**UGC Care Listed Journal**

**मराठवाडा इतिहास परिषद,**

**औरंगाबाद**

(रजि.नं. एफ ८२० / दि. २६.०८.१९८२)

**ISSN : 0976 – 5425**

# History Research Journal

# इतिहास संशोधन पत्रिका

**Issue. - XXXI** **January**

**अंक - एकतीस** **2024**

कार्यकारी संपादक

**डॉ. सोमनाथ रोडे**

**: संपादकीय मंडळ :**

डॉ. नारायण सूर्यवंशी डॉ. नितीन बावळे

डॉ. सुभाष बेंजलवार डॉ. प्रमोद चव्हाण

प्रा. सर्जेराव बनसोडे डॉ. भालचंद्र कुलकर्णी

या अंकात व्यक्त केलेली विचार-मते ही मराठवाडा इतिहास परिषद, औरंगाबाद अथवा संपादक किंवा संपादक मंडळ यांची अधिकृत मते नाहीत. त्यांच्याशी ते सहमत असतीलच असे नाही.

**UGC Care Listed Journal**

**History Research Journal**

**इतिहास संशोधन पत्रिका**

**Issue. - XXXI January**

अंक - एकतीस **2024**

**ISSN : 0976 – 5425**

☼ **प्रकाशक :**

**डॉ. नितीन बावळे**

सचिव, मराठवाडा इतिहास परिषद

शारदा महाविद्यालय, परभणी

जि. परभणी भ्रमणध्वनी - ९४२२१ १०४८९

☼ **मराठवाडा इतिहास परिषद, औरंगाबाद**

☼ **संपर्क :**

**प्राचार्य डॉ. सोमनाथ रोडे**

कार्यकारी संपादक

४ - शारदानगर, अंबाजोगाई रोड, लातूर

पीन : ४१३ ५३१ फोन : ०२३८२ - २२८०९०.

भ्रमणध्वनी : ७५१७९ ८५६९०

☼ **मुखपृष्ठ छायाचित्रे -** डॉ. धनाजी मासाळ व डॉ. दत्तात्रय कोरडे, सातारा

☼ **मुखपृष्ठ सजावट -** शिवप्रसाद डिझायनर्स, लातूर

☼ **मूल्य : रु. २५०/-**

पंचवार्षिक वर्गणी रु. १,०००/-

दशवार्षिक वर्गणी रु. २,०००/-

☼ **प्रकाशन दि. १२ जानेवारी २०२४**

☼ **अक्षर जुळवणी व मुद्रक :**

**विद्याभारती प्रकाशन**

गुजराती शाळेजवळ, मेन रोड,

लातूर - ४१३ ५१२

The publication of the MSS/ Journals/Proceedings- financially supported by the Indian Council of Historical Research and the responsibility for the facts, stated, options expressed and conclusion researched is entirely that of the author/ authors of the articles and the Indian Council of Historical Research accepts no responsibility for them.

# ● भूमिका ●

मराठवाडा इतिहास परिषद, औरंगाबाद ही राज्यभरातील इतिहास प्राध्यापक, अभ्यासक, संशोधक आणि विद्यार्थ्यांचे कृतिशील व्यासपीठ म्हणून इ. स. १९८० पासून कार्यरत आहे. इतिहास विषयात नवीन साधनांद्वारा मांडणी, लिखाण, संशोधन उपलब्ध करून देण्याचे काम परिषदेच्या व्यासपीठावरुन झाले आहे. मान्यवर संशोधक, अभ्यासक आणि इतिहासकारांनी अधिवेशनाच्या माध्यमातून मार्गदर्शन करण्याचे कार्य सातत्याने केले आहे.

संशोधनपर शोधनिबंध परिषदेने नियमितपणे प्रकाशित केले आहेत. इ.स. १९८५ ला 'निवडक शोधनिबंध' या शीर्षकाने अंकाचे प्रकाशन झाले. मात्र इ. स. १९९७ पासून परिषदेने 'इतिहास संशोधन पत्रिका' - 'History Research Journal' या नावाने शोधनिबंध प्रकाशित केले आहेत. अध्यक्षीय भाषण, सत्राध्यक्षांची भाषणे ही संशोधन पत्रिकेतून प्रकाशित करण्यात येत आहेत. १४ जून २०१९ पासून इतिहास संशोधन पत्रिकेचा समावेश 'UGC Care Listed Journal' मध्ये झालेला आहे, ही अत्यंत आनंदाची बाब आहे. परिषदेच्या व्यासपीठावरुन उत्कृष्ट शोधनिबंध सादर व्हावेत म्हणून परिषदेच्या वतीने तिन्ही विभागांतून उत्कृष्ट शोधनिबंधाला रोख रु. १५०० व प्रमाणपत्राचे पारितोषिक ३७ व्या अधिवेशनापासून देण्यास सुरुवात केली आहे. इतिहास संशोधन पत्रिका प्रकाशित करण्यामागची भूमिका स्थानिक संशोधन प्रकाशित व्हावे, नवीन संशोधकांना प्रकाशनासाठी संधी प्राप्त व्हावी आणि संशोधनासंदर्भात मार्गदर्शन आणि प्रेरणा मिळाव्यात अशी आहे. परिषदेच्या विचारपीठावरून आतापर्यंत सुमारे १८३० शोधनिबंध सादर झाले. त्यांपैकी परिषदेने ८७० शोधनिबंध प्रकाशित केले आहेत. प्रकाशनाची जबाबदारी संपादक मंडळ, इतिहास संशोधन पत्रिकेचे स्थायी सभासद, वर्गणीदार, वाचक, परिषदेचे अजिव सदस्य (१६४) व वार्षिक सदस्य आणि सातत्याने मौलिक आर्थिक साहाय्यता देणारी 'भारतीय इतिहास अनुसंधान परिषद, नवी दिल्ली' (आयसीएचआर) यांनी उचललेली आहे. त्याबद्दल सर्वांचे मन:पूर्वक आभार ! एकतीसाव्या अंकाचे वाचक स्वागत करतील ही अपेक्षा. मराठवाडा इतिहास परिषद कार्यकारिणी संपादक मंडळाने घेतलेल्या परिश्रमाबद्दल त्यांचे अभिनंदन करते. मराठवाडा इतिहास परिषदेने चार दशकांचा काळ यशस्वीरीत्या पूर्ण केला आहे. आतापर्यंत परिषदेने ३० 'इतिहास संशोधन पत्रिका' इतिहासाच्या अभ्यासकांसमोर सादर केल्या याचे मनोमन समाधान वाटते. आपणा सर्वांच्या सदिच्छेच्या बळावर परिषदेची भावी वाटचाल गतिमान होईल, असा आम्हास विश्वास वाटतो.

**डॉ. नितीन बावळे**
सचिव

**डॉ. नारायण सूर्यवंशी**
अध्यक्ष

**सर्व सदस्य**

**मराठवाडा इतिहास परिषद, औरंगाबाद**

# ● संपादकीय ●

(राष्ट्रीय स्तरावरील अधिवेशन)

मराठवाडा इतिहास परिषद हे इतिहास संशोधनासाठी कृतिशील असलेले एक प्रमुख व्यासपीठ आहे. इ. स. १९८० पासून आजपर्यंत मराठवाडा इतिहास परिषदेच्या व्यासपीठावर अनेक जुन्या व नव्या पिढींतील संशोधकांनी आपले शोधनिबंध सादर केले आहेत. महाराष्ट्रातील मान्यवर व ज्येष्ठ इतिहास संशोधकांच्या प्रेरणा आणि मार्गदर्शन नवोदित संशोधकांना देण्याचा पत्रिकेद्धारे प्रामाणिक प्रयत्न मराठवाडा इतिहास परिषदेने केला आहे. आता ४२ व्या राष्ट्रीय स्तरावरील अधिवेशनानंतर हा एकतीसावा अंक प्रसिद्ध केला जात आहे. या अंकात प्रामुख्याने शिवनेरी महाविद्यालय आणि श्री अनंतपाळ नूतन विद्यालय, शिरुर अनंतपाळ, जि. लातूर येथे दि. ०३-०४ डिसेंबर २०२२ रोजी आयोजित केलेल्या अधिवेशनात सादर झालेल्या शोधनिबंधांचा अंतर्भाव करण्यात आलेला आहे.

मराठवाडा इतिहास परिषदेच्या अधिवेशन प्रसंगी 'इतिहास संशोधन पत्रिका' ही नियमितपणे प्रसिद्ध केली जाते. या अधिवेशनात प्रसिद्ध होणारा पत्रिकेचा हा एकतीसावा अंक आहे. आतापर्यंतच्या ४२ अधिवेशनांत सुमारे १८३० पेक्षा अधिक शोधनिबंध सादर झाले आहेत. त्यांपैकी ८७० शोधनिबंध परिषदेच्या 'इतिहास संशोधन पत्रिका' मधून प्रसिद्ध झाले आहेत. महाराष्ट्रात केवळ इतिहास संशोधनाला वाहिलेल्या ज्या मोजक्या संशोधन पत्रिका आहेत त्यात 'इतिहास संशोधन पत्रिके' चा आवर्जून उल्लेख करावा लागेल.

इतिहास संशोधन पत्रिकेचे नियमित वार्षिक प्रकाशन परिषदेचे सन्माननीय सभासद, महाविद्यालय आणि विद्यापीठे, ग्रंथालय व संग्रहालय, स्थायी सदस्य आणि 'आयसीएचआर' (ICHR) नवी दिल्ली यांच्या मौलिक सहकार्याने सुरु आहे. मराठवाडा इतिहास परिषदेवर अतूट प्रेम करणाऱ्या १५३ स्थायी सदस्यांनी प्रत्येकी एक हजार, दोन हजार व पाच हजार रुपयांचा स्थायी निधी देऊन इतिहास संशोधन पत्रिकेची आर्थिक बाजू भक्कम करण्यात हातभार लावला आहे. हा सर्व स्थायी निधी बँकेत मुदत ठेवीच्या रुपाने जमा आहे. स्थायी निधीची रक्कम रुपये पाच लाखांपर्यंत नेण्याचा इतिहास परिषदेचा मानस आहे. जेणेकरून येणाऱ्या व्याजावर मराठवाडा इतिहास संशोधन पत्रिकेचा प्रकाशनखर्च भागविला जावा, अशी योजना आहे. इतिहास संशोधन पत्रिका अंक २७ साठी 'आयसीएचआर' चे पंचेचाळीस हजार रुपयांचे अनुदान मंजूर झाले त्याबद्दल त्यांचे मन:पूर्वक आभार व्यक्त करणे संपादक मंडळ आपले कर्तव्य समजते.

२९ व्या अंकासाठी देखील अनुदानाचा प्रस्ताव 'आयसीएचआर' कडे मंजुरीसाठी पाठविला आहे. मागील दहा वर्षापूर्वी संपादकीय मंडळाने प्रस्तुत पत्रिकेला 'आयएसएसएन' क्रमांक मिळविण्यासाठी यशस्वी प्रयत्न केले व आपल्या पत्रिकेस आयएसएसएन-०९७६-५४२५ हा अधिकृत क्रमांक प्राप्त झाला आहे. 'यूजीसी' च्या नवीन नियमांनुसार प्रकाशित लेख, ग्रंथ यांना आयएसएसएन क्रमांक असल्यास 'आयक्युएसी' ग्रेड सिस्टीम नमूद केली आहे. परिषदेने आतापर्यंत केलेल्या कार्याचे फलित म्हणजे १४ जून २०१९ पासून या संशोधन पत्रिकेचा समावेश 'UGC Care Listed Journal' मध्ये झालेला. ही अत्यंत जमेची बाजू आहे.

इतिहास संशोधन पत्रिकेचा अंक अधिकाधिक दर्जेदार आणि निर्दोष करण्याचा संपादकीय मंडळाचा प्रयत्न असतो. अंक प्रकाशन व वितरण करण्याचा एकूण खर्च लक्षात घेता प्रत्येक सदस्याने किमान एक अंक व्यक्तिश: खरेदी करावा, हा संपादकीय मंडळाचा आग्रह आणि विनंती या वर्षीही करीत आहोत. तद्वतच प्रत्येक महाविद्यालयासाठी किमान एक अंक संबंधित प्राध्यापकांनी आवर्जून नेण्याची व्यवस्था केली पाहिजे. 'इतिहास संशोधन पत्रिका / History Research Journal' बद्दल मान्यवर व्यक्ती व इतिहासकारांनी लिहिलेले अभिप्राय मराठवाडा इतिहास परिषदेच्या कृतिशील आणि संशोधनात्मक कार्याची पावतीच आहे, असे आम्ही मानतो. महाराष्ट्रात 'इतिहास संशोधन पत्रिका' इतिहास संशोधनाच्या क्षेत्रात सर्वमान्य व्हावी या दृष्टीने संपादक मंडळ प्रयत्नशील आहे.

इतिहास संशोधन पत्रिकेच्या अंकाचे मुद्रितशोधन करण्याची जबाबदारी डॉ. सुभाष बेंजलवार यांनी स्वेच्छेने पार पाडली आहे. सदरील अंकाचे प्रकाशन विद्याभारती प्रकाशन, लातूरचे श्री. रवि जोशी यांनी केले आहे. या अंकाचे डी.टी.पी. व पीडीएफ तयार करण्याची जबाबदारी श्री. महादेव स्वामी यांनी पार पाडली. अंकाची बाह्य आणि अंतर्गत सजावट मांडणी तसेच कलात्मक मुखपृष्ठ तयार करण्याचे कार्य शिवप्रसाद डिझायनर्स, लातूर यांनी मन:पूर्वक केले आहे. तसेच मुद्रित शोधनाचे मोलाचे सहकार्य श्री. शरद खर्चे, लातूर यांनी केले आहे. त्याबद्दल सर्वांचे ऋणनिर्देश व्यक्त करणे संपादक मंडळ आपले कर्तव्य मानते.

इतिहास संशोधन पत्रिकेचा एकतीसावा अंक वाचक, संशोधक व अभ्यासक यांच्या हाती देताना संपादकीय मंडळास आनंद होत आहे. अंक व अंकातील लेखासंबंधीच्या प्रतिक्रिया नि:संकोचपणे कळवून सहकार्य करावे, ही विनंती.

**डॉ. सोमनाथ रोडे**

कार्यकारी संपादक व संपादकीय मंडळ

# मराठवाडा इतिहास परिषद

## अध्यक्ष / सचिव यांचा कार्यकाल

| कार्यकाल | अध्यक्ष | सचिव |
|---|---|---|
| १९८०-१९८३ | डॉ. टी. व्ही. पथी | प्रा. मोहिनीराज भाले |
| १९८४-१९८६ | डॉ. प्रभाकर देव | प्रा. एन. के. बागूल |
| १९८७-१९८९ | प्रा. सोमनाथ रोडे | प्रा. व्ही. आर. मुळे |
| १९९०-१९९२ | प्रा. प्रभाकर पोहरे | डॉ. पी. ए. गवळी |
| १९९३-१९९५ | डॉ. बी. एस. ढेंगळे | डॉ. सतीश देशमुख |
| १९९६-१९९८ | डॉ. बी. एस. ढेंगळे | प्रा. यू. व्ही. बोकारे |
| १९९९-२००१ | डॉ. एन. एन. नगराळे | प्रा. पी. एल. बिलोलीकर |
| २००२-२००४ | डॉ. एस. एस. गाठाळ | प्रा. जी. के. शेटकार |
| २००५-२००७ | डॉ. अनिल कठारे | डॉ. ओ. बी. समदाणी |
| २००८- २०१० | डॉ. सुलभा मुरलीधर | प्रा. श्रीराम जाधव |
| २०११-२०१३ | डॉ. अनिल सिंगारे | डॉ. रामभाऊ मुटकुळे |
| २०१४-२०१६ | डॉ. राजेंद्र धाये | डॉ. सखाराम टकले |
| २०१७-२०१९ | डॉ. रामभाऊ मुटकुळे | डॉ. ओमशिवा लिगाडे |
| २०२०-२०२२ | डॉ. जाकेर पठाण | प्रा. विजय पांडे |
| २०२३-२०२५ | डॉ. नारायण सूर्यवंशी | डॉ. नितीन बावळे |

# मराठवाडा इतिहास परिषद, औरंगाबाद

## विद्यमान कार्यकारी मंडळ (२०२३-२०२५)

**अध्यक्ष** : डॉ. नारायण सूर्यवंशी

शिवनेरी महाविद्यालय, शिरूर अनंतपाळ, जि. लातूर

**उपाध्यक्ष** : डॉ. गोपालसिंह बच्छीरे

सिद्धार्थ महाविद्यालय, जाफ्राबाद, जि. जालना

**सचिव** : डॉ. नितीन बावळे

शारदा महाविद्यालय, परभणी

**सहसचिव**: डॉ. संजय पाईकराव

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

**कोषाध्यक्ष**: डॉ. विनोद बोरसे

आसारामजी भांडवलदार महाविद्यालय, कन्नड, जि. औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| **जिल्हा प्रतिनिधी** : | डॉ. जगदीश भेलोंडे | : | औरंगाबाद |
| | डॉ. प्रभाकर मिरकड | : | जालना |
| | डॉ. बाबासाहेब शेप | : | बीड |
| | डॉ. सुशिलकुमार सरवदे | : | उस्मानाबाद |
| | डॉ. किशन केंद्रे | : | नांदेड |
| | डॉ. एम.डी. दामाजीवाले | : | लातूर |
| | डॉ. गणेश माने | : | परभणी |
| | डॉ. उद्धव राऊत | : | हिंगोली |
| **महिला प्रतिनिधी**: | डॉ. विजया साखरे | : | कंधार, जि. नांदेड |
| | डॉ. रतन गंगणे | : | औरंगाबाद |


UGC Care Listed Journal : ISSN : 0976 - 5425

मराठवाडा इतिहास परिषद, औरंगाबादच्या 'इतिहास संशोधन पत्रिकेची रक्कम ONLINE / RTGS / NEFT द्वारे पाठविण्यासाठी बँक खात्याचा तपशील :

| | | |
|---|---|---|
| 1) खात्याचे नाव | : | मराठवाडा इतिहास परिषद, सोनवणे कॉम्प्लेक्स, मेन रोड, लातूर |
| 2) बँकेचे नाव | : | बँक ऑफ महाराष्ट्र, मेन ब्रँच, लातूर |
| 3) खाते नंबर | : | 20050377241 |
| 4) खाते प्रकार | : | सेव्हिंग |
| 5) IFSC कोड | : | MAHB 0000038 |

"इतिहासचक्र तोडण्याचा एकमेव उपाय म्हणजे
एखाद्या मानव समूहाच्या संस्कृतीने अंतर्गत समानतेच्या व
एकतेच्या बळावर स्वतःची प्रगती करीत असतानाच
अखिल मानवजातीच्या कल्याणाचे ध्येय बाळगणे हा आहे."

- डॉ. राममनोहर लोहिया

# महारोगी सेवा समिती, वरोरा

स्थापना १९४९

[ नोंदणी क्र. F-24(C) - महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त कायदा, १९५० अंतर्गत ]

मु. पो. आनंदवन,
तालुका : वरोरा, जिल्हा : चंद्रपूर,
महाराष्ट्र राज्य, (भारत), पिनः ४४२९१४

ई-मेल : financemss1951@gmail.com
वेबसाईट : www.anandwan.in

दुरध्वनी : + ९१ - ७१७६-२८२०३४
भ्रमणध्वनी : + ९१ - ८३८००९३०८३

---

आनंदवन : फेब्रु. २३ : मा : ०२ / ०१४२
चौदा : फेब्रुवारी : २०२३

डॉ. श्री. सोमनाथ रोडे
कार्यकारी संपादक : इतिहास संशोधन पत्रिका
४ शारदानगर, अंबाजोगाई रोड,
लातूर ४१३ ५३१
भ्र. : ७५१७९८५६९०, ९४२१४८३६११

सस्नेह नमस्कार .........

दि. २७.०१.२०२३ आपल्या पत्रासमवेत
इतिहास संशोधन पत्रिका : अंक अठ्ठाविसावा व एकोणतिसावा ....
दोन अभ्यासपूर्ण पुस्तके प्राप्त झाली. इतिहासारखा ... अत्यावश्यक असूनही कांहिशा उपेक्षिलेल्या गेलेल्या विशेषावरील खात्यनाम लेखकांच्या समृध्द लिखाणामुळे आणि छायाचित्रामुळे संग्राह्य झालेली आपली ही साहित्यसंपदा संस्थेच्या ' आनंद वाचनालयात ' विराजमान झाली असून इथे येणाऱ्या अभ्यासक / पर्यटकांना वाचनासठी आम्ही उपलब्ध करून दिलेली आहेत. या साहित्यिक भेटीचे मन:पूर्वक स्वागत ...सहर्ष आभार !

इतिहास .....
पुस्तकांच्या बरोबरीने सामुहिक वाचन आणि प्रसिध्दी माध्यमातून प्रसारित होणे आवश्यक आहे. त्यासाठी आपल्यासारख्या इतिहासप्रेमी मंडळींनी प्रयास करणे आवश्यक आहे. हे सहजशक्य नसले तरी आवाक्याबाहेरचे नाही.

आम्हा आमटे आणि आनंदवन परिवाराच्यावतिने ....
आपल्या .... आपल्या सहकारी अभ्यासकांना हार्दिक शुभकामना ....................

सदैव स्वागत .... आनंदवन, सोमनाथ, हेमलकसादि प्रकल्पावर !
स्नेहादरासह ....
आपले;

डॉ. विकास आमटे
सचिव – महारोगी सेवा समिती,, वरोरा

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | लेखक | पृष्ठांक | शिर्षक |
|---|---|---|---|
| | श्री. प्रभाकरराव कुलकर्णी | १५ | उद्‌घाटन सत्रातील भाषण |
| | डॉ. प्रकाश मा. मसराम | २९ | ऐतिहासिक संशोधन पद्धतीतील नवे प्रवाह : अन्वयार्थ, मीमांसा व आवश्यकता |
| | **प्राचीन विभाग** | | |
| १. | Mr. Ravi Dinkar Khillare | ४३ | Buddhist Sects in Deccan in Post Mauryan Period |
| २. | Mr. Siddharth R. Dawane | ५२ | Jivaka - A physician from Ancient India |
| ३. | श्री. वैजनाथ विश्वनाथ काळदाते | ६४ | नागनाथ मंदिरावरील भैरव मूर्ती : एक शिल्प : शास्त्रीय अभ्यास |
| ४. | डॉ. संजय पाईकराव | ६९ | औरंगाबाद बौद्ध लेणी शिल्पातील अष्टभय जातक शिल्प-एक नवे आकलन |
| ५. | डॉ. जगदीश व्यं. भेलोंडे | ७९ | शंख व शंखमूर्ती |
| ६. | श्री. नीळकंठ विष्णू काळदाते | ८७ | नागनाथ मंदिरावरील षडानन कार्तिकेय मूर्ती : एक अभ्यास |
| ७. | डॉ. सुभाष बेंजलवार | ९४ | सातवाहनकालीन कला - स्थापत्यातून प्रतिबिंबित होणारा सांस्कृतिक समन्वय |
| | **गोषवारा** | | |
| १. | श्रीमती अनिता प्रल्हाद आढागळे | ९९ | महायान पंथातील स्त्रीवादी दृष्टिकोन : विशेष संदर्भ औरंगाबाद लेणी |
| २. | श्रीमाला के. जी. | १०१ | शिरुर अनंतपाळ येथील चालुक्य शैलीतील मूर्तिशिल्पांची निरीक्षणे |
| | **मध्ययुगीन विभाग** | | |
| १. | डॉ. अनिल सिंगारे | १०५ | छत्रपती शिवरायांचे पुरोगामित्व |
| २. | प्रा. सर्जेराव चांगदेव बनसोडे | ११० | पेशवे - निजाम संबंध : एक चिकित्सक आकलन |




UGC Care Listed Journal : ISSN : 0976 - 5425

| अ.क्र. | लेखक | पृष्ठांक | शिर्षक |
| --- | --- | --- | --- |
| ३. | डॉ. नितीन बावळे | ११७ | छत्रपती शिवाजी महाराजांच्या यशाचे रहस्य - युद्धनीती |
| ४. | डॉ. नारायण सूर्यवंशी | १२२ | महाराष्ट्रातील यादवांची हिंदू सत्ता व तिचा शेवट : एक अभ्यास |
| ५. | Dr. Aneesa Iqbal Sabir | १२८ | Emperor Aurangzeb: An Educationist |
| | **गोषवारा** | | |
| १. | श्री. कृष्णा बबनराव काळे | १४० | संत एकनाथांच्या जीवनातील गुरुंचे स्थान व त्यांनी केलेला गुरुंचा गौरव |
| | **आधुनिक विभाग** | | |
| १. | Dr. Dhanaji Baburao Masal | १४५ | Women's Participation in Freedom Movement in Solapur |
| २. | श्रीमती सीमा सुर्यभान जाधव | १५१ | १९ व्या शतकातील सामाजिक सुधारणा चळवळी : विशेष संदर्भ 'सत्यशोधक समाज' |
| ३. | डॉ. विठ्ठल व्यंकटराव घुले | १५८ | जातिव्यवस्था आणि स्त्रीमुक्ती |
| ४. | डॉ. एस. डी. सावंत | १६९ | जम्मू आणि काश्मीरचे भारतासोबतचे विलीनीकरण |
| ५. | डॉ. गिरीधर नागोराव सोमवंशी | १७४ | आर्थिक राष्ट्रवादातून भारतीय राष्ट्रवादाची जडणघडण |
| ६. | डॉ. एम. डी. दामाजीवाले | १८० | निजाम राज्यातील शिवलिंग देशमुख व रामराव ऊर्फ जंगबहादुरचा लढा |
| ७. | डॉ. ओमशिवा लिगाडे | १८७ | संशोधन आणि अन्वयार्थ : सहसंबंध |
| ८. | डॉ. विजय पांडुरंगराव कुलकर्णी | १९२ | वि. दा. सावरकरांच्या सैनिकीकरण सिद्धांताची वर्तमान उपयुक्तता |
| ९. | श्री. संदीप भरतराव कुमठेकर | १९९ | हैद्राबाद मुक्तिसंग्रामातील स्वतंत्रता सेनानी : पं. श्रीनिवासराव कुमठेकर |

| अ.क्र. | लेखक | पृष्ठांक | शिर्षक |
|---|---|---|---|
| १०. | श्रीमती मधुरा वामनराव जगताप | २०९ | जातीविरोधी चळवळीतील वैचारिक क्रांतिशलाका - गेल ऑम्वेट |
| ११. | डॉ. सचिन उत्तमराव हंचाटे | २१३ | गव्हर्नर जनरल लॉर्ड विल्यम बेंटिकचे कार्य |
| १२. | श्रीमती मायादेवी साहेबराव खळगे | २२० | डॉ. बाबासाहेब आंबेडकरपूर्व अस्पृश्य चळवळीतील शिलेदार |
| | **गोषवारा** | | |
| १. | श्री. आनंद मारोतीराव पौळकर | २२६ | मानव व पृथ्वी यांच्या सहसंबंधाचा पर्यावरणीय इतिहास |
| २. | श्रीमती हाजेरा बानो अजहर आफाखा | २२७ | रेशमी रुमाल आंदोलन : एक परिचय |
| ३. | डॉ. शामसुंदर दिनकर रत्नपारखी | २२९ | हैद्राबाद राज्याची भौगोलिक रचना (सन १७४७ - १९४८) |
| | **संकिर्ण** | | |
| १. | मराठवाडा इतिहास परिषद : अधिवेशने (दृष्टिक्षेपात) | २३१ | |
| २. | मराठवाडा इतिहास परिषद : अजीव सभासद यादी | २३७ | |
| ३. | मराठवाडा इतिहास परिषद : संशोधन पत्रिका स्थायी सभासद यादी | २४५ | |
| ४. | मराठवाडा इतिहास परिषद : उत्कृष्ठ शोध निबंध पारितोषिके विजेते | २५० | |

# उद्घाटन सत्रातील भाषण

✵

## श्री. प्रभाकरराव कुलकर्णी

दिनांक ३ व ४ डिसेंबर २०२२ या दिवशी अनंतपाळ शिरूर या पुण्य नगरीत मराठवाडा इतिहास परिषदेचे (४२ वे) अधिवेशन संपन्न होत आहे. शिवनेरी महाविद्यालय व श्री अनंतपाळ नूतन विद्यालयाच्या संयुक्त पुढाकाराने हे अधिवेशन अनंतपाळ नूतन विद्यालयाच्या प्रांगणात साजरे होत आहे. या दोन विद्या प्रतिष्ठानाच्या दृष्टीने तसेच या नगरीच्या व परिसराच्या दृष्टीने सुद्धा ही घटना ऐतिहासिक तर आहेच पण संस्थांचा गौरव वाढविणारी आहे तसेच या अधिवेशनात सहभागी होणारे प्राध्यापक, इतिहास संशोधक व मान्यवर विद्वान मार्गदर्शक यांच्या दृष्टीनेसुद्धा या नगरीत संपन्न होणारे हे अधिवेशन त्यांना अभिमान वाटावा असेच आहे.

**"काव्यशास्त्रविनोदेन कालो गच्छति भीमताम्"** या न्यायाने या नगरीतील लोक जीवन जगतात. उपरोक्त दोन्ही संस्था या नगरीतील साहित्य संस्कृति संवर्धन मंडळ व अनंतपाळ नवयुवक वाचनालय यांच्या वतीने सतत समाज-प्रबोधनाचा कार्यक्रम राबविला जातो. मराठवाडा व महाराष्ट्र पातळीवरील विद्वानांनी या नगरीत हजेरी लावलेली आहे. साहित्य संमेलनाचे आयोजन, आचार्य कुलाचे महाराष्ट्र पातळीवरील अधिवेशन या ठिकाणी संपन्न झाले आहे. भजन, कीर्तन व प्रवचनाचे कार्यक्रम येथील शिव व हरिभक्त मंडळीकडून सतत होत असतात. मराठवाडा इतिहास परिषदेच्या रूपाने या नगरीच्या सांस्कृतिक उपक्रमांत मानाचा तुरा खोवला आहे.

ही नगरी राजकीयदृष्ट्यासुद्धा अत्यंत जागरूक आहे. "**if you do not think politics, politics will think of you**" असे एक इंग्रजीतील वचन आहे. जर तुम्ही राजकारणाचा विचार करणार नसाल तर राजकारण तुमचा विचार करील व आपल्या मार्गाने तुम्हास ओढीत नेईल. ही नगरी निजाम राजवटीत राजकारणाचा विचार करणारी होती. म्हणूनच या नगरीने दोन स्वातंत्र्यसैनिक दिले. इतिहास काळातील राजकारणाचा विचार करता या नगरीतील ७ बुरूजांची गडी


UGC Care Listed Journal : ISSN : 0976 - 5425

याची साक्ष देते. अशी विशाल व संरक्षणाच्या दृष्टीने मजबूत गडी आपल्या लातूर जिल्ह्यात पाहावयास मिळणार नाही. या गडीचे मालक येथील वतनदार पाटील याचा राजदरबारी मोठा मान व दबदबा होता. त्यांना या गावी सुमारे ७०० एकर जमीन इनाम म्हणून होती. सुमारे तीनशे-चारशे वर्षांपूर्वी बांधलेली गडी सध्या भग्न अवस्थेत आहे.

ज्या नगरीत हे अधिवेशन संपन्न होत आहे त्या नगरीचा थोडा भूगोल व इतिहास ही आपल्या ऐतिहासिक व शोधक दृष्टीस आणून द्यावा असे वाटते. **“१९२४ साली भारत सरकारने तत्कालीन पुराण वस्तू संशोधन खात्याचे प्रमुख श्री. राखल दास बॅनर्जी यांनी मोहनजोदरो व हडप्पा येथील (सध्या पाकिस्तानातील) ठिकाणाचे उत्खनन केले व सर्व जगास एका भारतीय संपन्न संस्कृतीचे दर्शन घडविले.”** या उत्खननात जी नगररचना ज्ञात झाली ती थोडक्यात येणेप्रमाणे आहे. नगराच्या सभोवताल तटबंदी, नगरातील मोठे रस्ते दक्षिणोत्तर व त्यांना येऊन मिळणारे छोटे रस्ते पूर्व-पश्चिम व तेसुद्धा काटकोनात नगररचनेचा हा जो आराखडा आहे, अगदी तसाच आराखडा या नगरीचा होता. या नगरीस चोहोकडून तटबंदी होती. पहिल्या सुमारे ७ ते ८ फूट उंचीपर्यंत दगडी बांधकाम व त्याच्या वर ५ ते ७ फुटांपर्यंत मातीच्या केंगलाचे बांधकाम होते. भिंतीची रूंदी सुमारे ७ फुटांची होती. या भिंतीचे सर्व बांधकाम कमवलेल्या मातीमध्ये होते. उत्तर व दक्षिणेकडे दोन वेशी होत्या. त्यांना मोठ मोठे लाकडी दरवाजे होते. या वेशीलगत आतल्या बाजूस राखणदारासाठी राहण्याची सोय होती. तेथे एस्कर राहात असत. ते गावात भाकरी मागून व गावातून मिळणाऱ्या बलुत्यावर जीवन जगत असत. पूर्व व पश्चिम भागात दोन खिंडी होत्या. दोन मोठ्या वेशी व दोन लहान खिंडी या चारही मार्गांचे दरवाजे सायंकाळी बंद होत असत व ही नगरी सुरक्षित राहात असे.

ही नगरी व हा परिसर कल्याणीच्या चालुक्य राजाच्या आधिपत्याखाली होता. त्याच्याच पुढाकाराने या नगरीत तीन हेमाडपंथी देवालयांची उभारणी झाली. एक अनंतपाळाचे, दुसरे नारायण मंदिर व तिसरे मल्लिकार्जुन मंदिर. सध्या जास्त सुस्थितीत असलेले व सुप्रसिद्ध असलेले मंदिर म्हणजे अनंतपाळाचे मंदिर.

या मंदिरात एकूण ३ शिलालेख आहेत. त्यांपैकी दोन्हींचे वाचन शक्य नाही. कारण ते अगदी पुसट झाले आहेत. तिसरा शिलालेख मंदिरात नंदीच्या उजव्या बाजूस सुट्या स्वरूपात उभा ठेवलेला आहे. तो कानडी भाषेत आहे. त्याचे वाचन झाले आहे. त्या लेखानुसार या नगरीचे नाव श्रीपूर असे आहे. या मंदिराचे बांधकाम अगदी वैशिष्ट्यपूर्ण आहे. माती, चुना व सिमेंट यांचा या बांधकामात कुठेच उपयोग नाही. केवळ एक दगड दुसऱ्या दगडावर अशा रीतीने बसविला आहे की त्याची जोडणी अगदी अजोड व मजबूत आहे. या पद्धतीच्या बांधकामास शुष्क संधीचे बांधकाम म्हणतात.

जगातील मानवी संस्कृतीचा उद्‌गम व विकासाचा विचार करता ही गोष्ट स्पष्ट होते की, अगदी प्राचीन मानवी संस्कृती नदीकाठीच निर्माण झाली व तिथेच विकसित झाली. याप्रमाणे शिरूर अनंतपाळ या नगरीची वसाहत घरणी नदीकाठी शेकडो वर्षांपूर्वी झाली. हा परिसर घरणी व वांजरा या नद्यांमुळे सुपीक व संपन्न बनला आहे. या परिसरात शेतीला पाणीपुरवठ्याचे दोन मध्यम प्रकल्प आहेत व छोटे-छोटे लहान प्रकल्पही भरपूर आहेत. शेतीच्या दृष्टीने हा भाग संपन्न आहे. ऊस व सोयाबीन या पिकांसाठी प्रसिद्ध आहे. आता कोठे येथील शेतकरी फळ बागायतीकडे वळत आहेत.

ही इतिहास परिषद मराठवाडा विभागाची आहे. मराठवाड्यातील दोन विद्यापीठांतर्गत (४००) या महाविद्यालयाची आहे. या महाविद्यालयांतील सुमारे (२००) प्रतिनिधी व काही शोधनिबंध वाचक यांचा यात सहभाग आहे. आपण मराठवाड्यातील लोक फार सुदैवी आहोत. कारण आपण फार मोठ्या वैभवशाली अशा आध्यात्मिक, वैचारिक तसेच राजकीय विरासतीचे वारसदार आहोत. पैठण ही दक्षिण काशी एकनाथ महाराजांच्या वास्तव्याने पुनीत झालेली. या नगरीसच ज्ञानेश्वरीच्या शुद्धीकरणाचा एकमेव अधिकार प्राप्त झाला. जालना जिल्ह्यातील जांब या गावाने रामदास स्वामींना जन्म देऊन संत पण राजकीय संतपरंपरा निर्माण करून समाज बलसंपन्न व चारित्र्यसंपन्न करण्याचा प्रयत्न केला. मध्ययुगात देवगिरीच्या यादवाने एक सुवर्णयुग निर्माण केले. खुद्द ज्ञानेश्वरांनी यादव घराण्यातील राजा रामदेव राय यांच्या संबंधाने खालील गौरवोद्‌गार काढले आहेत.

**"तेथ यदु वंश विलासु । जो सकल कला निवासु ।।**
**न्यायाते पोशी । क्षितिशु श्री रामचंद्र ।।"**

देवगिरीसारख्या अभेद्य व अजिंक्य अशा किल्ल्याची निर्मितीसुद्धा याच मराठवाड्यातील. आधी कळस मग पाया या अद्‌भूत व अभिनव पद्धतीने साकार झालेले वेरूळ येथील कैलास लेणे व अजिंठा येथील लेणीतील चिरस्मरणीय व अजरामर अशी रंगीत चित्रकला हा सुद्धा सर्व जागतिक वारशाचा गौरवशाली ठेवा तो याच मराठवाड्यातील. एकनाथ महाराज, गुरू जनार्दन स्वामीसुद्धा याच मराठवाड्यातील. लीळाचरित्र कार म्हाईम भट्ट हे मराठवाड्यातील सराळे या गावचे. आद्य मराठी कवयित्री महदंबा ही मराठवाड्यातीलच. तिने रचलेले धवळे प्रसिद्ध आहेत. मराठीचे आद्य कवि विवेकसिंधुकार मुकुंदराज हे मराठवाड्यातीलच. भारतातील १२ ज्योतिर्लिंगांपैकी परळी वैजनाथ, वेरूळ येथील घृष्णेश्वर व औंढा नागनाथ हे तीनही ज्योतिर्लिंग मराठवाड्यातीलच. अंबाजोगाईची योगेश्वरी देवी व तुळजापूरची भवानी देवी ही दोन्ही शक्तिपीठेसुद्धा मराठवाड्यातीलच.

स्वामी रामानंद तीर्थांनी मराठवाड्यातच नव्हे तर संपूर्ण हैद्राबाद राज्यात महात्मा गांधींच्या विचाराचे जागरण केले. संपूर्ण हैद्राबाद संस्थान निजामाच्या गुलाम-गिरीतून मुक्त केले. वारकरी सांप्रदायाचा उद्‌गाता याच भूमीशी संबंधित तसेच हिंदवी स्वराज्याचा निर्मातासुद्धा याच भूमीशी संबंधित होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची कर्मभूमीसुद्धा मराठवाडाच होती. सेतु माधवराव पगडी यासारखे इतिहास संशोधक यांचा जन्म मराठवाड्यातील निलंगा या गावचा. संस्कृत भाषेचे व वेद वाङ्‌मयाचे गाढे अभ्यासक मराठवाड्यातील औसा तालुक्यातील नागरसोगा या गावचे. शिख पंथाचे धर्मगुरू व खालसा पंथाचे संस्थापक गुरू गोविंद सिंग यांची कर्मभूमी मराठवाड्यातील नांदेड हीच आहे. मराठवाड्याच्या विकासाचा ध्यास घेणारे व त्याच्या पूर्तीसाठी मराठवाडा जनता विकास परिषदेच्या माध्यमातून प्रयत्न करणारे हैद्राबाद मुक्तिलढ्याचे सेनानी गोविंदभाई श्रॉफ हेही मराठवाड्यातीलच. आपल्या अलौकिक बुद्धिमत्तेने अख्ख्या महाराष्ट्रात वैचारिक क्षेत्रात आपला अमीट असा ठसा उमटवून नवचैतन्याचे चिकित्सक असे व्यासपीठ निर्माण करणारे नरहर कुरूंदकर हे सुद्धा मराठवाड्यातीलच.

प्राध्यापक हेरॉल्ड जे लॉस्की यांच्या तोडीचे राजकारणाचे व्याकरण शिकविणारे, समाजवादी विचारसरणीच्या अनेक पिढ्या घडविणारे प्रबोधनकार प्राचार्य ना. य. डोळे यांनी मराठवाड्यातील उदगीरलाच आपली कर्मभूमी मानली. वैचारिक व प्रबोधन क्षेत्रात आपल्या पुरोगामी वैचारिक कर्तृत्वाने तळपणारे आधुनिक प्रबोधनकार डॉ. जनार्दन वाघमारे व प्राचार्य नागोराव कुंभार हे सुद्धा मराठवाड्यातील लातूर या नगरीचे. आधुनिक संत श्री विनोबा भावे व कर्मतपस्वी बाबा आमटे यांच्या विचाराचा व कार्याचा महाराष्ट्रभर जागर करणारे इतिहास अभ्यासक डॉ. सोमनाथजी रोडे हे सुद्धा मराठवाड्यातील लातूर या नगरीचेच. भक्तीमार्गातील वारकरी पंथातील संतपदाला पोहोचलेले श्री धुंडा महाराज देगलूरकर व लिंगायत धर्मातील राष्ट्रसंत डॉ. श्री. शिवलिंग शिवाचार्य महाराज या उभयतांनी महाराष्ट्राला एका विशिष्ट उंचीपर्यंत नेऊन पोहोचविले. ते दोघेही मराठवाड्यातीलच. दक्षिण गंगा म्हणून गौरविलेल्या गोदावरीने या मराठवाड्यास संजीवनी दिली. गोदावरी काठची संस्कृती म्हणजेच मराठवाड्याची संस्कृती ही ओळख देशास करून दिली. मराठवाड्याची व पर्यायाने महाराष्ट्राची मराठी संस्कृती याच नदीच्या काठी साकारली व भरभराटीला आली. अनेक संतांनी, अनेक विचारवंतांनी व अनेक राजधुरंधर राजकारण्यांनी ही मराठवाड्याची भूमी व येथील संस्कृती वैभवसंपन्न केलेली आहे. या भूमीचे व या संस्कृतीचे आपण वंशज आहोत म्हणून आपणही गौरवशाली आहोत.

**"दुर्लभम भारते जन्म, महाराष्ट्र त्वतिदुर्लभम्"**

भारतात जन्माला येणे हे दुर्लभ असले तरी महाराष्ट्रात जन्माला येणे दुर्लभतर आहे. माझ्या मते मराठवाड्यात जन्माला येणे दुर्लभतम आहे.

येथे संपन्न होणारी ही एक इतिहास परिषद आहे. मी या परिषदेच्या संयोजकांपैकी एक या नात्याने, संयोजक संस्थांचा सभासद या नात्याने तसेच या गावचा व परिसरातील एक नागरिक या नात्याने मी माझे इतिहासविषयक काही विचार (जे की माझे नसून संकलित केलेले आहेत) ते आपल्यासमोर व्यक्त करीत आहे.

इतिहास हा एक संस्कृत शब्द आहे. त्याची फोड इति-ह-आस अशी आहे. इति म्हणजे असे, ह ला विशेष अर्थ नाही. आस म्हणजे घडले. इतिहास म्हणजे असे घडले असा अर्थ होतो. इतिहासाच्या अभ्यासकाने इतिहास म्हणजे जे जे घडले त्या सर्वांचा प्राथमिक वृत्तान्त अशा शास्त्रशुद्ध व्याख्येपासून सुरूवात केली पाहिजे. इतिहास काळात जी घटना घडते त्याबद्दल इतिहासकारांत वाद होत नाहीत. वाद होतो ती घटना कशी घडते व का घडते हे समजून घेण्यात व समजून सांगण्यात. म्हणूनच इतिहासाच्या भिन्न उत्पत्ती निर्माण होतात.

## उत्पत्ती :

### १) देववाद व दैववाद :

ईश्वर हा सर्व विश्वाचा निर्माता असल्यामुळे त्याच्या मर्जीनुसारच जगातील सर्व घटना घडतात. ईश्वराच्या मर्जीनेच एक कालचक्र फिरत असते. त्या चक्रानुसारच सर्व घटना घडतात. एक काळ या चक्र सिद्धांताचा चिनी उद्‌गाता टुंग चुंग शू हा आहे. इराणी कल्पना अशी आहे की, १२ हजार वर्षांचे एक कालचक्र आहे. ग्रहगोलाच्या स्थानाशी व त्याच्या गतीशी मानवी घडामोडीचा संबंध आहे. ख्रिस्ती कल्पना अशी आहे की, मानवी इतिहासाचा जनक ईश्वर आहे. ग्रीसचा पायथागोरस असे म्हणतो की, विशिष्ट नियमानुसार सर्व ग्रहांचे व पृथ्वीचे भ्रमण चालू असते. विशिष्ट कालांतराने सर्व ग्रहाचे व पृथ्वीसुद्धा पूर्वी होते त्या स्थानीच येतात. त्याचप्रमाणे पृथ्वीवरील सर्व सजीवांची स्थिती ही पूर्वीसारखीच होते. इतर संस्कृतीप्रमाणे भारतातही दैवी शक्तीवर विश्वास होता व आहे.

### २) नदीकाठ :

रॉट झेल या इतिहासकाराने व विचारवंताने नाईल, गंगा, हो हांग हो,यांगत्से, टायग्रीस, युफ्रेटिस, टायबर इत्यादी नदीच्या काठी उदयास आल्या त्या संस्कृतीचा अभ्यास करून हे दाखवून दिले की, मानवी इतिहास नदी काठी घडत असतो.

### ३) राष्ट्रीयत्व :

प्रत्येक राष्ट्राचा एक वेगळा स्वभाव असतो. त्यानुसारच एक वेगळी संस्कृती जन्म घेत असते. त्यानुसारच जगाचा इतिहास घडतो. उदा. भारत, ईजिप्त, जर्मनी वगैरे राष्ट्र.

४) **वंशवाद :**

१) गोबिनो - वंशवादी फ्रेंच इतिहासकार आहे. जगातील भिन्न-भिन्न संस्कृतींचा अभ्यास करून त्याने असे मत मांडले की, आतापावेतो मानव जातीने भिन्न-भिन्न क्षेत्रांत जी प्रगती केली तिची परिस्थितिजन्य वेगवेगळी रूपे असली तरी एकूणच सर्व कर्तृत्वाचे श्रेय एकाच मानव गटाकडे आहे तो म्हणजे ट्युटानिक वंश. या वंशाचे लोक गोरे आहेत.

२) ग्रेट - हा अमेरिकन वंशवादी इतिहासकार. त्यांच्या मते विशिष्ट मानवी वंशानेच आजपर्यंत सर्व मानवी संस्कृतीची प्रगती केली आहे. हा विचारवंत मानवी प्रगतीची सर्व श्रेय नारडेक वंशास देतो.

३) हिटलर - वंशवादाचा पुरस्कर्ता नारडीक वंश हाच शुद्ध वंश आहे. जर्मनी याच वंशाचा आहे. या नारडीक वंशासच जगावर राज्य करण्याचा अधिकार आहे. हाच नाझी वाद आहे.

५) **नैसर्गिक विकासवाद :**

स्पेंगलर - हा जर्मन इतिहासकार आहे. "दि डिकलाईन ऑफ दी वेस्ट" हा त्याचा ग्रंथ. त्याच्या मते जगात आठ वेगवेगळ्या संस्कृती आहेत. त्या एकमेकांपासून वेगवेगळ्या असल्या तरी त्याचा जीवन मार्ग एकच आहे. मानवी जीवन ज्या प्रकारे बाल्य, तारूण्य, प्रौढत्व आणि मृत्यू या अवस्थांतून जाते त्याच अवस्थांतून प्रत्येक संस्कृती मार्गक्रमण करते. प्रत्येक संस्कृतीचे आयुष्यमान ठरलेले असते.

६) **संस्कृतीची वाटचाल तीन अवस्थांतून :**

सोरोकिन - या इतिहासकाराने भिन्न-भिन्न संस्कृतींचा अभ्यास करून असा सिद्धांत मांडला की, मानवी जात प्रथम धार्मिक व आध्यात्मिक जीवनपद्धती पसंत करते. कालांतराने या अवस्थेचा कंटाळा येतो, समाजात विकार उत्पन्न होतात, भौतिक सुख-सोयीची आवड निर्माण होते. समाज भोगवादी बनतो, काही काळानंतर त्यास या अवस्थेचाही कंटाळा येतो. पुन्हा ती धार्मिक, आध्यात्मिक जीवन पद्धतीकडे वळते. अशा प्रकारे समाजाची वाटचाल होते म्हणजे इतिहास घडतो.

## ७) निसर्ग चक्र प्राध्यापक हटींग्टन :

१) यांनी हजारो वर्षांच्या पर्जन्यमानाचा अभ्यास करून त्यानुसार वृष्टी आणि अवर्षण यानुसार संस्कृतीची प्रगती व अवनती घडते, असा सिद्धांत मांडून इतिहास या प्रकारे घडतो असे प्रतिपादन केले.

२) थिओडोर रूझावेल्ट - अमेरिकेचे माजी अध्यक्ष यांनी असा सिद्धांत मांडला की, समाजजीवनात काही कालखंड असे येतात की, विकास खुंटतो, समाजप्रवाह पतित होतो, काही मार्ग सुचत नाही पण कालांतराने याच समाजातील काही तरूण नवे मार्ग, नवे विचार सुचवितात, नवचैतन्य निर्माण करतात तोच हा इतिहास. उदा. टिळक, गांधी, सुभाषचंद्र बोस, लेनिन, माओ वगैरे. काही मोठी माणसे समाजावर प्रभाव टाकतात पण तो प्रभाव अल्पजीवी असतो. उदा. सिजर, नेपोलियन, सिकंदर वगैरे. काही मोठी माणसे समाजावर प्रभाव टाकतात व तो प्रभाव दीर्घकालीन असतो. उदा. गौतम बुद्ध, महावीर, महात्मा गांधी, कन्फोसिअस, ताओ वगैरे.

'काळ राज्याचा कारण असतो का, राजा काळाचा कारण असतो' धर्मराजाच्या या प्रश्नास पितामह भीष्मांनी जे उत्तर दिले ते असे...

**कालो वा कारणंम राज्ञो राजा वा काल कारणंम् ।**
**इति ते संशयो मा भूद राजा कालस्य कारणंम् ।।**

काळ हा राज्याला कारण होतो की राजा हाच काळाला कारण होतो याविषयी तू संशयात पडू नकोस. कारण राजा हाच काळाला कारण आहे. म्हणजेच राजा हाच इतिहास घडवितो.

## ८) विरोध विकास वाद :

१) हेगेल - जर्मन तत्त्वज्ञ यांच्या मते समाजाची प्रगती किंवा विकास हा विचाराच्या विरोधातून व समन्वयातून होत जातो. प्रथम एक विचार मांडला जातो, त्याच्या विरोधी दुसरा विचार निर्माण होतो. कालांतराने त्या दोन्ही विचारांत समन्वय निर्माण होतो. पुढे चालून हा समन्वयी विचारच मुख्य विचार म्हणून पुढे येतो. त्यात पुन्हा विरोधी विचार निर्माण होतो व कालांतराने त्याचा पुन्हा समन्वय निर्माण होतो. अशाच पद्धतीने समाज विकास करतो. म्हणजेच त्याचा इतिहास हा घडत जातो. (थेसिस, अँटिथेसिस, सेंथेसिस)

२)	कार्लमार्क्स - कार्ल मार्क्सनेही हेगेलची पद्धतीच मान्य केली व वर्ग विरोधाचा विचार मांडला. समाजातील आहे रे आणि नाही रे हे जे दोन वर्ग आहेत त्यांच्यातच सतत वर्गकलह आहे. सतत वर्गयुद्ध चालू आहे. या वर्ग विरोधातूनच इतिहास घडतो आहे. समाजातील उत्पादन साधने बदलली की समाज बदलतो. हा बदल म्हणजे इतिहास होय.

**९)	संस्कृती संघर्ष :**

अनादी कालापासून माणूस एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी स्थलांतरित होत आला आहे. या सामुदायिक स्थलांतरामुळे स्थलांतरित व स्थानिक लोक त्यांच्या संस्कृतीत सतत संघर्ष होत आला आहे. हा संघर्षाचा वृत्तांत म्हणजेच इतिहास होय.

प्राध्यापक हटींग्टन - हे अमेरिकेच्या हार्वर्ड विद्यापीठात प्राध्यापक. यांनी १९९३ साली असा विचार मांडला की, आता राष्ट्रा-राष्ट्रांत संघर्ष हा आर्थिक किंवा वैचारिक कारणावरून न होता तो संस्कृतीच्या कारणावरूनच होणार. सध्या जगात सात ते आठ संस्कृती नांदत आहेत. पाश्चात्त्य संस्कृतीला सर्वांत मोठे भय आहे. ते इस्लामी संस्कृतीकडूनच आहे. या दोन संस्कृतींत संघर्ष तीव्र झाल्यास भारत हा पाश्चात्त्य संस्कृतीच्या बाजूनेच उभा राहील अशीसुद्धा भविष्यवाणी त्यांनीच केली आहे.

**१०)	वर्चस्ववादी विचारसरणी :**

१)	इटलीचा मुसोलिनी या विचारसरणीचा पुरस्कर्ता होता. इसवी सन पूर्व काळापासून इटलीने, रोमने जगावर अधिराज्य गाजविले आहे. प्रथम जुलियस सीझरने व नंतर रूम येथील क्याथलिक चर्चने. हे मोठेपण टिकविणे व वाढविणे हे इटलीचे आद्यकर्तव्य आहे. म्हणूनच मुसोलिनी दुसऱ्या महायुद्धात हिटलरच्या बाजूने उभा ठाकला.

२)	भारतात ग्रँट डफ, वीसेंट स्मिथ व जेम्स मील यांनी जे इतिहास लिखाण केले ते यूरोपातील विशेषतः इंग्लंडमधील मूल्यानुसार. त्यामुळे त्यांना भारताचा खराखुरा इतिहास लिहिता आला नाही. त्यांच्या मते नेटीव्हचा गतकाल हा अंधःकारमय होता. म्हणून त्याच्या उद्धारासाठी या देशात ब्रिटिशांची सत्ता ईश्वराने स्थापन केली. या विचारसरणीस महाराष्ट्रातील तत्कालीन काही बुद्धिवंतांनी साथ दिली.

११) **मानव जातीच्या स्थिती-गतीचा वृत्तांत म्हणजे इतिहास :**

१) फ्रेंच तत्ववेता रूसो असे म्हणतो, “man is born free but everyhere he is in chains” म्हणून मानवाच्या सर्वांगीण मुक्ततेचा वृत्तांत म्हणजे इतिहास.

२) इटालियन इतिहासकार व्हिको याने ‘न्यू सायन्स’ या आपल्या ग्रंथात इतिहासाचा अर्थ असा लावला की, इतिहास म्हणजे माणसांनी निर्माण केलेल्या सर्व संस्थांचा इतिहास.

३) माणूस इतिहासाचा विचार करतो तेव्हा त्याचे लक्ष मानव हेच असते. म्हणजेच मानवाचा मानवी जातीचा इतिहास हेच त्यास अभिप्रेत असते.

४) अब्राहम लिंकन - राष्ट्राध्यक्षपदी निवड झाल्यावर लिंकनची सत्कारासाठी मोठी मिरवणूक निघाली. एक स्त्री रस्त्याच्या कडेला आपल्या लहान मुलांना घेऊन या वेळी आली होती. तिने आपल्या मुलास लिंकनकडे बोट दाखवून म्हटले की, हाच तो लिंकन. त्याचा मुलगा आईस म्हणतो “He looks like a common man” लिंकनने हे ऐकले व मुलास जवळ घेऊन कुरवाळून म्हटले की, इथून पुढे आता “common man” सामान्य माणसाचे राज्य येणार आहे.

५) डॉ. बाबासाहेब आंबेडकर - महादेव गोविंद रानडे यांच्या १०१ व्या जयंतीनिमित्त डॉ. बाबासाहेबांनी पुण्यात एक व्याख्यान दिले. विषय होता “इतिहास कोण घडवितो”. त्यांनी आपल्या व्याख्यानात अगस्तींचे मत असे सांगितले की, इतिहास हा विधिलिखित असतो. बॅकलच्या विचारांचा उल्लेख करून असे सांगितले की, विज्ञान व भौतिक क्षेत्रातील होणारे बदल म्हणजेच इतिहास. शेवटी कार्ल मार्क्सचा उल्लेख करून त्याचे विचार असे सांगितले की, इतिहास हा आर्थिक शक्तीच्या पोटी जन्म घेतो. वरील तीनही विचारवंतांची इतिहासाची उत्पत्ती त्यांनी अमान्य केली. कारण त्यांच्या मते इतिहासाच्या घटनेत माणसास महत्त्व नाही. डॉ. बाबासाहेबांच्या मते माणूसच इतिहास घडवितो.

६) अँटोनियो ग्रामची हा विचारवंत व इतिहासकार भावी इतिहास-कारांना असे आव्हान करतो की, त्याने इतिहास लिहिताना प्रभावी विचारसरणी व प्रभावी गटाच्या दडपणाखाली दडपलेल्या तळागाळातील सामान्य माणूस याच्या जीवनप्रेरणेचा शोध घेऊनच इतिहास लेखन करावे.

७) आजची इतिहासाची आधुनिक व्याख्या - "History is a systematic record of man from past to present."

८) आधुनिक विचारवंत - अठराव्या शतकापासून ऑगस्ट कॉम्ट, हर्बर्ट स्पेन्सर, जॉन स्टुअर्ट मिल वगैरे विचारवंतांनी मानवविरहित इतिहासाची उत्पत्ती अमान्य केली व क्रमविकासाची व प्रगतीचे तत्त्व मांडले. इतिहासातून नेहमी एकातून दुसरे व दुसऱ्यातून तिसरे अशा रीतीने सतत पुढचे असे काही तरी घडत असते, साधले जाते व तेही केवळ ते मानवामुळेच.

**१२) अमेरिकन तत्त्वतेत्ता जॉन हरमण रॅडॉल - त्याचा एक ग्रंथ :**

"Nature and historical experience" या ग्रंथात त्याने एक विचार असा मांडला की, "मला पुष्कळदा असे वाटते की, इतिहास अशी काही वस्तूच नाही. आमच्या महाविद्यालयात इतिहास विभाग व इतिहासाचे प्राध्यापक तरी का असावेत? प्रत्येक ज्ञान शाखेला त्या त्या शाखेच्या इतिहासाची जरूरी आहे. म्हणून माझ्या मते इतिहासात काय यावे हा प्रश्नच निरर्थक आहे. इतिहास हा नेहमी कशाचा तरी इतिहास असतो."

**१३) प्राध्यापक ई. एच. कार ब्रिटिश : इतिहासकार :**

केंब्रिज विद्यापीठातील हे प्राध्यापक असे म्हणतात की, "इतिहासातील घटनांपेक्षा त्या घटना कोणी आणि का सांगितल्या याकडे लक्ष द्यावे". त्यांच्या मते भूतकाळातील घटनांची उजळणी ही विशिष्ट उद्देशाने होत असते. म्हणून इतिहास समजून घेताना हा उद्देशच समजून घेतला पाहिजे.

मानवी इतिहासाच्या उत्पत्तीचा उपरोक्तप्रमाणे अगदी म्हणजे अगदीच थोडक्यात आढावा घेतला. आज जगाची लोकसंख्या ७०० कोटींच्या पुढे गेली आहे.

मानवी इतिहासाचा निर्माता मानवच आहे. हे तत्त्व जर मान्य केले तर ७०० कोटी मानवाच्या भाव - भावना, त्यांचे विचार, त्यांच्या कल्पना, त्यांचे संकल्प, त्यांच्या महत्त्वकांक्षा, त्यांचे विकार व आणखी बऱ्याच काही मानवाशी संबंधित गोष्टी यांचा विचार करता इतिहास हा एक अतिविशाल हिमालयरूपी ऐरावत आहे. त्याचे सर्वंकष आकलन करू पाहणारे हे जगातील इतिहासकार आंधळे आहेत. प्रत्येकास या ऐरावतचे जे दर्शन त्यांच्या मर्यादित ज्ञानचक्षूला घडले ते त्यांनी नमूद केले. कोणाचेही स्पष्टीकरण अंतिम स्वरूपाचे व समग्र स्वरूपाचे मानता येत नाही. शेरपातेनसिंग व कॅप्टन हिलरी यांनी जरी सर्वप्रथम गौरीशंकर सर केले असले तरी त्यांना समग्र हिमालय कळला असे होत नाही.

महाराष्ट्रात व भारतात अनेक इतिहासकार होऊन गेले व सध्या बरेच हयात आहेत परंतु त्यांनी महाराष्ट्र व भारताशिवाय जगाचा इतिहास लिहिला, असे माझ्या माहितीत नाही. जगाचा इतिहास लिहिणारे एच. जी. वेल्स, विल्ड डुरांट व आरनॉल्ड टायनबी हे त्यांपैकी प्रसिद्ध आहेत. विल्ड डुरांट यांनी ११ खंडांत जगाचा इतिहास लिहिला. आरनॉल्ड टायनबी यांनी जगातील २६ संस्कृतींचा अभ्यास केला व प्रत्येकाच्या उद्‌गम, विकास व ऱ्हासावर भाष्ये लिहिले.

मानव हा निसर्गतः व समाजप्रिय प्राणी असल्यामुळे त्याने प्रथम कुटुंब व पुढे चालून टप्प्या-टप्प्याने राष्ट्राची व आपल्या स्वतंत्र संस्कृतीची निर्मिती केली. मानवाच्या प्रत्येक कृतीस एक उद्दिष्ट व ध्येय असते. त्यानुसारच त्याच्या जीवनाची वाटचाल असते. माझ्या मते इतिहासकारास इतिहास लिहिताना काही उद्दिष्ट असले पाहिजे. केवळ घटनांची तटस्थपणे मांडणी करणे ही जरी अत्यावश्यक व प्राथमिक अट असली तरी त्या घटना घडण्यामागच्या प्रेरणा व उद्दिष्टेसुद्धा विशद करणे अत्यावश्यक आहे. त्यामुळे भावी मानवाला व मानव समुदायाला आपल्या जीवनाचा अभ्युदय व्हावा व नि श्रेयसाची प्राप्ती व्हावी ही अपेक्षा असते. या दोन्ही गोष्टी त्याला इतिहास वाचनातून प्राप्त व्हाव्यात ही अपेक्षा.

भारत हे अतिपुरातन राष्ट्र व त्याची संस्कृतीसुद्धा प्राचीनतम आहे.

**"युनान मीस्त्र ओ रोमा सब मीट गये जहाँसे**
**मगर अब तक बाकी है नामो निशा हमारा ।**
**कुछ बात है की हस्ती मिटती नही हमारी**
**सदियों रहा है दुश्मन दौरे जमा हमारा ।।"**

या कवि इक्बालच्या काव्यपंक्ती भारताचे ययार्थ वर्णन करतात. कृष्ण यजुर्वेदातील प्रार्थनेत 'आस्मिन राष्ट्रे' असा उल्लेख आहे. प्रत्येक आरतीत 'समुद्रापर्यंत एक राष्ट्र' असा निर्देश आहे. विष्णु पुराणातील...

**"उत्तरं यत् समुद्रस्य हिमाद्रे श्वैव दक्षिणम् ।**
**वर्ष तद् भारतं नाम भारती यत्र संतती ।।"**

असा श्लोक आहे. बाह्य स्पर्श शास्त्रात "हिमालयापासून हिंदू महासागरापर्यंत वसलेल्या देवनिर्मित देशाला हिंदुस्थान म्हणतात" असा उल्लेख आहे. केरळातील शंकराचार्य ते आसाममधील शंकरदेव यांच्यात एक सांस्कृतिक ऋणानुबंध आहे. या व इतर अनेक गोष्टी भारत एक एकसंध राष्ट्र आहे व ते तितकेच पुरातनही आहे हे सिद्ध होते.

प्रत्येक राष्ट्राचे एक ब्रीद असते. "कृण्वन्तो विश्वमार्यम्" जगातील सर्व मानवाना आर्य बववायचे आहे. म्हणजेच सर्व मानवाची उन्नती घडविणे हे आपले जागतिक ध्येय आहे. वशिष्ठ स्मृतीत आर्य या शब्दाचे स्पष्टीकरण दिले आहे ते असे वासनाच्या अधीन न होता व शास्त्राने अयोग्य म्हटलेली कर्मे न करता प्रकृतीच्या व शास्त्राच्या नियमाप्रमाणे योग्य कर्तव्ये करणाऱ्या माणसास आर्य म्हणतात. ज्ञानदेवांनी पसायदानात याच अर्थाची विष्यवात्मक देवाला प्रार्थना केली आहे. भारताचा स्वातंत्र्य लढा हे जगातील गुलामगिरी नष्ट करण्याच्या मार्गातील एक पाऊल आहे, अशी भारतीय स्वातंत्र्यसैनिकांची भावना होती. आपला भारत देश हा एक आध्यात्मिक परिवार आहे. अरनेस्ट रेना हा प्रसिद्ध फ्रेंच लेखक म्हणतो की, "A nation is a spiritual family."

भारताची महती गाताना जगप्रसिद्ध इतिहासकार आरनॉल्ड टायनबी म्हणतो की, "We are still living in this transitional chapter of world history, but it is alredy becoming clear that a chapter which had a western begining will have an Indian ending if it is not to end in self distruction."

व्हिनसेंट स्मिथ एक ब्रिटिश इतिहासकार. भारताबद्दल त्याचा गाढा अभ्यास. त्यांनी "History of India" हा ग्रंथ लिहिला. या ग्रंथात ते लिहितात "भारतात अनेक प्रकारची विविधता असली तरी इथे एक मौलिक एकात्मता आहे आणि भारतीयांनी अशी एक वैशिष्ट्यपूर्ण संस्कृती विकसित केली आहे आणि ती जगात अन्यत्र कोठेही सापडणार नाही."

अमेरिकेतील रूपार्ट इमर्सन या राजकीय शास्त्रज्ञाने असे म्हटले आहे की, "Failure of democracy is a common experience of mankind and success of democracy is an exception. India is an exception. India is an exceptional country because it has succeeded in the democratic experiment in the third world." डॉ. किंग असे म्हणतात की, 'इतर देशांमध्ये मी प्रवासी म्हणून जातो पण भारतात मी येतो तो तीर्थयात्रेकरूच्या भूमिकेतून.'

जग असे मानते की, फ्रेंच राज्यक्रांतीने जगास स्वातंत्र्य, समता व बंधुता हा लोकशाहीचा बीज मंत्र दिला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर असे म्हणतात की, "माझ्या सामाजिक जीवनाचे परीक्षण स्वातंत्र्य, समता व बंधुता या तत्त्वाआधारेच होऊ शकते. मी ही तत्त्वे फ्रेंच क्रांतीतून न घेता बुद्ध तत्त्वज्ञानातून घेतली आहेत. त्रं. श. शेजवलकरांनी महाराष्ट्रातील एकनाथ, तुकाराम आणि रामदास या तीन संतांनी अनुक्रमे समता, बंधुता आणि स्वातंत्र्य याचा पुरस्कार केला असे सांगितले. त्यामुळे निर्माण झालेल्या मूल्यभानाशी शिवछत्रपतींचा संबंध जोडला."

या सर्व विवेचनावरून असे सिद्ध होते की, जगात भारताची एक विशिष्ट भूमिका आहे. ती त्यास त्याने स्वतःच निर्माण केलेल्या वारशातून मिळाली आहे. ती जपणे, वाढविणे व तिचा प्रसार करणे हे भारताचे ऐतिहासिक उत्तरदायित्व आहे. हा दृष्टिकोन लक्षात घेऊन नवइतिहासकारांनी इतिहास लेखन करावे, अशी त्यांना नम्रतापूर्वक विनंती.

❍❍❍

# ऐतिहासिक संशोधन पद्धतीतील नवे प्रवाह : अन्वयार्थ, मीमांसा व आवश्यकता

**(बिजभाषणातील विचार)**

✵

**डॉ. प्रकाश मा. मसराम**
इतिहास विभाग, मुंबई विद्यापीठ, मुंबई

---

शिवनेरी महाविद्यालय, शिरूर अनंतपाळ, जि. लातूर येथे यशस्वीपणे संपन्न मराठवाडा इतिहास परिषदेच्या ४२ व्या राष्ट्रीय अधिवेशनाचा 'बिजभाषक' म्हणून मला निमंत्रण देऊन सन्मानित केल्याबद्दल परिषदेचे मा. अध्यक्ष, मा. सचिव, सर्व सन्माननीय पदाधिकारी आणि सदस्यांचा मी आभारी आहे.

मराठवाडा इतिहास परिषद हा महाराष्ट्रातीलच नव्हे तर भारतातील इतिहासलेखनाच्या अलीकडच्या प्रवाहावर चर्चा करण्यासाठी एक आदर्श विचारमंच आहे, असा माझा दृढ विश्वास आहे. पारंपारिक इतिहासलेखन पद्धतीपेक्षा अलीकडे सर्वसमावेशक (राजांपासून ते तळागाळातील समुदायांच्या कर्तृत्वाचा आढावा) भूतकाळातील इतिहासाची उकल वस्तुनिष्ठपणे करणाऱ्या नवीन इतिहास-लेखन प्रवाहाच्या पद्धतीची मांडणी या विचारमंचावर प्रस्तुत करणे मला अतिशय महत्त्वाचे वाटते.

प्राचीन काळापासून ते आजतागायत इतिहास संशोधनामध्ये विविध संशोधन पद्धतींचा वापर इतिहासकार, संशोधक आणि विद्यार्थी यांच्यामार्फत केला जात आहे. ज्यामध्ये वर्णनात्मक विश्लेषण पद्धती, ग्रंथालय शोधन पद्धती, व्यष्ठी अध्ययन पद्धती इत्यादींचा प्रामुख्याने उपयोग होताना दिसतो. त्याचप्रमाणे ऐतिहासिक संशोधन वेगवेगळ्या विचारप्रणालींचा, दृष्टिकोनाचा जसे साम्राज्यवादी, धार्मिक, भौतिकवादी, राष्ट्रवादी, मार्क्सवादी, वंचितवादी, धर्मनिरपेक्ष दृष्टिकोनाच्या माध्यमातून होत आलेले आहे. या माध्यमातून इतिहासाच्या भूतकाळातील घटनांचे त्या-त्या विचारसरणीतून अन्वयार्थ लावण्याचे प्रयत्न झाल्याचे लक्षात येते.

प्राचीन काळापासून इतिहासलेखन, ऐतिहासिक लेखनाचा पद्धतशीर अभ्यास आणि ऐतिहासिक संशोधनाच्या अंतर्निहित तत्त्वांची एक समृद्ध आणि वैविध्यपूर्ण पार्श्वभूमी आहे. त्याची पाळेमुळे हेरोडोटस आणि थ्युसीडाईड्ससारख्या प्राचीन ग्रीक इतिहासकारांच्या कार्यात शोधली जाऊ शकतात, ज्यांनी घटनांच्या दस्तऐवजीकरणाचा पुढाकार घेतला आणि त्यांच्यातील कार्यकारण संबंध स्थापित करण्याचा प्रयत्न केला.[१] पुनर्जागरण आणि प्रबोधन युगांनी इतिहास लेखनात अनुभवजन्य पुरावे आणि गंभीर विश्लेषणाकडे बदल पाहिला. व्हॉल्टेअर आणि गिबनसारख्या उल्लेखनीय व्यक्तींनी प्रचलित ऐतिहासिक मिथक आणि दंतकथा यांना आव्हान देण्यात महत्त्वाची भूमिका बजावली.[२]

१९ व्या शतकात राष्ट्रीय इतिहास लेखनाचा उदय झाला. कारण उदयोन्मुख राष्ट्र-राज्यांनी राष्ट्रीय अस्मितेची व अस्तित्वाची भावना वाढविण्यासाठी ऐतिहासिक कथांचा वापर केला. उदा. भारतीय स्वातंत्र्य लढ्यासाठी प्रेरक ऐतिहासिक घटनांचा वापर (महापुरूषांच्या पराक्रमाच्या गाथा व राष्ट्रीयत्वाची भावना) राष्ट्रीय अस्मितेची जागृती इत्यादी जनमानसात केली. २० व्या शतकात इतिहास लेखनात विविध सैद्धांतिक आणि पद्धतशीर नवकल्पनांद्वारे परिवर्तनात्मक बदल घडून आले. मार्क ब्लॉच आणि लुसियन फेब्रेसारख्या विद्वानांच्या नेतृत्वाखालील ॲनल्स स्कूलने दीर्घकालीन ऐतिहासिक संरचनांचे महत्त्व आणि ऐतिहासिक विश्लेषणामध्ये सामाजिक विज्ञानांचे एकत्रीकरण यावर भर दिला. त्याचबरोबर उत्तर आधुनिकता-वादी चळवळीने पारंपरिक ऐतिहासिक कथनांना आव्हान दिले. वस्तुनिष्ठतेच्या कल्पनेची चौकशी केली आणि ऐतिहासिक मेटानॅरेटिव्हजला व्यापक केले.[३]

अलीकडे भारतात डी. डी. कोसंबी, रोमिला थापर, आर. एस. शर्मा, इरफान हबीब, के. एम. पन्नीकर, डी. एन. झा, रणजित गुहा यांच्या लेखनातून शास्त्रीय मार्क्सवादी विश्लेषणाने पुरेशा प्रमाणात मांडलेले पारंपरिक राजकीय इतिहासापासून ते सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक संरचनाच्या अभ्यासापर्यंत असे संक्रमण सुमारे तीस वर्षांपूर्वी घडले आणि घडत आहे. त्यामुळे तळागाळातील सर्वहारा वर्गाचा वस्तुनिष्ठ इतिहासाची उकल होऊन त्याची जाणीव व नेणीव तसेच त्यांनी बजावलेल्या कामगिरीचे महत्त्व सर्व सुमदायास लक्षात आले.

समकालीन काळात भारतीय इतिहास लेखन बहु-विद्याशाखीयधिष्ठित संक्रमणाच्या उंबरठ्यावर असल्याचे दिसते. इतर सामाजिक शास्त्राद्वारे विकसित झालेली संशोधन पद्धती आणि अंतर्दृष्टी यांच्याशी संवाद साधत मोठ्या संख्येने विद्वानांचे संशोधनाचे कार्य, विचारधारा, संस्कृती आणि सामाजिक वृत्तीच्या अभ्यासाकडे वाटचाल करीत आहेत. म्हणजेच ऐतिहासिक संशोधन पद्धतीत आंतरविद्याशाखीय व बहु-विद्याशाखीय संशोधन प्रणालीचा अंतर्भाव करून सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, धार्मिक आणि भौगोलिक, नैसर्गिक विज्ञान इत्यादींचा शास्त्रीयदृष्ट्या सर्वंकष अशा अंगाचा वापर होताना दिसून येत आहे. खरे तर भूतकाळात आधीच्या संशोधकांनी केलेल्या ऐतिहासिक घटनांच्या संशोधनांचे पुनरावलोकन व चिकित्सक विश्लेषण करण्यासाठी तसेच नवीन ऐतिहासिक तथ्ये प्रकाशात आणण्यासाठी ऐतिहासिक संशोधनाची ही आंतरविद्याशाखीय व बहु-विद्याशाखीय संशोधन पद्धती आजच्या युगात महत्त्वपूर्ण ठरत आहे.[४]

सदर संशोधन लेखातून इतिहास संशोधनातील नवे प्रवाह जसे - स्मृती व इतिहास लेखनशास्त्र, आदिवासी समुदायांचे इतिहास लेखनशास्त्र आणि समकालीन काळात उदयोन्मुख पावलेला इतिहासाचा नवा दृष्टिकोन म्हणजे ट्रान्स नॅशनल हिस्टोरिग्राफीचा अन्वयार्थ आणि त्याचे महत्त्व याचे विश्लेषण केलेले आहे.

१९५० च्या दशकापासून पारंपरिक इतिहासलेखन पद्धतीला छेद देऊन इतिहासकारांद्वारा शास्त्रशुद्ध पद्धतीने सामाजिक व आर्थिक इतिहासाच्या संशोधनाची सुरूवात तर १९७० ते १९८० च्या दरम्यानच्या दशकामध्ये सूक्ष्म इतिहास (Micro History), वंचितांचा इतिहास (Subltern Studies) तसेच स्थानिक इतिहास, स्मृतीच्या आधारे आदिवासी आणि तळागाळातील जनसामान्यांच्या इतिहास लेखनाचा व संशोधनाचा दृष्टिकोन विकसित झाला.

**स्मृती (मेमरी) आणि इतिहास लेखनशास्त्र :**

भूतकाळात घडलेला इतिहास ही एक कथा तसेच मानवी घटना आहे. एखाद्या समुदायाच्या किंवा वंशाच्या इतिहासाची उकल करण्यासाठी लिखित अभावाच्या परंपरेमुळे, कागदपत्रांच्या अनुपस्थितीमुळे ऐतिहासिक घटना उघड

करण्यासाठी व त्याची अधिक वस्तुनिष्ठपणे मांडणी करण्यात समस्या निर्माण होऊ शकते. अशा वेळेस मौखिक परंपरेत अनुभवलेल्या लोकांच्या मुलाखतीद्वारे ऐतिहासिक घटना थेट किंवा व्यक्ती ऐतिहासिक घटनांचे साक्षीदार यापैकी एक ऐतिहासिक स्त्रोताची माहिती व्यक्तीच्या स्मृतीच्या द्वारे प्राप्त होते.

मौखिक इतिहासाच्या पद्धतीद्वारे निर्माण केलेल्या मौखिक स्त्रोतांना अजूनही ऐतिहासिक संशोधनपर लेखनासाठी कमी विश्वासार्ह मानले जाते. एखाद्या घटनेबद्दल, एखाद्या साक्षीबद्दल उद्‌भवणारी समस्या ही या व्यक्तीच्या स्मरणशक्तीची बाब आहे. त्या व्यक्तीला घडलेल्या घटना किती प्रमाणात आठवतात यावर घटनेची विश्वासार्हता अवलंबून असते. त्याची स्मरणशक्ती आजही त्या प्रसंगाला सामोरे गेल्यावर जी स्मरणशक्ती होती तशीच आहे किंवा कदाचित त्याच्या आजूबाजूला होणाऱ्या बदलांमुळे त्याची स्मृती बदलली आहे. यामुळे व्यक्तीच्या स्मरणशक्तीच्या वैधतेशी संबंधित समस्या उद्‌भवते.[५] परंतु समकालीन काळातील राष्ट्राचा, समुदायाचा सर्वसमावेशक इतिहासाची मांडणी किंवा पुनर्मांडणी करायची असेल तर जेथे दस्ताऐवजाची कमतरता आहे तिथे नक्कीच स्मृतीच्या अथवा मौखिक साधनांच्या माध्यमातून पूर्तता करता येते. कारण ऐतिहासिक घटना या केवळ बहुसंख्य राष्ट्राच्या ऐतिहासिक घटना किंवा प्रमुख घटना मानल्या जाणाऱ्या घटना नसतात. कारण यात वंचित समुदायांचा सर्वसमावेशक इतिहास आणि यापूर्वी कधीही प्रकट न झालेल्या ऐतिहासिक घटनांचेही परीक्षण करणे आवश्यक आहे. जेणेकरून इतिहास अधिक व्यापक होऊ शकेल. त्यासाठी नक्कीच कागदोपत्री पुरावा नसल्यामुळे व्यक्तीच्या स्मृतीद्वारे ऐतिहासिक तथ्यांची उकल करू शकतो. मौखिक अथवा स्मृतीच्या इतिहासाचा इतर ऐतिहासिक स्त्रोतांच्या संयोगाने विचार केला पाहिजे, जसे की लिखित नोंदी आणि पुरातत्वीय पुरावे.[६] भिन्न स्त्रोतांचे अंतरंग आणि बाह्यरंग (क्रॉस-रेफरन्सिंग) तपशिलांची पुष्टी वा परीक्षण करण्यात आणि ऐतिहासिक घटनांची अधिक व्यापक समज प्रदान करण्यात मौखिक किंवा स्मृतीविषयक परंपरा मदत करू शकते.

अपुऱ्या साधनांमुळे किंवा शास्त्रशुद्ध लेखनपरंपरेच्या अभावामुळे भारतातील वंचित समुदायांचा दडलेला इतिहास उजागर करण्यास अडचण निर्माण झाली आहे.

वंचित समुदाय किंवा आदिवासी समुदायाचा इतिहास, संस्कृती आणि त्याचा वारसा फार समृद्धीशाली आहे. परंतु त्यांच्याकडे लिखित परंपरा नाहीत, त्यांचे ज्ञान हे मौखिक परंपरेशी संबंधित आहेत जे केवळ इतिहासात मौखिक परंपरेच्या इतिहासाचा स्त्रोत म्हणून आणि विशेषतः ज्ञानाचा स्त्रोत म्हणून स्मृतीच्या आधारे त्याचे आकलन होण्यास मदत होऊन त्याचे जतन व संवर्धन करण्यास साहाय्यभूत ठरत आहे.[७]

भूतकाळाची रचना समजून घेण्यासाठी इतिहास आणि स्मृती या एकमेकांशी जोडलेल्या संकल्पना आहेत. इतिहासाचा उद्देश घटनांचा वस्तुनिष्ठ लेखाजोखा प्रदान करणे हा आहे. स्मृतीत वैयक्तिक अनुभव आणि सांस्कृतिक कथांचे व्यक्तिनिष्ठ स्मरण समाविष्ट असते.[८] या संदर्भात इतिहास, समाजशास्त्र, मानववंशशास्त्र आणि सांस्कृतिक अभ्यास यांसारख्या क्षेत्रातील आंतरविद्याशाखीय संशोधनासाठी इतिहास आणि स्मृती यांच्यातील संबंध हा केंद्रबिंदू बनला आहे. स्मृतीच्या अभ्यासाने ऐतिहासिक कथा आणि सामूहिक ओळख यांच्या आकारावर त्याचा प्रभाव अधोरेखित केला आहे.[९] फ्रेंच इतिहासकार पियरे नोरा यांचे "लेस लीउक्स डी मेमोअर" वरील कार्य सांस्कृतिक चिन्हे आणि सामायिक राष्ट्रीय ओळख बनविण्यात स्मृतीची भूमिका अधोरेखित करते. ऐतिहासिक घटनांचे परस्परसंबंधित स्वरूप आणि त्यांचे सामूहिक स्मरण प्रतिबिंबित करते.

इतकेच नव्हे तर ऐतिहासिक व्याख्येवरील सामूहिक स्मृतीच्या प्रभावाने राष्ट्रीय आणि सांस्कृतिक ओळखीच्या गुंतागुंतीकडे लक्ष वेधले आहे. समकालीन काळात असे सुचविण्यात आले आहे की, सांस्कृतिक वारसा जतन करण्यात स्मृती (मेमरी) महत्त्वपूर्ण भूमिका बजावते. बहुतेकदा मौखिक आणि सांस्कृतिक परंपरेद्वारे जतन केलेले ज्ञान पिढ्यानुपिढ्या पुढे संक्रमणित केले जाते.[१०] इतिहासाच्या निर्मितीमध्ये स्मृतीची तपासणी केल्याने कोणाच्या आठवणींना प्राधान्य दिले जाते आणि ते ऐतिहासिक संशोधनात कसे वापरले जातात? यासंबंधी नैतिक प्रश्नदेखील उपस्थित करतात.[११] कोलंबिया विद्यापीठातील समाजशास्त्र जेफ्री के. ऑलिक आणि जॉयस रॉबिन्स सामूहिक स्मरणशक्तीच्या आकारात स्मृतीविषयक पद्धतींच्या भूमिकेवर जोर देऊन स्मृतीचे सामाजिक परिणाम शोधतात. त्यांचे कार्य ऐतिहासिक

कथनांमध्ये स्मरणशक्तीच्या अंतर्निहित संभाव्य पूर्वग्रहांना मान्यता देण्याच्या महत्त्वावर जोर देतात. स्मृतीद्वारे संशोधकांना विविध दृष्टिकोनांचा समावेश असलेल्या गंभीर दृष्टिकोनाचा अवलंब करण्यास उद्युक्त करते.

थोडक्यात इतिहास आणि स्मृती यांचे एकमेकांशी जोडलेले स्वरूप भूतकाळाच्या सर्वसमावेशक आणि सूक्ष्म आकलनाची गरज अधोरेखित करते. इतिहास वस्तुनिष्ठते-साठी प्रयत्नशील असताना स्मृती एक व्यक्तिनिष्ठ आणि वैयक्तिक दृष्टिकोन प्रदान करते. सामूहिक ओळख आणि सांस्कृतिक वारशात योगदान देणाऱ्या कथांना आकार देतो. ऐतिहासिक संशोधनातील स्मृतीची गुंतागुंत आणि गतिशीलता ओळखून, विद्वान अधिक व्यापक आणि सर्वसमावेशक ऐतिहासिक कथा तयार करू शकतात जे संपूर्ण इतिहासातील विविध अनुभव आणि दृष्टिकोन प्रतिबिंबित करतात.

**आदिवासी समुदायाचे इतिहासलेखन शास्त्र :**

आदिवासी इतिहासलेखन स्थानिक संस्कृती समजून घेण्याचा एक महत्त्वपूर्ण पैलू, प्रामुख्याने आदिवासी समुदायांमधील इतिहास, परंपरा आणि सांस्कृतिक ज्ञानाच्या मौखिक परंपरेवर व प्रसारावर अवलंबून आहे. त्याचबरोबर आदिवासी समुदायाची विशिष्ट लक्षणे, त्यांची कुल चिन्हे (totem). त्यांच्यातील असलेली उच्च कोटीची स्त्री-पुरूष समानता, त्यांचे आयुर्वेदाचे व विविध कलेचे ज्ञान आणि त्याचे आजच्या परिप्रेक्षातील अनन्यसाधारण महत्त्व याची प्रचीती आपणांस ट्रायबल हिस्ट्रोग्राफीतून येते.[१२]

Jivaka's history illuminates the position of medical practitioners and their methods in sixth-century BC ancient India. Jivaka suffered a number of difficult surgeries in exchange for his devotion, earning large sums of money that may be considered favorable in today's terms. Jivaka is a renowned surgeon and physician. He made important contributions to surgery while working as a physician. Jivaka is regarded by Buddhists as the Buddha's personal physician. He became a role model for emulation and adoration because of his close relationship with the

religion's founder and its first patron. Jivaka possessed extraordinary curative powers. He praised his impersonal approach to all people who sought his assistance. For decades and even centuries, the name Jivaka has been associated with a man of miracles. He is credited with developing traditional Thai medicine and massage in Thailand, according to the locals. Even today, Thailand massage therapy has also been developed by Jivaka, preserved his medical techniques in the form of *Jivaka sutra*. Jivaka has been, is, and will still be considered one of the greatest legends. And lastly, I would like to leave you with his famous adage of open shelling.

***"Everything on earth is nothing but medicine."***

## References :


(1) Muller Max (ed), The Sacred book of the east Vol. XVII (Mahavagga), Vinaya-Text translated by T.W. Rhys Davids & Hermann Oldenburg, Oxford, at the Clarendon Press, London,1882, p. 171-172.

(2) F. Schiefner, Tibetan Tales, Derived from Indian Sources, Translated from the Tibetan of the Kah-Gyur, by William Ralston, Kegan Paul, Trench, Trubner & Co., London, 1906, p. 84- 91.

(3) Sharma Hemraj, Kashyap Samhita, Chaukhamba Sanskrit Sansthan, Varanasi, p. 21.

(4) Malalasekeca GP, Dictionary of Pali Proper Names, Vol. 1, Reprint New Delhi, 1983, p. 957.

(5) Pintog Chatnarat & Khenpo Karchung, The Traditional studies Jivaka Komarabhacca : The Buddha's Doctor in Theravada and Bhaisajyaguru. The Medicine Buddha in Vajrayana, The Journal of the International Buddhist studies college, Thailand, 2019, p. 98.

(6) Muley Gunakar, The Great Doctor of Northern India: Jivaka Kaumara-Bhrtya, Edited by Bob Haddad, Vigyan Prasar, Department of Science and Technology, GOI, 2019, p. 2.

(7) Chatnarat P & Karchung K, op. cit, p. 98.

(8) Shastri Ratnakar, Bharat Ke Pranacharya, Aatamaram & Sons, Delhi, 1988, p. 485.

(9) Nalinaksha Datta, D.M. Bhattacharya and Shiv Nath Sharma, (ed.), Gilgit Manuscripts, Vol. 3, Part-2, Civaravastu, Calcutta, 1942, p. 25-26.

(10) Kashyap Ajaya, Jivaka : The great surgeon and physician of Ancient India,Indian Journal of Colo-Rectal Surgery, Vol II, issue 3, 2019, p. 77. also read Ratnakar Shastri, Bharat Ke Pranacharya, p. 485.

(11) Bhagawat Ram Gupt. Ayurved ka Pramanik Itihas, Chowkhamba Krishnadas Academy, Varanasi, 2019, p. 258.
(12) Zysk Kenneth. Asceticism and Healing in ancient India, Medicine in the Buddhist Monastery, Motilal Banarsidass Publishers, Delhi, 1991, p. 55.
(13) Muller Max (ed), op.cit.p. 176.– 179 Also Read Zysk Kenneth, Studies in Traditional Indian Medicine in the Pali canon: Jivaka and Ayurveda, The Journal of the international association of Buddhist studies, Vol 5, 1982, p. 70-72.
(14) Zysk Kenneth, op.cit, p. 56 & 120.
(15) Sharma Hemraj, op.cit, p.21.
(16) Max Muller (ed), op.cit., p. 180 -181.
(17) Kashyap Ajaya, op.cit., p. 78.
(18) Pierce Salguero, The Buddhist medicine kin in literary context: Reconsidering ana early medieval exhale of Indian influence on chines medicine and surgery, History of Religions, 48 (3), p. 183-210.
(19) Zysk Kennaeth, Studies in Traditional Indian Medicine in the Pali canon: Jivaka and Ayurveda, The Journal of the international association of Buddhist studies, Vol 5, 1982, p. 73-74.
(20) Sharma Hemraj, op.cit, p. 21.
(21) Muller Max (ed), op.cit., p. 184-188.
(22) Mukhopadhyaya Girindranath, op.cit, p. 711-714.
(23) Vidyalankar Atridev, Ayurved Ka Bruhat Itihas, Indian University Press, Allahabad, 1960, p. 103.
(24) Zysk Kenneth, op.cit, p. 56 & 122.
(25) Shastri Ratnakar, op.cit, p. 490.
(26) Granoff Phyllis, Cures and Karma II: Some miraculous healing in the Indian Buddhist story tradition, Bulleten de I' Ecole Francaise d' Extrem-Orient, 1998, p. 285-304.
(27) Sharma Priyavrata, Ayurved ka Pramanik Itihas, Chaukhambha Orientalia, Varanasi, 1975, p. 153.
(28) Muller Max (ed), op.cit., p. 191 -193.
(29) Mukhopadhyaya Girindranath, op.cit, p. 720.
(30) Cullavagga, Vipassana Research Institute, Igatpuri,1998, p. 331.
(31) Mukhopadhyaya Girindranath, p. 720-723.
(32) Sharma Priyavrata, (ed.) History of Medicine in Indian ( From Antiquity to 1000 A.D.), Indian National Science Academy, New Delhi, p. 117.
(33) Kern H., Manual of Indian Buddhism, Strassburg, 1896, p. 47.
(34) Paw Maung, The Physician of the Budha "Jivaka", A gift of Dhamma, California, p. 9.
(35) Mukhopadhyaya Girindranath, op.cit, p. 741-742.

❍❍❍

३

# नागनाथ मंदिरावरील भैरव मूर्ती : एक शिल्प : शास्त्रीय अभ्यास

**श्री. वैजनाथ विश्वनाथ काळदाते**
संशोधक विद्यार्थी
ज्ञानोपासक महाविद्यालय, परभणी

औंढा नागनाथ मंदिराला प्राचीन वारसा लाभला आहे. या नागनाथ मंदिराची रचना चालुक्य आणि शिलाहार कला शैलीतून झालेली दिसून येते. औंढा नागनाथ हे मंदिर शिल्प आणि स्थापत्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहे. औंढा नागनाथ मंदिरावर जवळजवळ ४५० पेक्षा जास्त शिल्पे असून अनेक शिल्पे कलाकौशल्याने नटलेली आहेत. हे मंदिर द्विजंघायुक्त असून शिवाला समर्पित असून हे मंदिर इतर धर्मपंथीय मूर्तींनासुद्धा स्थान देते तसेच शिव आणि शक्तीच्या मोठ्या प्रमाणावर प्रतिमा आहेत.

प्राचीन काळापासून औंढा नागनाथ शहराला महत्त्वाचे स्थान आहे. औंढा नागनाथ हे मंदिर उंच जगदीवर उभे असून त्यावर अनेक शिल्पे असल्यामुळे अभ्यासक व शिल्पप्रेमींना आकर्षित करतात. या मंदिरावर भैरव प्रतिमांची निर्मिती का केली? त्याच्या मागील इतिहास किंवा धार्मिक कल्पना काय असाव्यात याचा शोध घेण्याच्या दृष्टीने औंढा नागनाथ येथील भैरव प्रतिमा हा विषय प्रस्तुत शोध निबंधासाठी निवडला आहे.

औंढा नागनाथ मंदिरावर तंत्रमंत्र संप्रदायाचा मोठ्या प्रमाणावर प्रभाव दिसून येतो. प्रस्तुत संशोधनासाठी प्राथमिक व दुय्यम संदर्भ ग्रंथांचा आधार घेतला असून संशोधकाने प्रत्यक्ष सर्व्हेक्षणही केले आहे.


UGC Care Listed Journal : ISSN : 0976 - 5425

**शैव पंथाची प्राचीनता :**

पौराणिक संस्कृतीवर आधारलेल्या आजच्या ब्रह्मा, विष्णू व महेश या देवतांना महत्त्वाचे मानले जाते. रज, सत्व आणि तम या तीन गुणांचे हे तिघे प्रतिनिधी आहेत. सृष्टीची निर्मिती, पालन व तिचा शेवट ही ब्रह्मदेव, विष्णू आणि शिव यांची प्रमुख कार्ये मानली गेली आहेत. कश्मिरी शैवसंप्रदाय, पाशुपत संप्रदाय, वीरशैव संप्रदाय, हरिहर संप्रदाय, कापालिक संप्रदाय, कालामुख संप्रदाय अशा प्रकारे शैवाचे पंथ व उपपंथ दिसून येतात. त्यामध्ये कापालिक आणि कालामुख संप्रदाय जवळजवळ सारखेच आहेत असे दिसते.

**भैरवाविषयी पौराणिक कथा :**

कापालिक भैरवाला शिवाचा अवतार मानून आपले मुख्य उपास्य दैवत म्हणून पूजा व भक्ती करतात. भैरव म्हणजे भरण करणारा किंवा भीषण शिवाच्या रूद्र प्रकारचे हे एक रूप शिवपुराणाप्रमाणे भैरव शंकराचे पूर्ण रूप आहे. महाराष्ट्रात तरी बहुधा प्रत्येक खेड्यात भैरव व कालभैरवाच्या मूर्ती आढळतात. त्यासंबंधी वराह पुराणात अशी कथा आहे की, ब्रह्मदेवाने रूद्र उत्पन्न केला व त्याला कपाली या नावाने संबोधून पृथ्वीचे रक्षण करण्यास सांगितले. या नावामुळे स्वतःचा अपमान झाला असे वाटून दुसऱ्याने आपल्या डाव्या हाताच्या अंगठ्याच्या नखाने ब्रह्मदेवाचे पाचवे डोके तोडले. परंतु ते त्याच्या अंगठ्याला चिकटून राहिले व काही केल्या ते निघेना. यातून मुक्त होण्याला काय उपाय करावा हे सांगण्यासाठी रूद्राने ब्रह्मदेवास विनंती केली. ब्रह्मदेवाने बारा वर्षे कापालिकवृत्त सांगितले. रूद्र महेंद्रगिरी पर्वतावर गेला. त्याने केसांचे यज्ञोपवित आणि अस्थींच्या मन यांचा हार घातला, जटा मुकुटावर मुंडकं ठेवले आणि हातात रक्ताने भरलेले कपाल घेऊन पृथ्वीवर सर्व तीर्थांची यात्रा करीत तो हिंडला. बाराव्या वर्षी तो काशीला आला आणि त्या ठिकाणी त्याच्या हातातून ब्रह्मदेवाचे कपाळ गळून पडले. ज्या ठिकाणी ते पडले त्या स्थानाला कपालमोचन असे म्हणतात.[१] भैरवाच्या उग्र स्वरूपाच्या मूर्ती अधिक प्रमाणात आढळतात. काळही त्याला वचकतो म्हणून भैरवाला काळभैरव असेही म्हणतात.[२] विष्णू धर्मोत्तर

पुराणाप्रमाणे ढेबर पोट, बटबटीत डोळे, ओठांतून बाहेर पडणाऱ्या दाढा, नरमुंडाच्या माळा, हत्तीचे चामडे, सापाचे दागिने, हातात असलेली निरनिराळी शस्त्रे ही त्याची प्रमुख लक्षणे होत आणि कुत्रा त्याचे वाहन आहे. भैरवाची बटुक भैरवाची बरीचशी रूपे आहेत पण त्याला अष्टभर म्हणून ओळखली जाणारी आठ रूपेच प्रसिद्ध आहेत.[३]

**ग. ह. खरे :**

यांच्या मते भैरवाची अतिसांग, रूद्र, चंड, क्रोध, उन्मत्त, कपाल, भीषण आणि संहार ही आठ मुख्य वर्ग असून त्यात प्रत्येकात पुन्हा आठ-आठ भैरव अशी त्यांची नावे आहेत.

**१)** **अतिसांग वर्ग :** अतिसांग, विशालक्ष, मोदकप्रिय, स्वच्छंद, विघ्नसंतुष्ट, खेचर, सचराचार.

**२)** **रूद्र वर्ग :** रूद्र क्रोधदृष्ट, जटाधार, विश्वरूप वीरूपाक्ष, नानरूपधर, तज्रहस्त, महाकाय.

**३)** **चंड वर्ग :** चंड, प्रलयंतक, भूमिकंप नीळकंठ, विष्णू, कुलपालक, मुंडपाल, कामपाल.

**४)** **क्रोध वर्ग :** क्रोध, पिंगळेक्षण, अभ्रूरूप, धरा पाल, कुटील, मंत्रनायक, रुद्र, पितामह.

**५)** **उन्मत्त वर्ग :** उन्मत्त, बटुकनायक शंकर भूतवेताळ, त्रिनेत्र, त्रिपुरंतक, वरद, पर्वतवास.

**६)** **कपाल वर्ग :** कपाल, शशि, भूषण, हसितचर्माबरधर, योगिश, ब्रह्मराक्षस, सर्वज्ञ, सर्वदेवेश सर्वभ्रतहधिष्ठित.

**७)** **भीषण वर्ग :** भीषण, भयहर, सर्वज्ञ, कालाग्री दक्षिण, मुखर, अस्थिर, महारूद्र.

**८)** **संहार वर्ग :** संहार, अतिरिक्तांग, कालाग्री, प्रियंकर, घोरणाद, विशालाक्ष, योगिश, दक्षसंस्थित अशी ६४ भैरव रूपे आहेत.[४]

भैरवाच्या मूर्ती भारतात सर्वत्र आढळत असल्या तरीही उत्तर भारतात शिवाची बटुक भैरव हे स्वरूप विशेषत्वाने लोकप्रिय आहे. यात शिवांचे नग्न भयंकर रूप विशाल नेत्र आणि हातात खडग, खटवांग, शूल, कपाल धारण केलेले दाखविले आहे. त्यांच्या पायांत कडावू आणि श्वान या वाहनांसह त्यांचे अंक आहे. दक्षिण भारतात बटुक भैरवाचे रूप भयंकर बाहेर दात, श्वान वाहन, हातात डमरू, पाश त्रिशूल, कपाल दाखविले आहे, गळ्यात घटमाळा आणि कटिसूत्र रूपात सर्प दाखविला आहे. ज्वालामय केस उत्तर आणि दक्षिण भारतीय अशा दोन्ही भागांतील मूर्तीला दाखविले आहेत.[५]

गडचिरोली जिल्ह्यातील मार्कंडी येथील मार्कंड ऋषि मंदिराच्या बाह्य भिंतीवर भैरवाच्या दोन प्रतिमा आहेत - एक अष्टभुज व दुसरी चतुर्भुज आहे. येथीलच दुसरी प्रतिमा चतुर्भुज भैरवाची आहे. उजव्या हातात खडक व बहुधा गजदंत तर डाव्या हातात खेटक व नरमुंड आहे. जटा मुकुट आणि सर्पहार धारण केलेला हा भैरव नग्न आहे. मुकुटात आणि हारामध्ये नरमुंड असल्यामुळे त्याच्या उग्रतेत आणखी भर पडलेली आहे. त्यात पुन्हा याला दाढी-मिशा आहेत, त्याने आपला उजव्या पायाखाली असलेल्या प्रेताच्या पायावर ठेवलेला आहे.[६] साधारणतः अशा प्रकारची प्रतिमा नागनाथ मंदिरावर असून त्याचे वर्णन पुढीलप्रमाणे....

**नागनाथ मंदिरावरील भैरव प्रतिमा :**

औंढा नागनाथ हे एक शैव क्षेत्र आहे. त्यामुळे या मंदिराच्या मंडोवरावर अनेक भैरव मूर्ती पाहावयास मिळतात. नागनाथ मंदिराच्या मंडोवरावर दक्षिण बाजूस चतुर्भुज भैरव असून स्थानक मुद्रेत आहे. त्याच्या वरच्या उजव्या हातात डमरू, वरच्या डाव्या हातात खेतक आहे तर खालील उजव्या हातात तलवार असावी. कारण ती खंडित झालेली आहे. त्याचा काही अंश हाताच्या मुठीत दिसतो आणि खालच्या डाव्या हातात नरमुंड आहे. बाजूला दोन पायांवर उभे राहून कुत्रा रक्त थेंब चाटत असल्याचे दिसते. उजव्या कोपऱ्यात अस्थिपंजर पिशाच्च बसलेला आहे. मूर्तीचा जटासांभार पंख्यासारखा पसरलेला असून नागबंधाने तो व्यष्टित केलेला आहे. त्याचप्रमाणे त्याची दाढी पण तशीच दिसते. गळ्यात साप, पायापर्यंत जाणारी

मुंडमाळ, ओठांवर मिशा तसेच यज्ञोपवित घातल्यासारखे नाग व्यष्टित झालेले दिसतात. तो समपद अवस्थेत उभा असून कमरेतून किंचित झुकलेला असून नग्न अवस्थेत आहे. मंदिरावरील असलेल्या भैरवाच्या हातात नरमुंड असून त्याच्याकडे उसळताना एक पशू दिसतो. कल्पना अशी की नुकतेच कापलेल्या मानव मस्तकातून पडणाऱ्या रक्ताचे थेंब चाटण्याकरिता कुत्रा उड्या मारत आहे.



**निष्कर्ष :**

१) प्राचीन भारतीय आध्यात्मिक विचारसरणीवर शैवतंत्र मार्गाचा प्रभाव पडल्याचे मूर्तिशास्त्राच्या अभ्यासाने स्पष्ट होते.

२) कापालिक संप्रदायाचा प्रणेता भैरव यांच्या मूर्ती महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात आढळतात.

३) भैरव रूपातील शिल्पांच्या अभ्यासाने तत्कालीन समाजातील सामाजिक आणि धार्मिक जीवन समजते.

**संदर्भ :**


(१) जोशी प्र. न., वराह पुराण, प्रसाद प्रकाशन, पुणे, १९८१, पृ. १३०.

(२) जोशी नि. पु., भारतीय मूर्तीशास्त्र, प्रसाद प्रकाशन, पुणे, १९७९, पृ. १९९.

(३) उपरोक्त, पृ. १९९.

(४) खरे ग. ह., मूर्ती विज्ञान, भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे, २०१२, पृ. १२१.

(५) म्हैसेकर प्रदीप, भारतीय मूर्तिशास्त्र, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद, २०२०, पृ. ३१९.

(६) देगलूरकर गो. बं., शिवमूर्ती नमः, स्नेहल प्रकाशन, पुणे, २०१४, पृ. १००.


❍❍❍

(४)

# औरंगाबाद बौद्ध लेणी शिल्पातील अष्टभय जातक शिल्प - एक नवे आकलन

**डॉ. संजय पाईकराव**
इतिहास व प्राचीन भारतीय संस्कृती विभाग,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

बौद्ध धम्मामध्ये जातक कथांना अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. गौतम बुद्धाच्या पूर्वजन्मासंबंधीच्या कथा, जातके किंवा जातक कथा म्हणून ओळखल्या जातात. जातक कथेबाबत दुर्गा भागवत असे म्हणतात की, जातक याचा अर्थ जन्माची हकीकत असा होतो. बौद्ध परंपरेप्रमाणे या बोधिसत्वाच्या पूर्वजन्मीच्या कथा आहेत.[१] याचा अर्थ असा आहे की, बुद्धाच्या जन्मापूर्वीच्या कथा या बोधिसत्वानंतरसुद्धा प्रचलित होत्या. पुढे दुर्गा भागवत म्हणतात की, माणसाने केलेले बरे-वाईट कर्म त्याला दुसऱ्या जन्मातही भोगावे लागते. कर्म भोगल्यावाचून माणसाची सुटका नाही. जो नियम सर्वसामान्य माणसाला तोच बोधिसत्वाला लागू आहे.[२] सामान्य व्यक्ती व बोधिसत्वालासुद्धा बरे-वाईट कर्मापासून सुटका नाही. हे नियम सर्वांना लागू होतात. त्यामध्ये कोणताही भेदाभेद होत नाही. दुर्गा भागवत म्हणतात की, बोधी म्हणजे ज्ञान आणि बोधिसत्व म्हणजे बुद्ध होण्यास परिपक्व होत चालला आहे. त्याला प्रत्येक जन्मी उत्कृष्ट गुण संपादन करणे, पंचशील पाळणे हे बोधिसत्वाचे प्रथम कर्तव्य होय.[३] बोधी म्हणजे ज्ञानाची परंपरा व पंचशिलाचे पालन करणारा हा बोधिसत्व होत असतो व तो सर्व जगाचे कल्याण करतो.

बुद्धत्व प्राप्त होण्यापूर्वी गौतम बुद्धाला अनेक योनींत जन्म घ्यावे लागले. दान, शील, नैष्कर्म्य, प्रज्ञा, वीर्य, क्षांती, सत्य, अधिष्ठान, मैत्री व अपेक्षा या दहा पारमितांचा उत्तरोत्तर विकास त्याने या जन्मात करून घेतला आणि या विकासाची

परमोच्च अवस्था गाठल्यानंतर गौतम बुद्ध म्हणून तो अवतरला अशा श्रद्धेतून या कथा आकारलेल्या आहेत. या जातक कथांतून बुद्ध हा बोधिसत्व या नावाने कथानायक कथेतील दुय्यम पात्र वा कथेतील घटनांचा एक प्रेक्षक म्हणून वावरलेला आहे. बुद्धत्वाच्या प्राप्तीसाठी प्रयत्नशील असा प्राणी अशा अर्थाने बोधिसत्व हा शब्द वापरला गेला आहे. पशू, पक्षी, जलचर आदी विविध योनींत बोधिसत्वाने जन्म घेतला, असे या कथांतून दाखविलेले असले तरी तो मादीरूपात मात्र आढळत नाही.[४]

बौद्ध धर्माच्या प्रसारासाठी गौतम बुद्धाच्या अनुयायांनी या जातक कथांचा उपयोग केला हे निःसंशय प्रत्यक्ष गौतम बुद्धानेही तो केला असावा. सद्धर्मपुंडरीक या बौद्ध ग्रंथात तसा उल्लेख आढळतो. व्यावहारिक नीतिकथा, दीर्घ साहसकथा, निखळ विनोदी कथा अशा विविध प्रकारच्या जातक कथा आहेत. एकूण भारतीय कथा संचितातील लौकिक कथांमध्ये आवश्यक ते फेरफार करून त्यांना बौद्ध जातक कथांचे स्वरूप दिले गेल्याचेही दिसते. जातकामध्ये रूपांतरित झालेल्या काही कथा नुसत्या कथा म्हणून बौद्ध सुत्तांत (सूत्रांत) पाहायला मिळतात. त्यांत बोधिसत्वाची व्यक्तिरेखा अर्थातच नसते. अशा कथांना पुढे केव्हा तरी जातकांचे स्वरूप दिले गेले आहे.[५]

एके काळी काशी राष्ट्रात वाराणसी येथे ब्रह्मदत्त नावाचा राजा राज्य करीत होता. त्या वेळी अशा आशयाच्या ओळींनी जातक कथेची सुरूवात होते. प्रत्येक जातक कथेचे खालीलप्रमाणे पाच भाग असतात...

(१) पच्चुप्पन्नवत्थु वर्तमानकाळाची कथा असा या संज्ञेचा अर्थ. संबंधित जातक कथा गौतम बुद्धाने आपल्या अनुयायांना केव्हा सांगितली हे येथे सांगितलेले असते.

(२) अतीतवत्थु म्हणजे (गौतम बुद्धाच्या) मागील जन्माची कथा.

(३) गाथा किंवा पद्ये. ही सर्व साधारणतः जातक कथेशी संबंधित असतात; परंतु पुष्कळदा त्यांचे दुवे वर्तमान काळाच्या कथेशी जोडलेले असतात. अशा गाथांना अभिसंबुद्ध गाथा बुद्धाला आत्मज्ञान प्राप्त झाल्यानंतर त्याने म्हटलेल्या गाथा असे संबोधले जाते.

(४) वेय्याकरण म्हणजे गाथांचे शब्दशः स्पष्टीकरण.

(५) समोधान किंवा उपसंहार. त्यात प्रथम गौतम बुद्धांकडून संबंधित जातक कथेतील मागील जन्मीच्या व्यक्तींची हल्लीच्या जन्मातील व्यक्तींशी सांगड घातली जाते.

बौद्धांच्या त्रिपिटकातील सुत्तपिटक या ग्रंथाचा खुद्दकनिकाय म्हणून जो पाचवा भाग आहे त्याचे पंधरा पोट विभाग असून त्यातील क्रमाने दहावा भाग जातक हा आहे. या दृष्टीने जातके ही त्रिपिटकाचाच एक भाग होत, असे मानले जाते. तथापि जातक या विभागात विविध जातक कथांशी संबंधित असा मुख्य गाथाच आहेत, प्रत्यक्ष जातक कथा नाहीत. केवळ गाथांवरून जातक कथांची कल्पना येणे अवघड म्हणून त्यांच्या स्पष्टीकरणार्थ जातक-अट्ठकथा लिहिली गेली. ती मुळात पाली भाषेत होती नंतर तिचा सिंहली भाषेत अनुवाद झालेला होता. या अनुवादात मूळ जातक कथा मात्र पालीतच ठेवलेल्या होत्या. पुढे पाली अट्ठकथा नष्ट झाली आणि तिच्या उपलब्ध सिंहली अनुवादावरून गद्यानुवादाच्या रूपाने सिंहली आणि जातकट्ठवण्णना (जातकार्थवर्णना) या नावाने ती पुन्हा पालीत आणली गेली. हे कर्तृत्व बुद्धघोषाचे असे काही अभ्यासकांचे मत असले तरी त्याबाबत एकमत नाही. जातकट्ठवण्णना हा ग्रंथ जातक कथांच्या अभ्यासाचा आजचा मुख्य आधार आहे.[६]

जातक कथांची संख्या नेमकी किती याविषयीही एकमत नाही. जातक-ट्ठवण्णना या ग्रंथात एकूण ५४७ कथांचा अंतर्भाव असून त्यांची विभागणी २१ निपातांत किंवा गटांत केलेली आहे. ती करताना त्या त्या जातक कथेशी संबंधित अशा गाथांची संख्याच विचारात घेतलेली आहे. उदा. एक-निपात या पहिल्या गटात एक गाथा आणि तिच्या संबंधित असलेले एक जातक अशा व्यवस्थेने एकूण १५० जातके आलेली आहेत. या ५४७ कथांपैकी काही पुनरावृत्त झालेल्या आहेत तर काहींचा समावेश अन्य विस्तृत अशा जातक कथांत झालेला आहे. त्यामुळे प्रत्यक्षात ही संख्या ५४७ पेक्षा कमीच आहे. धर्मानंद कोसंबी यांच्या मते, सुमारे ५३४ जातक कथा आहेत. भारतात सांची, भारहुत आणि अमरावती या ठिकाणच्या स्तुपांवर विविध जातक कथांतील दृश्ये कोरलेली आहेत. या स्तुपांचा काळ पाहता इ. स. पू.

तिसऱ्या-दुसऱ्या शतकांत जातक कथांची लोकप्रियता प्रस्थापित झालेली होती, असा निष्कर्ष काढता येतो. जातकट्ठवण्णना या ग्रंथाचा काळ मात्र इसवी सनाचे पाचवे शतक असा सर्वसाधारणतः मानला जातो.[७]

बौद्ध परंपरेत जातक कथांचे चित्रण हे चित्र व शिल्पांच्या माध्यमातून प्रकट झाले आहे. अजिंठा, औरंगाबाद लेणींमध्ये वेगवेगळ्या जातक कथा या शिल्पांच्या माध्यमातून प्रकट होतात. सातवाहन कालखंडात अनेक लेणींतून जातक कथांची शिल्पे प्रतिबिंबित होतात. या शोधनिबंधात औरंगाबाद बौद्ध लेणी शिल्पातील अष्टभय जातक शिल्पांवर नवा प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे.

**औरंगाबाद लेणी :**

औरंगाबाद लेणी ही औरंगाबाद शहरातील बीबी-का-मकबरापासून उत्तरेला सुमारे दोन किलोमीटर अंतरावर आहे. ही एक बौद्ध लेणी असून डोंगरात खोदलेली आहे. ही बौद्ध लेणी असल्याचा पहिला संदर्भ कान्हेरीच्या विशाल चैत्यात सापडतो.[८] इ. स. चे ६ वे शतक ते इ. स. चे ७ वे शतक या दरम्यान ही लेणी निर्माण करण्यात आली आहे. यात लेणींची संख्या १२ इतकी आहे.[९] तुलनेने मृदू अशा बेसॉल्ट खडकात ही लेणी खोदलेली आहे आणि त्याच्या स्थानावरून ही सर्व १२ लेणी मुख्यत्वे तीन गटांत विभागलेली आहे. त्यामध्ये पहिल्या गटात लेणी क्र. १ ते ५, दुसऱ्या गटात ५ ते ९ आणि तिसऱ्या गटामध्ये ९ ते १२ आहेत. औरंगाबाद परिसरात असलेल्या अजिंठा आणि वेरूळ येथील लेणींशी या लेणींचा संबंध लावला जातो.

**अष्टभय जातक शिल्प :**

अजंठा लेणीपूर्वी औरंगाबाद बौद्ध लेणीत जातक कथांवरील आधारलेली शिल्पे आपणांस आढळून येतात. यामध्ये औरंगाबाद लेणीतील लेणी क्र. ७ मध्ये बोधिसत्व अवलोकितेश्वराचे अष्टभय जातक शिल्प दर्शनी भागात ठळकपणे आपणास दिसून येते.

बोधिसत्व अवलोकितेश्वराच्या हातात देठासकट लालपद्म असते तर एक हात अभयमुद्रेत असतो. डोक्यावर दोन्ही बाजूंनी बुद्ध असतात तर त्यांच्या मुकुटात बुद्ध किंवा स्तूप असल्याचे दर्शवितात. अग्नी, वादळ, जल, शत्रू, रोगराई, सर्प, सिंह,

हत्ती यापासून आमचे संरक्षण करा ही प्रार्थना लोक खाली करताना दाखविले आहे. म्हणून याला अष्टभय शिल्प म्हणतात.[१०] इ. स. च्या चौथ्या शतकात ही लेणी कोरली आहे. अजिंठा व औरंगाबाद या लेणींमध्ये हे अष्टभय जातक शिल्प आहे. पुढे या अष्टभयपासून मुक्ती देणारे शिल्प प्रचंड लोकप्रिय झाले. वज्रपाणीच्या हाती शस्त्र व पाश असतात. आता त्याला अवलोकितेश्वर बोधिसत्व म्हणू लागले. सातव्या व आठव्या शतकात जर जनतेचे कल्याण करता यावे म्हणून त्यांना हजारो हात व सर्व दिशेने बघता यावे म्हणून अनेक डोके दाखविले गेले.[११]

बोधिसत्व पद्मपाणी हे इ. स. दुसऱ्या-तिसऱ्या शतकात उपासकांचे आवडते दैवत झाले होते. त्यांच्याकडे उपासक आठ भयांपासून संरक्षण मागत असे अशी, उपासना करणारी शिल्पे महाराष्ट्राच्या अनेक लेणींत आपल्याला पाहायला मिळतात. ते अष्टाभय शिल्प म्हणून ओळखले जाते. आठ भयांपासून उपासकाला अग्नीपासून, शत्रूच्या तलवारीपासून, शत्रूने केलेल्या कैदेतून, वन्य हिंस्त्र प्राण्यांपासून, सरपटणाऱ्या विषारी प्राण्यांपासून, समुद्रात जहाज बुडण्यापासून, साथीच्या किंवा अनेक रोगांपासून आणि येणाऱ्या मृत्यूपासून बोधिसत्वाने उपासकांचे संरक्षण करावे, अशी उपासना करणारी ही शिल्पे लेणींत कोरलेली पाहायला मिळतात.[१२]

**औरंगाबाद लेणीतील अष्टभय जातक शिल्प :**

औरंगाबाद लेणीतील लेणी क्र. ७ मध्ये बोधिसत्व अवलोकितेश्वराची अष्टभय जातक शिल्पे ही समभाग प्रतिमेत असून ती कमलपुष्पावर उभी कोरण्यात आली आहेत. ती पद्मासनात असून त्याची मुद्रा अभयमुद्रा जटामुकुटात अमिताभ बुद्ध कोरलेला आहे. लहान नाक, छोटे तोंड व बंद डोळे आहेत.[१३] डोक्यावर गंधर्व हे फुलांचे हार घेऊन आकाशात विहार करीत आहेत. ही शिल्पे दोन भागांमध्ये कोरण्यात आली आहेत. पहिला भाग उजवीकडे असून त्यामध्ये चार शिल्पे आहेत तर डाव्या बाजूने चार शिल्पे आहेत.[१४]

**अष्टभय जातक लोककथा आणि वास्तव :**

अष्टभय जातकामध्ये आठ भयांचे चित्रण करण्यात आले आहे. त्याची लोककथा व वास्तव आपणांस पुढील विवरणातून समजून येईल–

## १) अग्निभय :

अचानक लागलेली आग ही एक नैसर्गिक आपत्ती असते. त्या आगीमुळे माणसाचे जीवन उद्‌ध्वस्त होते. आगीचे लोळ कुशलतेने रेखाटले आहेत. अशा भयापासून बोधिसत्व अवलोकितेश्वर मानवाचे रक्षण करतो. बौद्ध धम्माचे अनुयायी हे व्यापार, धर्म प्रसार, युद्ध - आक्रमण यासाठी प्रवास करीत असतात. त्यांचे जीवन अकस्मात संकटापासून सुरक्षित राहावे म्हणून हा अग्निभयपट दर्शविण्यात आला आहे. या शिल्पात दोन व्यक्ती हे अग्नीपासून पळून जात आहेत. त्यांना बोधिसत्व अवलोकितेश्वर हे आगीपासून वाचविण्याचे काम करीत आहेत.[१५]

## २) दरोडेखोराचे भय :

प्राचीन कालखंडामध्ये मोठ्या प्रमाणात दरोडेखोर हे सामान्य / धनाढ्य व्यक्ती, व्यापारी यांची संपत्ती लुटण्याचे काम करीत असत. त्यामुळे त्या व्यक्ती सर्व संपत्ती लुटल्यामुळे तो हतबल होतो. म्हणून या शिल्पात हा प्रसंग कोरला आहे. दोन व्यक्ती हे दरोडेखोराला पाहून पळत आहेत, त्यांना वाचविण्याचे काम बोधिसत्व अवलोकितेश्वर करीत आहेत.[१६]

## ३) गुलामीपासून मुक्ती :

भारतामध्ये आपणांस गुलामगिरीची पद्धत प्राचीन कालखंडापासून आढळून येते. याचाच प्रसंग या शिल्पामध्ये कोरण्यात आला आहे. यामध्ये दोन व्यक्तींच्या हातामध्ये बेड्या असून त्यांना गुलामीतून मुक्त करण्याचे कार्य हे बोधिसत्व अवलो-कितेश्वर करीत आहेत.[१७]

## ४) जहाज बुडण्यापासून संरक्षण :

व्यापार, पर्यटन तसेच राजकीय संबंधातून मैत्री, आक्रमणासाठी समुद्री मार्गाने प्रवास केला जातो. त्यातून प्रवास करणाऱ्यांना जलसमाधी मिळू शकते किंवा या संकटातून वाचविण्यासाठी बोधिसत्व अवलोकितेश्वर हा जहाज बुडण्यापासून सर्वसामान्यांना वाचवितो.[१८]

### ५) सिंह, हिंस्त्र पशूंपासून संरक्षण :

वन्य व हिंस्त्र पशू जंगलामध्ये मुक्तपणे वावरतात. मनुष्यही काही कामा-निमित्ताने जंगलात गेला तर हे पशू हल्ला करू शकतात. त्यातून मानवी जीवन हे संकटात येऊ शकते. हिंस्त्र पशूचा हल्ला जीवघेणा असू शकतो. त्यामुळे त्यापासून वाचविण्यासाठी बौद्ध धम्मात प्रार्थना केली जाते. या शिल्पात एका दाम्पत्याला सिंहापासून वाचविण्याचे काम बोधिसत्व अवलोकितेश्वर करतो.[१९]

### ६) नाग / सापांपासून संरक्षण :

नाग / साप / अजगर हे माणसाच्या जीवनात अनेक संकटे निर्माण करू शकतात. त्यांचा दंश जीवघेणा असतो, त्यातून मनुष्य वाचेल की नाही हे सांगता येत नाही. या शिल्पात दोन व्यक्तींचे नागापासून संरक्षण करण्याचे कार्य बोधिसत्व अवलोकितेश्वर करतो आहे हे दर्शविले आहे.[२०]

### ७) हत्तीपासून संरक्षण :

हत्ती हा प्राणी अतिशय बलाढ्य असून तो जंगलातील सर्वात शक्तिशाली आणि बुद्धिमान प्राणी म्हणून आपण ओळखतो. कधी-कधी हत्ती पिसाळत असतो. शिल्पामध्ये हत्ती दोन व्यक्तींवर हल्ला करीत आहेत, त्याला वाचविण्याचे कार्य हे बोधिसत्व अवलोकितेश्वर करीत असते.[२१]

### ८) कुरूप व्यक्तींपासून संरक्षण :

समाजामध्ये अनेक प्रकारचे कुरूप व्यक्ती आपणांस दिसून येतात. तसाच एक प्रसंग सदरील शिल्पात कोरण्यात आला आहे. या शिल्पात एक दाम्पत्य हे आपल्या मुलांसोबत आहे, मूल व आपल्या नवऱ्याला वाचविण्यासाठी ही महिला त्या कुरूप व्यक्तीसमोर आपले गुडघे टेकविते. त्या कुरूप व्यक्तीचा चेहरा अत्यंत घाणेरडा असून तो बघण्याच्या लायकीचा नाही. त्याचे डोळे हे मोठे व खुले आहेत. त्याच्या हातामध्ये भीतीदायक असे शस्त्र असून तो दाम्पत्य व त्यांच्या मुलावर हल्ला करीत आहे. त्या हल्ल्यापासून बोधिसत्व अवलोकितेश्वर त्यांना वाचविण्याचे काम करीत आहेत.[२२]

वरील विवेचनावरून असे समतजे की, बोधिसत्व अवलोकितेश्वर अष्टभयांपासून सामान्य व्यक्तींना संरक्षण करण्याचे परमकर्तव्य मानून तो सामान्यांचा संकटमोचन म्हणूनसुद्धा त्याला ओळखले जाते.

**चिकित्सक विश्लेषण :**

जातक कथांमधील प्रचलित लोक रूढी यांनी कल्पनांचे विश्लेषण करताना तज्ज्ञांनी केलेले विवेचन महत्त्वाचे ठरते. दुलारी कुरेशी असे म्हणतात की, बोधिसत्व अवलोकितेश्वर पश्चिम भारतातील लेणीमध्ये प्रामुख्याने आढळून येतो. ही अजिंठा, कान्हेरी, औरंगाबाद व वेरूळ ही प्रमुख ठिकाणे आहेत.[२३] कारण बोधिसत्व हे लोकांना संकटातून वाचवीत असतात. बोधिसत्वे ही बुद्धाच्या तत्त्वज्ञानातून लोकांची संकटे दूर करणारा एक महान व्यक्ती आहे. पिया ब्रनकासिओ म्हणतात की, औरंगाबाद बौद्ध लेणीतील अष्टभय जातक शिल्पे ही लेणी क्र. ७ मध्ये असून ती महायान पंथाचे द्योतक आहे. तो अष्टभयापासून सर्वांचे रक्षण करण्याचे त्याचे काम आहे.[२४]

रे अमिता म्हणतात की, अवलोकितेश्वर हा कमळावर समपादस्थानकावर उभा आहे. शिल्पकलेतील हे एक सर्वांत महत्त्वाचे शिल्प असून ते पश्चिम भारतातील लेणीतील उत्कृष्ट शिल्प आहे.[२५] कमळ हे बोधिसत्वाच्या जन्माचे एक प्रतीक आहे. त्यातून ते समपादस्थानकावर उभे राहून लोकांची संकटे दूर करतात. याचा अर्थ असा की, बौद्ध धम्माचे अनुयायी हे प्रामुख्याने व्यापारी असल्याने त्यांना नित्य जीवनामध्ये अनेक संकटांना सामोरे जावे लागत असते. सामान्य नागरिकांना कुठलाही धर्म संरक्षक कवच प्रदान करीत असतो. बौद्ध धम्मामध्ये असे कवच आपल्या अनुयायांना दिलेले आहे. त्यामुळे समुद्र ओलांडून चीन, जपान, अग्नेय आशिया, मध्य आशिया व पूर्ण आशियायी देशांमध्ये बौद्ध धर्माने प्रवेश करून बौद्ध धम्माचा व संस्कृतीचा प्रसार करण्याचे काम केले आहे. व्यापारी, धर्मप्रसारक व सामान्य जनांना अष्टभयापासून संरक्षण कवच देण्याचे सूत्र या अष्टभय जातक शिल्पामध्ये देण्यात आले आहे.

**समारोप :**

गौतम बुद्धांच्या जन्मापूर्वीच्या ज्या कथा आहेत त्या जातक कथा म्हणून ओळखल्या जातात. या जातक कथेचे सार हे मानवतेचे रक्षण करणे होय. बहुजन हिताय, बहुजन सुखाय, लोकान कंपाय असे या धम्माचे स्वरूप आहे. मानवी जीवन क्षणभंगूर आहे याचा उल्लेख सर्वम अणिकनम सर्वन कनिकम असा केला आहे.

अशा दुःखांचे मूळ कारण आणि आपल्या इच्छा, वासना मर्यादित ठेवाव्यात, असा बौद्ध धम्माचा संदेश आहे. जीवन हे अष्टभयाने व्यापलेले आहे. हे जर सुखी करावयाचे असेल तर प्रज्ञा, शील, करूणेचे पालन करून पंचशील व त्रिरत्नांच्या अनुसार करून अष्टदीप तेवत ठेवला पाहिजे, असा या अष्टभय जातक शिल्पांचा संदेश आहे.



**औरंगाबाद बौद्ध लेणी शिल्पातील अष्टभय जातक शिल्प**

## संदर्भ :


(१) भागवत दूर्गा, सिद्धार्थ जातक कथा, वर्धा बुक्स, पुणे, १९७५, पृ. ३.

(२) उपरोक्त.

(३) उपरोक्त, पृ. ४.

(४) बापट पु. वि., जातके, मराठी विश्वकोश, https://vishwakosh.marathi.gov.in/Access dated 02-12-2022, 7.30.

(५) उपरोक्त.

(६) उपरोक्त.

(७) उपरोक्त.

(8) Gokhale Shobhana, Kanheri Inscription, Deccan College Post Graduate & Research Institute, Pune, 1991, p. 52.

(9) Gupte R.S. & Mahajan B.D., Ajanta Ellora & Aurangabad Caves, Taraporawala, Mumbai, 1962, p. 225.

(10) Getty Alice, The Godes of Northen Buddhism, Oxford, London, 1914, p. 52.

(11) Gupte R.S. & Iconography of the Hindu, Buddhist & Jains, Taraporawala, Mumbai, 1972, p. 12.

(12) Bhattacharya Benoytosh, Indian Buddhist Iconography, Farima Mukhopadhayay, Culcutta, 1958, p. 124.

(13) Brancaccio Pia, The Buddhist Caves at Aurangabad : Transformations in Arts & Religion, BRILL, Leiden, 2011, p. 160.

(14) Ibid, p. 160.

(15) Qureshi Dulari, Art & Vision of Aurangabad Caves, Bhartiya Kala Prakashan, Delhi, 1998, p. 116.

(16) Ibid.

(17) Ibid.

(18) Ibid.

(19) Ibid.

(20) Ibid.

(21) Ibid, p. 117.

(22) Ibid.

(23) Ibid.

(24) Brancaccio Pia, Opcit, p. 160.

(25) Ray Amita, Aurangabad Sculpture, Farima Mukhopadhayay, Culcutta, 1966, p. 9.


❍❍❍

५

# शंख व शंखमूर्ती

**डॉ. जगदीश व्यंकटराव भेलोंडे**
शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, कन्नड, जि. औरंगाबाद

भारतीय संस्कृतीमध्ये शंखाला महत्त्व दिलेले आहे. मंदिरामध्ये व देवघरामध्ये शंख ठेवले जाते, शंखाची पूजा केली जाते, शंख हे वाद्य म्हणूनही वापरले जाते. युद्ध प्रसंगी किंवा मंगल प्रसंगी शंख हे वाद्य म्हणूनही वापरले गेले आहे व आजही मंगल प्रसंगी त्याचा वापर केला जातो. विविध देवतांनी आपल्या हातामध्ये शंख धारण केलेले आहे. भारतीय शिल्पकलेमध्येही शंखाची निर्मिती करण्यात आली आहे. साहित्यातूनही शंखाविषयी माहिती देण्यात आली आहे. धार्मिक ग्रंथांबरोबरच शिल्पशास्त्रविषयक ग्रंथातूनही शंखाचे उल्लेख आले आहेत. पुराण ग्रंथातून शंख या असुराची माहिती विविध कथांच्या माध्यमातून दिली आहे. शंख हे सहज उपलब्ध होत असले तरी शंखाच्या निर्मितीसंदर्भात विविध कथा रचण्यात आल्या आहेत. विविध देवतांनी धारण केलेले शंख हे विविध नावांनी ओळखले जातात. शंखाच्या मानवी स्वरूपातील मूर्तिशिल्पांची निर्मितीही करण्यात आली. शंख हे वेगवेगळ्या आकारांतील पाहावयास मिळतात. वर्तमानात शंख वाजविणे हे आरोग्यासाठी उत्तम समजले जाते. तेव्हा भारतीय संस्कृतीमध्ये शंखाला का महत्त्व दिले होते याची प्रचीती येते. विविध देवतांच्या हाती शंख देण्यामागे निश्चित काही तरी कारण असावे. शंखाची निर्मिती, त्यांचे प्रकार, त्यांची विविध नावे, शंखासंदर्भात पौराणिक कथा, इतिहास व महत्त्व याविषयीची माहिती जाणून घेण्यासंदर्भात प्रस्तुत विषयाची मांडणी करण्यात आली आहे. देवतांनी अस्त्र व शस्त्राच्या स्वरूपात शंख धारण करण्यामागे व मानवी अलंकारामध्ये शंखाचा समावेश करण्यामागे निश्चितच काही महत्त्वपूर्ण कारण असावे.

**शंख व त्याची निर्मिती :**

शंखाची निर्मिती ही गोगलगायपासून होते. गोगलगायच्या कठीण कवचाला शंख असे म्हणतात. गोगलगाय ही मृदुकाय म्हणजे हाडे नसलेली मऊ शरीराची असल्यामुळे तिच्या संरक्षणासाठी कठीण कवचाची निर्मिती झालेली आहे. इतर प्राण्यांपासून स्वतःचे संरक्षण करीत असताना गोगलगाय शंखामध्ये जाऊन बसत असे. शंख हे साधारणतः नदी किंवा समुद्राच्या काठी मोठ्या प्रमाणात उपलब्ध होतात. "संस्कृतात शंखाला 'जलज' ही म्हणतात व समुद्राला 'शंखिन' एक नाव आहे".[१] त्यामुळे सृष्टीच्या निर्मितीबरोबरच शंखाची निर्मिती झाली असावी. प्रागैतिहासिक संस्कृतीचा अभ्यास करताना देशातील विविध ठिकाणी झालेल्या उत्खननात शंखाचे अवशेष मिळाले आहेत. "महाराष्ट्रातील नद्यांच्या गाळाचा अभ्यास करताना असे दिसते की, या गाळामध्ये सापडलेल्या शंख व शिंपल्यांचे कार्बन १४ पद्धतींवरून काढलेल्या वयोमानावरून गाळांचे निक्षेप १ लाख ते २० वर्षांपूर्वीचे असावेत"[२] परंतु त्या वेळेस शंखाच्या वापराविषयीची निश्चित माहिती मिळत नाही. वेगवेगळ्या आकारांतील शंख आढळतात.

**शंखासंदर्भात पौराणिक कथा :**

शंखाचे महत्त्व लक्षात घेता शंखाच्या निर्मितीसंदर्भात पौराणिक कथांची निर्मिती करण्यात आली. वास्तविक शंख हे सहज उपलब्ध होत होते. शिवाय त्याची निर्मिती एका प्राण्यापासून झाली असली तरी कदाचित त्याचे महत्त्व अधोरेखित करण्यासाठी त्या संदर्भात अशा प्रकारच्या कथांची निर्मिती करण्यात आली असावी. देवी भागवतात अशा प्रकारची कथा सांगितली आहे की, "शंखचूड नावाच्या दैत्याने देवतांचाही पराभव केला तेव्हा सर्व देव शंकराला शरण गेले. शंकराकडून हा दैत्य मारला जात नव्हता कारण त्याची पत्नी तुळशी ही पतिव्रता होती. विष्णूने शंखचूडाचे रूप धारण करून तिच्या पतिव्रत्याचा भंग केला. त्यामुळे शंखचूड मारला गेला. तुळशीने विष्णूला पाषाण होण्याचा शाप दिला असता विष्णूने तुझा पती शंखाच्या रूपाने माझ्या पूजेत समाविष्ट होईल असे म्हटले."[३] तुळशीची अशाच प्रकारची कथा जालंधर असुराच्या पत्नीच्या रूपाने येते. शंखचूड असुरापासून शंखाची निर्मिती या कथेतून दाखविण्यात आली असली तरी शंखाच्या निर्मितीसंदर्भात केवळ ही एकच पौराणिक कथा नाही तर अनेक कथा या संदर्भात असल्याचे दिसतात. "महाभारतातील

समुद्र मंथन आख्यानामध्ये समुद्र मंथनाच्या वेळी अमृत व विविध वस्तूंमध्ये शंखही उत्पन्न झाले. ते विष्णूने लक्ष्मीसोबत धारण केले. महाभारतातील अन्य एका कथेत विष्णूने पाताळातील पंचजन असुराचा वध करून 'पांचजन्य' शंख मिळविले होते. विष्णू पुराणानुसार समुद्रामध्ये निवास करणाऱ्या शंखासारख्या आकृतीवाल्या पंचजन असुरापासून संदीपनी ऋषीच्या मुलांचे संरक्षण केले आणि असुरांच्या अस्तीपासून निर्मित शंख मिळवून शंखनाद केला, तो ध्वनी असुरांना भयभीत करणारा होता."[४] अशा प्रकारच्या विविध कथा शंखाच्या निर्मितीसंदर्भात पाहावयास मिळतात. या कथांवरून शंख हे महत्त्वपूर्णच असल्याचे स्पष्ट होते.

**शंख : देवतांचे आयुध व प्रकार :**

साधारणतः सहज उपलब्ध होणाऱ्या शंखाचा उपयोग विविध गोष्टींसाठी केला जात होता. त्यापैकी शंख हे वाद्य व अलंकार म्हणून वापरले जात होते. भारतीय संस्कृतीमध्ये "शंख हे ज्ञानाचे प्रतीक... शंखाला पंचभुतात्मक शब्दब्रह्माचे प्रतीकही मानतात."[५] त्यामुळेच शंख हे विविध देवतांच्या हाती दाखविण्यात आले आहेत. देवतांच्या हाती असणारे शंख हे विविध नावांनीही ओळखले जात होते. वास्तविक शंख हे निसर्गतः वेगवेगळ्या आकारांचे आढळतात. त्यावरून त्याची विविध नावेही आहेत. "पेला, नलिका, पट्टी, घुमट, गोल, बिंब, शंकू, द्विशंकू, चाती, टोपी, बुटका मनोरा, ज्वालामुखी (उदा. लिपेट) इ. अनेक आकारांचे शंख असतात."[६] अशी वेगवेगळी नावे त्यांच्या आकारावरून पडलेली आहेत. शिवाय शंखावर असलेल्या पिळांवरून त्याचे वामावर्त व दक्षिणावर्त असे दोन प्रकार पडतात. परंतु देवतांनी धारण केलेले शंख हे वेगवेगळ्या नावांनी ओळखले जातात. शंख हे विष्णू या देवतेच्या प्रमुख आयुधांपैकी एक आहे. विष्णूच्या २४ प्रकारच्या मूर्तीमध्ये व विष्णूच्या शक्तीच्या हाती शंख दाखविले जातात. देवता व मानवांनी धारण केलेल्या शंखांची वेगवेगळी नावे पाहावयास मिळतात. "महाभारतामध्ये देवतांच्या शंखांचे विविध नावे आढळतात. त्यामध्ये कृष्ण-पांचजन्य, अर्जुन-देवदत्त, भीम-पौण्ड्र, धर्मराज-अनन्तविजय, नकुल-सुघोष, सहदेव-मणिपुष्कर"[७] अशा प्रकारची नावे होती. शंख हे विष्णू या देवतेचे प्रमुख आयुध असले तरी इतर देवता व मानवांनीही याचा उपयोग विविध कारणांसाठी केलेला दिसतो.

शंख हे विष्णू या देवतेचे आयुध असून विष्णू या देवतेची ओळख शंख, चक्र, गदा, पद्म या प्रमुख आयुधांवरून होते. विष्णूने धारण केलेले शंख हे पांचजन्य या नावाने ओळखले जाते. मूर्तिशिल्पामधून विष्णूच्या हाती दाखविण्यात येणाऱ्या आयुधांच्या क्रमावरून विष्णूचे २४ प्रकारचे मूर्तिशिल्प निर्माण होतात. विष्णूच्या हाती दाखविण्यात येणारे शंख हे आडवे, उभे किंवा बोटामध्ये अडकवून धरलेले दाखवण्यात येतात. विष्णूला शंखोदक प्रिय असल्यामुळेच वैष्णव संप्रदायात शंखाला विशेष महत्त्व दिले आहे. शंख हे विष्णू या देवतेबरोबरच महिषासुरमर्दिनी व वरूण या देवतेच्या हाती दाखविण्यात आले आहे.

**शंख मूर्तिशिल्प :**

एखाद्या बाबीचे महत्त्व अधोरेखित करण्यासाठी त्याची प्रतिमा देवतेच्या स्वरूपात दाखविली जात असे. देवदेवता असो की प्रतीके असो त्यांना मानवी स्वरूपात दाखविण्यात येत होते. देवदेवतांबरोबर त्यांची प्रतीकेही मानवी रूपात दाखविली गेली आहेत. वैष्णव शिल्पांत विष्णूच्या काही आयुधांचे मानवीकरण झाले आहे. ही प्रथा मध्ययुगीन कालापासून सुरू झालेली दिसते.[९] शंख हे प्रतीक विष्णू या देवतेचे आयुध पुरूष म्हणून ओळखल्यामुळे शंखाच्या मानवी स्वरूपातील मूर्तिशिल्पांची निर्मिती करण्यात आली. शंखाचे मूर्तिशिल्प कशा प्रकारे करावे याविषयीही माहिती सांगण्यात आली आहे. “विष्णू धर्मोत्तर पुराणामध्ये आयुध पुरूषाचे उल्लेख आहेत, शंखाचे चित्रण सुंदर नेत्रांनी युक्त दिव्य शुक्लांग पुरूषाच्या रूपात झाले पाहिजे. मयमतनुसार शंख श्वेत रंग व वामन आकाराचे राहतील.”[१०] धार्मिक ग्रंथांमध्ये सांगितल्याप्रमाणे शंखाचे मूर्तिशिल्प निर्माण करण्यात आले आहेत. “बंगालमध्ये सरिसदह गावी विष्णू मूर्तीच्या अनुषंगाने शंखाची पुरूषमूर्ती दिसते म्हणजे शंखाचेही मूर्तीकरण झालेले आहे. त्याचा उजवा हात व्याख्यान मुद्रा दर्शवीत असून डावा हात कमलधारी आहे.”[११] सदरील मूर्तिशिल्पातून शंखाला ज्ञानाचे प्रतीक व शब्दब्रह्माचे प्रतीक दाखविण्याचा प्रयत्न केला असावा. “शंख पुरूष किरिट मुकुट किंवा करण्ढक मुकुट व वनमाला धारण केलेले त्रिभंग उभा असतो. खजुराहो येथील मूर्तीमध्ये जटा मुकुट आहे. एन. पी. जोशी यांनी प्रिन्स ऑफ वेल्स संग्रहालयातील एका मूर्तीचा उल्लेख केला आहे की, ज्यामध्ये विष्णूजवळ शंख घेतलेली एक स्त्री उभी आहे.”[१२]

**शंख - वाद्य :**

शंख हे एक वाद्य आहे. वाद्य वाजविणे व त्यातून जो ध्वनी निर्माण होतो त्यावरून वाद्याचे प्रमुख तीन प्रकार पडतात. आघातवाद्य, तंतुवाद्य व वायुवाद्य किंवा स्वर (सुषिर) वाद्य हे तीन प्रकार होत. भरतमुनीने आपल्या नाट्यशास्त्रात वाद्याचे चार प्रकार सांगितले आहेत. ते म्हणजे "तत म्हणजे तारा असलेले, अवनद्ध म्हणजे चामड्याने मढवलेले, घन म्हणजे भरीव द्रव्याचे व सुषिर म्हणजे वारा फुंकून वाजविले जाणारे"[१३] वाद्य वाजविण्यावरून या प्रमुख प्रकारातून अनेक वाद्यांची निर्मिती झालेली आहे. यावरून शंख हे वाद्य वारा फुंकून वाजवले जाणारे असल्यामुळे सुषिर या वाद्य प्रकारातील असल्याचे दिसते. शंख हे वाद्य म्हणून प्रागैतिहासिक काळापासून वापरले जात असावे.

"शंख आणि बासरी अमरावती शिल्पात आहेत. त्यात शंखाच्या तोंडाशी धातूची नळी लावलेली दिसते. त्यामुळे फुंकणे सोपे जाते. शंख हे प्राचीन भारतीयांचे, त्यातल्या त्यात वीरांचे, आवडते वाद्य. श्रीकृष्णाचा पांचजन्य प्रसिद्ध आहे परंतु सातवाहन काळानंतर वाद्य म्हणून शंख शिल्पात किंवा चित्रात दिसत नाही,"[१४] असे मत डॉ. एम. के. ढवळीकर यांनी मांडले आहे. परंतु सातवाहन काळानंतरही शिल्पातून शंख हे केवळ प्रतीक म्हणूनच नव्हे तर वाद्य म्हणूनही दाखविले आहे. युद्ध प्रसंगी, मंगल समयी या वाद्याचा वापर केला जात होता. राजाज्ञा सांगण्यासाठीही याचा उपयोग केला जात असावा. यातून निघणारा आवाज हा उच्च स्वराचा असल्यामुळे याचा वापर केवळ विशेष प्रसंगी होत असावा.

**अलंकारामध्ये शंखाचा समावेश :**

प्रारंभी मानवाने अलंकार म्हणून वेगवेगळ्या नैसर्गिक साधनांचा उपयोग केलेला आहे. त्यामध्ये माती, शंख-शिंपले इत्यादींचा उपयोग केला आहे. प्रागैतिहासिक काळामध्ये शंखाचा वापर केला जात असावा. परंतु सिंधू संस्कृतीमध्ये याचे अनेक पुरावे उपलब्ध झालेले आहेत. शंखाचा वापर बांगड्या, कर्णफुले, पदके इत्यादी शोभेच्या वस्तू बनविण्यासाठी केला जात होता. त्यासाठी लागणारा शंख सौराष्ट्रातून आणला जात असे. तेथे शंख मोठ्या प्रमाणात मिळत असत. गुजरातमधील "जामनगरजवळ नागेश्वर येथे तर फक्त शंखाच्या वस्तू बनविण्याचा कारखाना होता. हे तेथे सापडलेल्या शंखाच्या वस्तू आणि कापलेले शंखांचे तुकडे यांच्या

ढिगावरून सिद्ध होते"[१५] गुजरातप्रमाणे महाराष्ट्रातूनही शंखाच्या विविध वस्तू निर्माण केल्या जात होत्या. "महाराष्ट्रातल्या गोदावरी आणि तापी नद्यांच्या पात्रात मोठ्या प्रमाणात शंख, शिंपले मिळत असत. या शंख, शिंपल्यांचा वापर करून कर्णफुले, बांगड्या इतर शोभिवंत वस्तू बनविण्यात महाराष्ट्राचा कलाकार तरबेज होता."[१६] यावरून हे स्पष्ट होते की, सिंधू संस्कृतीच्या उत्तरेतील नगरामध्ये शंख, शिंपले व त्यापासून बनविलेल्या वस्तू या गुजरात व महाराष्ट्रातून आयात केल्या जात होत्या. शंख व त्यापासून बनविलेल्या वस्तूला देशांतर्गत बाजारपेठेत तर मागणी होतीच त्याचबरोबर विदेशी बाजारपेठेतही त्यास मागणी होती. "सिंधू संस्कृतीचा परदेशी व्यापार इ. पू. ३००० च्या आधी अस्तित्वात होता हे पश्चिम आशियात सापडलेल्या शंखांच्या वस्तूंवरून दिसून येते."[१७] यावरून शंख व शंखापासून बनविलेल्या वस्तूंची निर्यात भारतातून होत होती हे स्पष्ट होते.

**नाण्यांवर शंख प्रतिमा [१८] :**

शंखाची प्रतिमा नाण्यांवरही निर्माण करण्यात आली आहे. देवतांच्या हाती व स्वतंत्रही शंख नाण्यांवर दाखविण्यात आले आहेत. सातवाहन काळापासून निर्माण केलेल्या अनेक राज्यकर्त्यांच्या नाण्यांवर शंख आहेत. "सातवाहन राजा दुसरा सातकर्णी यांच्या नाण्याच्या एका बाजूस हत्ती, शंख व उज्जैन चिन्ह आणि लेख आहे. गौतमीपुत्र सातकर्णी याच्या चैत्य (दहा कमानीचा) छाप नाण्याच्या एका बाजूस चैत्य, चंद्राकोर, शंख व कमळ आणि लेख आहे. यज्ञश्री सातकर्णी याच्या चैत्य (दहा कमानीचा) छाप व चैत्य भरीव छाप नाण्याच्या एका बाजूस शंख दाखविले आहे." सातवाहनानंतर गुप्त घराण्यातील अनेक राज्यकर्त्यांनी आपल्या नाण्यांवर शंखांची निर्मिती केलेली आहे. "चंद्रगुप्त दुसरा याच्या चक्र विक्रम छाप नाण्याच्या एका बाजूस लक्ष्मीच्या उजव्या हाताखाली शंख दाखविले आहे. कुमारगुप्त पहिला याच्या महेंद्रगज छाप नाण्याच्या एका बाजूस उजवीकडे खाली कोपऱ्यात शंख आहे तर गरूड छाप नाण्याच्या दर्शनी बाजूस उजवीकडे शंख आहे." यादव राजा पाचवा भिल्लम याच्या नाण्यावर सिंह आणि शंख ही चिन्हे आहेत. सिंघन राज्याच्या नाण्यावरही शंख हे चिन्ह आहे. चौल राजा राजराज (इ. स. ९८५-१०१४) याच्या राजा छाप नाण्यावर मागील बाजूस शंख दाखविले आहे तर तिरूमलरायाच्या नाण्यांवर शंख, चक्र, गरूड, राम, वराह इत्यादी आकृती आहेत.

**शंखाचे महत्त्व :**

भारतीय संस्कृतीमध्ये शंख हे महत्त्वपूर्ण समजले आहे. विविध बाबींसाठी शंखाचा उपयोग करण्याबरोबरच शंखाला महत्त्वपूर्ण स्थान दिले आहे. शंखाचे महत्त्व विविध वाङ्‌मयीन साधनांतून मांडण्यात आले आहे. "शंख ध्वनी केल्यावाचून मंदिराचे महाद्वार उघडू नये, असे वराहपुराणात सांगितले आहे. विष्णू मंदिरात शंख फुंकणारा सर्व पापांपासून मुक्त होतो, असे बृहनारदीय पुराणात म्हटले आहे."[१९] मंदिराचे द्वार उघडण्यापासून शंख ध्वनीला महत्त्व दिले आहे, शिवाय शंखोदक प्रिय विष्णूला प्रसन्न ठेवण्यासाठीही याचा ध्वनी महत्त्वाचा असल्याचे वर्णन केले आहे. चंद्राला प्रसन्न करण्यासाठी शंखाचे दान द्यावे, असे मत्स्य पुराणात म्हटले आहे.[२०] एकंदर या सर्व कल्पनांमागे शंखाचा जास्तीत जास्त वापर व्हावा हाच उद्देश असावा.

भारतीय आयुर्वेदमध्येही शंखाचे महत्त्व सांगताना अथर्ववेदामध्ये शंखमणी, शंखपुष्पी, वनस्पतींचा उल्लेख केला आहे. 'अथर्ववेदाच्या आयुष्काम सूक्तात सर्व प्रकारच्या रोगांपासून मुक्ती मिळणे व आयुष्य संवर्धित करणे, सर्व भयापासून मुक्ती शंखापासून मिळावी यासाठी व बल, तेज आणि शतायुष्यप्राप्तीसाठी शंख मणिबंधन करण्याविषयी माहिती दिली आहे.' भाग्यप्राप्ती पालुपद सूक्तात शंखपुष्पिका - मूलबंधनाच्या माध्यमातून पशूसमृद्धी, समस्त शत्रू नष्ट व भाग्यवान होण्याची प्रार्थना केली आहे. स्त्री वशीकरण सूक्तात शंखपुष्पिका वनस्पतीची प्रार्थना करण्यात आली आहे तर पती वशीकरण सूक्तात पतीला वश करण्यासाठी त्याला शंखपुष्पी वनस्पती खाऊ घालताना म्हणावयाच्या सूक्ताची माहिती दिली आहे.

**सारांश :**

शंख हे गोगलगाय या प्राण्याचे कवच असून ते सहज उपलब्ध होत असतात. छोट्याशा असलेल्या शंखाला भारतीय संस्कृतीत महत्त्वपूर्ण स्थान दिले आहे. शंखाचा वापर वाद्य, अलंकार व शोभेच्या वस्तू बनविण्यासाठी केला जात असे. एवढेच नव्हे तर अनेक राज्यकर्त्यांनी आपल्या नाण्यांवरही शंखाची प्रतिमा कोरलेली आहे. वेगवेगळ्या आकारांवरून शंखाची वेगवेगळी नावे आहेत. शिवाय विविध देवतांनी व मानवाने धारण केलेले शंख हे वेगवेगळ्या नावांनी ओळखले जातात. शंखासंदर्भात अनेक कथांची निर्मिती व समज निर्माण करून शंखाला महत्त्वाचे स्थान प्राप्त करून

दिले. भारतीय आयुर्वेदामध्ये शंखाचे महत्त्व सांगितले आहे. शंखमुद्रा, शंखवनस्पती व शंखस्मृतीचीही निर्मिती करण्यात आली आहे. वैज्ञानिकदृष्ट्या शंख हा कँकिओलीन व कॅल्शियम कार्बोनेट यांच्या विशिष्ट थरांनी बनलेला असतो. कॅल्शियमचा तर औषधी म्हणून उपयोग होतो. शंखामध्ये पाणी टाकून ते ग्रहण केले तर हे कॅल्शियम मिळते. शिवाय शंख ध्वनीमुळे फुफ्फुसाचे आरोग्य चांगले राहते. त्यामुळेच अथर्व-वेदामध्ये याचे महत्त्व सांगितले असावे. आरोग्याच्या दृष्टीने शंखाचे असलेले महत्त्व लक्षात घेऊन त्याचे महत्त्व प्रतिपादन करण्यासाठी विविध देवतांच्या हाती शंख दाखविण्यात आले आहेत.

**संदर्भ :**


(१) देव बी. चैतन्य, भारतीय वाद्य, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, १९७६, पृ. ८३.

(२) सांकलिया ह. धी, माटे म. श्री., महाराष्ट्रातील पुरातत्व, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, १९७६, पृ. ०७.

(३) पं. जोशी महादेवशास्त्री, भारतीय संस्कृतीकोश, खंड-९, १९७६, पृ. १९३.

(४) गुप्ता रूमी, देवी-देवताओं के अस्त्र-शस्त्र, स्वाती पब्लिकेशन, दिल्ली, २००३, पृ. ६९.

(५) देगलूरकर गो. बं., विष्णुमूर्ते नमस्तुभ्यम, स्नेहल प्रकाशन, पुणे, २००३, पृ. ३६.

(६) मराठी विश्वकोश, खंड-१७, २००७, पृ. ५६७.

(७) काकडे संजय (प्रकाशक), सार्थ ज्ञानेश्वरी, अमोल प्रकाशन, पुणे, २०१६, पृ. ३२-३३.

(८) पं. जोशी महादेवशास्त्री, भारताची मूर्तिकला, अनमोल प्रकाशन, पुणे, १९८०, पृ. ५२.

(९) उपरोक्त, गुप्ता रूमी, पृ. १३४.

(१०) उपरोक्त, पं. जोशी महादेवशास्त्री, भारताची मूर्तिकला, पृ. १०२.

(११) उपरोक्त, गुप्ता रूमी, पृ. १३९.

(१२) उपरोक्त, देव बी. चैतन्य, पृ. ३३.

(१३) ढवळीकर मधुकर केशव, महाराष्ट्राची कुळकथा, राजहंस प्रकाशन, पुणे, २०११, पृ. १०८.

(१४) उपरोक्त, पृ. ५२.

(१५) देव प्रमोद, प्राचीन महाराष्ट्रातील व्यापार परंपरा, विद्या बुक औरंगाबाद, २०२२, पृ. ४९.

(१६) ढवळीकर मधुकर केशव, कोणे एके काळी सिंधू संस्कृती, राजहंस प्रकाशन,पुणे,२०१२, पृ.४३.

(१७) ढवळीकर मधुकर केशव, प्राचीन भारतीय नाणकशास्त्र, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, २००६, पृ. ७१, ७७, ८८-८९, १९४, २०५, २११, २४३, २४८, २६१.

(१८) उपरोक्त, पं. जोशी महादेवशास्त्री, भारताची मूर्तिकला, पृ. १०२.

(१९) उपरोक्त, पं. जोशी महादेवशास्त्री, भारतीय संस्कृतीकोश, पृ. १९४.

(२०) चित्राव सिद्धेश्वरशास्त्री, अथर्ववेदाचे मराठी भाषांतर, भारतीय चरित्र कोश मंडळ, पुणे, १९७२, पृ. ८४, १३२, १८७, २०७.


❍❍❍

६

# नागनाथ मंदिरावरील षडानन कार्तिकेय मूर्ती : एक अभ्यास

**श्री. नीळकंठ विष्णू काळदाते**
संशोधक विद्यार्थी
ज्ञानोपासक महाविद्यालय, परभणी

हिंदू धर्मातील पाच मुख्य संप्रदायांपैकी सर्वांत लोकप्रिय अशा शैव संप्रदायातील किंवा परिवारातील एक महत्त्वपूर्ण देव म्हणून कार्तिकेयाकडे पाहिले जाते. कार्तिकेयास वेगवेगळ्या नावांनी ओळखले जाते. जसे की, स्कंद, गांगेय, सुब्रह्मण्यम, कार्तिकेय, षडानन, कुमार इत्यादी त्यांपैकी त्याचे सुब्रह्मण्यम हे दक्षिण भारतातील नाव आहे. विविध ग्रंथांमधून कार्तिकेयाचे आयुध, वाहन आणि लक्षणांची माहिती मिळते. स्कंदपुराण, पद्‌मपुराण यांसारख्या पुराणग्रंथांमधून कार्तिकेयाच्या जन्माची कथा आलेली आहे.

तारकासुराचा वध करण्यासाठी ज्याचा जन्म झाला अशा शिवसुत कार्तिकेयाच्या मूर्ती रूपातील प्रतिमा मराठवाड्यातील मंदिरावर क्वचितच पाहायला मिळतात परंतु नागनाथ मंदिर औंढा येथे कार्तिकेयाच्या मूर्तीचे अंकन मोठ्या प्रमाणावर केलेले आहे. त्यापैकीच षडानन कार्तिकेय ही प्रतिमा नागनाथ मंदिराच्या बाह्य भागावरील मंडोवर वर पाहायला मिळते.

**कार्तिकेयाच्या जन्माची पौराणिक कथा :**

भगवान शंकर पार्वतीसह आपल्या भवनात झोपलेले असतात. काही काळानंतर देवी पार्वती शय्येवरून उठली व कुतुहलाने सुवर्णकमळांनी भरलेल्या सरोवराकाठी आली. तेथे जाऊन तिने जलविहार केला. सख्यांसह किनाऱ्यावर बसून तिने त्या स्वादिष्ट जलाचे पान करण्याची इच्छा व्यक्त केली. एवढ्यात सूर्याप्रमाणे तेजस्वी अशा सहा कृतिका तिने पाहिल्या. त्या कमलाच्या पानात सरोवराचे जल


UGC Care Listed Journal : ISSN : 0976 - 5425

भरून निघाल्या होत्या. त्यांना पार्वती म्हणाली, "देवींनो कमलपात्रात भरलेले जल मी पाहू/पिऊ?" देवी, एका शर्तीवर आम्ही तुला हे जल देऊ, तुझ्या गर्भातून जो पुत्र जन्मास येईल तो आमचा पुत्र मानला जाईल. आमच्यातील मातृभाव पाहून तो आमचा रक्षक होईल. तो पुत्र तीन लोकांत विख्यात होईल. पार्वतीने सर्व कबूल केल्यावर तिला कमलपात्रातील जल मिळाले. त्यांच्यासह तिनेही ते जल पिऊन टाकले. तेव्हा रोग-शोक नाहीसा करणारे एक अद्भूत बालक पार्वतीच्या शरीरातून बाहेर आले. त्याचे शरीर सूर्याप्रमाणे प्रकाशित होत होते. त्याने आपल्या हातात शक्ती, शुल व अंकुश धारण केले होते. अग्नीप्रमाणे हे बालक तेजस्वी होते. सुवर्णाच्या समान गोऱ्या रंगाचे हे बालक कुत्सित दैत्यांना मारणारे असल्याने त्याला कुमार हे नाव पडले.[१]

कृतिकांनी दिलेल्या जलाच्या प्रभावाने हे झाले असल्याने तिच्या सहा शाखांप्रमाणे विशाख, षण्मुख, स्कंद, कुमार, षडानन आणि कार्तिकेय आदी नामांनी ते विख्यात झाले. दुसऱ्या एका कथेप्रमाणे भगवान शिव गंधमादन पर्वतावर एकांतात पार्वतीसह राहू लागले. त्या दोघांचा सुरत प्रसंग सर्व लोकांना अनिष्ट-कारक, अद्भूत व प्रलयकारी वाटला. भगवान शिवांच्या दुःसह वीर्याने चराचर जगत नष्ट होऊ लागले. अग्नीस पार्वतीने वीर्यरूपी शिक्षा दिली. अग्नीने शिवाच्या सूचनेने ते तेज कृतिकांच्या शरीरात प्रवेश करवून तो मुक्त झाला. नंतर कृतिका गर्भवती झाल्या. त्यांना त्या नक्षत्राच्या रूपात आकाशात राहतील असा शाप त्यांच्या पतींनी दिला. याच वेळी शंकराचे वीर्य गंगेत मिसळले गेले. त्यापासून सहा मुखाचे बालक निर्माण झाले.[२]

**कार्तिकेयाची आयुधे :**

कार्तिकेयास ब्रह्मा, विष्णू, इंद्र, सूर्य आदी सर्व देवांनी चंदनमाला, सुंदर धूप, खेळणी, छत्र, चवरी, भूषण, अंगराग इत्यादींनी विभूषित केले व त्याची स्थापना सेनापती पदावर केली. भगवान विष्णूंनी सर्व प्रकारची आयुधे त्याला दिली. धनाध्यक्ष कुबेराने दहा लाख यक्षाची सेना त्याला दिली. अग्नीने तेज दिले. वायूने वाहन दिले. सूर्याप्रमाणे तेजस्वी अशा या स्कंदास सर्व प्रकारचे आयुध दिले गेले.[३]

**कार्तिकेयच्या प्रतिमांची प्राचीनता :**

पूर्व कुषाण काळापासून कार्तिकेयाचे नाण्यांवर अस्तित्व दिसून येते. या काळातील पंचमार्क प्रकारच्या नाण्यांवर दंड, कमंडलू, शक्ती आणि ढाल इत्यादी आयुधे असलेली प्रतिमा दिसून येते. या प्रतिमेस स्कंद म्हणून ओळख दिली आहे. ही प्रतिमा त्रिमुखी आहे. हुविष्काच्या काही नाण्यांवर स्कंद, कुमार आणि विशाख इत्यादी दिसतात. कुषाण, कनिष्क यांच्या नाण्यावर स्कंदाची स्कंद, महासेन, कुमार आणि विशाख अशी चार नावे व त्यांची चित्रे थोड्या अपभ्रष्ट स्वरूपात आली आहेत.[४]

कुषाण काळानंतर हुविष्काच्या सुवर्ण नाण्यावर स्कंद, कुमार, विशाख यांचे युग्म रूप तर स्कंद, कुमार, विशाख, महासेन यांचे त्रिकरूपातील अंकन पाहावयास मिळते. यौधेय राजाच्या नाण्यांवर कोंबड्याबरोबर कार्तिक स्वामीचे दर्शन घडते. कुषाण काळातील एकूण वीस प्रतिमा आढळतात.[५]

कोंबडा हे कार्तिकेयाचे खेळणे आहे, असे मानतात. हा कोंबडा त्याला एका मताप्रमाणे सूर्याचा सारथी अरूण यांच्याकडून व दुसऱ्या मताप्रमाणे समुद्राकडून मिळाला आहे.[६] यौधेय गणांच्या नाण्यांवरदेखील षण्मुख, शक्ती धारण केलेल्या कार्तिकेयाची प्रतिमा आढळते. यौधेयांची अशी नाणी चांदी व तांब्याची असून ती इ. स. पूर्व पहिल्या शतकातील आहेत असे मानले जाते.

गुप्त काळातदेखील कार्तिकेयाच्या मूर्ती निर्माण झाल्या होत्या. कुमार गुप्त पहिला हा गुप्त सम्राट कार्तिकेयाचा मोठा उपासक असल्याचे कळते. कुमारगुप्ताच्या एका नाण्यांवर तो मोरास द्राक्षांचा गुच्छ देत आहे असे अंकन आहे तर नाण्यांच्या पृष्ठभागावर मयुरासीन कार्तिकेयाचे अंकन आहे तसेच दुसरा गुप्त सम्राट स्कंदगुप्त याच्या एका अभिलेखात कार्तिकेयाचा उल्लेख आढळतो.

**नगराच्या आकारानुसार कार्तिकेय मूर्ती :**

कार्तिकेयाच्या मूर्तीचे अनेक ग्रंथांतून वर्णन आलेले आहे. नगराच्या आकारानुसार कोणत्या नगरात, खेड्यात कशा प्रकारची कार्तिकेय मूर्ती असावी याबद्दल वर्णन येतात. रूपमंडनसारख्या ग्रंथात म्हटले आहे की, कार्तिकेय मूर्ती तरूण दाखवावी. दंडावर वस्त्राचे तुकडे लपेटलेले, मयुरास वाहन रूपात अंकित केलेले असावे.

अभिशप्त प्रकारचे नगर असेल तर त्या नगरात द्वादशभुजी कार्तिकेयाची मूर्ती स्थापन करावी. व्यापारी ग्राम असेल तर तिथे चतुर्भुज मूर्ती असावी. वनामध्ये आणि साधारण ग्रामात द्विभूज कार्तिकेय मूर्तीची स्थापना करावी.

कार्तिकेयाच्या उजव्या हातात क्रमाने शक्ती, पाश, खड्ग, बाण आणि त्रिशूळ पाहिजे आणि एक हात वरद वा अभय मुद्रेत असावा. हे सर्व हात केयुर आणि कंकणांनीयुक्त असावेत तर डाव्या हातात क्रमशः धनुष, पताका, खेटक, ताम्रचुड (कुक्कुट) आणि मुष्टी पाहिजे. तर्जनी फैलावलेली पाहिजे.

द्विभुज मूर्तीच्या डाव्या हातात शक्ती आणि उजव्या हातात कुक्कुट हवा, चतुर्भुज मूर्तीच्या डाव्या हातात शक्ती आणि पाश हवा तर एका उजव्या हातात तलवार आणि दुसऱ्या हातात वरद वा अभय मुद्रेत हवा.[७] अशा प्रकारे निर्माण केलेली कार्तिकेयाची मूर्ती शुभ असते व सर्व कामप्रद असते.

**मूर्तिरूपातील कार्तिकेयाचे अंकन :**

गुप्त कालखंडाच्या अंतिम काळात कार्तिकेय शिव परिवारातील महत्त्वपूर्ण देव म्हणून प्रतिष्ठित झाला होता. गुप्त काळापासून दिसणाऱ्या शिल्पांमध्ये कार्तिकेयाचे वाहन मोर असून त्याच्या हातात त्रिशूळ, पाश, सर्व आदी आयुधे दिसतात.

गुप्तोत्तर कालखंडातील अनेक शैव मंदिरांतून शिव-पार्वतीसह कार्तिक स्वामीचे अंकन पाहायला मिळते. या काळातील कार्तिकेय षडानन रूपात दिसून येतो. षडानन रूपातील कार्तिकेयाची एक प्रतिमा मध्य प्रदेशातून प्राप्त झाली होती, जी सध्या ग्वाल्हेर येथील वस्तुसंग्रहालयात पाहायला मिळते.

मध्य काळापासून कार्तिकेयाच्या अनेक मूर्ती मूर्तिशास्त्रीय ग्रंथातील वर्णनानुसार घडू लागल्या. ओरिसा आणि भुवनेश्वर येथून अनेक कार्तिकेय मूर्ती निर्माण झाल्या. यामध्ये कार्तिकेयास शिव परिवारातील सदस्य म्हणून दाखविण्यात आले आहे.

शिवाशी संबंधित असलेल्या कार्तिकेयाच्या मूर्ती चतुर्भुज रूपात असल्यास त्याच्या दोन हातांत शूल आणि कुक्कुट असते तर उरलेल्या दोन हातांत त्रिशूल आणि डमरू दाखवितात. खजुराहो येथील लक्ष्मण मंदिर आणि कंदरिया महादेव मंदिर या ठिकाणी कार्तिकेयाच्या सर्वाधिक मूर्ती आढळून येतात. ग्वाल्हेरच्या तेली मंदिरावर-देखील कार्तिकेयाची द्विभुज आणि मयुरारूढ अशी प्रतिमा पाहायला मिळते. याशिवाय मराठवाड्यातील जगप्रसिद्ध असलेल्या राष्ट्रकूटकालीन वेरूळ येथील लेणी क्रमांक १५ व १६ मध्ये कार्तिक स्वामीच्या द्विभुज व चतुर्भुज रूपातील मूर्ती पाहायला मिळतात. वारंगळ येथील रामप्पा मंदिरात (इ. स. १३ वे शतक) सहा डोक्यांचा कार्तिकेय तारकासुराशी युद्ध करताना दाखविला आहे.[८]

**नागनाथ मंदिरावरील षडानन कार्तिकेय :**

हिंगोली जिल्ह्यातील औंढा या तालुक्याच्या ठिकाणी नागनाथांचे शिवमंदिर आहे. हे एक प्रसिद्ध ज्योतिर्लिंगदेखील आहे. नागनाथ मंदिराच्या बाह्य भागावर विपुल प्रमाणात शिल्पांकन केलेले असून येथे कार्तिकेयाच्या द्विभुज, चतुर्भुज, द्वादशभुज इत्यादी प्रकारच्या मूर्ती पाहायला मिळतात. यापैकी प्रस्तुतच्या संशोधनासाठी किंवा अभ्यासासाठी निवडलेली षडानन कार्तिकेयाची मूर्ती ही बाह्य मंडोवरावरील दक्षिण दिशेस आहे. स्थानक रूपातील ही मूर्ती समपाद अवस्थेत उभी आहे.



मुख्य मुखाच्या उजव्या बाजूस दोन मुखे असून डाव्या बाजूस तीन मुखे कोरलेली आहेत. डोक्यावर किरिट मुकुट आहे, गळ्यामध्ये मोतीहार आणि यज्ञोपवित उठून दिसत आहेत. कमरेपासून खाली अत्यंत सुंदर असे वस्त्र असून त्याचा सोगा अगदी उठून दिसत आहे. पायांतील तोडे उठून दिसत आहेत. कार्तिकेयाच्या पायाजवळ उजव्या बाजूस वाहन म्हणून उठावदार असा मोर कोरलेला आहे. मोराच्या डोक्यावरील तुरा अगदी स्पष्ट दिसतो आहे. हा मोर थोडा भग्न झालेला आहे. कार्तिकेयाचे उजव्या बाजूचे सर्वच हात भग्न झालेले आहेत. तरीपण त्यातील दोन हातांत असलेले आयुधे स्पष्टपणे ओळखता येतात. यापैकी एक आयुध त्रिशूळ असून दुसरे अंकुश आहे. अंकुश असलेल्या हातात मनगटाचा भाग तेवढा शिल्लक आहे. ज्यामध्ये असलेले अंकन स्पष्टपणे पाहायला मिळते. कार्तिकेयाचे डाव्या बाजूकडील पाच हात सुस्थितीत असून एक हात भग्न झालेला आहे. हा भग्न हात वरद मुद्रेत असावा असे वाटते. बाकीच्या हातामध्ये त्रिशूळ, खटवांग, कुक्कुट, धनुष्य असून सर्वांत खालच्या डाव्या हातात परशू आहे. या परशूचा दांडा भग्न झालेला आहे. मात्र अर्धा दांडा व परशूचे पाते अगदी स्पष्टपणे डाव्या पायाच्या बाजूस दिसते आहे.[९]

या प्रतिमेतील खालील उजव्या बाजूस असलेला मोर, डाव्या बाजूस असलेला परशू आणि कार्तिकेयाच्या उजव्या हातातील कुक्कुट व त्याचे सहा मुख यावरून ही षडानन कार्तिकेयाची मूर्ती आहे हे स्पष्ट होते. या द्वादशभुज मूर्तीचे वर्णन अनेक ग्रंथांतून आले आहे.

अपराजितापृच्छा खंड दोनमध्ये कार्तिकेयाच्या मूर्तीचे वर्णन करताना असे म्हटले आहे की,

**षड्वक्त्रं द्वादशभुज लोचत्रयसपुतम ।**

**शिण्यारूढं (शिख्यारूढं) मांसलंच कुमार कुमाराकृतिम् ।**

**अर्थ :** कुमार-कार्तिकेय सहा मुखी, बारा हात असलेला आणि तीन नेत्रयुक्त आहे. तो मोरावर आरूढ, मांसलदेही आणि कुमार रूपात आहे.

**शरं शक्तिं च खड्गंच अक्कुशं दण्डमेव च ।**
**अक्षसूत्र षडतानी वामकेषु भुनेषु च ।**
**श्रृड़गं धनु पाशखेटं वरदांच कमण्डलुम् ।**
**दक्षिणेषु भुजेष्मेवमस्त्राणां षटकमेव च ।**

**अर्थ :** कार्तिकेयाच्या डाव्या हातात क्रमशः बाण, शक्ती, खड़ग, अंकुश, दण्ड आणि अक्षसूत्र आहे तर उजव्या हातात क्रमशः श्रृडग, धनुष, पाश, खेटक, वरदमुद्रा आणि कमंडलू इत्यादी आयुध असतात.

**निष्कर्ष :**

शिव परिवारातील एक प्रमुख देवता म्हणून कार्तिकेय सर्वपरिचित आहे. अनेक ठिकाणच्या प्राचीन मंदिरावर आणि वेरूळसारख्या लेणीमधून मूर्ती रूपात कार्तिकेयाचे अंकन पाहायला मिळते. हे मूर्ती रूपातील अंकनदेखील द्विभुज, चतुर्भुज, द्वादशभुज असे वेगवेगळे पाहायला मिळते. एक मुखी, सहा मुखी अशा रूपातदेखील कार्तिकेयाचे दर्शन मिळते. पुराण कथांचा आधार घेऊन ही मूर्ती निर्मित झालेली पाहायला मिळते. शिवसुत, कुमार, षडानन, सुब्रह्मण्यम, सेनापती, गांगेय ही सर्व नावे त्याच्या विविध रूपांतील प्रतिमेचे प्रतिनिधित्व करतात. कुषाण काळ, गुप्तकाळ, मध्ययुगीन काळात त्याच्या मूर्तीची निर्मिती भारताच्या वेगवेगळ्या भागांत झाल्याचे दिसून येते. सर्वसामान्य आणि अभ्यासकांना कार्तिकेय मूर्तीची ओळख व्हावी, मूर्तीतील बारकावे समजावेत या उद्देशाने प्रस्तुतचे लिखाण केले आहे.

**संदर्भ :**

(१) जोशी प्र. न., पद्मपुराण पूर्वार्ध, प्रसाद प्रकाशन, पुणे, १९८१, पृ. ४९.
(२) जोशी प्र. न., स्कंदपुराण पूर्वार्ध, प्रसाद प्रकाशन, पुणे, १९८१, पृ. ६३.
(३) उपरोक्त, जोशी प्र. न., पद्मपुराण, पृ. ४९-५०.
(४) खरे ग. ह., मूर्तिविज्ञान, भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे, २०१२, पृ. १४७-१४८.
(५) म्हैसेकर प्रदीप, भामुशा, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद, २०२०, पृ. ३९६.
(६) जोशी प्र. न., भारतीय मूर्तिशास्त्र, प्रसाद प्रकाशन, पुणे, १९७९, पृ. ३२३.
(७) उपरोक्त, म्हैसेकर प्रदीप, पृ. ३९६.
(८) इंदूरकर उदयन, प्राचीन मंदिरे, मूर्ती आणि भावपूर्ण शिल्पे, भारतीय विचारसाधना प्रकाशन, पुणे, २०१७, पृ. १२४.
(९) जुगनू श्रीकृष्ण व शर्मा भंवर, अपराजितपृच्छा, भाग-२, परिमल पब्लि.,दिल्ली,२०११, पृ.१२६६.

❍❍❍

७

# सातवाहनकालीन कला-स्थापत्यातून प्रतिबिंबित होणारा सांस्कृतिक समन्वय

**डॉ. सुभाष बेंजलवार**
महाराष्ट्र महाविद्यालय, निलंगा, जि. लातूर

भारतीय ऐतिहासिक काळाची सुरूवात ही प्रामुख्याने महाजनपद काळ व मौर्य काळापासून मानली जाते. सोळा महाजनपदांपैकी अश्मक हे जनपद दक्षिण भारतातील प्रदेशात होते. नर्मदा नदी व विंध्य-सातपुडा पर्वत रांगांच्या नैसर्गिक संरचनेमुळे उत्तर भारत व दक्षिण भारत अशा दोन विभागांत भारतीय भूप्रदेशाचे विभाजन करण्यात येऊ लागले. दक्षिण भारताच्या तुलनेत उत्तरेत ऐतिहासिक काळाचा विकास जलद गतीने घडून आला. दक्षिण भारतातही याच वेळी ऐतिहासिक काळाची सुरूवात होत होती परंतु क्षेत्रफळाच्या दृष्टीने राजकीय विस्तार उत्तरेतल्या सत्तांइतका दक्षिणेत घडून आला नाही. परिणामी उत्तर भारत हेच ऐतिहासिक घडामोडीचे केंद्रबिंदू मानण्यात येऊ लागले. उत्तर भारतात मगध या महाजनपदाच्या विकासातून मौर्य घराण्याची सत्ता उदयास आली. तद्वतच दक्षिणेत अश्मक या महाजनपदाच्या विकासाबरोबर सातवाहनांची सत्ता उदयास आली. ऐतिहासिकदृष्ट्या दक्षिण भारतातील पहिले राजघराणे म्हणून सातवाहनांना विशेष महत्त्व आहे. या घराण्याने जवळपास ४५० वर्षे दक्षिण भारताच्या भूप्रदेशावर राज्य केले. राजकीय सत्तेचा केंद्रबिंदू सातवाहनांनी मगधहून दक्षिणेत आणला आणि एक संपन्न अशी राजवट निर्माण केली. या संपन्नतेमुळे व राजकीय स्थैर्यामुळे सांस्कृतिक क्षेत्रात मोठ्या प्रमाणात प्रगती झाली. सांस्कृतिकदृष्ट्या सातवाहनांचा काळ हा संपन्न होता.

सातवाहनांच्या मूळ वस्तीस्थानासंदर्भात प्रारंभी एकमत नव्हते. डॉ. मिराशींच्या मते सातवाहनांवा मूळ प्रदेश विदर्भ होता तर डॉ. रायचौधरीच्या मते दक्षिणेत त्यांचे वास्तव्य असावे. पूर्वेकडे राज्यविस्तार झाल्यावर त्या प्रदेशाला आंध्र असे नाव पडले.

मध्य प्रदेश, आंध्र असे सातवाहनांच्या मूळ प्रदेशासंदर्भात विविध मते पुढे आली. असे असले तरीही सातवाहनांचे सर्व शिलालेख महाराष्ट्री प्राकृत भाषेत आहेत. त्यांचा एकही शिलालेख द्रविड भाषेत नाही. सातवाहन राजा हाल याच्या 'गाथासप्तशती' हा ग्रंथही महाराष्ट्री प्राकृत भाषेतच रचलेला आहे इत्यादी पुराव्यांवरून हे घराणे महाराष्ट्रातीलच होते हे सिद्ध होते.[१]

सातवाहन काळात कला, स्थापत्य क्षेत्रात मोठ्या प्रमाणात विकास झाला. कला, स्थापत्य क्षेत्रात नागरी वास्तू व धार्मिक वास्तू निर्माण झाल्याचे दिसते. राजप्रासाद, उद्याने, धर्मशास्त्र यांची निर्मितीही मोठ्या प्रमाणात झाली. बौद्ध विहार, चैत्य, स्तूप मोठ्या प्रमाणात तयार झाले. त्यापाठीमागे धार्मिक, आर्थिक, राजकीय कारणे आहेत. भारतात स्थापत्य कलेच्या ज्या तीन शैली विकसित झाल्या त्यातील अमरावती कलाशैली ही दक्षिण भारतीय परिसरात विकसित झाली. मथुरा व गांधार कलाशैलींप्रमाणेच कलेचे केंद्र म्हणून याच सातवाहन काळात अमरावती कला शैली नावारूपास आली.[२]

सातवाहन राजे वैदिक धर्माचे अभिमानी होते. मात्र त्या काळी महाराष्ट्रात बौद्ध व जैन पंथांचा प्रसार झालेला होता आणि राजे त्यांना दान देत होते व त्यांच्या विहारांना आर्थिक मदतही करीत होते. सर्वसामान्य लोक भागवत संप्रदायाच्या देवतांची पूजा करीत होते. त्या काळी मातृदेवतांची पूजाही प्रचलित होती. ग्रामदेवतांची संख्याही बरीच मोठी असली पाहिजे.[३] सातवाहन काळात तेर (तगर) हे प्रसिद्ध व्यापारी मार्गावरील ठिकाण होते. तेरणा नदीच्या काठावर वसलेली ती एक प्रसिद्ध बाजारपेठच होती. अशीच व्यापारी नगरे त्या कालखंडात उदयास आली होती. तत्कालीन उत्तरेकडील नगरे आणि भोकरदन, पैठण, तेर, भडोच इत्यादी नगरांना जोडून पाश्चात्त्य देशांशी संपर्क साधणारे व्यापारी मार्ग होते. रोम, ग्रीस इत्यादी देशांशी त्या वेळी झालेला व्यापार व तेरचा उल्लेख ग्रीक वाङ्मयात आढळतो आणि तेर येथील उत्खननातून प्राप्त झालेल्या अवशेषांची त्याला पुष्टीही लाभलेली आहे.[४] तेर या ठिकाणी असलेल्या सातवाहनकालीन विविध धातूंची नाणी, दैनंदिन जीवनातील अनेक वस्तू आजही पाहायला मिळतात.

तेर येथील वस्तुसंग्रहालयात तत्कालीन सांस्कृतिक जीवनाचे प्रतिबिंब पाहायला मिळते. वेशभूषेचे विविध प्रकार दर्शविणाऱ्या प्रतिमा, अलंकार, मातीचे व धातूचे मणी हे तत्कालीन महत्त्वपूर्ण अवशेष आजही 'सांस्कृतिक वैभव तेवढ्याच अभिमानाने सांगताना दिसतात. तेर येथील वस्तुसंग्रहालयामध्येच लज्जागौरीचे शिल्पही उपलब्ध आहे. या शिल्पावरून सातवाहन काळात स्त्रियांना पूजनीय स्थान (उत्पत्ती देवता) होते असे दिसते. सातवाहन घराण्यातील गौतमी, बलश्री, वशिष्ठी इत्यादी स्त्रियांची नावे तत्कालात सन्मानदर्शक आलेली दिसतात. या स्त्री स्थितीदर्शक तेरमधील प्रतिमा पृष्टी देतात. सातवाहन काळात तेरप्रमाणेच भोकरदन हे औरंगाबाद-अजिंठा रस्त्यावरील ठिकाण मोठे म्हणून नावारूपास आले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांनी केलेल्या उत्खननात अनेक अवशेष त्या ठिकाणी सापडले. कारागिरांची घरे, हस्तिदंताच्या स्त्रीमूर्ती, बांगड्या, जल शलाका, विविध प्रकारचे मणी इत्यादींची निर्मिती तिथे होत असल्याचे निष्पन्न झाले. शिवाय हस्तिदंताच्या दोन तरूण स्त्रीमूर्तीही त्या ठिकाणी सापडल्या. त्या मूर्ती बॅबिलोन येथील मूर्तीशी साधर्म्य साधणाऱ्या आहेत. ही मूर्ती सध्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या वस्तुसंग्रहालयात आहे. सातवाहन कालखंडानंतर मात्र भोकरदनचे महत्त्व कमी झाले.

बौद्ध स्तूप निर्मिती हे सातवाहनकालीन स्थापत्य कलेचा महत्त्वपूर्ण आविष्कार होय. अमरावती येथील स्तूप उद्ध्वस्त अवस्थेत असला तरी भारतीय शिल्प कलेचा तो अप्रतिम नमुना असला पाहिजे. याच स्तूप स्तंभावरील आडव्या पट्टीत बुद्धाच्या जीवनावरील जातक कथेतील प्रसंग शिल्पांकित केले आहेत. नागार्जुनकोंडा व अमरावती येथील स्तूप याच काळातले आहेत. सांची येथील स्तुपाजवळचे एक तोरणद्वार याच काळात उभारलेले असून ते सातवाहन नृपती सातकर्णी याने निर्माण केले. याचे शिल्पकाम अत्यंत सुंदर आहे.[५] अनेक विद्वानांनी अमरावती शिल्पकलेस भारतीय शिल्पकलेचे अत्यंत महत्त्वपूर्ण पुष्प मानले आहे. सातवाहन काळात मोठ्या प्रमाणात लयन स्थापत्याचा विकास झाला. लयन स्थापत्य किंवा गिरी शिल्प हे एक सातवाहन काळातले महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य आहे. महाराष्ट्रातील सह्याद्री पर्वताच्या उपरांगांचा वापर सातवाहनकालीन लेणी शिल्पांसाठी झाला. भौगोलिक परिस्थितीतून सांस्कृतिक प्रगती साधण्याचा सातवाहनांचा हा प्रयत्न यशस्वी ठरला. गिरी शिल्पांची

उत्तम जोपासना याच काळात झाली. भव्य चैत्यगृहे व ठाशीव व रेखीव शिल्पे ही या गिरी शिल्पांची विशेष उल्लेखनीय अंगे होत. त्याचा उत्तम नमुना म्हणजे कार्ले येथील चैत्यगृह सर्वोत्कृष्ट मानले जाते.[६]

महाराष्ट्रातील कोरीव लेणी ही भारताच्या प्राचीन इतिहासाचे महत्त्वपूर्ण अंग आहे. भारतातील एकूण १२०० लेणींपैकी हजारांहून अधिक महाराष्ट्रात आहेत. यातील सुमारे ८०० लेणी या बौद्ध धर्मीयांच्या असून २०० हिंदूंच्या आणि राहिलेल्या जैनांच्या आहेत. ही लेणी कोरण्यास इ. स. पू. तिसऱ्या शतकात सुरूवात झाली आणि पुढे १२०० वर्षे हा वास्तुप्रकार प्रगत होत गेला.[७] हा लेणी समूह प्रगत करण्यात अनेक राजघराण्यांनी मोलाचे योगदान दिले. महाराष्ट्रात मात्र सातवाहन काळ या प्रक्रियेसाठी महत्त्वपूर्ण मानला जातो. कारण महाराष्ट्रातील लेणी स्थापत्याची सुरूवातच सातवाहन काळात झाली. महाराष्ट्रात लेणी कोरण्यास इ. स. पू. दुसऱ्या शतकात सुरूवात झाली, त्याआधी बौद्ध धर्म येथे येऊन पोहोचला होता. बौद्ध भिक्षूंनी लोकांत न मिसळता आणि गावात न राहता धर्माचा प्रचार करावा असे सांगितले होते परंतु पावसाळ्यात त्यांना चार महिने एका ठिकाणी राहणे भाग पडे. त्यासाठी लेणी कोरली गेली आणि म्हणूनच त्यांना वर्षावास असेही नाव दिले गेले.[८]

अजंठा लेणी सातवाहन काळातील असून त्यात भिंतीवरची रंगीत चित्रे अजही पाहायला मिळतात. गाथा सप्तशतीमध्ये रंगीत चित्रांचे उल्लेख आहेत. त्यावरून त्या काळी ही कला बरीच विकसित झाली होती असे वाटते. सातवाहन काळातच अजिंठ्याच्या लेणींपैकी लेणी क्र. ८, ९, १०, १२, १३ व १५ कोरल्या गेल्या. त्यांपैकी ९ व १० ही चैत्यगृह आहेत तर बाकी विहार आहेत.[९] लेणी क्र. १० हे अजिंठ्याच्या मालिकेतील सर्वात प्रचीन चैत्यगृह आहे. नाणेघाटातील (नाशिक) पांडव लेणीसुद्धा सातवाहन काळातच कोरल्या गेल्या. गौतमी बलश्री हिचा शिलालेख याच लेणींमध्ये आहे. सातकर्णीची विधवा राणी नागनिका हिचा मोठा लेख भग्नावस्थेत नाणेघाटाच्या लेणींत अद्यापि अवशिष्ट आहे. त्यात तिच्या वेदीश्री व शक्तिश्री या दोन पुत्रांची नावे आहेत.[१०]

सातवाहनकालीन शिल्पकाम मूलतः लेणींमध्ये दिसून येते. बहुतेक सर्व लेणी बौद्धांच्या आहेत. नाणे घाटातील सातवाहन देवकुल हे एकच अन्य प्रकारचे उदाहरण होय. या काळातील शिल्पकला बहुजन समाजाच्या प्रेरणेने व आश्रयाने

बहरली. राजे, महाराजे यांच्याप्रमाणेच श्रेष्ठी व इतर सामान्य लोक यांनी लेणी कोरविली आणि दाने दिली असे सांगणारे अनेक शिलालेख उपलब्ध आहेत. तत्कालीन लेणीचे वैशिष्ट्य म्हणजे या सर्व बौद्ध लेणी हीनयान पंथाच्या आहेत.[११] त्याचबरोबर बहुतेक सर्व लेणी या व्यापारी मार्गावरच कोरलेल्या आहेत. या लेणींतील शिल्पकाम अप्रतिम आहे. त्यातील विविध प्रकारच्या मूर्तीही अत्यंत सुबक आहेत. ही शिल्पकला अत्यंत भावपूर्ण आहे. भावपूर्णता व सहजता हे सातवाहनकालीन शिल्पकलेचे प्रमुख वैशिष्ट्य आहे.

एकंदरीत सातवाहनकालीन कला स्थापत्यातून सांस्कृतिक संपन्नतेचा प्रत्यय येतो. ही सांस्कृतिक संपन्नताच सातवाहन घराण्याचे साम्राज्य विकसित करण्यात महत्त्वपूर्ण ठरली. या कला स्थापत्यातून ही राजवट समतापूर्ण अवस्थेत होती हे स्पष्ट होते. मातृसत्ता किंवा स्त्रियांना दिलेला सन्मानपूर्व दर्जा राजघराण्यातील स्त्रियांना नामोल्लेखात व त्या राजांनी कोरविलेल्या शिलालेखात तर दिसतोच त्याचबरोबर लज्जागौरी प्रतिमा, विविध केशरचनेच्या प्रतिमा, सौंदर्यपूर्ण अवस्थेतील शिल्पकला, अलंकारयुक्त मणी या सर्व वस्तू अवशेषांतून तत्कालीन समाजजीवन समतापूर्ण असल्याचे स्पष्ट होते. त्याचबरोबर सांस्कृतिक जीवनमानही उच्च प्रतीचे असल्याचे उपलब्ध अवशेषांवरून दिसून येते.

**संदर्भ :**


(१) गायधनी रं. ना., प्राचीन भारताचा इतिहास, अनिरूद्ध पब्लिशिंग हाऊस, पुणे २०११, पृ. ५८.

(२) जोशी महादेवशास्त्री (संपा.), भारतीय संस्कृती कोश (ड-९), भारतीय संस्कृतीकोश मंडळ, पुणे, १९७६, पृ. १८८.

(३) उपरोक्त.

(४) पाठक अरूणचंद्र, महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर (लातूर जिल्हा भाग-१), पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, २००८, पृ. २०३.

(५) उपरोक्त, जोशी महादेवशास्त्री (संपा.), पृ. १९०.

(६) उपरोक्त.

(७) ढवळीकर म. के., संशोधन सुवर्णमहोत्सवी अंक, वि. का. राजवाडे संशोधन मंडळ, पुणे, १९८२, पृ. १०३.

(८) उपरोक्त.

(९) उपरोक्त, जोशी महादेवशास्त्री (संपा.), पृ. १९०.

(१०) जोशी गणपतीशास्त्री (संपा.), मराठवाडा संशोधन मंडळ, वार्षिक, १९७४, पृ. ३१.

(११) केतकर श्री. व्यं., प्राचीन महाराष्ट्र (भाग-२), व्हीनस प्रकाशन, पुणे, १९६३, पृ. ३५.

गोषवारा

१

# महायान पंथातील स्त्रीवादी दृष्टिकोन : विशेष संदर्भ औरंगाबाद लेणी

**श्रीमती अनिता प्रल्हाद आढागळे**
संशोधक विद्यार्थी
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

प्राचीन भारतातील एक प्रभावी धर्म म्हणून बौद्ध धर्म ओळखला जातो. जगभरात प्रसार पावलेल्या या विश्वधर्माने प्रज्ञा, करूणा, मैत्री, प्रेम यासोबतच स्वातंत्र्य, समता, बंधुतेची शिकवण जगाला दिली. विज्ञानवादाची कास धरून मानवतेच्या कल्याणार्थ समतेची जोपासना करीत स्त्री-पुरूष समानतेला महत्त्व दिले गेले. बुद्ध धम्म आणि संघ ही बौद्ध धर्माची प्रमुख अंगे असून सुरूवातीला संघात स्त्रियांना प्रवेश नाकारला असला तरी कालांतराने संघात स्त्रियांना प्रवेश मान्य केला गेला.

बौद्ध धर्मात सुरूवातीच्या काळात कोणत्याच देवी-देवतांचा समावेश नव्हता परंतु काळाच्या ओघात बौद्ध धर्मातील मतभिन्नतेमुळे निर्माण झालेल्या पंथात अनेक देवी-देवतांनी या धर्मात शिरकाव केला. त्यामध्ये इसवी सनाच्या आठव्या-नवव्या शतकानंतर धर्मात जे बदल झाले आणि तंत्राचा प्रभाव जसाजसा वाढत गेला तसा तसा अनेक देवतांचा प्रवेश बौद्ध धर्मात झाला असे दिसते. यात अनेक उग्र भीतीदायक अशा रक्षक देवतांचाही समावेश होतो. महायान पंथाची एक उपशाखा तंत्रयानातील काही स्त्री देवता यांना बोधिसत्वप्रमाणेच बौद्ध धर्मात अनन्यसाधारण महत्त्व आहे.

औरंगाबाद लेणीतील लेणी क्र. ७ ही एक अखंड लेणी असून तीन भागांत विभागलेली दिसून येते. ही लेणी महायान पंथाच्या शैलीचे प्रतिनिधित्व करते. गर्भगृहात प्रवेश करण्याआधी व्हरांड्यासमोरील भिंतीवर विशाल असे समभंग मुद्रेतील

अवलोकितेश्वर आणि मंजुश्री यांचे अप्रतिम शिल्प कोरलेले आहे तर गर्भगृहामध्ये गौतम बुद्धांची आसनाधिष्ठित ध्यानस्थ सुंदर मूर्ती लक्ष वेधून घेते. गर्भगृहाच्या बाहेरील डाव्या व उजव्या अशा दोन्ही बाजूंन ताराचे अप्रतिम शिल्प कोरले आहेत. तारा ही तंत्रमार्गातली देवता आहे. इसवी सनाच्या सहाव्या शतकात ताराची बौद्ध धर्माच्या देवता मालिकेत स्थापना झाली. इ. स. बाराव्या शतकापर्यंत ताराची लोकप्रियता सारखी वाढत गेली. तिला प्रज्ञापारमिता या नावाने संबोधून सर्व बुद्धाच्या मातृपदी स्थापण्यात आले. ती अवलोकितेश्वराची सहचारी आहे.

औरंगाबाद लेणीमध्ये हरिती या प्रमुख संरक्षक स्त्रीदेवतेचे शिल्प हे पंचकी आणि तिच्या मुलांसोबत कोरलेले दिसते. हरिती ही देवता मुळात राक्षसीण होती. बौद्ध साहित्यात हरितीची कथा अनेक ठिकाणी आढळून येते. कथेप्रमाणे मानले जाते की, हरितीला ५०० मुले होती. परंतु स्वतःचे व परिवाराचे उदरभरण, पालन पोषणासाठी हरिती इतरांची मुले खात होती. त्यामुळे लोकांनी तिच्या त्रासाला वैतागून तिची तक्रार बुद्धांकडे केली. हरितीची खोड मोडण्यासाठी गौतम बुद्ध भिक्षेसाठी हरितीकडे गेले आणि भगवंतांनी हरितीचा सर्वात लाडका लहान मुलगा 'पिंगला' हा आपल्याकडे भिक्षा पात्रात लपवून ठेवला. हरिती सर्वांत लाडका मुलगा हरवला या दुःखाने व्याकुळ झाली. तिने भगवंताकडे हरवलेला मुलगा शोधून देण्याची विनंती केली. हरितीने नरभक्षकपणा सोडून देण्याचे मान्य केल्यावर बुद्धांनी तिचा मुलगा शोधून देण्यास होकार दिला. त्यानंतर बुद्धांनी हरितीला पिंगला परत केला. बुद्धांनी हरितीला संघाची सामान्य उपासक म्हणून नियुक्त केले तसेच तिच्या मुलांसहित उदरनिर्वाहासाठी अन्न पुरविण्याची जबाबदारी अन्य भिक्षूंना दिली. त्यांच्या सेवेच्या बदल्यात हरिती आणि तिची मुले बौद्ध वास्तूंचे संरक्षक बनले. याप्रमाणे मुलांचे भक्षण करणारी राक्षसीण ही मुलांचे संरक्षण करणारी प्रमुख देवता बनली.

महायान पंथाचा प्रसार होत असताना दक्षिण भारतात विशेष करून औरंगाबाद लेणीमध्ये कोरल्या गेलेल्या स्त्रीदेवतांचे रेखीव शिल्प हे फक्त नयनरम्य व सौंदर्यात्मक दृष्टिकोनातून न बघता, स्त्रीदेवतांच्या मातृत्व, स्वातंत्र्य, निर्भयतेची आणि संरक्षक देवता म्हणून त्यांच्याविषयी आकलन होणे आवश्यक आहे.

❍❍❍

२

# शिरूर अनंतपाळ येथील चालुक्य शैलीतील मूर्तिशिल्पांची निरीक्षणे

**श्रीमाला के. जी.**
संशोधक विद्यार्थी, डेक्कन कॉलेज, पुणे

पूर्व मध्यकालीन काळात कला आणि स्थापत्याच्या क्षेत्रात वेगळा ठसा उमटविणारी एक महत्त्वाची शैली म्हणजे प. चालुक्य राजवटीच्या काळात विकसित झालेली वेसर अथवा चालुक्य शैली होय. लातूर जिल्ह्यातील शिरूर अनंतपाळ येथे चालुक्य राजवटीच्या काळात बांधलेल्या मंदिरात शैव, वैष्णव प्रतिमा आहेत. या प्रतिमा प्रतिमाशास्त्रीय दृष्टीने कौशल्यपूर्ण शिल्पांकित केल्या आहेत. शिरूर अनंतपाळ गावातील पूर्व मध्यकालीन मंदिरे ही कला व स्थापत्याच्या दृष्टीने दुय्यम असली तरी त्या ठिकाणी असलेल्या उमा-महेश्वर, विष्णू-लक्ष्मी, शेषशायी विष्णू आणि सप्तमातृकेच्या मूर्ती मूर्तिशास्त्राच्या अभ्यासाच्या दृष्टीने विशेष महत्त्वपूर्ण आहेत.

स्थापत्य व मूर्तिशिल्पांची वेगळी शैली या काळात विकसित झाली - ज्यास चालुक्य शैली म्हटले जाते. अलंकरण, मकर तोरणरचना, शिल्पांकनाची विशिष्ट पद्धती, रेखीव, बांधेसूद शरीर रचना ही काही स्थूल वैशिष्ट्ये या शैलीची आहेत.

लातूर जिल्ह्यातील शिरून अनंतपाळ येथे प. चालुक्य राजवटीत विकसित झालेल्या चालुक्य शैलीचा प्रभाव असणारी तीन मंदिरे आहेत.

शिरूर अनंतपाळ येथील मूर्तिशिल्पांत उमा महेश्वराच्या दोन प्रतिमा आहेत. त्या प्रतिमांपैकी नारायण मंदिरातील प्रतिमा सरस आहे. स्तंभरचना त्यावर मकरतोरण, वरील बाजूस कीर्तिमुख व गंधर्वादी देव, मकरतोरणाच्या आत नंदीवर आरूढ उमा-महेश्वराची आलिंगन मूर्ती आहे. त्या तुलनेत अनंतपाळ मंदिराचा विचार केला असता सामान्य आयाताकार पाठशिळेवर उमा-महेश्वराची नंदीवर आरूढ आलिंगन प्रतिमा कोरली आहे. शिवाय तेथील उमा ही द्विभूजही आहे. नारायण मंदिरातील उमा-महेश्वर प्रतिमेचे पादपीठही लांबीने व उंचीने जास्त आणि सुबक आहे. मात्र ते मूळ उमा-महेश्वराचे पादपीठ नाही.

उमा-महेश्वर प्रतिमेप्रमाणेच विष्णू-लक्ष्मी प्रतिमेच्या बाबतही दोन्ही मंदिरांतील प्रतिमांच्या अंकनाची तुलना केली असता नारायण मंदिरातील प्रतिमा जास्त सुबक, कलापूर्ण व रेखीव असल्याचे लक्षात येते. अनंतपाळ येथील विष्णू-लक्ष्मीच्या मागे आयताकृती पाठशिळा आहे. पाठपीठावर गरूड अंकित आहे पण प्रतिमेच्या तुलनेत पादपीठाचा आकार मोठा व रेखीवपणा जास्त दिसतो. नारायण मंदिरातील पादपीठावर गरूड अंकित नाही मात्र दोन स्तंभांच्या शीर्षातील मकरतोरणाच्या आत विष्णू-लक्ष्मी आलिंगन प्रतिमा आहे. तोरणाच्या मधोमध वर कीर्तिमुख तर तोरणाच्या दोन्ही बाजूंनी ५-५ विष्णूचे दशावतार कोरले आहेत. स्तंभाच्या बाहेरील बाजूस व्यालशिल्पे शिल्पांकित आहेत.

मल्लिकार्जुन मंदिराच्या गर्भगृहातील सध्या एका लघुपीठावर ठेवलेली नृतरत शिवप्रतिमा ही मंदिरातील इतरत्र असणारी प्रतिमा आहे. लहान आयताकृती पाठशिळा व त्यावर चतुर्भुज नंदीसह नृतरत शिव असे मूर्तीचे रूप आहे. अनंतपाळ मंदिरातील अंतराळाच्या देवकोष्टकातील सप्तमातृका यास गणेश व वीणाधारी शिव दोघांच्यामध्ये ललितासनात आसनस्थ, वाहनासह कोरल्या आहेत. अनंतपाळ मंदिरातील शेषशायी विष्णूचा वारपलेला पाषाण वालुकाश्म आहे. पाषाणाचा पार्श्वभाग अधिक चकचकीत न करता शिल्पांकन केले आहे. सायुध विष्णू शयनावस्थेत असून गदा, शंख, चक्र, पद्म ही आयुधे दिसतात. वामललितासनात आसनस्थ लक्ष्मी-विष्णूचे पादप्रक्षालन करताना दिसते तर विष्णूच्या नाभीकमलात आसनस्थ ब्रह्मा कोरला आहे. शिळेच्या वरील बाजूस मकर मुखातून निघालेल्या गुल्मात विष्णूचे दशावतार कोरले आहेत.

त्रिदल गर्भगृह असणाऱ्या नारायण व अनंतपाळ मंदिरातील दक्षिण गर्भगृहात वैष्णव शिल्प आहेत. त्या गर्भगृहाच्या द्वारशाखेखाली वैष्णव द्वारपाल आहेत, तर शिवलिंग आणि उमा-महेश्वर असलेल्या गर्भगृहाच्या द्वार शाखेखाली शैव द्वारपाल आहेत परंतु नारायण मंदिरात मुख्य गर्भगृहात शिवलिंग असूनही ललाटबिंबावर गरूड व द्वारपाल शैव आहेत. शिल्पांकनाचे हे वेगळेपण येथे दिसून येते.

अनंतपाळ मंदिरातील प्रतिमांच्या आढळावरून तत्कालीन समाजात शैव आणि वैष्णव संप्रदायांचा वावर हा शिरूर अनंतपाळ परिसरात होता हे स्पष्ट होते. अनंतपाळ मंदिरातील प्रतिमांच्या तुलनेत नारायण मंदिरातील प्रतिमा कलात्मक व भव्य आहेत, असे असले तरी दोन्ही ठिकाणच्या मूर्तीच्या निर्मितीशैलीत साम्यता आहे.

❍❍❍

# मध्ययुगीन विभाग

१

# छत्रपती शिवरायांचे पुरोगामित्व (परिसंवादातील भाषण)

**डॉ. अनिल सिंगारे**
संत जनाबाई महाविद्यालय, गंगाखेड, जि. परभणी

मध्ययुगीन जगाच्या इतिहासात भूतकाळ, वर्तमानकाळ आणि भविष्यकाळ अशा तिन्ही काळाला प्रभावित करणारे जे अपवादात्मक राज्यकर्ते होऊन गेले त्यात हिन्दवी स्वराज्याचे छत्रपती शिवाजी महाराजांचा उल्लेख पहिल्यांदा करावा लागेल. छत्रपती शिवाजी महाराज हे केवळ राज्यकर्ते म्हणून आपणास ज्ञात आहेत परंतु त्यांच्या हिंदवी स्वराज्याच्या राज्यकारभाराचा बारकाईने अभ्यास केला असता त्यात आपणांस सामाजिक सुधारणा, धार्मिक सुधारणा, आर्थिक सुधारणा व सांस्कृतिक परिवर्तनाच्या असंख्य पाऊलखुणा दिसून येतात.

भारतातील राजकीय क्षेत्रावर मुसलमानी राज्यकर्त्यांच्या प्रभावाची गडद छाप पडलेली असताना दक्षिण भारताच्या पश्चिम किनाऱ्यावरील डोंगराळ व दऱ्याखोऱ्याच्या परिसरात एक स्वतंत्र व सार्वभौम असे हिंदवी स्वराज्य स्थापन होणे हे तत्कालीन जगाच्या इतिहासातील फार मोठे आश्चर्य मानले जात होते. छत्रपती शिवाजी महाराजांनी आपले स्वराज्य आत्मदीर्घ व आर्थिकदृष्ट्या मजबूत करण्यासाठी सर्व प्रकारच्या पारंपरिक धोरणाचा त्याग करून अनेक नवनवीन संकल्पना स्वीकारल्या. छत्रपती शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्याच्या प्रशासनासाठी ज्या नवीन संकल्पनांचा अंमल सुरू केला. त्यामुळे स्वराज्याचे रूपांतर सुराज्यामध्ये झाले. म्हणून छत्रपती शिवाजी महाराज हयात असेपर्यंत स्वराज्यातील कोणत्याही कामात बंडखोरी झालेली दिसून येत नाही. सर्व जातिधर्माची जनता त्यांच्या स्वराज्यामध्ये सुखी, समाधानी आणि निर्भय जीवन जगत होती. प्रत्येक व्यक्तीच्या मनामध्ये शिवाजी महाराजांच्या कडक शिस्तीचा आणि न्यायनिष्ठुरतेचा धाक होता. त्यामुळे आधुनिक काळातील विनयभंग, सामूहिक बलात्कार आणि लाचारीचे राजकारण यांसारख्या घटना घडल्याची नोंद शिवकालीन दफ्तरात सापडत नाही.

छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्यातील न्यायव्यवस्थेने कमालीची शिस्त निर्माण केली होती. कायद्यापुढे सर्व समान असतात हे सर्वांच्या निदर्शनास आणून देण्यासाठी त्यांनी राज्याभिषेका समयी आपल्या दरबारामध्ये एका रत्नजडित भाल्याच्या टोकावर सोन्याचा तराजू ठेवून त्याचे दोन्ही पारडे समतोल अवस्थेमध्ये ठेवण्यात आलेले होते, अशी माहिती राज्याभिषेकाच्या कार्यक्रमाला उपस्थित असलेल्या इंग्रज प्रतिनिधी हेन्री ऑक्झेंडन यांनी आपल्या वर्णनामध्ये नमूद केलेली आहे. केवळ लोकांना दाखविण्यासाठी न्यायाचा तराजू नव्हता तर खरोखर न्यायदान करीत असताना न्यायाच्या या तराजुचे पारडे कधीही कुणाकडेही झुकून खाली वर झालेले नाही. त्यासाठी शिवाजी महाराजांच्या न्यायनिवाड्यातील एक प्रकरण खूप काही सांगून जाणारे आहे. 'छत्रपती शिवाजी महाराजांची एक पत्नी गायकवाड घराण्यातील होती, तिचे नाव सकवारबाई असे होते. छत्रपती शिवाजी महाराज आणि सकवारबाईचा विवाह जानेवारी १६५७ मध्ये झालेला होता. सकवारबाईचा सख्खा भाऊ सखूजी गायकवाड यांनी तुरूंगवासाची शिक्षा भोगत असताना एका कैदी महिलेने आपल्याकडे सखूजी गायकवाड वाईट नजरेने पाहात असल्याची तक्रार छत्रपती शिवाजी महाराजांकडे केली. छत्रपती शिवाजी महाराजांनी त्यांची स्वतः चौकशी केली. त्यात सखूजी गायकवाड दोषी असल्याचे सिद्ध झाले. तेव्हा छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या बायकोचा सख्खा भाऊ असूनही सखूजी गायकवाड यांचे दोन्ही डोळे काढून त्यास आंधळे करण्याची शिक्षा ठोठावली आणि या शिक्षेची त्वरित अंमलबजावणी करून सखूजीला जन्मभर आंधळे होऊन जीवन जगावे लागले.' छत्रपती शिवाजी महाराजांची ही न्यायनिष्ठुरता आधुनिक काळातील राज्यकर्त्यांमध्ये अंशतःदेखील असती तर दिल्लीच्या बसमध्ये सामूहिक बलात्कार व त्यानंतर हत्येसाठी पाशवी कृती करण्याचे धाडस कोणत्याही नराधमास झाले नसते.

छत्रपती शिवाजी महाराजांनी हिंदू धर्मातील काही अनिष्ट चालीरीतींची हकालपट्टी स्वराज्यातून केल्याचे लक्षात येते. ब्राह्मणी धर्मशास्त्राअन्वये ब्राह्मण गुन्हेगारांना शारीरिक त्रास होऊ शकणाऱ्या शिक्षा देऊ नयेत, असा धर्मशास्त्रांचा आदेश असतानाही छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या स्वराज्यात अनेक गैरवर्तन करणाऱ्या ब्राह्मण गुन्हेगारांना कडक शिक्षा दिलेल्या आहेत. **उदा.** मुसेखोर तालुक्यामध्ये रंगो त्रिमल वाकडा या कुलकर्ण्याने आपल्या गावातील एका विधवा ब्राह्मण महिलेवर

बलात्कार केला, अशी तक्रार छत्रपती शिवाजी महाराजांकडे आली. शिवाजी महाराजांनी त्वरित या तक्रारीची दखल घेऊन रंगो त्रिमल यास पकडून आपल्यासमोर दाखल करा, असा आदेश दिला. शिवरायाचे शिपाई लगेच रंगो त्रिमल याला पकडण्यासाठी तातडीने गेले. शिवरायांची न्यायनिष्ठुरता रंगो त्रिमल यास चांगलीच माहीत होती. त्यामुळे रंगो त्रिमल हा आपला जीव वाचविण्यासाठी हिंदवी स्वराज्याच्या शेजारी जावळी प्रांतात पळून गेला. न्यायाला उशीर करणे म्हणजे एका अर्थाने न्याय नाकारण्यासारखेच असते म्हणून छत्रपती शिवाजी महाराज त्वरित न्यायनिवाडा करीत असत. न्यायव्यवस्थेतील गतिमान हालचालींमुळे स्वराज्यातील गुन्हेगारीचे समूळ उच्चाटन झाले. म्हणून हिंदवी स्वराज्य शांत, सुरक्षित आणि निर्भय बनले.

छत्रपती शिवाजी महाराजांनी अवलंबिलेल्या न्याय निष्ठुरतेमुळे हिंदवी स्वराज्यात कायद्याचा धाक निर्माण झाला. त्यामुळे अंतर्गत शांतता व सुरक्षितता निर्माण झाली. हिंदवी स्वराज्याच्या शेजारी मुंबई, कल्याण, भिवंडी येथे इंग्रजांचे राज्य होते. आपला धाक राहावा म्हणून शिवाजी महाराजांनी त्यांना गर्भित इशारा देणारे पत्र लिहिलेले आहे. जंजिरा येथील मुजोर सिद्धी आपल्या आरमाराच्या जोरावर समुद्र किनारपट्टीवर दहशत निर्माण करीत होता. छत्रपती शिवाजी महाराज इंग्रज अधिकाऱ्यांना पत्र लिहून आदेश देतात की, 'तुम्ही सिद्धीच्या आरमाराला मुंबई बंदरात थांबू देत असाल तर एक लक्षात ठेवा आपल्यातील शांततेतील तह बाजूला ठेवून मला तुमच्याशीच दोन हात करावे लागतील.' छत्रपती शिवाजी महाराजांचा निर्वाणीचा इशारा मिळताच थॉमस निकोल्स सिद्धीकडे गेला. त्याने मुंबई बंदरातून आपली आरमारी सेना त्वरित परत बोलावून घेतली, अशी देशाभिमुख भूमिका आधुनिक काळातील भारतीय राज्यकर्ते घेतील तर भारताचे शेजारी कधीही वाईट नजरेने आपल्या देशाकडे पाहण्याची हिंमत करणार नाहीत.

हिंदवी स्वराज्याच्या शेजारी राजापूर व पाण्डिचेरी येथे फ्रेंचांचे वर्चस्व होते. त्यांच्याशी छत्रपती शिवाजी महाराजांनी अत्यंत कडक धोरण अंगीकारले. छत्रपती शिवाजी महाराज फ्रेंच वकालतीला कळवितात की, तुम्ही पाण्डिचेरीत सुरक्षित राहावे पण जर का तुम्ही माझ्या माणसांना थोडी जरी इजा पोहोचविली तर याद राखा. राजापुरातील तुमच्या माणसांना मी कसलीही दया, माया दाखविणार नाही. फ्रेंच प्रशासक मॉर्टिन याने कधीही छत्रपती शिवाजी महाराजांच्या हिंदवी स्वराज्याकडे

वाकड्या नजरेने पाहिलेले दिसत नाही. भारताच्या पूर्व किनाऱ्यावर डचांनी वेंगुर्ला व इतर ठिकाणी आपल्या लहान-मोठ्या वसाहती निर्माण केल्या होत्या. त्यांच्यावरही छत्रपती शिवाजी महाराजांनी आपला धाक निर्माण केलेला होता. छत्रपती शिवाजी महाराज आणि डच यांच्यामध्ये एक व्यापारी करार झाला. त्यात शिवाजी महाराजांनी एक कलम असे मान्य करून घेतले की, 'मुसलमानी राजवटीत तुम्हाला भारतीय स्त्री-पुरूषांना गुलाम म्हणून विकत घेण्याची व देण्याची अनिर्बंध परवानगी होती. पण आता माझ्या राज्यात भारतीयच नव्हे तर कोणत्याही स्त्री-पुरूषाची खरेदी अथवा विक्री करण्याची परवानगी मिळणार नाही, असे काही कराल तर माझी माणसे तुम्हाला प्रतिबंधित करतील तेव्हा याचे काटेकोरपणाने पालन व्हावे अन्यथा वाईट परिणाम होतील.' असा सज्जड इशारा छत्रपती शिवाजी महाराज यांनी डचाला दिलेला होता आणि याच डचाने शेवटपर्यंत या कलमाचे उल्लंघन होऊ दिलेले नाही. यातच छत्रपती शिवाजी महाराजांचे यश दडलेले आहे. अलीकडील काळात भारताचे राजकारण करणारे परकीय पाहुण्यांसमोर ज्या भोळसर वृत्तीने वर्तन करतात त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचा या करड्या शिस्तप्रियतेतून बऱ्याच गोष्टीचा बोध घेण्यासारखे आहे. यातून एक जरी गोष्ट भारतीयांनी अमलात आणली तर भारतीयांची जगातील प्रतिमा निश्चितच उंचावेल.

छत्रपती शिवाजी महाराजांनी धर्मासाठी माणूस नसून माणसासाठी धर्म आहे ही बाब स्वतःच्या वृत्तीतून जगाला दाखवून दिली. ब्राह्मणी धर्मशास्त्राच्या प्रभावामुळे भारतीय समाज काटेरी कुंपणाच्या आत बंदिस्त झालेल्या प्रांतासारखा होता. एकदा माणूस यातून बाहेर पडला तर त्याला मरेपर्यंत नव्हे तर मेल्यानंतरही हिंदू धर्मात परत येता येत नव्हते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी याचे वर्णन पुढील शब्दांत केलेले आहे. "ब्राह्मणी धर्मशास्त्रांनी हिंदू धर्माची अवस्था एका पाण्याच्या टाकीसारखी केलेली आहे. त्या टाकीच्या पाण्याच्या नळाची तोटी चालू ठेवली आहे. त्या टाकीतून पाणी सतत बाहेर पडत आहे परंतु दुसरे पाणी टाकीमध्ये सोडण्याची मात्र सोय नाही." म्हणजेच हिंदू धर्मातून बाहेर पडता येते पण हिंदू धर्मामध्ये पुन्हा प्रवेश करता येत नाही. हिंदू धर्मातून एकदा बाहेर पडला तर त्याच्या पुढील सर्व पिढ्यांची हिंदू धर्मापासून फारकत होत असते. छत्रपती शिवाजी महाराजांचा बाल सवंगडी, सहकारी नेताजी पालकर शीघ्रकोपीपणामुळे व उद्वेगाने हिंदू धर्माचा त्याग करून इस्लाम धर्मात

प्रवेश केला तो नेताजी पालकरचा 'कुलीखान' बनला. परंतु नंतर त्याला पश्चात्ताप झाला. त्याने परत हिंदू धर्मात पुनर्प्रवेश करण्याची इच्छा व्यक्त केली. ब्राह्मणी धर्मशास्त्रे यास परवानगी देत नव्हते. तेव्हा छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वतः पुढाकार घेऊन नेताजी पालकर यास हिंदू धर्मात पुनर्प्रवेश दिला परंतु तत्कालीन कर्मठ मराठा समाज त्याच्याशी रोटी-बेटी व्यवहार करण्यास तयार नव्हता. म्हणून नेताजी पालकरला हिंदू धर्मात येऊनही बहिष्कृताचे जीवन जगावे लागत होते. तेव्हा छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वतः त्याला आपल्या बाजूला एका पंक्तीमध्ये बसवून भोजन केले. एवढेच नाही तर नेताजी पालकरचा मुलगा जानोजी पालकर याच्याशी स्वतःची सकवारबाईपासून झालेली मुलगी कमळजाबाई हिचा विवाह लावून दिला आणि नेताजी पालकर यास आपला व्याही करून घेतला. 'यथा राजा तथा प्रजा' या उक्तीप्रमाणे तद्नंतर तत्कालीन मराठा समाजाने नेताजी पालकर व त्याच्या कुटुंबीयांचा स्वीकार केला. तेव्हा नेताजी पालकर यांचे बहिष्कृताचे जिणे छत्रपती शिवाजी महाराजांच्या या अचाट धाडसी कृत्यामुळे संपले. खऱ्या अर्थाने छत्रपती शिवाजी महाराजांची ही कृती म्हणजे हिंदू धर्मामध्ये फार मोठी धार्मिक सुधारणेची कृती होय परंतु छत्रपती शिवाजी महाराजांकडे या दृष्टिकोनातून कोणत्याही इतिहासकारांनी पाहिलेले दिसत नाही.

छत्रपती शिवाजी महाराजांचे या कृतीतून धर्मासाठी माणूस नसून माणसासाठी धर्म आहे आणि धर्मशास्त्रांचे आदेश जीर्ण मताचे आहेत, कालबाह्य झालेले आहेत, त्याला फेकून देणे म्हणजेच माणूस माणसाला जोडण्यासारखे आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव घेऊन राजकारण व समाजकारण करणाऱ्यांनी व छत्रपती शिवाजी महाराजांचा राजकीय, सामाजिक, धार्मिक व सांस्कृतिक वारसा सांगणाऱ्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्यावरील एका कृतीचे जरी अनुकरण केले तर महाराष्ट्राचा फार मोठा आदर्श आपण देशासमोर ठेवल्यासारखे होईल. कारण छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार आणि कार्य हे माणूस माणसाला जोडण्याचा विचार आहे. माणसा-माणसामध्ये भेदाभेद, पक्षपात व दुरावा निर्माण करण्याचा विचार हा छत्रपती शिवाजी महाराजांचा विचार असूच शकत नाही.

❍❍❍

२

# पेशवे-निजाम संबंध : एक चिकित्सक आकलन


**प्रा. सर्जेराव चांगदेव बनसोडे**

पंडित जवाहरलाल नेहरू महाविद्यालय, औरंगाबाद


मराठे-निजाम संबंध मराठ्यांच्या राजकारणाला सदैव प्रभावित करणारा महत्त्वाचा घटक राहिला आहे. हिंदुस्थानातील राजकीय अस्थिरतेचा फायदा घेत निजाम-उल-मुल्कने १७२४ मध्ये हैद्राबाद मुघल सुभेदार मुबारिझखान याचा साखरखेडच्या लढाईत पराभव करून स्वतःची सत्ता दक्षिणेत स्थापन केली.[१] तेव्हापासूनच निजामाने संपूर्ण हिंदुस्थानचे राजकारण प्रभावित करण्यास सुरूवात केली होती. मराठ्यांच्या (पेशवे) सारखी प्रबळ आणि विस्तारवादी सत्ता अस्तित्वात असताना दक्षिणेत निजाम आणि म्हैसूरसारख्या प्रादेशिक सत्तांचा उदय मराठ्यांच्या पेशवे कालखंडातील यशावर प्रश्नचिन्ह निर्माण करतो. त्यामुळे मराठ्यांचा सत्ताविस्तार मध्यवर्ती ठेवून पेशव्यांच्या यशस्वितेचे कितीही गौरवीकरण केले तरी दक्षिणेतील निजाम आणि म्हैसूर राज्यांनी उत्तर आणि दक्षिणेच्या राजकारणात पार पडलेली भूमिका हे गौरवीकरण यशस्वी होऊ देत नाही. रियासतकार गोविंद सखाराम सरदेसाई यांनी मराठ्यांच्या इतिहाससंदर्भात म्हटल्याप्रमाणे मराठ्यांच्या ऐतिहासिक साधनांचा शोध ही अविरत चालणारी प्रक्रिया आहे. म्हणून जसजशी साधने उजेडात येतील तसतसे त्याचे पुनर्मूल्यांकन करणे अगत्याचे आहे.[२] या भूमिके-तून मराठे-निजाम संबंधाचे घटनात्मक आणि सैद्धान्तिक आकलन प्रस्तुत शोधनिबंधात मांडले आहे. त्यासाठी मराठ्यांच्या इतिहासाचे ज्येष्ठ अभ्यासक रियासतकार सरदेसाई, इतिहासाचार्य वि. का. राजवाडे, सेतु माधवराव पगडी व त्र्यं. शं. शेजवलकर यांनी मांडलेल्या भूमिकेचा आधार घेतला आहे. पेशवे कालखंडात मराठ्यांनी स्वीकारलेले पादशाही धोरण आणि त्यातून मराठी सत्तेला प्राप्त झालेले साम्राज्याचे स्वरूप व उत्तर हिंदुस्थानातील मराठ्यांच्या सत्ताविस्ताराची इतिहास अभ्यासक प्रामुख्याने चर्चा करतात

परंतु ज्यामुळे मराठ्यांच्या सत्तेला अनेक वेळा धोका निर्माण झाला त्या निजाम आणि दक्षिणेतील राजकारणाबाबत पेशव्यांची भूमिका किती उत्साहवर्धक किंवा उदासीन होती याची चिकित्सा फारशी कोणी करताना दिसत नाही. त्यामुळे पेशव्यांच्या कार्यकाळाचे यथार्थ आकलन होत नाही. त्यासाठी पेशवे कालखंडातील मराठ्यांच्या उत्तरेकडील राजकारणाबरोबरच दक्षिणेतील राजकारणाची चर्चा होणे आवश्यक आहे. त्याचाच एक भाग म्हणून उत्तर-दक्षिण राजकारणावर प्रभाव टाकणाऱ्या पेशवे-निजाम संबंधावर प्रस्तुत शोधनिबंधात चर्चा केली आहे. मराठे-निजाम संबंधांचा आपल्याला दोन भागांत विचार करावा लागतो.

(१) मोगल बादशहाचा प्रतिनिधी म्हणून

(२) स्वतंत्र राज्यकर्ता म्हणून निजाम.

निजाम-पेशवे संबंध स्वतंत्र निजाम राजवट अस्तित्वात येण्याच्या अगोदर-पासून म्हणजे १७१३ मध्ये मोगल बादशहा फारूखशियर यांनी दक्षिणेचा सुभेदार म्हणून निजामाची नियुक्ती केल्यापासून आले होते.[३] मोगल बादशहाचे वजीरपद सोडून निजाम इ. स. १७२४ मध्ये दक्षिणेकडे आला. तेव्हापासून त्याचा पाडाव करण्याची संधी मराठ्यांना होती परंतु ती मराठ्यांनी साधली नाही. परिणामी दक्षिणेत निजामाचे राज्य कायम झाले जे मराठ्यांना शेवटपर्यंत पुरून उरले. घटनात्मक-दृष्ट्या मांडलिक संस्थानिक शाहू (मराठा) यांचे निजामाशी संबंध तो अधिकृत राज्य प्रतिनिधी असल्यामुळे सेवक-मालकपणाचे राहिले.[४] ब्रिटिश काळात गायकवाड, शिंदे, होळकर व निजाम यांचे ब्रिटिशांसोबत जसे संबंध होते अगदी तसे मराठे-निजाम संबंधाच्या मुळाशी बाळाजी विश्वनाथ यांनी आणलेल्या सरदेशमुखीच्या सनदेचा मुद्दा कळीचा होता. मोगलांचा सरदार असल्यापासून मराठा आणि निजाम संबंध सरदेशमुखीच्या सनदेवरून चिघळले होते. स्वतंत्र राज्य स्थापन केल्यानंतरसुद्धा निजामाने मराठ्यांच्या सरदेशमुखीच्या सनदेला विरोधच केला. त्यामुळे मराठे निजामाशी शेवटपर्यंत लढत राहिले परंतु अनेक वेळा त्यांनी युद्धात निजामाचा पराभव करूनही पूर्ण पाडाव केला नाही. प्रत्यक्ष तहामध्ये राजकीय मुत्सद्दीपणाच्या जोरावर निजाम स्वतःची सत्ता टिकविण्यात यशस्वी ठरला तर सरदेशमुखीच्या

सनदेमुळे मराठे मोगल साम्राज्याचे मांडलिक बनले. त्यामुळे मराठी सत्तेला साम्राज्यांतर्गत स्वराज्याचे स्वरूप प्राप्त झाले. शिवछत्रपतींचा सार्वभौम राज्याचा विचार त्यामुळे मागे पडला. स्वतः राजा होण्याचे धोरण सोडून दिल्लीच्या बादशहासोबत मांडलिकत्वाचे नाते ठेवत वागायचे हेच धोरण शाहू आणि पेशवे काळात रूढ झाले. दिल्लीची मोगल पातशाही कायम ठेवून तिच्या मांडलिकत्वाखाली हिंदूंची स्थिती कशी सुधारायची एवढेच त्यांचे धोरण राहिले.[५] पेशवे काळात मराठे सरदारांच्या (पेशव्यांसह) स्वार्थनिष्ठ राजकारणाने पेशवे-निजाम संबंध प्रभावित झाले होते. मोगल बादशहाचे शत्रू अहमदशहा अब्दाली आणि इतरांचा बंदोबस्त करण्यासाठी पेशव्यांची घोडी अटकेपार गेली परंतु उदगीरच्या लढाईत कमजोर पडलेल्या निजामाचा पूर्ण पाडाव करून शत्रू शेषही शिल्लक ठेवू नये, ही शिवकालीन राजनीती अमलात आणण्याचा विचार पेशव्यांच्या डोक्यात आला नाही. निजामाचा वेळीच पाडाव झाला असता तर दक्षिणेत परशुराम पंत प्रतिनिधी यांचे मराठेशाहीत एक सत्ताकेंद्र निर्माण झाले असते. ते पेशव्यास नको असल्याचे आपल्या लक्षात येते. त्यामुळे पेशव्यांनी निजामाचा पूर्ण पाडाव करण्याची भूमिका कधी घेतली नाही. इ. स. १८ व्या शतकात मराठ्यांनी साम्राज्य विस्ताराच्या अनुषंगाने आधी दक्षिण की उत्तर यावर चर्चेअन्ती स्वीकारलेल्या उत्तर केंद्रित धोरणातून याची प्रचीती येते. पेशव्यांच्या पुढाकाराने मराठ्यांनी उत्तर केंद्रित सत्ता विस्ताराचे (हिंदू पादशाही निर्मितीचे) धोरण स्वीकारले. परंतु त्यामुळे छत्रपती शाहूंच्या दरबारात उघड-उघड (प्रतिनिधी आणि पेशवे) दोन गट पडले. या दोन्ही गटांना एकत्र ठेवण्यात, त्यांच्यात समन्वय साधण्यात छत्रपती शाहू महाराज यांना अपयश आले. त्यांच्यातील दुही वाढत जाऊन त्याचा प्रभाव मराठे-निजाम संबंधावर झाला. पेशव्यांच्या आक्रमक आणि आग्रही भूमिकेमुळे या काळात शिवकालीन अष्टप्रधान मंडळाचे स्वतंत्र स्थान धोक्यात आले. एवढेच नाही तर छत्रपतींची सत्ता सीमित होऊन पेशवे अधिक प्रभावशाली बनले. मराठ्यांचे प्रमुख प्रधान म्हणून मराठ्यांच्या या कालखंडातील सर्व यशापयशाचे संपूर्ण दायित्व साहजिकच पेशव्यांकडे जाते. त्यामुळे बाळाजी विश्वनाथ पेशवे यांच्यापासून ते दुसऱ्या बाजीराव पेशवे यांच्यापर्यंत पेशवे मराठ्यांच्या यशापयशास उत्तरदायी ठरतात.

इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांनी मराठ्यांच्या इतिहासाची साधने खंड एकच्या प्रस्तावनेत म्हटल्याप्रमाणे अठराव्या शतकात मराठ्यांच्या राजनीतीचे स्वरूप उत्तरेत हिंदू पादशाही स्थापन करण्याचे होते. पहिल्या बाजीरावाने हिंदू पादशाहीची स्थापना करण्याची योजना छत्रपती शाहू महाराज यांच्यासमोर ठेवली. तेव्हापासून सर्वच पेशव्यांनी याच धोरणाचा पुरस्कार केला होता. असे असले तरी या संकल्पनेचे मूळ संकल्पक छत्रपती शिवाजी महाराज होते. त्या संकल्पनेच्या केंद्रस्थानी दक्षिण दाक्षिणात्यांची म्हणजे प्रथम दक्षिण सुरक्षित करून संपूर्ण उत्तर हिंदुस्थान ताब्यात घेणे ही भूमिका होती परंतु सर्वच पेशवे उत्तराभिमुख धोरण स्वीकारताना हे विसरल्याचे दिसते. त्यामुळे पेशव्यांनी प्रमाणापेक्षा अधिक उत्तराभिमुख धोरण स्वीकारल्यावर दक्षिण ही त्यांची मागील बाजू (पिछाडी) नेहमीच निजाम, हैदर अली, फ्रेंच, इंग्रज व पोर्तुगीजसारख्या शत्रूच्या आटोक्यात (असुरक्षित) राहिली. मराठ्यांच्या या देशी आणि विदेशी शत्रूंनी नेहमीच याचा फायदा उठवित मराठ्यांना वारंवार खिंडीत पकडले. याबाबत इतिहासाचार्य वि. का. राजवाडे असे म्हणतात की, पहिल्या बाजीरावाने दक्षिणेकडे दुर्लक्ष केल्याने दक्षिणेत निजाम, हैदर इ. शत्रू पुढे आले.[७] छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वप्नातील मराठा पादशाही स्थापन करताना पेशवे शिवकाळातील मराठी राज्यसत्तेचे ध्येय धोरण आणि राजनीती विसरल्याचे त्यांच्या उत्तर आणि दक्षिण विशेषतः निजाम धोरणावरून स्पष्ट होते. पहिले बाजीराव पेशवे यांनी आपल्या कारकीर्दीची पहिली ७-८ वर्षे दक्षिणेची व्यवस्था लावण्यात खर्ची घातली.[८] त्यावरून उत्तर केंद्रित राजकारण करताना दक्षिणेच्या राजकारणाचे महत्त्व त्यांच्या लक्षात यायला हवे होते परंतु तसे झाले नाही. त्याच्या मुळाशी दोन शक्यता दिसतात. त्या म्हणजे एक पहिल्या बाजीरावाचे अयोग्य राजकीय आकलन, राजकीय परिस्थितीच्या मर्यादा आणि दुसरी म्हणजे मराठा सरदारांमध्ये निर्माण झालेली राजकीय महत्त्वाकांक्षा. त्यामुळे बाळाजी विश्वनाथ यांनी दाखविलेल्या उत्तर केंद्रित मार्गाने मार्गक्रमण करताना पेशव्यांची निजामविषयक भूमिका त्यांच्या निजामाबाबतच्या धोरणाच्या अपयशाचे कारण बनली होती. नाना फडणवीस यांच्या काळातसुद्धा मोगल रक्षणाची प्रारंभिक अवस्थेतील पेशव्यांची मानसिकता कायम होती.

त्यामुळेच खर्ड्याच्या लढाईनंतर पेशव्यांच्या मनात असते तर निजामाचा कायमचा बंदोबस्त करणे त्यांना शक्य होते परंतु मोगलांच्याबद्दल पेशव्यांच्या मनात असलेल्या न्यूनगंडाच्या भावनेमुळे मोगल बुडवू नये, राखायचा आहे, अशी भूमिका पेशवे यांनी घेतली 'आपल्याला मानीत नाहीत व कदाचित आपणाहून वरचढ होतील म्हणून राज्यातील पराक्रमी माणसास सदा ठेचीत राहणाऱ्या पेशव्यांच्या धोरणामुळेच मराठा सत्ता कमकुवत झाली व निजाम अमर झाला.'[९] छत्रपती शिवाजी महाराजांचा मार्ग पेशव्यांनी अनुसरला असता तर हिंदुस्थानात एक नवीन संमिश्र समाज निर्माण झाला असता परंतु पेशवे त्यापासून दूर गेले होते. परिणामी त्यांचे दक्षिणच काय पण उत्तरेकडील धोरणही अपयशी ठरले होते.

शाहू-ताराबाई यांच्या संघर्षाच्या वेळी दक्षिणेत आलेल्या म्हणजेच पेशव्यांच्या उदयाच्या समकालीन उदयास आलेली निजामाची सत्ता मराठ्यांच्या ऱ्हासानंतरही कायम राहिली. त्यामागे मराठ्यांचे दक्षिण राजकारणातील अपयश आणि निजामाचे मुत्सद्दी राजकारण होते. छत्रपती शाहूंचे पाठीराखे सरदार सरदेशमुखी व चौथाईच्या उत्पन्नावर जगत असल्याने ती न देण्याच्या कृतीविरूद्ध तेवढ्यापुरतीच मोगल बादशहा व निजामाविरूद्ध त्यांनी भूमिका घेतल्याचे दिसते.[१०] पेशवे काळात मराठ्यांमध्ये बेबंदशाहीची बीजे पेरली गेले. तेच मुळात मराठ्यांच्या अप्पलपोटे-पणाच्या राजकारणातून. त्यामुळे मराठे तीन गटांत विभागले गेले. दक्षिणेत निजामाचे अंकित होऊन मोगली राज्यांची कायम राखणदारी करणारे चंद्रसेन, रंभाजी, नेमाजी इत्यादी मराठा सरदारांचा एक गट होता. दुसरा गट पेशव्यांच्या नेतृत्वाखाली मध्य महाराष्ट्रात होता तर तिसऱ्या गटात वारणेपासून तुंगभद्रा नदीपर्यंत जाऊन राहिलेले मराठे होते.[११]

अठराव्या शतकात मराठ्यांचे राजकारण या तीन गटांतील सरदारांनीच केले. त्या अनुषंगानेच पेशव्यांच्या राजकारणाची दिशा निश्चित झाली. कारण पेशव्यांचे यश हे इतर दोन गटांन कायम कमकुवत करण्यावर किंवा नष्ट करण्यावर विसंबून होते. त्यामुळे पेशवे-निजाम संबंध हे मराठेशाहीतील अशा गटबाजीच्या राजकारणाने प्रभावित झाले होते. पेशवाईच्या काळात मुघल सत्ता पूर्ण खिळखिळी

झाली होती परंतु ती पूर्णपणे मोडीत काढणे पेशव्यांना जमले नाही. त्यांचे घोडे अटकेपार गेले व पानिपतवरून पळत परत आले पण उदगीरच्या लढाईत निजामाला जीवदान देऊन शत्रू शेषही शिल्लक ठेवू नये या शिवकालीन राजनीतीपासून पेशव्यांचे निजाम धोरण दूर गेल्याचे दिसते. त्यामागे पेशव्यांच्या मनात असलेली मुघल आणि निजामाच्या संरक्षणाची आणि राजकीय संभ्रमाची भावना दिसते. बाळाजी विश्वनाथच्या काळात शिंदे, जाधव, निंबाळकर, आटोळे, पांढरे इत्यादी मराठा सरदार मोगलांना मिळाले तर बाजीरावांच्या काळात चिमणाजी दामोदर, सेनापती दाभाडे एवढेच नाही तर स्वतः कोल्हापूरचे छत्रपती संभाजी इत्यादींनी निजामास सहायक भूमिका घेतली. नानासाहेब पेशवे यांच्या काळात तर छत्रपती ताराबाई, दाभाडे, गायकवाड, पवार, रघुजी भोसले, बाबूजी नाईक हेच नव्हे तर पेशव्यांचे नोकर असणारे मल्हारराव होळकर व शिंदे निजामास जाऊन मिळतील, अशी पेशव्यास भीती वाटत होती.[१२] पेशव्यांच्या अव्यावहारिक उत्तराभिमुख धोरणामुळे दक्षिणेतल्या इतर सत्तांचा पराभव करून आपले सामर्थ्य वाढविण्यास आणि सत्ताविस्तार करण्यास निजामास अवकाश मिळाला. पेशवे, भोसले इत्यादी मराठेशाहीतील मातबर सरदार उत्तरेत बंगालमध्ये गुंतल्याच्या संधीचा फायदा निजामाने घेतला आणि आपल्या राज्याच्या सीमा वृद्धिंगत केल्या. त्या वेळी निजामाला पायबंद घालावा, असे पेशव्यांना वाटले नाही हे त्यांच्या राजकीय अनाकलनाचे द्योतक समजावे लागते. पेशव्यांनी दक्षिण बाजू म्हणजे दक्षिणेतील निजाम, हैदर इत्यादी शत्रूंची योग्य व्यवस्था लावून उत्तराभिमुख धोरणाचा अवलंब केला असता तर कदाचित उत्तर-दक्षिण राजकारणात आणि निजामाबाबत त्यांना अपयश आले नसते. त्यांचे उत्तरेत पानिपतही झाले नसते.

**निष्कर्ष :**

(१) निजामासोबतचे मराठ्यांचे तडजोडीचे राजकारण राजकीय संभ्रमातून आणि मुघल संरक्षणाच्या भावनेतून आल्याचे दिसते. त्यामुळे प्रत्येक वेळी युद्धात पराभूत होऊनसुद्धा निजामाचे राज्य मराठ्यांना नष्ट करता आले नाही.

(२) मराठा-निजाम संबंध सरदेशमुखीच्या सनदेभोवती केंद्रित झाल्याचे दिसते.

(३) पेशव्यांनी प्रत्येक वेळी निजामाचा पराभव केला असला तरी तहामध्ये मात्र निजामाने मुत्सद्देगिरीत पेशव्यांवर मात केली. त्यामुळे निजामाचे राज्य कायम टिकून राहिले यावरून स्पष्ट होते.

(४) शिवकालीन स्वराज्याचे ध्येय-धोरण आणि राजनीतीपासून दूर गेल्याने मराठ्यांचे निजामाबाबतचे धोरण अपयशी ठरले.

(५) मुघल संरक्षण आणि राजकीय संभ्रमाच्या भावनेमुळे निजामाविरूद्ध निश्‍चित भूमिका पेशव्यांना घेता आली नाही.

**संदर्भ :**


(१) कुलकर्णी अ. रा., मराठ्यांचे इतिहासकार आणि संशोधक, मराठ्यांचा इतिहास खंड-३, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, १९८६, पृ. १३.

(२) समदानी ओमप्रकाश, मराठ्यांच्या इतिहासाचे लेखन : त्र्यंबक शंकर शेजवलकर यांच्या संदर्भात विशेष अभ्यास, अप्रकाशित पीएच.डी. प्रबंध, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद, १९९८, पृ. १४.

(३) शेजवलकर त्र्यं. शं., निजाम-पेशवे संबंध १८ वे शतक, पुणे विद्यापीठ, पुणे, १९६३, पृ. १६.

(४) पगडी सेतु माधवराव, मराठे व निजाम संबंध, मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय, मुंबई, १९६१, पृ. २९.

(५) उपरोक्त, शेजवलकर त्र्यं. शं., पृ. २२.

(६) उपरोक्त, पृ. १३.

(७) उपरोक्त, समदानी ओमप्रकाश, पृ. १४१ - १४२.

(८) समदानी ओमप्रकाश (लेख), मराठ्यांच्या इतिहासातील उत्तर-दक्षिण वाद आणि शेजवल-करांची भूमिका (समा.), मराठवाडा इतिहास परिषद-निवडक शोधनिबंध, खंड-५, औरंगाबाद, २०००, पृ. ५९.

(९) उपरोक्त, शेजवलकर त्र्यं. शं., पृ. ६७.

(१०) उपरोक्त, पृ. १८.

(११) उपरोक्त, पृ. २०.

(१२) उपरोक्त, समदानी ओमप्रकाश (लेख), मराठ्यांच्या इतिहासातील उत्तर-दक्षिण वाद आणि शेजवलकरांची भूमिका (संपा), पृ. ५९.


❍❍❍

३

# छत्रपती शिवाजी महाराजांच्या यशाचे रहस्य-युद्धनीती

**डॉ. नितीन बावळे**

शारदा महाविद्यालय, परभणी

मध्ययुगीन इतिहासातील दक्षिण भारताच्या रयतेसाठीचे सोनेरी पान म्हणजे छत्रपती शिवाजी महाराजांचा काळ होय. महाराष्ट्राच्या मातीमध्ये मावळ्यांच्या रूपामध्ये शिवबांनी हिऱ्याची खान खोदली. मध्ययुगीन भारतात मोगल, आदिलशाही, कुतुबशाही, निजामशाही यांनी सर्वत्र आपल्या सत्तेची पाळेमुळे रोवली होती. महाराष्ट्रातील अनेक कर्तबगार मंडळी यांच्याकडे सेवेत होती. सामान्य जनता तर यांच्या अन्याय आणि अत्याचार यामुळे भयभीत होऊन जीवन कंठत होती. अशा प्रसंगी वरील सत्तेकडे सेवेमध्ये असतानाही स्वतःचा स्वाभिमान ठेवून आपल्या स्वतःच्या पुत्राला स्वराज्य स्थापन करण्यासाठी वातावरण तयार करून यंत्रणा पुरविण्याचे काम शहाजीराजांनी केले. या यंत्रणेचा उपयोग करून महाराष्ट्राच्या मातीमध्ये स्वराज्य स्थापन करण्याची प्रेरणा राजमाता जिजाऊंनी बाल शिवाजीच्या मनामध्ये रूजविली. यामुळे अल्प वयामध्ये बाल शिवाजीच्या मनामध्ये स्वराज्य स्थापनेचे बिजांकुर उमलू लागले. बाल वयामध्ये त्यांनी आपल्या सभोवती सवंगडी जमा केले आणि रायरेश्वराच्या मंदिरामध्ये स्वराज्य स्थापनेची शपथ घेतली. स्वराज्य स्थापन करताना बाल शिवाजीचे ध्येय हे लोककल्याणकारी राज्य निर्माण करण्याचे होते आणि म्हणूनच त्यांनी आपल्या राज्याला स्वराज्य असे नाव दिले होते. स्वराज्य स्थापनेच्या कार्यास असलेला आप्तस्वकियांचा विरोध दूर करत, शत्रूला पराभूत करणे आणि आपल्या स्वराज्याची पकड मजबूत करणे यासाठी त्यांनी अहोरात्र मेहनत घेतली. लहानपणापासून समोर आलेल्या संकटाचा सामना धीरोदात्तपणे कसा करावयाचा यासाठी रणनीती तयार करून ते संकटावर विजय मिळवीत गेले.

शहाजीराजांनी आदिलशाहीची मनसबदारी स्वीकारल्यानंतर शहाजीकडे पूर्वीपासून चालत आलेली पुणे, सुपे, चाकण, इंदापूर परगण्याची जहागिरी त्यांच्याकडेच ठेवण्यात आली.[१] पुढे शहाजीराजांनी दिलेली पुणे, सुपे, चाकण, इंदापूरची जहागिरी

सांभाळत असताना स्वकीय आणि इतर वर्चस्व गाजविणाऱ्या सत्ताधीशांचा शिवाजी-राजांना बंदोबस्त करावा लागला. हा बंदोबस्त करीत असताना सुरूवातीस समोपचाराने आपण परकीय सत्ताधीशांच्या विरोधामध्ये उभारलेले हे कार्य सांगून त्यामध्ये सहभागी होण्याचे आवाहन त्यांनी स्वकीयांना केले परंतु स्वकीय सत्ताधीश आपल्या कार्यामध्ये सामील न झाल्यास त्यांच्यावर वेगवेगळ्या मार्गाने विजय मिळविण्याची रणनीती छत्रपती शिवाजी महाराजांनी तयार केली. शहाजीराजांच्या जहागिरीचा प्रदेश जरी शिवाजीराजे सांभाळत असले तरी या प्रदेशातील किल्ले मात्र आदिलशाहीच्या ताब्यात होते. आपल्याला शत्रूवर मात करायची असेल तर किल्ले ताब्यात असणे गरजेचे होते. मावळ प्रदेशातील डोंगराळ आणि दऱ्याखोऱ्यांतील प्रदेशात स्वराज्य उभारण्यास अनुकूल परिस्थिती आहे हे शिवाजी राजांच्या लक्षात आले. तेव्हा त्यांनी आपल्याभोवती असलेल्या सवंगड्याच्या साह्याने जहागिरीच्या प्रदेशातील किल्ले ताब्यात घेण्यास सुरूवात केली. कोंढाणा, तोरणा, पुरंदर असे एकानंतर एक किल्ले अत्यंत कष्टाने व पराक्रमाने जिंकून घेतले. हे किल्ले ताब्यात घेत असताना शिवाजी राजांनी एक वेगळ्या प्रकारची रणनीती राबविली. आपल्या जहागिरीच्या प्रदेशांमध्ये चांगले प्रशासन आणि योग्य न्यायाने लोकांची मने शिवाजीराजांनी जिंकून घेतली. ताब्यात आलेल्या प्रत्येक किल्ल्याची डागडुजी करून त्यांचा वापर सुरू केला. तसेच या प्रत्येक किल्ल्यावर सुव्यवस्थित असे प्रशासनही निर्माण केले. अशा प्रकारे शिवाजीराजांनी किल्ले जिंकत असताना उघड संघर्ष टाळून साम-दाम-दंड-भेद या नीतीचा वापर केला. कारभार सुव्यवस्थित करण्यासाठी व लोकांमध्ये विश्वास निर्माण करण्यासाठी शिवाजीराजांनी स्वतःची राजमुद्रासुद्धा वापरली.

**प्रतिपचंद्रलेखेव वर्धिष्णू विश्व वंदिता**
**शाहसुनोः शिवस्यैषा मुद्रा भद्राय राजते**

शिवाजीराजांचा स्वतंत्र हालचाली आणि किल्ले ताब्यात घेण्याच्या कृतीला त्यांच्या वडिलांचा पाठिंबा असेल म्हणून आदिलशहाने शहाजीराजांना कैद केले परंतु कूटनीतीचा वापर करीत शिवाजीराजांनी आदिलशहावर मोगलांचे दडपण आणून शहाजीराजांची कैदेतून सुटकासुद्धा केली. या ठिकाणी त्यांनी वापरलेली कूटनीती निश्चितच त्यांच्या वयाच्या मानाने फार मोठी होती. यानंतर स्वराज्य स्थापनेच्या दृष्टीने त्यांनी फार मोठा पराक्रम केला तो जावळी प्रदेशाच्या विजयाने.

कारण जावळीचा प्रदेश अतिशय दुर्गम, घनदाट जंगलांनी व्यापलेला होता. या प्रदेशावर वर्चस्व निर्माण झाले तर भविष्यामध्ये शत्रूंशी आपण संघर्ष करीत असताना, युद्ध करीत असताना या प्रदेशाचा उपयोग आपल्या विजयासाठी होऊ शकतो हे शिवाजीराजांनी हेरलं व जावळी मोहीम ठरविली. जावळीच्या प्रदेशांमध्ये वर्चस्व गाजवीत असलेल्या चंद्रराव मोरे यांच्या विरोधातल्या अनेक तक्रारी शिवाजीराजांकडे आलेल्या होत्या. तेव्हा तेथील जनतेचा आपणाला अशा अन्यायी शासनकर्त्यांच्या विरोधामध्ये पाठिंबा मिळेल हे शिवाजीराजांनी जाणले. आपसांत संघर्ष टाळण्यासाठी सुरूवातीला जावळीतील चंद्ररावांची सामोपचाराची बोलणी करून पाहिली परंतु चंद्रराव सामोपचाराने शिवाजीराजांच्या स्वराज्य स्थापनेच्या कार्यात यायला तयार नसल्यामुळे नाइलाजाने शिवाजीराजांनी जावळी हा फार मोठा दुर्गम प्रदेश जिंकून घेऊन स्वराज्यामध्ये समाविष्ट केला.

आदिलशहावर वर्चस्व निर्माण करणाऱ्या शिवाजीराजांचा बंदोबस्त करणे आदिलशाहीला क्रमप्राप्त होते आणि म्हणूनच शहाजी राजांचा कट्टर विरोधक अफजलखान याने शहाजीराजांचे पुत्र शिवाजीराजांचा बंदोबस्त करण्याचं आश्वासन दरबाराला दिलं. अफजल खानाच्या शक्तीने पराभव न करता युक्तीने पराभव कसा करता येईल याची रणनीती शिवाजीराजांनी तयार केली. खानाला आपण घाबरत आहोत, असे दाखवीत खानाची भेट घेऊन खानाचा अंतस्थ हेतू सफल न होऊ देता खानावर मात करण्याचे कार्य शिवाजीराजांनी केले. अशा प्रकारे खानावर मिळविलेला विजय हा तत्कालीन सर्व सत्तांना हादरा देणारा ठरला. यानंतर सिद्दी जोहर याने शिवाजीराजांचा बंदोबस्त करण्यासाठी मोठ्या फौजेसह स्वराज्याकडे मार्गक्रमण केले. पन्हाळा किल्ल्यावर शिवाजीराजे थांबले होते तेव्हा सिद्दी जोहरने या किल्ल्याला वेढा देऊन पन्हाळा किल्ल्याची सिद्दी जोहरने चांगलीच नाकेबंदी केली. तेव्हा या वेढ्यातून बाहेर पडण्यास अन्य मार्ग नसल्याने शिवाजीराजांनी नवी रणनीती तयार करून आपला वकील सिद्दी जोहरकडे पाठवून त्यास भेटण्याची इच्छा व्यक्त केली. यानुसार सिद्दी जोहरच्या छावणीमध्ये शिवाजीराजे भेटण्यास येणार असे समजल्याने वातावरण शिथिल झाले आणि या संधीचा फायदा घेत रातोरात शिवाजीराजांनी पन्हाळगडावरून विशाळगडाकडे स्थलांतर केले.

पुढील काळात मोगल बादशहा औरंगजेबाचा मामा, शाहिस्तेखान जो मोगल दरबारात अमीर उल उमरा या सन्मानदर्शक पदवीने सन्मानित होता, त्याचे स्वराज्यावर आक्रमण झाले. शाहिस्तेखान पुण्यात वास्तव्य करून शिवाजीराजांच्या लोकांत फूट पाडण्याचा प्रयत्न करीत होता तर दुसरीकडे त्याची बलाढ्य फौज पुण्याच्या परिसरात धुमाकूळ घालत होती. सामान्य जनता त्यामुळे त्रस्त झालेली होती.[२] या वेळी शिवाजीराजांनी वेगळी रणनीती वापरत शाहिस्तेखान थांबलेल्या पुण्याच्या लाल महालावर छापा घातला आणि त्याच्या मनामध्ये जबरदस्त दहशत निर्माण करून त्याला पुणे सोडणे भाग पाडले. मोगलांच्या अनेक स्वारीमुळे स्वराज्याचे फार मोठे आर्थिक नुकसान झाले होते. ही नुकसानभरपाई भरून काढण्यासाठी शिवाजीराजांनी मोगलांच्या सुरत शहरावर हल्ला करण्याचे ठरविले. बहिर्जी नाईक सुरतला गेला. तो सुरतची सर्व बाजारपेठ फिरला. सुरत शहराच्या संपन्नतेची, धनाढ्य व्यापाऱ्यांची, तेथील संरक्षणव्यवस्थेची सर्व माहिती बहिर्जी नाईकने शिवाजीराजांना दिली.[३]

शिवाजीराजांनी यानंतर मोगलांचे नाक असलेल्या सुरत या शहरावर हल्ला करत चार दिवस तेथील संपत्ती जमा केली. मोगल सरदारांना शिवाजीराजांचा बंदोबस्त करण्यात अपयश येत असल्याने पुढे औरंगजेबने मिर्झा राजे जयसिंगाची शिवाजीराजांच्या विरोधामध्ये नेमणूक केली. मोगलांच्या बलाढ्य फौजेशी लढणे योग्य होणार नाही हे शिवाजीराजांनी ओळखले आणि त्यांनी मिर्झा राजे जयसिंग-सोबत पुरंदरचा तह केला. या पुरंदरच्या तहानुसार शिवाजीराजांना काही किल्ले व प्रदेश मोगलांना द्यावा लागला आणि मोगल बादशहाची आग्रा या ठिकाणी भेट घेण्याचे ठरले. या ठिकाणी स्वराज्याचे होणारे नुकसान टाळण्यासाठी आणि मोगल बादशहाची भेट घेण्याच्या उद्देशाने शिवाजीराजांनी पुरंदरच्या तहातील अटीनुसार आग्रा भेट मान्य केली आणि आग्रा भेटीमध्येही शिवाजीराजांनी आपल्या स्वाभिमानाचे दर्शन संपूर्ण हिंदुस्थानचा बादशहा असलेल्या औरंगजेबाला करून दिले. या वेळी शिवाजीराजांना नजरकैदेत ठेवण्यात आले. परंतु याही वेळी एक वेगळ्याच प्रकारची रणनीती तयार करीत मिठाईच्या पेटाऱ्यातून शिवाजीराजांनी या नजरकैदेतून आपली सुटका करून घेतली. पुरंदरच्या तहाने जे गमावलं ते परत संपूर्णतः प्राप्त केलेले आहे.

शिवाजी औरंगजेब की कल्लत से निकल भागे, इसमे कोई क्या करता नही थी कोई भी राजा औरंगजेब शत्रुता करके भाग नही सकता. संकट के समय प्राण बचाने में फिरता है दिखाई देती है हिंदी कवि भूषण कहते है कि, आग्रा के प्रसंग में शिवाजीने हिम्मत और वीरता दिखाई.[४] या नंतरच्या काळात शिवाजी महाराजांनी आपले स्वराज्य उभारले आहे. तेव्हा शेजारील सत्तांनीसुद्धा आपल्याला महाराजा-प्रमाणे समान दर्जा दिला पाहिजे यासाठी स्वतःचा राज्य भिषेक ६ जून १६७४ रोजी शिवाजीराजांनी केला. यामागे आपल्या स्वतंत्र सत्तेचं अस्तित्व शेजारील सर्व सत्तांना मान्य करण्यास भाग पाडणे हा उद्देश होता. वैदिक पद्धतीने केलेल्या राज्याभिषेकानंतर घडलेल्या काही अमंगल घटनांमुळे तांत्रिक पंथीय लोकांचे समाधान व्हावे या उद्देशाने त्यांनी तांत्रिक पद्धतीनेही दुसरा राज्याभिषेक करवून घेतला.

कर्नाटक मोहीम शिवाजीराजांच्या आयुष्यातील सर्वात भव्य-दिव्य मोहीम होती. या मोहिमेचे नेतृत्व स्वतः शिवाजीराजांनी केले. सव्वा वर्षातच स्वराज्याएवढाच प्रदेश कर्नाटकात जिंकला.[५]

मोगलांचे स्वराज्याच्या प्रदेशावर सतत हल्ले सुरूच होते. तेव्हा त्यांचा प्रतिकार शिवाजीराजे वेगवेगळ्या पद्धतीने करीत होते. त्यांच्या जीवनातील शेवटची जालनावरील स्वारी होय. या स्वारीनंतर सततची धावपळ व धामधूम यामुळे शिवाजी राजे खूप थकले आणि त्यांना ३ एप्रिल १६८० रोजी मृत्यूने गाठले. अशा प्रकारे शून्यातून स्वराज्य निर्माण करीत असताना आलेल्या प्रत्येक संकटाचा, संघर्षाचा, लढाईचा वेगळ्या युद्ध पद्धतीने मुकाबला करण्याचे शारीरिक आणि बौद्धिक अलौकिक सामर्थ्य शिवाजीराजांना प्राप्त होते. म्हणूनच त्यांनी प्रत्येक प्रसंगी वापरलेली रणनीती म्हणजेच युद्धनीती ही शिवाजीराजांच्या यशाचे रहस्य ठरली आहे.

**संदर्भ :**

(१) रोडे सोमनाथ, मराठ्यांचा इतिहास, पिंपळापुरे अँड पब्लिशर्स, नागपूर, जून-१९९८, पृ. ३८.

(२) उपरोक्त, पृ. ८३.

(३) धाये राजेंद्र व मुटकुळे रामभाऊ, छत्रपती शिवाजी आणि शिवकाळ, अरूणा प्रकाशन, लातूर, २०२१, पृ. १४१.

(४) जाधव एम. पी., छत्रपती शिवाजी हिंदी एवम् मराठी काव्य मे, अमन प्रकाशन, कानपूर, १९९७, पृ. १०४.

(५) सावळे दीपा, मराठ्यांचा इतिहास, एज्युकेशनल पब्लिशर्स, औरंगाबाद, २०१३, पृ. १५३.

(४)

# महाराष्ट्रातील यादवांची हिंदू सत्ता व तिचा शेवट : एक अभ्यास

**डॉ. नारायण सूर्यवंशी**
शिवनेरी महाविद्यालय, शिरूर अनंतपाळ, जि. लातूर

सुबाहूचा पुत्र दृढप्रहारी हा या वंशाचा मूळ पुरूष असून द्वारावती (द्वारका, गुजरात) येथून तो दक्षिणेत आला व त्याने राज्य स्थापिले. त्याची राजधानी श्रीनगर (सिन्नर, जि. नाशिक) ही होती. असा उल्लेख हेमाद्रीच्या, 'चतुवर्गचिंतामणी' या ग्रंथात मिळतो. जिनप्रभासुरीकृत नाशिकचा प्रभाव असलेल्या यादवांच्या काही कोरीव लेखांत दृढप्रहारी हा द्वारावतीहून येऊन चंद्रादित्यपूर (चांदोर) स्थायिक झाल्याचे वर्णन आढळते. नवव्या शतकात चंद्रादित्यपूर (चांदोर, जि. नाशिक) ही दृढप्रहारी राजांची राजधानी होती.[१] पुढे त्याचा मुलगा पहिला सेऊनचंद्र याने सिंदीनगर (सिन्नर, जि. नाशिक) भागातील सेऊनपूर येथे आपली राजधानी स्थलांतरित केली. हल्लीच्या नाशिक, नगर व औरंगाबाद जिल्ह्यांतील बराचसा भाग या प्रदेशात सामावलेला होता. यादवांचे हे सुरूवातीचे राज्य होते. यादव वंशीय राजे राष्ट्रकुट व त्यानंतर कल्याणीच्या चालुक्यांच्या दरबारी सामंत किंवा मांडलिक होते.[२] कल्याणीच्या चालुक्यांची राजसत्ता क्षीण होऊ लागली तेव्हा यादवांनी इ. स. च्या १२ व्या शतकात कल्याणीच्या चालुक्य वंशाचा शेवट करून त्यांची राजधानी कल्याणी आपल्या राज्याला जोडली. आधी चालुक्यांचा व नंतर कलचुरींचा शेवट करून यादवांनी दक्षिणेवर आपले प्रभुत्व स्थापन केले. तेव्हा लातूर जिल्हा यादवांच्या सत्तेखाली आला. यादव हे द्वारकेच्या श्रीकृष्णाचे वंशज असल्याचे सांगत. 'द्वारावतीपुरवराधिश्वर' हे बिरूद धारण करीत असत. इ. स. ११८७ मध्ये पाचव्या भिल्लम या यादव वंशीय राजाने कल्याणीच्या चालुक्याचा युद्धात पराभव केला. भिल्लम पाचवा याने देवगिरी हे नगर वसविले. आपल्या राज्याची राजधानी देवगिरी येथे नेली व स्वतःला भिल्लम पाचव्याने दक्षिणेचा सम्राट म्हणून राज्याभिषेक करून घेतला. यादवांनी चालुक्यांचे

मांडलिकत्व झुगारून देऊन थोड्याच काळात बृहन्महाराष्ट्रापासून म्हैसूरपर्यंत यादवांचे एकछत्री राज्य प्रस्थापित केले.[३] हेमाद्रीच्या 'चतुवर्गचिंतामणी' या ग्रंथात हे राजघराणे यादव म्हणून उल्लेखिले गेले असून या घराण्याची पूर्ण वंशावळ त्यात आलेली आहे. यादवांचे राजघराणे महाराष्ट्रावर राज्य करणारे शेवटचे हिंदू राजघराणे होय. त्यांच्या कालखंडात धार्मिक व सामाजिक क्षेत्रात मोठी परिवर्तने झाली. यादवांनी महाराष्ट्र आणि कर्नाटक या उभय भू-प्रदेशावर साधारणतः २०० वर्षे राज्य केले. त्यांनी देवगिरीला स्थलांतर करण्यापूर्वी चांदवड, सिन्नर या त्यांच्या राजधान्या होत्या. यादवांचे शिलालेख कानडी भाषेत असून त्यांच्या नामामध्येही कानडी भाषेचा प्रभाव दिसून येतो. उदा. मलगी, धाडीयाप्पा, भिल्लम, जयतुंगी इत्यादी पुरूष नामावलीत कानडीचा प्रभाव जाणवतो. यादवांच्या काळात कल्याण, नांदेड, धाराशिव, कंधार, औसा, उदगीर, उमरगा, निलंगा इत्यादी केंद्रे उदयास आली. हा परिसर महाराष्ट्र व कर्नाटक या राज्याच्या समीप असून या दोन भाषिक प्रदेशांवर लक्ष ठेवण्यासाठी उदगीर व औसा, नळदुर्ग, निलंगा या नगरांचा उपयोग केला गेला. तेथे सैन्याच्या छावण्या स्थापन केल्या गेल्या तसेच किल्लेही बांधले गेले.[४] यादवांच्या काळात आरी (आर्वी, जि. लातूर), करूनरणे (कारूनाळी, ता. उदगीर), कोणेयग्राम (कान्हेगाव, ता. उदगीर), सेरवखेल (साकोळ, ता. शिरूर अनंतपाळ), उजळंब (उजळंम, ता. चाकूर) इत्यादी ग्राम नामे यादवकालीन शिलालेखात आढळून आलेली आहेत. यावरून यादवांची सत्ता या भागावर होती हे सिद्ध होते. माहिमभटाचे 'लीळाचरित्र', जीन प्रभासुरी यांचे 'विविधतीर्थकल्प', हेमाद्रीचा 'चतुरवर्गचिंतामणी' व संत ज्ञानेश्वरांनी लिहिलेली 'ज्ञानेश्वरी' या वाङ्मयातूनही देवगिरीच्या यादवांच्या इतिहासावर प्रकाश पडतो.

भिल्लम पाचवा (इ. स. ११८७-११९१), जैत्रपाल (इ. स. ११९१-१२१०), सिंघन (इ. स. १२१०-१२४७), कृष्ण (इ. स. १२४७-१२६०), महादेव (इ. स. १२६०-१२७१), रामदेव (रामचंद्र) (इ. स. १२७१-१३०९), शंकरदेव (इ. स. १३०९-१३१२) शेवटी मेव्हना हरपालदेव हा इ. स. १३१८ साली मुसलमानी राज्यकर्त्यांनी ठार केला. ही देवगिरीच्या किंवा उत्तरकालीन यादव घराण्याची वंशावळ असून या यादव राज्यकर्त्यांनी देवगिरीवरून जवळ जवळ दोनशे वर्षे राज्यकारभार केला.

यादवकालीन काळातील औंढा-नागनाथ, अर्धापूर, खोलेश्वर, अंबाजोगाई, गेवराई, माहूर, श्रीवर्धनापूर, तुळजापूर, हिंगोली या नगरांबरोबरच कंधार देश, उदयगिरी देश या स्थानांची वर्णने पाहावयास मिळातात. कान्हेगाव (ता. उदगीर) येथे यादव राजा कृष्णदेव याचा इ. स. १२५८ चा शिलालेख मिळालेला आहे. या शिलालेखात यादव राजा कान्हेरदेव याचा लत्तनौर म्हणजे लातूर येथील अधिकारी गोपालदेव याने केलेल्या होमांच्या सांगतेप्रीत्यार्थ केलेल्या दानाची नोंद या शिलालेखात आहे. यावरून लातूर व लातूर परिसरावर कन्हेरदेव यादवांचे वर्चस्व होते. त्यांनी या जिल्ह्याच्या परिसरात आपले अधिकारी नेमले होते. याला वरील शिलालेखाची पुष्टी मिळते. याच कृष्णदेव यादवांच्या कान्हेगाव शिलालेखात तुरे (ओ. २३) सध्याचे तुरूरी, सखवल (ओ. २४) सध्याचे साकोळ, ता. शिरूर अनंतपाळ, उजल सध्याचे उजळंब, ता. चाकूर (ओ ३०), करवरणे सध्याचे काखनाळ इत्यादी लातूर जिल्ह्यातील स्थलनामांचा उल्लेख आलेला आहे. यावरूनही हा भाग किंवा लातूर जिल्ह्याचा परिसर यादवांच्या सत्तेखाली होता हे स्पष्ट होते तसेच लातूर जिल्ह्यातील औसा देश व उदगीर देश या स्थानाला यादवांच्या प्रशासनव्यवस्थेत महत्त्वाचे स्थान होते. भिल्लमाने दक्षिणेत आपले राज्य स्वबळावर स्थापन केले. त्यानंतर त्याचा पुत्र जैत्रपाल गादीवर आला. त्यानेही दक्षिणेतील होयसाळ राजाबरोबर संघर्ष केला तसेच काकतीय राजाचाही पराभव केला तेव्हा त्याच्या कारकीर्दीत लातूर जिल्ह्यावर यादवांची सत्ता होती.

जैत्रपालचा मोठा मुलगा सिंघन सत्तेवर आला. लातूर जिल्ह्याच्या लगतच काकतीय वंशाचे राज्य असून यादव व काकतीय यांच्यात सतत संघर्ष सूरू राहिले.[६] तेव्हा यादव नरेश सिंघन याने आपल्या पराक्रमी सेनापती खोलेश्वर याला या प्रदेशावर नियुक्त करून लातूरच्या उत्तरेला असलेले अंबे हे नगर (अंबाजोगाई) इनाम दिले. खोलेश्वर यांच्या आंबे शिलालेखावरून बीड, लातूर, उस्मानाबाद जिल्ह्यांचा परिसर यादवांच्या अमलाखाली होता हे स्पष्ट होते. या आंबे शिलालेखात औसा, उदगीर या लातूर जिल्ह्यातील स्थलनामांचा उल्लेख आलेला आहे. औसा देश (औसा) व उदगीर देश (उदगीर) या दोन्ही ठिकाणी 'बीड' अथवा यादव सैन्याच्या

छावण्या होत्या. यादवांच्या काळात औसा व उदगीर ही सीमेलगतची नगरे सैनिकीदृष्ट्या महत्त्वाची बनलेली दिसतात. कृष्णदेव यादवांच्या कारकीर्दीत लातूर हे मंडळ विभागाचे मुख्यालय असून त्यात कंधार, उदगीर व उमरगा या देश विभागांचा समावेश होता. गोपालदेव राष्टौड हा या विभागाचा प्रमुख होता, असा उल्लेख कान्हेरदेव यादवांच्या शिलालेखात आलेला आहे. महानुभाव वाङ्मयातही कृष्णदेवाचे उल्लेख मिळतात.

कृष्णदेवानंतर त्याचा भाऊ महादेव हा सत्तेवर आला. श्री चक्रधरांनी महादेव राज्यधर्म जाने असे म्हटलेले आहे. महादेवाने आपला मुलगा अमनदेव याचा युवराजपदी अभिषेक करविला परंतु शेवटी रामदेवाने अमनदेवाला कैद करून वध केला. देवगिरीची सत्ता आपल्या ताब्यात घेतली. या घटनेची नोंद लीळाचरित्राच्या ३४३ क्रमांकाच्या लीळेत आढळते. श्री चक्रधर म्हणतात... "वार्ता कैसी नाही : राज्यानंतर जाले : रामदेवो रावो राजी बैसला : अमनदेवो खाली उतरिली : देवगिरी पालटिली." वरील विवेचनावरून रामदेव किंवा रामचंद्रदेव यादव देवगिरीच्या गादीवर आला. त्याने नवसारी - सुरतपासून, नागपूर - रामटेक भंडाऱ्यापर्यंत व नर्मदेपासून दक्षिणेत कावेरीच्या उत्तर तीरापर्यंत यादव सत्तेचा विस्तार केला. १३ व्या शतकातील त्या शेवटच्या दुर्दैवी शतकात देवगिरीचे राज्य हे प्रगती आणि वैभवाच्या अतिउच्च शिखरी पोहोचले होते. दक्षिणेतील होयसाळ राजाबरोबर यादवांनी युद्ध केले. रामचंद्र देवांनी प्रचंड सैन्य सोबत घेऊन होयसाळांची राजधानी द्वारसमुद्रवर हल्ला केला परंतु होयसाळांचा पूर्ण पराभव होऊ शकला नाही. रामचंद्रदेव पराक्रमी असल्याचे इतिहासात पुरावे मिळतात. त्याने वाराणसीमधून मुसलमानांना हाकलून देऊन तेथे मंदिर उभारले ही घटना गुलाम सुलतान बल्बन यांच्या मृत्यूनंतर व जलालुद्दीनच्या राज्यारोहणा दरम्यान घडली असावी असे दिसते.

रामदेव यादव पराक्रमी होता खरा परंतु सावधचित्त नव्हता. त्याने उत्तरेकडील मुस्लिम सत्तेचा धोका ओळखला नाही, असेच इतिहासावरून आढळून येते.[७] दिल्ली सुलतान जलालुद्दीन खिलजी याचा पुतण्या व जावई अल्लाउद्दीन खिलजी याने दिल्लीची सत्ता काबीज करण्याचे योजून त्यासाठी लागणाऱ्या धनासाठी धनसंपन्न अशा रामचंद्रदेवाच्या देवगिरीवर स्वारी केली. तेव्हा यादवाचे सैन्य दक्षिण पादाक्रांत

करण्याच्या मोहिमेत गुंतले होते. देवगिरी या राजधानीत मोजकेच सैन्य असल्यामुळे अल्लाउद्दीन खिलजीकडून रामचंद्रदेवाचा पराभव झाला. अल्लाउद्दीनने देवगिरीत २५ दिवस मुक्काम केला. फारसी इतिहासकार अमीर खुस्रो, इसामी व जियाउद्दीन बरनी यांच्या लिखाणात अल्लाउद्दीनच्या देवगिरीवरील स्वारीचे व तत्कालीन घटनांचे वर्णन येते.[८] पराभूत झालेल्या यादव राजा रामचंद्रदेवाने अल्लाउद्दीनबरोबर तह करून प्रचंड संपत्ती दिली. अल्लाउद्दीन परत आपल्या राज्यात निघून गेला. तो पुढे दिल्लीचा सुलतान बनला व त्याने इ. स. १३०७ ला मलिक कफूरला देवगिरीवर पाठविले. मलिक कफूरने शरण आलेल्या रामचंद्रदेवाला कैद करून दिल्लीला सुलतानाकडे पाठवून दिले. सुलतान अल्लाउद्दीन खिलजीने त्याला सन्मानाची वागणूक देऊन देवगिरीला परत पाठविले. यादव राजा या पराभवाने खचला व त्याचा इ. स. १३१० मध्ये मृत्यू झाला. रामचंद्रदेवानंतर त्याचा मुलगा शंकरदेव किंवा सिंघन तिसरा हा राजा झाला. त्याने खंडणी देणे बंद केले. तेव्हा मलिक कफूर याने इ. स. १३१३ ला पुन्हा देवगिरीवर स्वारी केली. त्यात शंकरदेव मारला गेला.[९] त्यानंतर इ. स. १३१६ मध्ये दिल्लीतील घडामोडींचा फायदा घेऊन रामदेव यादवांचा जावाई व कल्याणीच्या चालुक्य घराण्यातील वीर पुरूष हरपालदेव याने देवगिरीतील मुस्लिम सरदारांना हाकलून लावून राज्य संघटित केले.[१०] दिल्लीचा सुलतान कुतुबद्दीन मुबारक शहा या अल्लाउद्दीनच्या मुलाने इ. स. १३१८ मध्ये देवगिरीवर स्वारी करून हरपालदेव याला ठार मारले व देवगिरी राज्य खालसा करून आपल्या राज्याला जोडले. त्याच्या नोंदी तत्कालीन लेखक बरनी व खुस्रोच्या लिखाणांत मिळतात.

**निष्कर्ष :**

(१) सुबाहूचा पुत्र दृढप्रहारी हा यादव वंशाचा मूळ पुरूष मानला जातो.

(२) यादव वंशीय राजे राष्ट्रकुट व त्यानंतर कल्याणीच्या चालुक्यांच्या दरबारी सामंत किंवा मांडलिक होते.

(३) यादव हे स्वतःला द्वारकेच्या श्रीकृष्णाचे वंशज असल्याचे सांगत.

(४) यादवांचे राजघराणे महाराष्ट्रावर राज्य करणारे शेवटचे हिंदू राजघराणे होय.

(५) यादवांनी महाराष्ट्र व कर्नाटक या उभय भू-प्रदेशावर साधारणपणे २०० वर्षे राज्य केले.

(६) माहिमभट्टाचे 'लीळाचरित्र' व हेमाद्रीच्या 'चतुरवर्गचिंतामणी' या ग्रंथातून देवगिरीच्या यादवांच्या इतिहासावर प्रकाश पडतो.

(७) नवसारी-सुरतपासून, नागपूर-रामटेक भंडाऱ्यापर्यंत व नर्मदेपासून दक्षिणेत कावेरीच्या उत्तर तीरापर्यंत रामचंद्रदेव यादवांनी आपल्या सत्तेचा विस्तार केल्याचे उल्लेख मिळतात.

(८) यादव घराण्यातील राज्यकर्त्यांनी उत्तरेतील मुस्लिम सत्तेचा धोका ओळखलेला दिसत नाही, असेच इतिहासावरून आढळून येते.

(९) सन १३१३ ला मल्लिक काफूरने देवगिरीवर पुन्हा स्वारी केली. झालेल्या युद्धात शंकरदेव मारला गेला.

(१०) अल्लाउद्दीनचा मुलगा व दिल्लीचा सुलतान कुतुबुद्दीन मुबारक शहा याने सन १३१८ मध्ये देवगिरीवर स्वारी करून हरपालदेवाला ठार मारले व देवगिरीचे राज्य खालसा केले.

(११) यादव घराण्याच्या शेवटाने महाराष्ट्रातील शेवटची हिंदू सत्ता संपुष्टात आली व तेथून पुढे मराठवाडा परिसरावर सन १९४८ पर्यंत मुस्लिम राजकर्त्यांची सत्ता राहिली.

**संदर्भ :**


(१) डहाके वसंत आबाजी, मराठी साहित्य इतिहास आणि संस्कृती, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, २००६, पृ. २१.

(२) राजन अमिताभ, डॉ. गाडगीळ, डॉ. देव (संपा.), स्थानिक इतिहास आणि साहित्य : एक शोध, नांदेड, १९८६, पृ. १४.

(३) पाध्ये केशवअप्पा, हेमाद्री ऊर्फ हेमाडपंत यांचे चरित्र, मुंबई, १९३१, पृ. १५.

(४) तुळपुळे शं. गो., प्राचीन मराठी कोरीव लेख, पुणे विद्यापीठ, १९६३, पृ. १२०.

(५) रोडे सोमनाथ (संपा.), निवडक शोध निबंध मराठवाडा इतिहास परिषद, औरंगाबाद, खंड दुसरा, पृ. १४०.

(६) महाराष्ट्र राज्य गॅझेटियर, लातूर जिल्हा, भाग-१, दार्शनिक विभाग, मुंबई, २००८, पृ. ६७.

(७) देगलूरकर गो. बं., ७७ व अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, औरंगाबाद, २००४, स्मरणिका-भारूड, पृ. ३.

(८) पगडी सेतु माधवराव, महाराष्ट्र आणि मराठे, जोशी आणि लोखंडे प्रकाशन, पुणे,१९६३,पृ. १.

(९) जोशी सु. ग. (संपा.), मराठवाडा संशोधन मंडळ, वार्षिक, राधाकृष्ण रामचंद्र प्रकाशन, शिरूर ताजबंद, १९७४, पृ. १०.

(१०) खरे ग.ह., दक्षिणेच्या मध्ययुगीन इतिहासाची साधने, भाग-२, भा.ई.सं.मं., पुणे, १९३४, पृ.१२.


❍❍❍

5

# Emperor Aurangzeb : An Educationist

✵

**Dr. Annesa Iqbal Sabir**
Department of History, AMU, Aligarh (U. P.)

Aurangzeb 'Alamgir' is described as 'the puritan in the purple'. Magnificent in his public appearance, simple and unassuring in his private life, punctilious in performance of his religious observances, prompt in the dispatch of his daily business, an eminent educationist, a remarkable religious enthusiast, a patron of of poor and the learned, a great literary genius, an elegant letter writer, a master of pen as well as sword. He left no faculty of his mind to rust and consistently worked even till the last days of his life. This research paper entitled "Emperor Aurangzeb: An Educationist" will not discuss the political accomplishments but a cultural aspect i.e education and will attempt to analyse Aurangzeb's view on education.

Aurangzeb mastered the *Quran* and the *Hadith* (traditions of the Prophet) thoroughly and became a scholar in Arabic and Persian literature. He had also some knowledge of hindi and could speak in that language. Being an intensely religiously minded person, Aurangzeb used to copy the *Quran*. His style of writing was excellent. He wrote many letters and also wrote orders on all petitions made to him, in his own hand. Prince Aurangzeb did not however like to hear useless poetry. Theological works were his most favourite subject of study. He diligently studied religious books such as the Commentaries of the *Quran*, the Traditions of the Prophet, works on jurisprudence, the writings of Imam Ghazali, selections from the books of Shaikh Yahia of

Maner, Shaikh Zain-ud-din, Qutb Muhi Shirazi, and other books of the same class, which he perused constantly[1]. He had a aversion for art, music, drama and even poetry (other than familiar quotatons). He spent his leisure hours in searching for legal precedents in Arabic works on Jurisprudence[2]. He had completely memorized the *Quran*. His handwriting was very beautiful and he could write in the *naskh* style, the *nastaliq* and the *shikastah* hands very well. He possessed great skill in prose composition and letter-writing, and was well-versed in prose and poetry but he did not incline to hearing useless poetry[3].

Aurangzeb was a scholar of Muslim theology and jurisprudence and had no taste for poetry. But it was during his period that Persian was in full bloom. He himself composed verse with great beauty. Khafi Khan wrote *Muntakhab-ul-Lubab*, Mirza Muhammad Qazim wrote *Alamgirnama*, Ishwar Das wrote *Maasir-i-Alamgiri*, Bhimsen wrote *Nushka-i-Dilkusha*, a history of Alamgir's reign and Sujan Rai wrote *Khulasa-ut-Tawarikh*. *Fatawa-i-Alamgiri* , a digest of Muslim Law, was also produced during his reign by several theologians and jurists under his personal supervision and placed it in the Imperial Library.[4] The *Ruqqat-i-Alamgiri* is a collection of the emperor's letters which demonstrates his mastery over simple and elegant Persian[5].

**AURANGZEB'S THEORY OF EDUCATION FOR A PRINCE:**

Auragzeb introduced a new theory of imperial education for the royal princes. This theory emphasized the importance of general knowledge, such as familiarity with the languages of the surrounding nations, an acquaintance with the distinguishing features of other nations, their resources and strenghth, mode of warfare, manners, religion, form of government, and with the origin of states, their progress and decline, the events, accidents or errors owing to which such great changes and mighty revolutions have been effected, duties of the sovereign towards his subjects, the art of warfare, of besieging a town or drawing up an army[6].

According to Aurangzeb, training in arms was the most important item in Prince's education[7].

In October 1654, when Muhammad Sultan, in his fifteenth year, was marching towards Ajmer to be presented to emperor Shahjahan, Aurangzeb gave him a number of practical and minute instructions. Aurangzeb, naturally being the father, wanted his son to make a good impression upon Emperor Shahjahan. The principles underlying these instructions throw ample light on Aurangzeb's conception of princely education. He directed his son thus, "Whether you are in residence or on a march, get up from bed 72 minutes before sunrise. After spending 48 minutes in bathing and getting ready, come out of your room for prayer and recititng set passages read one section of the Quran. Breakfast in the inner apartment will come next. If you are on a march, take care to reach the halting place appointed for the day punctually. Arriving there if you are so inclined or have the necessary time, read something on Arabic, otherwise take rest. After 24 minutes in the afternoon when the Sun begins to decline, come out of your tent for the *zuhar* prayer which should be performed with full congregation. The principal meal and some repose will fill your time till two hours before sunset, when the *asar* prayer should said. But if the meal alone suffices to refresh you, spend the interval in improving your handwriting' composing letters, or reading Persian prose and poetry. After the *asar* prayer, read Arabic for a short time and then some 24 minutes before sunset, hold a select audience where you should sit till 48 minutes after nightfall. Then leave the chamber and read a section of the *Quran* and retiring to the inner apartment go to bed at nine"[8].

Aurangzeb said thus, "Blessed is that Prince who finds a learned man, who with affection and fidelity imparts to him the virtues and good qualities fitting for a king. Nor can I do better than rejoice at finding in our

annals and elsewhere in the world's chronicles a number of princes, kings and monarchs who met with good fortune"[9].

Aurangzeb explicitly advised his son to read *Akbarnama* thus," Read the Akbarnama at leisure so that the style of your conversation and writing may become pure and elegant"[10].

His theory yielded excellent results during his life time and on account of his care and interest, his sons became accomplished in learning the manners and customs of princes and great men. The author of *Maasir-i-Alamgiri* praises Alamgir's efforts regarding the education of his sons thus " This perfect natured sovereign brought up his sons in such a way that through their outward and inward exertions they became endowed by high accomplishments and orthodox learning and came to possess an abundant share of virtue, submissiveness to God, abstinence from uncanonnical acts, the science and practice of kingship and governorship, and skill in many useful arts"[11].

**CRITICISM AND REBUKEMENT OF MULLAH SHAH BY AURANGZEB:**

When Mullah Shah, who was Aurangzeb's childhood teacher came to know of the political successes of his pupil, he hastened to Delhi, expecting that he would be promoted to the rank of *Omrah*. But to his dismay, he was permitted to meet Aurangzed after three months that too in a secluded apartment. The Emperor rebuked the Mullah that he had kept the Prince completely ignorant and unaware of the history of different nations, their geography and also origin and fall of states. He said,'You kept me in total ignorance of the lives of my ancestors, their extraordinary talents that enabled them to achieve, their extensive conquests. A familiarity with the languages of surrounding nations be indispensable in a king, but you would teach me to read and write Arabic so large a portion of my time to the study of a language where no one can hope to become proficient without ten or twelve years of close application and thus did you waste the precious hours of my

youth in dry, unprofitable, and never-ending task of learning words' He resented being trained by Mullaji which according to him was a waste of fruitful time. He finally said,' Happy for me that I consulted wiser heads than thine on these subjects! Go! Withdraw to thy village. Henceforth let no person know either who thou art, or what is become of thee'.[12]

**INDIFFERENCE OF KAMBAKSH TOWARDS ACQUISITION OF KNOWLEDGE AND HIS ADMONITION :**

Sujadat Khan, the *Mua'llim* (teacher) of prince Muhammad Kambaksh, came to the *maktabkhana* (study room) and asked the prince to come. The Khan waited for three hours but the Prince did not arrive. Therefore, he reported all that had happened to the Emperor who said, "The cause of the absence be investigated and reported to me". Accordingly the Khan reported to Aurangzeb that the Prince felt that he had acquired enough knowledge and that he was not interested in spending his whole life in the *Maktabkhana*. At this Aurangzeb understood and resented the vanity of the prince and called him to his presence and said "A human being is a beast without knowledge. For the Princes there is no escape from it". Then the emperor ordered that the prince should not be allowed to perform his *kurnish* for forty five days. Afterwards, the emperor due to paternal affection pardoned his faults adding, "in the acquirement of happiness i.e.(education) such indifference will not be permitted"[13].

Aurangzeb assembled his privy council with the learned men of his court for the purpose of selecting a good preceptor for his third son, Sultan Akbar, who he wished would be his successor. He desired that the young prince should receive such education which would make him a great man. Bernier was of the opinion that "No person can be more alive than Aurangzeb to the necessity of storing the minds of Princes destined to rule nations, with useful knowledge. As they surpass others in power and elevation so ought they, he says, to be pre-eminent in wisdom and virtue."

Aurangzeb was strongly against the upbringing of the princes customary then, and said that, “as these princes are right from infancy taken care of by woman and eunuchs, slaves from Russia, Circassia, Mingrelia, Gurgistan or Ethiopia whose minds are debased by the very nature of their occupation, these princes when called to the throne are ignorant about their duties, appear as if they have come from another world and shocked at everything around them. They lack dignity and are in fact only other names for savageness and vanity.” According to Aurangzeb, the monarchs of Asia had always indulged in monstrous vices as these ideas had been instilled in their minds since childhood. Usually the reigns of the Empire were given in the hands of some Vazir[14].

**AURANZEB’S ADVICE TO HIS SON IN THE *RUQAT-I-ALAMGIRI* :**

Auranzeb’s interest in the education of his sons and grandsons is clearly reflected in the letters which he wrote to them from time to time. In one such letters addressed to his son, Prince Muhammad Azam , he advised him to take particular care for the training of his son Bahadur thus, “Exalted son may God be praised that the grandson Bahadur had become brave and day by day his fortune is being improved. You should not be careless in training your son Bahadur”.[15]

In letter XX Aurangzeb warns his son, “Carelessness and indifference are contrary to the way of kingship and sovereignty”[16].

In letter XXVI, Aurangzeb writes of an episode that took place during Shahjahan’s reign. One day Sa’ad Allah Khan came late to the Court, when asked the cause he replied, “I was reading some passages from a book and copying them down in order to show them to your Majesty.” They were as follows, “The stability of the foundation of sovereignty depends upon justice. You should keep company with the wise and the learned and avoid the company of fools”[17].

In letter XLI, Auranzeb wrote to his son Muhammad Azam some passages which he found in the diary of Shahjahan and wanted his son

also to benefit from it. “Some actions are the best,to keep company with the pious,to search for the worthy and able, to give the deserving as much as you can, before they ask for it, to honour the learned”[18].

**INCLINATION TOWARDS DESSIMINATION OF KNOWLEDGE :**

Aurangzeb founded numerous schools and colleges in his kingdom and never ignored his duty with respect to the education of his subjects. He once confiscated the buildings belonging to the Dutch in Firangi Mahal and gave to a Muslim for running a *madrasa*.[19] He took keen interest for the education of the *Bohras* of Gujarat for whom he appointed expert teachers and arranged monthly examinations and the results were regularly reported to him.[20] Similarly Imperial *Firmans* were issued to other provincial governors instructing them to be particular about the education of their subjects. In 1678 A.D. he sanctioned large sums of money for the repair and renovation of the old *maktabs* and *madrasas* of Gujarat and ordered the Diwan to support the students of these colleges.[21] Also Imperial orders were sent so that three more Professors in Ahmadabad, Patan and Surat and more forty five students in Ahmedabad be added to the existing number. Aurangzeb assisted the students by providing them daily stipends according to their proficiency.[22]

His reign was also noted for the promotion of education under the patronage of private individuals. For instance, Akramuddin built a *madrasa* at Ahmadabad in 1697 .A.D. costing him one hundred twenty four thousand rupees and on his request was given Siha and Sundra (two villages) for maintenance by the Emperor.[23] Maulvi Abdul Hakim also founded a school in Sialkot, in which his son Maulvi Abdullah became a proficient teacher. Also Qazi Rafiuddin established a madrasah at Bianah in 1670 A.D. close to Qazion ki masjid.[24] The city of Sialkot also flourished as an important centre of education during his reign. Learned men from different parts of the country came to this place in the quest of knowledge. Not only was it famous due to the voluntary

efforts but also the fact that paper was easily available here. It had a huge manufactory of *Mansinghi* and silk paper which was clean, durable and good in texture.[25]

The system followed in the educational institutions founded by Aurangzeb must have been based on his own theory of education a fact which even Bernier acknowledges. That it proved to be greatly effective and led to wide spread of knowledge is borne out by the enhancing number of prominent poets and scholars in the Mughal Empire. The *Farhat-ul-Nasirin* mentions names of forty five distinguished poets of whom Sarmad was indisputably the most outstanding. Of them six belonged to Lahore and one called Chandar Bhan, was evidently a Hindu. It also testifies that there were thirty one litterateurs, some of whom such as Danishmand Khan, Fazal Khan, Shaikh Harwi and Itimad Khan, had also qualified themselves as good administrators. Over and above, there were thirty-six more, who distinguished themselves in religious sphere. Among the rest, such renowned teachers as Abdul Aziz, Abdullah and Abdul Karim, deserve special mention. Finally, there were many others who achieved their laurels in literature by writing volumes on various subjects.[26]

**EDUCATION OF AURANGZEB'S CHILDREN:**

Aurangzeb took keen interest in the upbringing of his children so much so that they became endowed with high accomplishments and orthodox learning and were virtuos, submissive to God, abstained from unislamic practices, acquires the science and practice of kingship and generalship, also were skilled in many useful arts. They committed the *Quran* to memory, gained skill in writing different kinds of hands, and mastered the Turki and Persian languages. Also the females of his harem (daughters) under his direction learnt the necessary rules and doctrines of religion, and all engaged in the worship of God, reading and transcribing the *Quran*, and the acquisition of virtues and provision for the next world. He had five sons and five daughters.[27]

Prince Muhammad Sultan, born by Nawab Bai, 4th Dcember, 1049/19th December, 1639. He was possessed noble manners and admirable qualities, memorized the Quran, could read and write Arabic, Persian and Turki quite well. This Prince performed brilliant exertions in the wars of His Majesty and died in the 20th year of His Majesty's reign. Prince Muhammad Muazzam Shah Alam Bahadur, born on the last day of Rajab, 1053/ 4th October, 1643, from the same Queen, due to the teachings of his father acquired noble traits of character and manly accomplishments. He had memorized the *Quran*, excelled in the knowledge of canonical law and *Hadith* and was punctual about his prayers. He had perfect knowledge of Arabic, Turki and Persian languages and and had gained mastery on writing various kinds of hands.[28] The *Ma'asir-i-Alamgiri* gives details of his daily busy routine.[29] Prince Muhammad Azam born on 28thth June 1653/12th Shaban 1063, to Dilras Banu Begum proved to be an accomplished individual of vibrant qualities of head and heart. By the excellent training of his father he reached the pinnacle of perfection and gained abundant qualities and aptitude. Aurangzeb was very fond of him and he had attained to the status of a comrade of his father. He died shortly after Aurangzeb on the 18th Rabi. A/ 8th June, 1707, after fighting bravely in the battle against Shah Alam I, at Jajau.[30] Muhammad Akbar, born on 12th Zil. H, 1067/ 11th September, 1657, to Dilras Banu. He too under the guidance of his father acquired sublime skills. He died in Iran in the 48th year of Alamgir's reign.[31] Prince Muhammad Kam Baksh born on the 24th February, 1667/10th Ramzan. 1077 A.H. to Bai Udipuri, memorized the *Quran* and thoroughly studied the standard books of his times. Comparatively he was more accomplished than his brothers, and acquired a great knowledge of the Turki language and skill in writing various kinds of hand. He possessed great qualities of bravery and liberality. On 3rd Zil. Q., 1120/3rd January, 1700, two years after Aurangzeb's death, he fell fighting like a Rustam or an Asfandiyar.

Amongst his five daughters Zeb-un-nisa Begum was the eldest was born on the 10th of Shawwal, 1047/15th February, 1638 to Begum Dilras Banu. Through the pious upbringing of the Emperor she memorized the *Quran* for which she received a reward of 30,000 gold coins from her father. She excelled in Arabic and Persian languages and could wrtite different hands like the *nastaliq*, *naskh*[32] and *shikastah* very well. Being herself educated she patronized scholars and admired the value of learning and skill. She established her own library by which large number of theologians, scholars, pious men, poets, scribes and calligraphists enjoyed her bounty. Mulla Safi-ud-din Ardbili by her order resided in Kashmir and engaged in translating into Persian "The Great Commentary on the *Quran*" which was entitled *Zeb-ut-Tafsir*. Other books were also composed in her honoured name. She died in her father's life-time, in the 46th year of his reign, 1113, (26th May, 1702 A.D. Zinat-un-nisa Begam, born on 1st Shaban, 1053/5th October, 1643 to Dilras Banu Begam. Her father equipped her with the knowledge of doctrines and rules of Faith. Several people acquired their livelihood from her bounty. Badar-un-nisa Begam, born on 29th Shawwal, 1057/ 17th November, 1647, to Nawab Bai. Her father made her memorise[33] the *Quran* and read books on the Faith. She spent her life in piety and doing holy deeds. She died on 28th Zil.Q. in the 13th year of his reign/ 9th April 1670. Zubdat-un-nisa Begam, born on 26th Ramzan, 1061/ 2nd September, 1651, to Dilras Banu Begam. She spent her life in prayer and worship for which she was immensely rewarded by her father, was married to Sipihr Shukoh, son of Dara Shukoh, and died in the same year as her father, in February, 1707 A.D. Mihr-un-nisa Begam, born on 3rd Safar 1072/ 18th September, 1661, to Aurangabadi Mahal. She was also a accomplished lady, was the wife of Izid Baksh, the son of Murad Baksh, died in the 50th year of her father's reign 1116 A.H./1706 A.D.Thus due to Aurangzeb's deep inclination towards learning all his ten children were proficient in the qualities of head and heart.

## CONCLUSION :

Auranzeb was an educationist. He established several educational centres in all important cities of his empire and erected schools in smaller towns. During his rule we learn Delhi, Jaunpur, Sialkot and Thatta were important centres of education. He enunciated a new theory of what the education of the royal princes be which emphasized in brief the importance of general knowledge, such as familiarity with the languages of the surrounding nations, an acquaintance with the distinguishing features of every nation of the earth, its resources and strengths, its mode of warfare, its manners, religion, mode of government, with the origin of the states their progress and decline, the events, accidents and errors owing to which such great changes and mighty revolutions have been effected, with reciprocal duties between sovereign and his subjects, the art of war, of besieging a town or drawing up an army. Thus he suggested that education should not be confined to religious studies but should also acquaint the students with secular subjects like history, political science, geography, environmental studies, languages etc. He was progressive in his outlook wherever acquisition of knowledge and imparting of education was concerned.

## References :


(1) Khan, Muhammad Saki Musta'id, Maasir-i-Alamgiri, Asiatic Society of Bengal, Calcutta, 1871, p. 532.

(2) Sarkar, Jadunath, Studies in Mughal India, B.R.Publishing Corporation, Delhi, 2019, p. 62.

(3) Ibid, Maasir-i-Alamgiri, p. 533.

(4) Ibid, p. 530.

(5) Ishwari Prasad, Short History of Aurangzeb's Reign, Orient Longman Ltd, Delhi, 1972, pp. 4-5.

(6) S.M. Jaffar, The Mughal Empire from Babar to Aurangzeb, Ess Ess Publications, Delhi, 1936, reprint, 1974, p. 373.

(7) Manucci, Nicolao, Storia Do Mogor or Mughal India, Vol,II, tr. William Irwine, S. Dey Editions, Calcutta, 1966, p. 32.

(8) Jadunath Sarkar, Studies in Aurangzeb's Reign. Oriental Longman Ltd, Calcutta, 1989, pp. 27-28.

(9) Ibid, Nicolao Manucci, p. 269-270.

(10) Sarkar, Studies in Mughal India, p. 76.
(11) Ibid, Maasir-i-Alamgiri, p. 534.,
(12) Bernier, Francois, Travels in the Mogul Empire 1656-1668, tr. A. Constable, Asian Education Services, New Delhi, 2004, p. 154-161.
(13) Ishwardas Nagar, Futuhat-I-Alamgiri, tr, (Tasneem Ahmad), Idarah-i-Adabiyat-i-Dilli, Delhi, 1978, p. 223.
(14) Bernier, Francois, Travels in the Mughal Empire, Op.cit, pp.144-145.
(15) Bilimoria, Jamshid, H, Ruqa'at-i-Alamgiri, or Letters of Aurangzeb, Idarah-i-Adabiyat-I Dilli, New Delhi, 1972, p. 13.
(16) Ibid, p. 27.
(17) Ibid, p. 31-32.
(18) Ibid, p. 44.
(19) Ibid, Bernier, Francois, p. 292.
(20) Khan, Ali Muhammad, Mirat-i-Muhammadi, Vol.-I, Baptist Mission Press, Calcutta, 1927, p. 377- 378.
(21) Ibid. p. 309.
(22) Ibid, p. 272.
(23) Ibid, p. 363.
(24) Law, N.N, Promotion of Learning in India, Idarah-i-Adabiyat-Delli, Delhi, 1973, p. 189.
(25) Ibid, p. 190.
(26) Jaffar, S.M, Education in Muslim India, IAD, Delhi, 1972, p. 102.
(27) Ibid, Maasir-i-Alamgiri, p. 534.
(28) Ibid, p. 535.
(29) Ibid, p. 536.
(30) Ibid, p. 537.
(31) Ibid, p. 538.
(32) Ibid, p. 539.
(33) Ibid, p. 540.

❍❍❍

"Slavery is a system of the most complete injustice."

- Plato

"All wealth in the product of labour."

- John Lock

गोषवारा

१

# संत एकनाथांच्या जीवनातील गुरूंचे स्थान व त्यांनी केलेला गुरूंचा गौरव

**श्री. कृष्णा बबनराव काळे**

संशोधक विद्यार्थी

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

महाराष्ट्राला जशी संतपरंपरा लाभलेली आहे तसेच या संतपरंपरेलासुद्धा एक गुरूपरंपरा लाभलेली आहे. संत ज्ञानेश्वरमाऊली पासून ते जगद्‌गुरू तुकोबारायां-पर्यंत गुरूपरंपरेने महाराष्ट्रातील संत मंडळीला अतिशय मोलाचे असे मार्गदर्शनच नाही तर जीवनच घडविलेले आहे. म्हणूनच की काय ज्ञानेश्वर माऊली आपल्या हरिपाठातील गुरूपरंपरेला अभंगात म्हणतात की, **"श्रीगुरूसारिखा असता पाठीराखा इतरांचा लेखा कोण करी"** श्रीगुरू आपल्या पाठीमागे ठामपणे उभा असेल तर आपण कोणतेही आव्हान सहजपणे स्वीकारून ते समर्थपणे पार पाडू शकतो. प्रत्येक संताला आपल्या गुरूचे योग्य वेळी असे मार्गदर्शन मिळाले म्हणून ते समाजउद्धाराचे कार्य समर्थपणे करू शकले. गुरूचे अनन्यसाधारण असे महत्त्व संतांनी आपल्या साहित्यातून विशद केलेले आपल्याला दिसते.

प्राथमिक शिक्षण एकनाथांनी आपल्या घरी शिकविण्यासाठी येणाऱ्या शिक्षकांकडून पूर्ण केल्यावर वयाच्या बाराव्या वर्षी एकनाथांनी घर सोडले होते आणि गुरूगृही आले होते. जनार्दन स्वामींनी एकनाथांची जास्त चौकशी न करता त्याला आपले शिष्य बनवून घेतले. संत एकनाथांची अध्यात्माची जिज्ञासा तीव्र


UGC Care Listed Journal : ISSN : 0976 - 5425

ज्ञान मिळविण्याची इच्छा, ज्ञान, ऐश्वर्यसंपन्न जनार्दन स्वामी हे होय. एकनाथांच्या गुरूभक्तीने स्वामी प्रसन्न होते. त्यांनी एकनाथाला तलवार चालविण्याचे व अध्यात्माचे शिक्षण दिले होते. यामध्ये ज्ञानेश्वरी व अमृतानुभव या ग्रंथाचे ज्ञान दिले. त्यांनी एकनाथाला नुसते विचारच नाही तर आचारही दिले. त्यांच्या जीवनाला ध्येय दिले. अनुभव मिळविण्याची त्यांना संधी मिळवुन दिली. त्यांना सामाजिक समाजव्यवस्थेची झालेली अवस्था पाहून निरीक्षण करून ती सुधारण्याच्या दृष्टिकोनातून तीर्थयात्रा करायला सांगितली.

जीवनाच्या महत्त्वाच्या वेळी योग्य मार्गदर्शन करून त्यांच्या जीवनाला दिशा देण्याचे कार्य जनार्दन स्वामींनी केले होते. नाथांनी गृहस्थाश्रम स्वीकारून गृहस्थधर्मांचे महत्त्व वाढविले तसेच नाथांच्या पहिल्या प्रवचनास हजर राहून जनार्दन स्वामींनी त्यांच्या कार्यास प्रोत्साहन दिले. तीर्थयात्रे दरम्यान साधूसंगतीत चतुश्लोक भागवतावर प्राकृतात विवरण करण्याची संधी निर्माण करण्याची संधी देऊन लेखनकार्याचा श्रीगणेशा केला होता. थोडक्यात नाथांच्या जडणघडणीत जनार्दन स्वामींचा सिंहाचा वाटा होता. बालपणात बुद्धी आणि शक्ती संगम घालून स्वयंशिस्त तसेच जबाबदारी पूर्णत्व त्यांच्या अंगी भिनवली होती.

गुरूकृपेची जाणीव नाथ महाराजांनी जीवनभर क्षणोक्षणी ठेवलेली आपल्याला दिसते. गुरूचा गौरव करताना त्यांची महती गाताना त्यांच्या ग्रंथात पदोपदी जाणवते. श्रीदत्त संप्रदायातील एक महान दत्तभक्त व आचार्य म्हणजे जनार्दन स्वामी होत तसेच ते संत एकनाथ महाराजांचे गुरू होते. सद्‌गुरू, श्रीगुरूचे स्थान नाथ महाराजांच्या जीवनात सर्वोच्च होते. त्यांच्या गुरूभक्तीने धन्य झाले होते. गुरू-शिष्य परंपरेचे सर्वोत्कृष्ट उदाहरण म्हणजे एका जनार्दनी होय. ते गुरूशी इतके एकरूप झाले होते की त्यांनी आयुष्यभर गुरूंचे ध्यान केले.

संत एकनाथ महाराजांच्या जीवनातील त्यांचे सद्‌गुरू श्री जनार्दन स्वामी यांचे स्थान हे आपल्याला सर्वोच्च आहे हे समजले तसेच संत एकनाथ महाराजांचे जीवन घडविण्यात स्वामींचा अनमोल असा वाटा आहे तसेच एकनाथ महाराजांनी आपल्या गुरूविषयीची कृतज्ञता आपल्या ग्रंथसाहित्यातून वेळोवेळी केलेली आहे. त्यांच्या मनामध्ये सद्‌गुरूंविषयीचा उच्च कोटी आदर आपल्याला दिसून येतो. शिष्याचा नूतन जन्म, त्यांचे नवीन जीवन हे पूर्णतेतूनच उदय पावले पाहिजे. नाथांनी म्हटले आहे की, गुरू माय-बाप संपूर्ण ! गुरूचा गौरव त्यांच्या सर्वतंत्र-स्वतंत्रतेचा द्योतक आहे. नाथांनी वर्णिलेली दीक्षाजन्माची कथा दृष्टीपुढे ठेवली तर गुरूगौरवाचे गूढ नकळतच उकलत गेले. मरणावर मात करून पाहणारी मानवाची अमृत आकांक्षाच दिव्य जन्माच्या संभवधारणेतून प्रकटली आहे आणि हा दिव्य जन्म ज्या दीक्षा विधीतून लाभतो ती दीक्षा देणारा गुरू आगळ्या वेगळ्या नवजाताच्या जीवनात असाधारण स्वरूपाचे स्थान पावला आहे. हा बोध करतळीवरील आवळ्याप्रमाणे आपल्या हाती आला आहे. गुरूपरंपरेने मानवाला एक वेगळे सुख-समाधान दिले.

❍❍❍

"या आयुष्यातील आपले मुख्य ध्येय
इतरांना मदत करणे हे आहे
ते तुम्हाला शक्य नसेल तर
निदान इतरांना आपल्याकडून
त्रास होणार नाही हे पाहिले पाहिजे."

- दलाई लामा

# आधुनिक विभाग

1

# Women's Participation in Freedom Movement in Solapur

**Dr. Dhanaji Baburao Masal**
Chhatrapati Shivaji College, Satara

Solapur was not remained political and commercial city during the British period. But it gave its contribution to the freedom movement of India. After 1920, Gandhi era started in Indian politics and the political atmosphere of Solapur became surcharged with the Gandhian spirit. After the declaration of Gandhiji's 'Salt Satyagraha Movement,' in 1930, Solapur came to be prominently marked on the political map of India. On the arrest of national leaders of the Congress in the month of May 1930, the people of Solapur started Satyagraha. On 9th of May section 144A was clamped on the city. Knight went on leave and saw Hotson, the home member at Bombay. Mallappa Dhanshetty, Kurban Hussain, Jagannath Shinde and Kisan Sarada were sentenced to death on 12th January 1931[1] and other citizens imprisoned as they protested against the tyrannical administration of British. This incident particularly awakened the people of Solapur.

Solapur was never a political capital of any medieval power. Solapur of course could not escape the nation-wide awakening brought about by the establishment of the Indian National Congress in 1885. During the period (1870-1885) many socio-political organisations were established in Solapur and because of their work there was an awakening about British domination in people of the city. Towards the close of the 19th century, Ranade and Tilak represented two lines of thinking over political issues in Maharashtra and Ranade's role in that

field was subsequently taken over by Gokhale in Solapur. Balwant Shankar Limaye made a revolutionary attempt in 1908 and collected some weapons but the police arrested him. Vasudev Balwant Gogte, who fired on Hotson at Pune, was the son of Solapur City. After these incidents right up to 1920, the English educated people of Solapur adopted a middle of the road policy. In 1920 a session of the Bombay Provincial Congress was held at Solapur with N.C. Kelkar and Sawant a local leader, acting as the chairman of the reception committee.[2] From 1920 the mill labour began to be organised and occasionally went on strike, the early leadership for which was provided by the communist leaders in the country. In Solapur the first strike took place in 1920, under the leadership of Bhimarao, and is known as *'Bhimravacha Samp.'* So to break the strike military was called and in the subsequent firing seven workers died. But even before it in 1908 the workers of city had kept up Hartal on the arrest of the Tilak by the government.[3] After 1920 communal riots began to erupt periodically, when Khan Bahadur Imamsaheb led the Muslims and Khadakikar, Gulabchand and Rajwade the Hindus.[4] After 1920, Gandhi era started in Indian politics and the political atmosphere of Solapur became surcharged with the Gandhian spirit. But after the declaration of Gandhiji's 'Salt Satyagraha Movement,' in 1930, Solapur came to be prominently marked on the political map of India. On the arrest of national leaders of the Congress in the month of May 1930, the people of Solapur started Satyagraha. When a few cases of violence took place, police arrested nine of the participants. For the demand of their release people came on the roads. The collector of Solapur Mr. Knight refused their release, but on the contrary, fired on desperate people. Mallappa Dhanshetty tried to mediate between the police and the people. But in this firing Shankar Shivadare died, becoming the first martyr of Solapur. Thereafter people became intensely aggressive.

In retaliation they uprooted telegraph posts, broke open the government compound gate, attacked the police, killing one police named Ala-Ud-din, court building was set on fire and the European people took shelter in the railway station compound for considerations of personal safety. For three days, i.e., on $9^{th}$, $10^{th}$ and $11^{th}$ of May, Jajuji as the Congress leader provided volunteers to watch the city at night as the police ran away. On $9^{th}$ of May section 144A was clamped on the city. Knight went on leave and saw Hotson, the home member at Bombay. On $11^{th}$ May, the Sikh regiment was called and ordered to fire at the unarmed crowd, but the regiment refused to do so. The enraged officers rushed to take stern action and Khan Bahadur Imamsaheb, a retired police officer exploited the situation, recalling the communal scuffle of 1927, in which the Hindus had an upper hand. Politics more than violence and local party squabbles more than politics led to the clamping of martial law in Solapur on $12^{th}$ May. The military arrived on the scene and took charge of the town. Colonel Page was in charge. The military arrested all the suspects and placed them before the military tribunal. No defense could be offered. Wearing of the Gandhi cap and flying the national flag on private or public buildings were regarded as crime and passerby were ordered to take off their Gandhi caps.[5] Mallappa Dhanshetty, Kurban Hussain, Jagannath Shinde and Kisan Sarada were sentenced to death on $12^{th}$ January 1931[6] and other citizens imprisoned as they protested against the tyrannical administration of British. This incident particularly awakened the people of Solapur. The 'Quit India Movement' saw increased participation of the people. The students, workers and the masses devoted themselves to the freedom movement. There were five bomb explosions in the city, but no one was injured.[7] Thus, Solapur City made its contribution to the freedom of India.

**SCHOOL FOR NATIONAL EDUCATION FOR GIRLS :**

In 1905, National Education in schools spread mainly in Bengal, Maharashtra and few other provinces but in 1921, the movement of national education spread to all provinces of the country. During this period in Maharashtra more than fifty National schools were established in each district and taluka place which were organised by the Tilak Maharashtra Vidyapeeth. The people of Solapur were influenced by Tilak for National Education and on Gandhiji's call many students left the Government schools and colleges. Hence the political leaders of Solapur felt the need of a national school which opened on 9th April 1921 at Solapur with 150 students on its roll in that year Gulabchand Hirachand was founder teacher of this school. One such school for girls was started at Gunjoti near Solapur under the leadership of Smt. Rajulmati Shah.[8] During this movement Gandhiji visited Solapur on 28th May 1921 and asked for subscription towards Tilak Swaraj Fund, which he received on his next visit to Solapur District in June 1921. It was an amount of Rs.27,565.[9]

**QUIT INDIA MOVEMENT WOMEN PARTICIPATION :**

During the Quit India movement top ranking leaders were arrested. In Solapur also local leaders like Dr.Antrolikar, Ramkrishna Jaju, Tulsidas Jadhav etc were arrested. To protest against this the students, youths and mill workers came together and took out a procession. All the boys from the schools and colleges in Solapur came out quietly and observed Hartal.[10] On 9th September 1942, the students of Dayanand Anglo Vedic College came together in the college as usual, but did not attend their classes. They just sang '*Vande Mataram*' and returned home.[11] Revansiddh Kharade and Umbraje lent financial help to the agitators. With this they got material for making bombs. Gangadhar Habbu, Krishnakant Kolhapure, Baburao Chavan etc. came together and made near about 50 bombs which were used to blast the Police gate, Government buildings, schools and colleges etc. but, when trying to blast the New High school a student

Datta Yelegaonkar was injured. The police arrested him and in police remand he told the names of other revolutionaries who were arrested and released due to lack of evidence. The Quit India Movement and address of Pandit Madan Mohan Malaviya influenced the students, among whom Shivling Dudhani and V.G. Shivdare wrote a letter to Gandhiji asking permission for their participation in '*Vaiktik Satyagraha*', which was refused because of their young age. They attended the meetings of Gandhiji at Govalia tank, Bombay on 8$^{th}$ August 1942. In this movement the women of the city participated on a large scale. Among those women Dwaraka Deshpande, Sumatibai Shah, Janabai Jadhav, Kalawati Bhosale etc were on the lead. All of them were closely associated with the educational development of Solapur city. The students from Sumatibai's hostel and school Rajamati Patil participated in the national movement openly and courted arrest and sent to Yerwada jail .She later became a famous freedom fighter in '*Patri sarakar*' of Satara.

In Solapur the work of printing and distribution of bulletins was carried out by Ranganna Vaidya and P.J. Buva with the help of several students. Among them V.G. Shivdare and Shivling Dudhani were on the lead. In Navi Peth of Solapur Adv. Pakhanikar conducted a class for the students of the Dayanand Anglo Vedic College. These students participated in the distribution of the bulletins. In this work Kalekar, Gopikisan Dayama, Mrs. Tara Belsare (Phatak), Smt. Sumatibai Shah too participated. V.G.Shivdare and Shivling Dudhani got six and nine months imprisonment receptively.[12] A novel feature of this was the participation of school going students of the city.

**CONCLUSIONS :**

Through this study it is clear that the women of Solapur city participated in the freedom movement of India and gave their contribution. Major conclusions are as under:

1) The participation of women in the freedom movement of India in initial stage (moderate and extremists) was very little. But during Gandhian era women were participated in the Indian Freedom Movement in Solapur City.

2) In the Movement of National Education movement women of Solapur started a school for national education for girls and supported to the freedom movement as like men.

3) During Gandhian era due to the policy adopted by Gandhiji women participated in the movement on the large scale.

4) In Solapur during the non cooperation movement and civil disobedience movement women gave their contribution.

5) In Solapur women participated on a large scale and worked as a revolutionary also.

6) The women of Solapur gave their contribution not only in Solapur but also revolutionary in the activities of Satara Prati Sarakar. Rajamati Patil had played leading role in the game of Solapur.

**References :**


(1) Bombay Archives, Home Department, (Hereafter referred as BAHD), (spl), 750 (14), B-I, 1930, p. 41.

(2) Govt. of Maharashtra, Maharashtra State Gazettes, Solapur District, Govt. Printing Press, Bombay, 1977, p. 94-95, 99, 100.

(3) Daily Lokmat, 23rd December, 1999, p. 7.

(4) Ibid, Govt. of Maharashtra, p. 100.

(5) Yewale S.B., Solapur Jilhyatil Swatantryaladha, August Kranti Suwarn Mahotsav Samiti, Mumbai, publication not given, p. 25-29.

(6) Ibid, Bombay Archives, p. 41.

(7) Ibid, Yewale S.B., p. 42-43.

(8) Shah Sumatibai, Mazi Jeevan Gatha, Shravika Sanstha Nagar, Solapur, 1989, p. 12-13.

(9) Jangam J.A., Freedom Movement in Solapur District, Unpublished Ph.D. Thesis submitted to the Shivaji University, Kolhapur, 1995, p.91.

(10) Daily Solapur Samachar, 11th August, 1942.

(11) Desai Sanjay, Quit India, Bombay, 1985, p. 52.

(12) Ibid, Yewale S.B., p. 41-52.


❍❍❍

(२)

# १९ व्या शतकातील सामाजिक सुधारणा चळवळी : विशेष संदर्भ 'सत्यशोधक समाज'

**श्रीमती सीमा सूर्यभान जाधव**
संशोधक विद्यार्थी
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

१९ व्या शतकाच्या पूर्वार्धात म्हणजेच इ. स. १८२७ साली क्रांतीची ज्योत मशालीत परावर्तित ठेवणारे महात्मा जोतिराव फुले यांचा जन्म झाला. तत्कालीन वैदिकवाद्यांच्या मानवा मानवांतील भेदाभेद, रूढी, अनिष्ट परंपरा, थोतांडवादी ईश्वरी आश्वासने यांनी समाज ग्रासलेला होता. वैदिक लोक यज्ञ व कर्म करण्याच्या माध्यमातून ब्राह्मणेतरांचा छळ करीत असत. स्वर्ग-नरकांची भीती घालून त्यांना गुलामगिरीत लोटत असत. ईश्वर आणि आत्म्याचा बागुलबुवा उभा करून (ईश्वरनिर्मित भासवून) चातुर्वर्ण्याच्या नावाखाली ब्राह्मण व ब्राह्मणेतर असा वर्णभेद निर्माण करून अनेकविध प्रकारे कुचंबना, अन्याय, अत्याचार करीत असत.

महात्मा फुले यांनी मानवता, समता, बंधुता या मूलभूत तत्त्वावर आधारित सार्वजनिक आधुनिक महाराष्ट्रातील शेतकरी आणि बहुजन समाजाला केंद्रस्थानी ठेवून पुरोगामी विचारांची मांडणी केली. स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवणारे आणि समाजातील असीम त्याग करणारे प्रज्वल व प्रतिभावान व्यक्तिमत्त्व म्हणजे महात्मा फुले ओळखले जातात. त्यांनी सत्यधर्माची कल्पना मांडली. सर्व विश्व हेच मोठे कुटुंब असून त्यातील सर्व मानव जाती एकाच परमेश्वराची लेकरे आहेत हे त्यांनी स्पष्ट केले. सर्व सृष्टीचा निर्माता हा एक असून तो सर्वांचाच असतो. त्यांच्या ठिकाणी धर्म, जात, वंश, श्रेष्ठ-कनिष्ठ असा भेदाभेद असत नाही. मानवता हेच अंतिम खरे सत्य आहे. त्यांच्या धर्मविषयक विचारांची प्रेरणा घेऊनच आजचा पुरोगामी व प्रगत महाराष्ट्र आपल्या डोळ्यांसमोर उभा आहे.

प्राचीन काळापासून व्यक्तीचा दर्जा, हक्क, कर्तव्य, आचार जातीवरून ठरत असे. जातीबहिष्कृत व्यक्तीला समाजात स्थान नव्हते. अधिकार भेद, उच्च-नीच भाव, परंपरागत व्यवसायांवर जाती संस्थेची निर्मिती झाली होती. ईश्वरी सत्तेने पूर्वक्रमानुसार आपण ज्या जातीत जन्मलो तिच्यावर धर्मसंस्थेने घातलेले निर्बंध आपण निमूटपणे पाळले पाहिजेत, कमी प्रतीची किंवा कष्टाची असली तरी ती विहित कर्मे मनोमन या भावनेने पार पाडली पाहिजे यातच व्यक्तीचे कल्याण आहे, अशी समाजाची धारणा होती. महात्मा फुले यांचे कार्य समाज क्रांतिकारकाचे होते. सत्यशोधक चळवळीने महात्मा फुले यांच्या प्रेरणेतून जनसामान्यांच्या उत्थानाचा अभूतपूर्व लढा उभारला. शेतकरी, कष्टकरी, कामगार, बहुजन दलित वर्गापासून डोंगर कपारीतील महादेव कोळ्यापर्यंत सामान्य जनसमुदायाचे उत्स्फूर्तपणे चालविलेली व शहरापासून खेड्यापर्यंत पोहोचलेली सत्यशोधक चळवळ ही आधुनिक भारतातील पहिली परिवर्तनवादी लोकचळवळ होती.

**सत्यशोधक समाजाच्या स्थापनेची पार्श्वभूमी :**

महात्मा फुले यांनी इ. स. १८४८ पासून आपल्या सार्वजनिक कार्याला सुरूवात केलेली होती तसेच त्यांनी आपले विचार जाहीर सभेतून आणि पत्रके काढून प्रसिद्ध करण्यास सुरूवात केली होती. महात्मा फुले यांनी मुख्यतः शिक्षण, जातिव्यवस्था व शेतकऱ्यांच्या समस्या यांकडे आपले लक्ष केंद्रित केलेले होते. महात्मा फुले ब्राह्मणाच्या वर्चस्वातून कनिष्ठ वर्गाची मुक्तता करण्यासाठी खऱ्या अर्थाने प्रेरित झालेले होते. शेकडो वर्षांपासून ब्राह्मण कनिष्ठ वर्गावर आपले अधिकार गाजवीत होते. मानव आणि ईश्वर यांच्यामध्ये भट, दलाल मध्यस्थ होता. या दलालांनी धर्माच्या नावावर अत्याचार सुरू केला होता. आपमतलबी ग्रंथाची निर्मिती यांनी आपला उदरनिर्वाह होण्यासाठी केलेली होती. या दलालाने हिंदू लोकांभोवती चातुर्वर्णाचा व जातिभेदाचा कोट रचलेला होता. पंढरीनाथ सीताराम पाटील लिहितात की, "भिक्षुकी गुलामगिरीच्या पाशात जनतेचे जीवन केवळ दडपून गेले असून स्वातंत्र्याच्या विश्वव्यापी मोकळ्या मैदानात विहार करण्यासाठी त्यांचा आत्मा सारखा तडफडत असे पण विद्येच्या अभावी तिला मार्ग दिसत नव्हता.

तेव्हा आपणांस जर जनताजनार्दनाची सेवा करावयाची असेल तर लोकांत याहीपेक्षा झपाट्याने विद्या प्रसार करून जातिभेदाच्या कोटाला सुरूंग लावून भिक्षुकशाहीशी आता सामोरे गेले पाहिजे. भिक्षुकशाहीचा रंग कमी झाल्याशिवाय आपण केलेल्या सुधारणा वाढीस लागणे शक्य नाही, अशी महात्मा फुले यांची खात्री झालेली होती व त्या मार्गाला लावण्याचा त्यांनी निश्चय केला. भिक्षुकशाहीच्या वर्मावर घाव घालून तिच्याशी लढणे हे एकट्याचे काम नाही, असे महात्मा फुले यांना वाटत होते. तेव्हा या कार्याकरिता सुशिक्षित ब्राह्मणेतरांची एक सामुदायिक स्वरूपाची संस्था स्थापन करून तिच्यामार्फत चळवळ चालू करावी, असे महात्मा फुले यांना वाटत होते."[१]

**सत्यशोधक समाजाची स्थापना :**

अनेक प्रकारच्या कुप्रथांना मूठमाती देऊन महात्मा जोतिराव फुले समाजासाठी सारखे लढत राहिले. आता हा विचारप्रवाह सतत पुढे सुरू ठेवायचा असेल तर लोकांच्या एकत्रीकरणाची मोट बांधण्याची गरज त्यांना वाटत होती. त्या वेळी त्यांच्याही लक्षात आले होते की, मनुष्याला निर्मिकाकडे पोहोचविणारा धर्म हा एक मार्ग आहे. मनुष्याची निर्मिकावर व धर्मावर निसर्गतः निष्ठा आहे. मनुष्याचा आत्मा हा ईश्वराचे एक रूप असून, नीती आणि सदाचाराने तो निर्मिक बनू शकतो. यात एक मोठी अडचण उभी राहात होती. ती म्हणजे भट लोक होय. या भटांनी पोथी-पुराणांची, मूर्तिपूजा, तीर्थयात्रा आदी अवडंबराची अडचण टाकून सामान्यांचे शोषण चालविले आहे. भिक्षुकी गुलामगिरीच्या पाशात येथील जनतेचे जीवन दडपून गेले आहे. शिक्षणाच्या अभावामुळे व योग्य मार्गदर्शन नसल्यामुळे येथील जनतेने त्यांची गुलामी पत्करली आहे. या गुलामीच्या जोखडातून जनतेची सुटका करण्यासाठी आपण एकटे येथे टिकणार नाही म्हणून याकरिता थोडेफार ब्राह्मणेतर तरूण जे नुकतेच शाळा शिकून बाहेर पडले होते. त्यांचा उपयोग घेऊन आपले कार्य तडीस नेण्यासाठी त्यांना एक पत्र लिहिले आणि एक बैठक बोलाविली. दि. २४ सप्टेंबर १८७३ रोजी जुनागंज घर नंबर ५२७ पुणे येथे महात्मा फुले यांच्या अध्यक्षतेखाली

'सत्यशोधक समाजा'ची स्थापना करण्यात आली.[२] या बैठकीत ५० ते ६० लोक उपस्थित होते. देवाच्या आणि धर्माच्या नावाखाली कनिष्ठ वर्गावर ब्राह्मणांनी आपले वर्चस्व निर्माण केले होते. त्याला शह देण्यासाठी आणि त्यातून अज्ञानी लोकांना धर्मातील अनिष्ट प्रथा, अंधश्रद्धा, जातिव्यवस्था यातून बाहेर काढण्यासाठी सत्यशोधक समाजाची स्थापना करण्यात आलेली होती. डॉ. नीळकंठ बोराडे लिहितात की, "महात्मा फुलेंनी अशा समाजाची कल्पना केली जो समाज सत्य शोधणारा असेल. सत्य शोधणारा समाज, त्यातील व्यक्ती समाजातील सर्व प्रश्न व त्याला मिळणारी उत्तरे ही सामाजिक न्याय आणि तत्त्वावर अधिष्ठित राहतील याबद्दल आग्रह धरतील. त्यामुळे समंजस, विवेकी समाजाची बांधणी होऊन निकोप समाज आकारास येईल. अगोदर समाजाची नीट बांधणी झाली की पुढचे बरेच प्रश्न सुटतील याची महात्मा फुले यांना खात्री होती."[३]

सत्य वर्तन केल्याशिवाय मानवप्राणी सुखी होणार नाही, असे महात्मा फुले यांचे म्हणणे होते. याविषयी प्रमाण देताना महात्मा फुले लिहितात की...,

**"सत्य सर्वांचे आदि घर । सर्व धर्माचे माहेर ।। धृ।।**
**जगा माजी सुख सारे । खास सत्याची ती पोर ।। १।।**
**सत्य सुखाचा आधार । बाकी सर्व अंधःकार ।।**
**आहे सत्याचा वा जोर । काढी भंडाचा तो नीर ।। २।।**
**सत्य आहे ज्याचे मूळ । करी धूर्ताची वा राळ ।।**
**बळ सत्याचे पाहुनी । बहुरूपे जळे मनी ।। ३।।**
**खरे सुख नटा नोव्हे । सत्या ईशा वर्ज्य पाहे ।।**
**जोती प्रार्थी सर्व लोका । व्यर्थ उभा पेटू नका" ।। ४।।**[४]

महात्मा फुले यांचे वरील उद्‌गार किती यथार्थ आहेत. व्यक्तीने किंवा समाजाने सत्याचीच कास धरून वाटचाल केल्याशिवाय व्यक्ती किंवा समाज कदापीही सुखी होणार नाही हे अचूक ओळखून महात्मा फुले यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केलेली होती.

**सत्यशोधक समाजाची तत्त्वे :**

(१) ईश्वर एकच असून तो निर्गुण, निराकार आहे.

(२) सर्व मानव एकाच परमेश्वराची लेकरे आहेत.

(३) परमेश्वराची भक्ती करण्याचा प्रत्येक मानवाला अधिकार आहे.

(४) परमेश्वराची भक्ती करण्यास मध्यस्थाची गरज नाही. भट, पुरोहित त्यांच्या आधाराविना कोणत्याही व्यक्तीला परमेश्वराची प्रार्थना करता येते.

(५) माणसाला जातीने नव्हे गुणाने श्रेष्ठत्व येते.

(६) पुनर्जन्म, कर्मकांड, जप-तप इत्यादी गोष्टी अज्ञानमूलक आहेत आणि त्या कनिष्ठ वर्गाच्या पिळवणुकीचे कारण आहेत.

(७) कोणताही धर्मग्रंथ ईश्वरप्रणीत नाही, त्याची निर्मिती मानवानेच केली आहे.[५]

सत्यशोधक समाजाची चळवळ ही मूलतः धार्मिक व सामाजिक सुधारणांचा आग्रह धरणारी चळवळ होती. समाजाच्या नियमांनुसार सभासदांना राजकीय विषयाची चर्चा करता येत नसे. ब्रिटिश राजवटीबद्दल ही चळवळ एकनिष्ठ राहिलेली होती. कारण जुलमी भटशाहीच्या जुलुमातून शूद्रातिशूद्रांची इंग्रजांनी सुटका केली, असे प्रतिपादन महात्मा फुले करीत असत. सत्यशोधक समाजाचा रोष ब्राह्मणी वर्चस्वा-विरूद्ध असला तरी तो ब्राह्मणाविरूद्ध अथवा कोणत्या एका विशिष्ट जातीविरूद्ध नव्हता. सर्व जातीच्या लोकांना त्यामध्ये सहभागी होता येत असे. फुलेंच्या सत्यशोधक समाजाद्वारे उभारण्यात आलेला लढा हा सामाजिक, आर्थिक, राजकीय गुलामगिरी व वर्चस्वाविरूद्ध लढा होता. सत्यशोधक समाजाचे ध्येय कनिष्ठ वर्ग तसेच शेतकरी आणि कामगार यांच्या उद्धाराचे असल्यामुळे त्यांचे ते विचार आणि कार्य ही याच वर्गांच्या प्रश्नांशी निगडित असे.[६]

**सत्यशोधक समाजाची उद्दिष्टे नि ध्येय :**

सर्व माणसे परमेश्वराचीच लेकरे असल्यामुळे ती समान आहेत. म्हणूनच सर्वांना धार्मिक, सामाजिक, आर्थिक अधिकार समान असले पाहिजेत, असे महात्मा फुले यांनी स्पष्ट केले. कनिष्ठ वर्गावरील अन्यायाचे निर्मूलन, शोषक वर्गाच्या शोषणापासून श्रमिकांची मुक्तता आणि जाति-धर्मनिरपेक्ष भावनिक एकात्मतेवर

आधारलेल्या निकोप सामाजिक जीवनाची उभारणी सत्यशोधक समाज स्थापण्यामागची ही विविध उद्दिष्टे महात्मा फुलेंची होती. "शूद्र आणि अतिशूद्र यांची ब्राह्मण पुरोहितांकडून होणारी पिळवणूक बंद करणे, त्यांना त्यांच्या मानवी हक्कांची आणि अधिकारांची शिकवणूक देणे तसेच ब्राह्मणी शास्त्राच्या मानसिक आणि धार्मिक गुलामगिरीतून मुक्त करणे."[७] ही सत्यशोधक समाजाची ध्येये होती तसेच ही ध्येये समजावून घ्यावयाची असतील तर तत्कालीन समाजाचे सरचिटणीस नारायण तुकाराम नगरकर यांनी प्रसिद्ध केलेल्या दि. २४-०९-१८७३ ते दि. २४-०९-१८७५ या दोन वर्षाचे अहवाल बघावे लागतील. यावरून खालील उद्देश व ध्येय सांगता येतील.

(१) ब्राह्मण, भट, जोशी, उपाध्ये इत्यादींच्या दास्यत्वातून शूद्रांना मुक्त करणे.

(२) ब्राह्मण, भट, जोशी, उपाध्ये यांनी आपल्या मतलबी ग्रंथांच्या आधारे हजारो वर्षांपासून चालविलेली लूट थांबविणे.

(३) सदुपदेश व विद्येद्वारे शूद्रांना त्यांचे अधिकार समजून देणे.

(४) धर्म आणि व्यवहारासंबंधी ब्राह्मणांच्या बनावट व कार्यसाधक ग्रंथापासून त्यांची मुक्तता करणे.

या समाजाच्या कार्यामुळे स्वार्थनिरपेक्ष कार्यकर्त्यांची नवीन पिढी उदयास आली. या समाजाविषयी धनंजय कीर म्हणतात, "आधुनिक भारतामध्ये सामाजिक पुनर्घटनेसाठी चळवळ सुरू करणारी पहिली संस्था म्हणजे 'सत्यशोधक समाज' होय. सत्यशोधक समाजाने सामाजिक गुलामगिरीविरूद्ध आवाज उठविला आणि सामाजिक न्यायाची व सामाजिक पुनर्रचनेची मागणी केली."[८]

शास्त्री महाधठ यांनी सत्यशोधक समाजाचा उद्देश पुढील कवितेतून सांगितला आहे. आज तत्त्वार्थ व मूलार्थ हा उद्देश महत्त्वाचा असून सर्वांनी हा उद्देश मानून पुढे जावे, अशी शास्त्री महाधठ यांची विनंती होती.

**सत्यशोधक समाज । सत्यधर्म तो असे ।।**
**विश्व मानव समान । एक तत्त्व तिथे वसे ।।**
**मानभाऊ नसेल तो । म्लेशचाही नसे ।।**
**सहज धर्म सर्वांचा । सार्वत्रिकत्व तो असे ।।**[९]

धार्मिक आणि सामाजिक गुलामगिरी समूळ नष्ट करणे हे सत्यशोधक समाजाचे मुख्य उद्दिष्ट होते.

महात्मा फुले यांचा 'सत्यशोधक समाज' म्हणजेच "जो समाज सत्य, शोधणारा समाज आणि त्यातील व्यक्ती समाजातील सर्व प्रश्न व त्याला मिळणारी उत्तरे ही सामाजिक न्याय व सत्यावर अधिष्ठित राहतील. त्यामुळे समंजस व विवेकी समाजाची बांधणी झाली की पुढचे बरेच प्रश्न सुटतील" यांची त्यांना खात्री होती. महात्मा फुले यांनी मांडलेल्या सत्य शोधणाऱ्या समाजाची त्या काळी जशी गरज होती तशी आजही आहे. सत्यशोधक चळवळ समाजातील कोणत्याही एका विशिष्ट वर्गाविरूद्ध नव्हती. बहुजन समाजात जागृती घडवून आणणे हे तिचे प्रमुख उद्दिष्ट होते. या समाजाच्या अनेक शाखा निघाल्या. त्याशिवाय लग्न लावण्यासाठी मंगलाष्टके मराठीत रचली गेली. सत्यशोधक समाजाद्वारे उभारण्यात आलेला लढा हा सामाजिक, आर्थिक, राजकीय व सांस्कृतिक गुलामगिरीविरूद्धचा होता. या समाजाच्या कार्यामुळे स्वार्थ-निरपेक्ष कार्यकर्त्यांची नवीन पिढी उदयास आली. महात्मा फुले यांच्या 'सत्यशोधक समाजाची' कल्पना शतपटीने तर्कशुद्ध व वस्तुस्थितीला धरून, ज्ञान व विज्ञानाचा मार्ग दाखविणारी होती.

**संदर्भ :**


(१) अंबाडे किसन मारूती, फुले आणि त्यांच्या सत्यशोधक चळवळीचा चिकित्सक अभ्यास, अप्रकाशित शोध प्रबंध, पुणे विद्यापीठ, १९९८, पृ. ५७.

(२) उपरोक्त, पृ. ५८.

(३) बोराडे नीळकंठ, ज्योतिराव फुले यांचा सुधारणावाद, सुगावा प्रकाशन, पुणे, १९९४, पृ. १६.

(४) फडके य. दि., महात्मा फुले समग्र वाङ्मय, म.रा. साहित्य संस्कृती मंडळ, १९९१, पृ. ४३९.

(५) सिरसाट मनोहर, सदाफुले शरद, कुंड शाम, वादे बाबू, फुले आंबेडकरी चळवळ विचार आणि भूमिका, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, २०११, पृ. १३२-१३३.

(६) कीर धनंजय, महात्मा ज्योतिराव फुले, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, २०२२, पृ. १७६.

(७) कीर धनंजय,महात्मा फुले आमच्या समाजक्रांतीचे जनक,पॉप्युलर प्रका.,मुंबई,१९९०,पृ.१४५.

(८) कीर धनंजय, महात्मा ज्योतिबा फुले, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९६८, पृ. १४९.

(९) पुरोगामी सत्यशोधक एप्रिल, मे, जून १९९२, पृ. ७५.

३

# जातिव्यवस्था आणि स्त्रीमुक्ती

✲

**डॉ. विठ्ठल व्यंकटराव घुले**
राजर्षि शाहू महाविद्यालय, परभणी

प्राचीन काळातील ब्राह्मणी व्यवस्थेने स्त्रियांचे सर्व हक्क हिरावून घेतले, त्यांना गुलामगिरीत बंदिस्त केले. पुरूषसत्ताक व्यवस्थेने त्यांचे माणूसपण हिरावून घेतले, ही व्यवस्था १९ व्या शतकापर्यंत सुरू होती. १९ वे शतक हे भारतातील प्रबोधनाचे शतक, इंग्रजी शिक्षणपद्धती, ख्रिश्चन मिशनऱ्यांचे कार्य, इंग्रजांनी केलेले विविध कायदे इत्यादींच्या माध्यमातून भारतीयांमध्ये जागृती सुरू झाली. भारतातील नवसुशिक्षितांना आपल्या धर्मात, समाजव्यवस्थेत अनेक दोष दिसायला लागले. या दोषाचे निराकरण करण्यासाठी वर्तमानपत्रे चालवून, ग्रंथ लिहून, शाळा काढून, स्वतःच्या आचारा-विचारांतून हे प्रबोधनाचे कार्य सुरू झाले. या काळात अनेक समाजसुधारक उदयाला आले. त्यांनी स्त्रियांच्या गुलामीविषयी, शोषणाविरूद्ध वाईट रूढी, प्रथा, परंपरेविरूद्ध आवाज उठविला. समाजसुधारकाच्या या कार्यामुळे भारतात स्त्रियांच्या प्रश्नांवर चर्चा व्हायला लागल्या परंतु खऱ्या अर्थाने स्त्री मुक्तीच्या चळवळी, संघटितरीत्या कार्य करताना २० व्या शतकाच्या मध्यानंतरच दिसून येतात व त्यास खरा जोर चढला. तो युनोने १९७५ हे वर्ष जागतिक पातळीवर महिला वर्ष म्हणून सुरू केल्यानंतर.

**स्त्रीमुक्ती म्हणजे नेमके काय ? :**

स्त्रीमुक्ती म्हटले म्हणजे प्रथम पुरूषाच्या कपाळावर आठ्या पडतात. त्या पुरूषी विचारातून स्त्रीमुक्ती या विचाराकडे पाहावयाचा दृष्टिकोन हा पुरूष सत्तेच्या चष्म्याचा असल्यामुळे प्रथम यास बदनाम करण्याच्या संदर्भानेच चर्चा झाली. स्त्रीमुक्ती म्हणजे स्त्रियांनी पॅण्ट-शर्ट घालने, बॉयकट करणे, सिगारेट ओढणे, नवऱ्याला स्वयंपाक करायला लावणे, क्लबमध्ये जाणे अशी टोकाची प्रतिक्रिया आणि थोडक्यात

काय तर स्त्रीमुक्ती म्हणजे नवरे सोडून देणाऱ्या महिलांची चळवळ अशीच बदनामी केली गेली व त्यास खतपाणी हे चित्रपट, नाटके व स्त्रीविरोधी विनोदानी घातले. स्त्रीमुक्ती म्हणजे कुटुंब, धर्म, संस्कृती, शिक्षण, रोजगार अशा जीवनातील सर्वच क्षेत्रांत स्त्रीच्या दुय्यम स्थानाविरूद्ध लढा होय. स्त्री-पुरूष क्षेत्रात समानता समाजाच्या सर्व अंगांमध्ये प्रत्यक्षात येण्यासाठी चळवळ असे तिचे स्वरूप आहे. म्हणूनच स्त्रीमुक्तीचा विचार केवळ उच्च वर्गजातीय स्त्रियांसाठी नसून कष्टकरी शेतकरी, शेतमजूर, दलित, बहुजन अशा सर्वच स्त्रियांसाठी मुक्तिदायी विचार आहे. स्त्रीमुक्ती विचाराचे सर्वांत मोठे योगदान म्हणजे पुढील तीन सिद्धांतांची देण होय.

(१) जे जे खाजगी ते ते राजकीय सार्वजनिक असते.

(२) लैंगिक अन्यायास विरोध.

(३) पुरूष प्रधानतेस विरोध.[१]

प्रा. नूतन माळवी यांच्या मते ज्या समाजात स्त्री-पुरूष संबंधामध्ये पुरूष-प्रधानतेमुळे असंतुलन निर्माण झालेले असते. त्या समाजामध्ये ते असंतुलन दूर करून स्त्री-पुरूष संबंध समतेवर अधिष्ठित करण्याचे तत्त्वज्ञान म्हणजे स्त्रीवाद होय.[२]

जॅकी स्टेसीने (१९९३) आपल्या 'अनटॅगलीग फेमिनिस्ट थेअरी' या ग्रंथात असे मांडले की, जीवनाच्या सर्व क्षेत्रांमध्ये होणारे स्त्रियांचे शोषण व दुय्यमत्व नष्ट करणे हाच स्त्रीवादाचा उद्देश आहे.[३]

या विचारातून स्त्री संघटना कार्यरत झाल्या. त्यामुळे पुरूषांनी बायकोला मारहाण करणे, हुंड्यासाठी अन्य वस्तूंसाठी जाच करणे हे खाजगी नसून तो स्त्रीवरचा अन्याय आहे, अशी भूमिका घेऊन स्त्रीने आत्महत्या करून मरण्यापेक्षा घटस्फोट घेऊन स्वतंत्र राहणे हिताचे तसा तिला अधिकार पाहिजे, अशी भूमिका स्त्री संघटकांची आहे.

**जातिव्यवस्था :**

स्त्री-पुरूषामधले भेद हे प्रथम कुटुंबामध्ये घडविले जातात. कुटुंबाच्या नंतरचे विश्व असते जातीचे. याच जातिव्यवस्थेवर समाज आधारलेला आहे. जात या शब्दाचा जन्माशी संबंध आहे. जन्म देणाऱ्या स्त्रियांवर ही व्यवस्था टिकवून

ठेवण्याची जबाबदारी बनते. तिच्या जननक्षमतेवर नवऱ्याच्या कुटुंबाचे नियंत्रण असणे जरूरीचे ठरते. ती जेव्हा एखाद्या मुलाला जन्म देते तेव्हा तिच्या नवऱ्याचा वंश चालू ठेवला जातो. ही जातिव्यवस्था मजबूत करण्यासाठी जातीच्या अंतर्गत विवाह करण्याची प्रथा आहे. कामधंद्याच्या निमित्ताने किंवा शिक्षणाच्या काळात आपण कितीही विविध लोकांच्या संपर्कात आलो तरी लग्न करताना आई-वडील, जातीतील ज्येष्ठ मंडळी, नातेवाईक यांचा निर्णय स्वीकारणे आपण योग्य समजतो. यामुळे जातिव्यवस्था सुरळीतपणे टिकविली जाते. जातीअंतर्गत विवाह करून जातीची शुद्धता टिकविली जाते तसेच या जातीची उतरंड आहे. यात ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य त्यानंतर शूद्र, बहुजन जाती व उरलेल्या खालच्या टोकाला दलित जाती असतात. या जातिव्यवस्थेच्या चित्राला जर उलटे केले तर कसे दिसेल त्याचे वर्णन प्रबोधनकार ठाकरे आपल्या खरा ब्राह्मण या नाटिकेत करतात. ते म्हणतात...

**खाली डोक वर पाय । वेद करती हाय हाय ।**
**भटं रडती धाय धाय । मेरी तुम्बडी भर दे ।।**
**पाव मे बम्मन । शिरपर अछूत ।**
**बीच घुसे बिस्मिल्ला । मेरी तुम्बडी भर दे ।।**[४]

उच्च जातीची ज्ञान, संपत्ती, सत्ता यावर घट्ट पकड असते ही पकड अशीच घट्ट राहावी म्हणून जातीच्या शुद्धतेचे महत्त्व त्यांना सर्वाधिक वाटत असे. त्यासाठी स्त्रियांवर अनेक कडक बंधने लादली गेली. त्यांना दुय्यमत्व देऊन त्यांचे स्वातंत्र्य हिरावून घेतले. अशा उच्च जातीत बालविवाह, सतिप्रथा, विधवा पुनर्विवाहाचा प्रश्न केशवपन या सर्व प्रथा स्त्री स्वातंत्र्यावर घाला घालणाऱ्या होत्या.

कुटुंबाची संपत्ती कुटुंबातच राहावी यासाठी घरातील विवाहित व्यक्तीचा मृत्यू झाला तर त्याच्या पत्नीचा विवाह लगेच दीराशी करून टाकीत या पाठीमागे संपत्ती घरातच राहिली पाहिजे ही भावना होती, अशी व्यवस्था उच्चवर्णीय जाट लोकांत दिसून येते.[५] इतर उच्चवर्गीयांत अशा विधवेचा विवाह न करता तिचे केशवपन करून तिच्या सर्व हालचालींवर कडक नियंत्रण ठेवले जात असे. उलट ज्या जातीकडे सत्ता-संपत्ती नव्हती त्यांच्यात त्या काळात तरी या प्रथा दिसून येत नाहीत.

अशा विधवेची जबाबदारी न घेता तिचा पुनर्विवाह करणे कुटुंबाच्या दृष्टीने उचित समजले जायचे.

जातिसंस्था विवाह संस्थेत हस्तक्षेप करते, जातीअंतर्गत विवाह हा जातिव्यवस्थेचा प्राण आहे. जातिव्यवस्था विवाहबंदी लादत असल्याने स्त्रियांची गुलामगिरी घट्ट होते. स्वतःच्या आवडीप्रमाणे कोणत्याही जातीतील व्यक्तीशी विवाह जातिव्यवस्थेला मान्य नसतो. जातीबाहेर विवाह करणाऱ्याला जात-बहिष्कृत केले जाते व जातीची शुद्धता राखण्यासाठी व परजातीतील पुरूषाशी विवाहाची शक्यता नष्ट करण्यासाठी स्त्रियाचे शिक्षण, सामाजिक सहभाग, व्यवसाय स्वातंत्र्यावरदेखील बंधने येतात. मुलगी जास्त शिकली तर ती जातीबाहेर विवाह करेल या भीतीमुळे मुलीच्या उच्च शिक्षणाची वाट जातिव्यवस्था बंद करते.[६]

**जातवर्गीय स्त्री अत्याचार :**

साहजिकच उच्च जातीकडे ज्ञान, सत्ता, संपत्ती, अधिकार यांचे केंद्रीकरण झाल्यामुळे निम्नवर्गीय जातीवर त्याचा अन्याय, अत्याचार वाढला. या अन्याय-अत्याचाराचा बळी असते ती स्त्री. उच्च जातीच्या पुरूषांना खालच्या जातीच्या स्त्रियांवर हक्क गाजविता येत होता. समाजात ज्या पुरूषाकडे सत्ता असते, ते सत्तेपासून वंचित असलेल्या गटातील स्त्रियांवर लैंगिक अत्याचार करणे आपला अधिकार समजतात. मग तो अत्याचार एकाच वेळी स्त्रीवर आणि तिच्या नवऱ्यावर/वडिलांवरही होतो.[७] स्त्रीवर केलेला अत्याचार हा फक्त स्त्रीवर असत नाही तर त्यातून अत्याचार करणाऱ्याला आपल्या उच्च जातीचे श्रेष्ठत्व मिरवायचे असते. सत्ता-संपत्तीचे प्रदर्शन करावयाचे असते. खालच्या जातीतील स्त्रिया भोगणे हा आपला अधिकारच आहे हे सिद्ध करावयाचे असते.

ग्रामीण भागात ही परिस्थिती आजही दिसून येते, गावातील उच्च जातीतील व्यक्तींना दलित, आदिवासी स्त्रिया या आपल्या हक्काच्या स्त्रिया वाटतात व यात समाजालाही काही चुकीचे वाटत नाही. शहरात शासन यंत्रणेतील अधिकारी, राजकारणातील पुरूषांनी हा हक्क घेतलेला असतो. त्याचा अधिकार आणि सत्ता सिद्ध करण्यासाठी सामाजिक मान्यता मिळालेला तो एक मार्ग असतो.

**पौरूषत्व सिद्ध करणे :**

स्त्रीयांचे समाजातील गौण स्थान सिद्ध करण्यासाठी अनेक प्रकारचे अत्याचार केले जातात व आपल्या सामाजिक मूल्याच्या चौकटीत ते गैर समजले जात नाहीत. नवऱ्याने बायकोला मारणे हा नवऱ्याचा हक्क असतो. एवढेच नाही तर त्याचे पौरूषत्व सिद्ध करून दाखविण्याचा तो एक उत्तम मार्ग समजला जातो. समाजातील इतर लोकांना आपले पुरूषी श्रेष्ठत्व दाखविण्यासाठी किंवा कुटुंबाअंतर्गत वादात बायकोला मारहाण करणे यात कोणला गैर वाटत नाही.

**बलात्कार :**

स्त्रीवर होणाऱ्या अत्याचारांत मोठे प्रमाण आहे ते बलात्काराचे व याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढतच आहे. कारण गुन्हेगाराला मोठ्या प्रमाणात शिक्षा होत नाहीत, शिवाय स्त्रीलाच आरोपीसारखे वागविले जाते. बलात्काराची विभागणी अनेक प्रकारांत करता येईल. जसे कुटुंबांतर्गत बलात्कार, एकटेपणाचा, अनोळखी-पणाचा फायदा घेऊन बलात्कार; परंतु आपल्याचा विचार करावयाचा आहे तो म्हणजे उच्च जातीकडून कनिष्ठ जातीतील स्त्रीवर होणारा बलात्कार. साधारणतः गावातील संपन्न जातीय सत्ताधारी वर्गातील पुरूषाकडून शोषित कनिष्ठ जातीतील स्त्रीवर होणाऱ्या बलात्कारात न्यायालयातसुद्धा स्त्रीला आरोपीसारखे वागविले जाते. समाजात तिच्या चारित्र्यावर शिंतोडे उडविले जातात तर न्यायालयात ती चारित्र्यहीन असल्याचे दावे मांडले जातात. बलात्काराचा आरोप करणाऱ्या स्त्रीलाच आरोपी पुरूषांपेक्षा अग्निपरीक्षेतून जावे लागते. न्यायालय या संस्थेमध्येदेखील पितृसत्ताक विचारप्रणाली असल्याचे हे लक्षण आहे. मुख्य म्हणजे आरोप सिद्ध झाला आणि आरोपीला शिक्षा झाली तरी बलात्कार झालेल्या स्त्रीला समाजाकडून शिक्षा भोगावी लागते. एक तर अविवाहित असेल तर विवाह होणे कठीण बनते व विवाहित असेल तर कुटुंबात समजावून घेतीलच असे नाही. शिवाय आरोपीच्या कुटुंबाकडून त्या उच्च जातीय समूहाकडून अन्य प्रकारे अन्याय होत राहतो. अशा स्त्रीला वेश्याव्यवसाय पत्करण्या-शिवाय दुसरा पर्याय उरत नाही. या सर्व कारणांमुळे बलात्कारित स्त्री तिच्या जातीकडून कुटुंबाकडून उपेक्षित बनते. हेच याचे भयानक स्वरूप आहे.

१९ व्या शतकात स्त्रीप्रश्न, धर्म जातिव्यवस्था यावर प्रामुख्याने चर्चा झाली, स्त्रीप्रश्नांच्या स्वरूपावर चर्चा करणाऱ्यांचे चार गट पडतात. ते खालीलप्रमाणे...

(१) ब्राह्मणी पुनरूज्जीवनवादी विचारप्रवाह.
(२) ब्राह्मणी सुधारकाचा प्रवाह.
(३) अब्राह्मणी सुधारकाचा प्रवाह.
(४) अब्राह्मणी क्रांतिकारकाचा प्रवाह.

**(१) ब्राह्मणी पुनरूज्जीवनवादी विचारप्रवाह :**

या प्रवाहाने धर्मशास्त्रानुसार स्त्रियाचा दर्जा कायम दुय्यम राहिला पाहिजे, अशी भूमिका घेतली. संमती व या संदर्भात स्त्री शिक्षणास, समाजपरिवर्तनात सातत्याने विरोधी भूमिका घेतली. या प्रवाहाचे प्रतिनिधित्व विष्णूशास्त्री चिपळूणकर, लोकमान्य टिळकांपासून आजतागायत सनातन प्रभातसारख्या संस्था, नरेंद्र महाराजां-सारखे धर्मगुरू, आर. एस. एस. सारख्या व समविचारी संघटना, प्रतिगामी विचाराचे लोक काही चळवळी करताना दिसतात.

**(२) ब्राह्मणी सुधारकाचा प्रवाह :**

या प्रवाहाने स्त्रियाही मानव आहेत, त्यांना जगण्याचा अधिकार आणि स्वातंत्र्य असले पाहिजे, अशी भूमिका घेतली. त्यांनी स्त्रियांच्या प्रश्नांची दखल घेऊन विधवा विवाह, बालविवाह, केशवपन, स्त्रीशिक्षण व स्वातंत्र्यासंदर्भात भूमिका घेतली. या कार्यास व त्यांच्या भूमिकेस अंगभूत मर्यादा होत्या. त्या म्हणजे हे प्रश्न, धर्म, रूढी, परंपरा व स्त्रीशोषणाच्या विविध संस्था यातून आलेले आहेत. असे न पाहता स्त्रियांच्या घरगुती, कौटुंबिक प्रश्नांना महत्त्व दिले. या प्रवाहाचे पाईक राजा राममोहन रॉय, लोकहितवादी, आगरकर, न्या. रानडे, लक्ष्मीबाई टिळक होते.

**(३) अब्राह्मणी सुधारकाचा प्रवाह :**

या प्रवाहाने स्त्रीशोषणाचे उगम हा ब्राह्मणी समाजव्यवस्थेत आहे हे नाकारले. या प्रवाहाने जातिव्यवस्था, पुरूषसत्ता, रूढी-परंपराच्या विरोधात भूमिका घेतली. या प्रवाहाने स्त्रियांच्या अत्याचारांकडे दयाबुद्धीने न पाहता मुक्तिवादा आशयाने पाहिले. या प्रवाहाचे पाईक प. रमाबाई, जनाक्का शिंदे, वि. रा. शिंदे, प्रबोधनकार ठाकरे इत्यादी आहेत.

## (४) अब्राह्मणी क्रांतिकारकाचा प्रवाह :

या प्रवाहाने भारतातील स्त्रियांचे शोषण ब्राह्मणी समाजव्यवस्थेत असून जातिव्यवस्था, वर्गव्यवस्था, पुरूषसत्ता या तिन्ही व्यवस्था करतात. वर्गजाती स्त्री दास्यांतासाठी संघर्ष करणारा. या प्रवाहाचे पाईक महात्मा फुले, ताराबाई शिंदे, छत्रपती शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे होते.

## जातिव्यवस्था आणि स्त्रीमुक्तीसंदर्भात महात्मा फुले यांचे विचार :

महात्मा फुले यांनी पुरूषसत्ता व जातिव्यवस्थेतून होणारे स्त्रियांचे शोषण उलगडून दाखविले. त्यांनी स्त्री शिक्षणाचा आग्रह धरला. महात्मा फुले सांगतात, स्त्री शूद्रांना शिक्षण देण्यास भटभिच्छुक घाबरतात, कारण त्यातून पुरूषी सत्ता व जातिव्यवस्था नष्ट होण्याची भीती त्यांना वाटते. आर्य ग्रंथकारांनी जे जुलमी लिखाण केले ते त्यांना ज्ञात होईल.[९]

महात्मा फुले यांनी आपल्या लिखाणातून व विशेषतः अखंडामधून हे स्पष्ट केले की, जातिव्यवस्था स्त्रियांचे शोषण करते, त्यामुळेच विषमताधिष्टित उतरंडीची विशेषतः असतानाच्या जातिव्यवस्थेत स्त्री शोषण कसे भिन्न असते हे 'कुळंबण' या अखंडातून दाखविले आहे.

### अखंड १

सूर्य प्रकाशता भाकरीस थापी।। अवलास सोपी।। कालवण ।।१।।
स्वयंपाक होता पाटीमध्ये भरी।। घेई डोईवरी।। शेती जाई ।।२।।
सर्वासंगे शेती काम करू लागे।। खाई ना ती मागे।। घरी घास ।।३।।
भिकारी ब्राह्मण धान्य ती वाटती।। भूदेवा पोशिती।। जोती म्हणे ।। (अखंड २)

ऊरापोटावर पाण्यास वाहती।। कचरा घालिती।। शेणामध्ये ।।१।।
कासोटा घालून शेण तुडविती।। गोवऱ्या थापिती।। उन्हामध्ये ।।२।।
चोपाळी (झोपाळी) बसून भटणीच्या परी।। मौज न च मारी।। छायेमध्ये ।।३।।
अशा उद्योगास म्हणजे कुळबिण।। भटा धनीपण।। जोती म्हणे ।। (अखंड ४)

भटीण शूदांची करीना मजुरी।। काढणी न करी।। शेतामध्ये ।।१।।
पेंढ्याचे ते ओझे खळ्यात नेईना।। कणसे मोडीना।। त्यांच्यासंगे ।।२।।
धान्य उपसिता पाट्या ती देईना।। बनग्या वारीना।। हतणीने ।।३।।
शूद्रांचीया खळी मजुरी करीना।। नखरा सोडीना।। जोती म्हणे ।। (अखंड १२)

नांगराचा मागे भटीण फिरेना।। काशा उपसीना।। लागोपाठ ।।१।।
भटीण फोडीना शेती ढेकळांना।। खतास घालीना।। डोईवर ।।२।।
खुरपून टाकीना बैलापुढे चारा।। नेईना बाजारा।। विकावया ।।३।।
भटीन शेतात धंदा नच करी।। चाळे चाळे करी।। जोती म्हणे ।। (अखंड १३)[१०]

महात्मा फुले यांनी सर्वच स्त्रिया सारख्याच प्रमाणपत्र शोषित असतात असे न मानता जातिव्यवस्थापक पुरूषसत्तेतून होणारे स्त्रियांचे शोषण जाती-जातीप्रमाणे कमी-जास्त असते हे स्पष्टपणे दाखविले आहे.

**रार्जर्षि शाहू महाराजांचे जातिव्यवस्था व स्त्रीमुक्तीसंबंधीचे कार्य :**

समताधिष्ठित समाज व जातिव्यवस्था अन्त हे शाहू महाराजांचे स्वप्न होते. यात स्त्रीची महत्त्वाची भूमिका बजावू शकेल अशी त्यांना खात्री होती. त्यासाठी त्यांनी सुरूवात आपल्या घरापासून केली. आपल्या सूनबाई इंदुमती राणीसाहेबांना अकाली वैधत्व आल्यानंतर त्यांना सनातनाच्या विरोधांना न जुमानता शिक्षण दिले. राजाराम कॉलेजमधील मुलींना फी माफी देऊन स्त्री शिक्षणास प्रोत्साहन दिले. धर्माच्या नावाखाली देवादिकांना मुले-मुली वाहण्याची पद्धत अर्थात वाघ्या-मुरळी प्रतिबंधक कायदा करून स्त्रीची अब्रू वाचविली. विधवा स्त्रियांना पुनर्विवाहाचा अधिकार दिला. शिवाय घटस्फोटासंबंधी निर्णय घेण्याकरिता प्रत्येक जातीची एक जात पंचायत असे. जात पंचायतीचे निर्णय स्त्रियांवर अन्याय करणारे व पुरूषांना अनुकूल ठरत. त्यामुळे महाराजांनी स्त्रियांनाही काडीमोड घेण्याचा अधिकार दिला व याबाबतची सर्व कामे जात पंचायतीऐवजी कोर्टात चालविण्यात येतील, असा निर्णय घेतला. त्याचप्रमाणे पुरूषसत्ताक जातिव्यवस्थेने स्त्रीला दीन-हीन ठरवून तिचा छळ चालविला होता. हा छळ थांबविण्यासाठी महाराजांनी स्त्रियांचा मानसिक, शारीरिक छळ करणे, उपाशी ठेवणे, सतत उभे करणे, चटके देणे, आपल्या स्त्रीचा सहवास टाळणे, मुद्दाम अवहेलना करणे इत्यादी प्रकारे स्त्रियांना दिल्या जाणाऱ्या वागणुकीस प्रतिबंध करणारा कायदा केला.[११] अशा प्रकारे शाहू महाराजांनी एका बाजूला स्त्रीशिक्षण तर दुसऱ्या बाजूला स्त्री विकासात साहाय्यभूत होणारे कायदे करून स्त्रीमुक्तीबाबत पुढाकार घेतल्याचे दिसून येते.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जातिव्यवस्था व स्त्रीमुक्तीविषयीचे विचार :**

डॉ. आंबेडकरांच्या मते जात म्हणजे बंदिस्त वर्ग होय. जातीच्या उदयाचे वेगवेगळे सिद्धांत सांगितले जातात. डॉ. आंबेडकरांनी जातीचा उदय हा स्त्रियावर बंधने लादूनच कसा केला गेला हे सांगितले. डॉ. आंबेडकरांनी अमेरिकेत अध्ययन करीत असताना भारतातील जाती हा निबंध लिहिला. त्यात जातिव्यवस्था कशी निर्माण झाली हे सांगून जातीबाह्य विवाहबंदी व जातीत जन्मले त्यांनाच सदस्यत्व ही जातिव्यवस्थेची लक्षणे सांगितली होती. डॉ. आंबेडकरांनी जात बंदिस्त करण्यासाठी स्त्रीयावर कशी बंधने लादली गेली याचे विश्लेषण केले आहे. त्यातला एक सिद्धांत म्हणजे स्त्रिया या जातिव्यवस्थेच्या प्रवेशद्वार आहेत. आजवर जातिव्यवस्थेच्या निर्मितीची, वैशिष्ट्याची जी चर्चा झाली ती मुख्यतः मांसभक्षण, विटाळ किंवा प्रायः धर्माच्या अंगाने झाली परंतु डॉ. आंबेडकरांनी जातिव्यवस्था ही स्त्रीशोषणातून जात अधिकाधिक बंदिस्त केल्याचे ते सतीची रूढी, बालविवाह, स्त्रियांचे विद्रुपीकरण इत्यादी रूढीतून दाखवून देतात.

डॉ. आंबेडकर म्हणतात, जात बंदिस्त करण्यासाठीचा मार्ग म्हणून जातीबाहेर विवाह होऊ दिले जात नाहीत. मिश्रविवाह हा धर्मबाह्य मानला गेला. मिश्रविवाह करणाऱ्यास कडक शिक्षा करण्यात येई. मिश्रविवाहाचे दोन प्रकार होते - एक अनुलोम विवाह तर दुसरा प्रतिलोम विवाह. एकवेळ अनुलोम विवाह सहन केला जाई परंतु प्रतिलोम विवाह नाही. या मिश्रविवाहामुळे जातिव्यवस्था उद्‌वस्त होईल ही भीती ब्राह्मणी परंपरेला वाटत असल्यामुळे जातिव्यवस्थेच्या माध्यमातून स्त्रियांवर अधिकाधिक बंधने घातली गेली.

**जातिव्यवस्थेनुरूप स्त्री दास्य :**

यूरोपातील स्त्री ही वर्गव्यवस्था व पुरूषसत्ता या बेड्यात अडकली आहे. भारतीय स्त्रीला या दोन बेड्यांचे बंधन तर आहेच शिवाय जातिव्यवस्था ही आणखी एक मोठी बेडी आहे. जातिव्यवस्था, जात पंचायत, जातीय श्रमविभाजन, जातीवर आधारित कायदे हे स्त्रीला गुलामीत ठेवतात. विवाह, घटस्फोट, पुनर्विवाह, वारसा हक्क इत्यादी बाबतीत स्त्रीला पुरूषावलंबी व पराधीन बनविण्यात हे जातीय कायदे महत्त्वाचे भूमिका बजावतात. भारतातील सर्व स्त्रियांचे दास्यत्व सारखे नसून जातिव्यवस्थेनुरूप त्यात फरक आढळतो. या जातिव्यवस्थेमुळे निम्न जातीत दलित,

आदिवासी, शूद्र, शेतकरी, शेतमजूर स्त्रियांचे शोषण हे अधिक होते. त्या प्रमाणात उच्च जातीय स्त्रियांचे शोषण अल्प आहे.

१) उच्च जातीय स्त्रिया शेतात काम करीत नाहीत, उलट शेतमजुरी करणाऱ्या स्त्रियांत अधिक प्रमाण आदिवासी, त्यानंतर दलित, नंतर मध्यम शेतकरी जातीय स्त्रियांचे असते. श्रमाच्या मोबदल्यात त्यांना मजुरीही कमी मिळते.

२) कनिष्ठ जातीच्या सामाजिक दर्जाहीन असल्यामुळे गाव पातळीवर उच्च जातीच्या प्रमाणात कनिष्ठ जातीतील स्त्रियांवर अत्याचार, बलात्कार अधिक होतात. गरीब उच्च जातीय स्त्रीवर अत्याचार झाल्यास राजकीय व सामाजिक प्रतिष्ठा प्राप्त असलेले त्याचे जातभाई तिच्या बाजूने उभे राहतात. असे कनिष्ठ जातीच्या संबंधात घडताना दिसत नाही.

३) वेश्याव्यवसायात असणाऱ्या स्त्रियांमध्ये कनिष्ठ जातीतील स्त्रिया मोठ्या प्रमाणावर असल्याचे दिसते. त्याला जातिव्यवस्था अधिक पाठबळ देते.

४) उच्च जातीय स्त्रियापेक्षा बहुपत्नीत्वाचे प्रमाण मराठा जातीत जास्त दिसून येते. या रूढीचा त्रास या जातीतील स्त्रियांना अधिक होतो.

५) १९ व्या शतकापर्यंत केशवपन, सतिप्रथा, विधवा पुनर्विवाह बंदी, उच्च जातीय स्त्रीमध्ये होती.

६) साक्षरतेचे प्रमाण जातीय व्यवस्थेनुरूप बदलते. उच्च जातीय स्त्रीमध्ये प्रमाण अधिक तर नंतर बहुजन, दलित व शेवटी आदिवासी स्त्रियांचे प्रमाण येते.

७) जातिव्यवस्थेचे अत्यंत दाहक चटके भटक्या समाजातील स्त्रीला सहन करावे लागतात. भटक्या विमुक्त जमातीमधील स्त्रियांचे दुहेरी शोषण होते. एक स्त्री म्हणून तर दुसरे भटक्या जातीची असल्यामुळे कायम असुरक्षितता, उघड्यावरचे जीवन, निसर्गापासून व समाजापासून स्वतःच्या चारित्र्याचा बचाव करणे.[१२]

या भटक्या विमुक्त जातीसाठी स्वतंत्र जात पंचायत असते. जात पंचायती स्त्रियांना शिक्षा देण्यासाठीच स्थापन झाल्या आहेत की काय असे वाटते. या जात पंचायतीमध्ये एकही स्त्री प्रतिनिधी नसते. चारित्र्य शुद्धतेबाबतचे सर्व नियम स्त्रीलाच असतात. शिक्षा इतक्या भयावह व अमानुष असतात की, जमातीचे नियम तोडण्याचे धाडसच निर्माण होऊ नये याची खबरदारी घेतलेली असते. उदा. चारित्र्य शुद्धतेवर उकळत्या

तेलातून पैसा काढणे, विस्तवावरून चालणे, नाक, स्तनदेखील कापणे, या जमातीमध्ये जिवंतपणीच चारित्र्य सांभाळावे असे नाही तर तिच्या मृत्यूनंतरदेखील तिचे चारित्र्य तपासले जाते. उदा. घिसाडी या जमातीमध्ये स्त्रीच्या मृत्यूनंतर तिसऱ्या दिवशी राख सावडताना त्यामध्ये बांगड्या, दागिने सापडले नाहीत तर ती स्त्री बदचलन होती असे मानून त्या राखेवर थुंकले जाते, राखेवर लाथा मारल्या जातात, त्या कुटुंबाला वाळीत टाकले जाते.[१३]

या भटक्या जमातीतील स्त्रियांना जीवनपणीच चारित्र्य सांभाळावे लागते शिवाय जन्मभर आपल्या मृत्यूनंतर आपल्या कुटुंबाला वाळीत टाकले जाईल ही भीती कायम ऊराशी बाळगून जगावे लागते. पारधी या भटक्या जमातीमध्ये स्त्रीला चारित्र्य सिद्ध करण्यासाठी पेटत्या निखाऱ्यातून लोखंडाची पहार लालभडक झालेली काढायला लावली जाते किंवा उकळत्या गोड तेलातून नाणे काढायला लावले जाते, हात भाजला तर ती दोषी अन्यथा निर्दोष अशा अमानवी, अमानुष, अशास्त्रीय व्यवस्था आजही सुरू असल्याचे दिसतात.

**संदर्भ :**


(१) परदेशी प्रतिमा, कांबळे सरोज, जातिव्यवस्था व स्त्रीमुक्ती, क्रांतिसिंह नाना पाटील अकादमी, अहमदनगर, २००७, पृ. ३.
(२) माळवी नूतन, सत्यशोधकी स्त्रीवाद, सुधीर प्रकाशन, वर्धा, जाने-२०१०, पृ. ५.
(३) उपरोक्त, पृ. ६.
(४) ठाकरे के. सी., खरा ब्राह्मण, खंड-३, म. रा. सा. सं. मं., मुंबई, १९९९, पृ. ३२८.
(५) सोनाळकर वंदना, रेंगे शर्मिला, पितृसत्ता व स्त्रीमुक्ती, क्रांतिसिंह नानापाटील अकादमी, अहमदनगर, २००७, पृ. ७.
(६) परदेशी प्रतिमा व इतर, फुले-शाहू-आंबेडकर आणि जातिव्यवस्था अन्त, क्रांतिसिंह नाना पाटील अकादमी, अहमदनगर, जानेवारी-१९९८, पृ. ४४.
(७) उपरोक्त, सोनाळकर वंदना, रेंगे शर्मिला, पृ. ७.
(८) उपरोक्त, पदरेशी प्रतिमा, कांबळे सरोज, पृ. ७.
(९) उपरोक्त, पृ. ७.
(१०) कीर धनंजय (संपा.), महात्मा फुले समग्र वाङ्मय, म. रा. सा. सं. मं., मुंबई, सहावी आवृत्ती, नोव्हेंबर-२००६, पृ. ६२०-६२२.
(११) उपरोक्त, परदेशी प्रतिमा व इतर, पृ. ३८.
(१२) मोरे विमल, पहिले विद्रोही स्त्री साहित्य संमेलन अध्यक्षांचे भाषण, परदेशी प्रतिमा, पुणे, २०१४, पृ. ९.
(१३) उपरोक्त, पृ. १०.

४

# जम्मू आणि काश्मीरचे भारतासोबतचे विलीनीकरण

**डॉ. एस. डी. सावंत**

शिवाजी महाविद्यालय, उदगीर, जि. लातूर

जम्मू आणि काश्मीर हे राज्य २०१९ च्या कलम ३७० च्या बदलापर्यंत भारतीय संघराज्यात एक राज्य म्हणून दर्जाप्राप्त होते. ५ ऑगस्ट २०१९ ला संसदेत जम्मू-काश्मीर पुनर्रचना विधेयक मांडण्यात आले. त्यानंतर ३१ ऑक्टोबर २०१९ ला राष्ट्रपतींच्या सहीने हे विधेयक लागू झाले. त्यातून जम्मू व काश्मीरचा राज्य दर्जा संपवून त्याला केंद्रीय प्रदेशाचा दर्जा देण्यात आला. भारताच्या स्वातंत्र्यप्राप्तीनंतर त्या वेळेस विविध संस्थाने विलीनीकरणाचा प्रश्न निर्माण झाला होता. एका बाजूला ब्रिटिश भारत सोडून जात होते, नवीन स्वातंत्र्याची पहाट होत होती त्याच वेळेस भारताला असहाय अशा फाळणीचे दुःखही सहन करावे लागले होते. त्याच काश्मीरच्या विलीनीकरणाचा प्रश्न पुढे आला होता.[१] काश्मीरचा खरा प्रश्न काश्मीरचे मुस्लिम बहुसंख्याकत्व व पाकिस्तानशी भौगोलिक संलग्नता या दोन कारणांतून निर्माण झाला आहे.

**काश्मीरचा इतिहास :**

विधात्याला पडलेले एक सुंदर स्वप्न म्हणून काश्मीरचा उल्लेख होतो. काश्मीरला ऐतिहासिक पार्श्वभूमी लाभलेली आहे. कल्हनच्या राजतरंगिनी म्हणून आपणाला काश्मीरचा इतिहास समजतो. त्यात पुढे जोतराज, श्रीधर, शुक यांनी भर घातली. काश्मीरमध्ये हिंदू, बौद्ध धर्माचे आगमन झाले. कालांतराने मध्ययुगीन काळात मुस्लिम धर्माचे आगमन झाले. काश्मीरवर अनेक सत्तांनी राज्य केले. हिंदू, बौद्ध, अफगाण, मोगल, शिख अशा वेगवेगळ्या सत्तांनी तिथे आपली सत्ता संपादित केल्याचे दिसून येते.[२]

**काश्मीरचे भारतात विलीनीकरण :**

१९४७ या वर्षात भारतीय उपमहाद्वीपाचे विभाजन होऊन नवीन राष्ट्रांचा उदय होत होता. त्यात भारत व पाकिस्तान ही दोन नवे राष्ट्रे निर्माण झाली.

भारतापासून फुटून पाकिस्तान हे एक नवीन राष्ट्र निर्माण झाले. तत्कालीन ब्रिटिश सरकारने तत्कालीन संस्थानांना अटी व मर्यादा घालून भारत किंवा पाकिस्तानात विलीन करून घेण्याचा प्रस्ताव दिला होता. त्यात काश्मीर हे एक संस्थान होते. त्या वेळेस काश्मीरवर राजा हरिसिंग यांची सत्ता होती. काश्मीरचे वैशिष्ट्य म्हणजे काश्मीरची बहुतेक जनता ही मुस्लिमधर्मीय होती व राजा हा हिंदू होता.[३]

या धामधुमीच्या काळात २२ ऑक्टोबर १९४७ रोजी पाकिस्तानातून शेकडो ट्रक काश्मीरमध्ये घुसले. या ट्रकमध्ये तत्कालीन फ्रंटियर प्रॉव्हिनसमधले (सध्याचा खैबर पख्तुनवा) ग्रामस्थ होते, त्यांची संख्या जवळपास हजारो होती. ते सर्व लोक आफ्रिदी, वखीर, मेहमूद, स्वात जमातीचे होते. त्यांना पाकिस्तानने 'स्वातंत्र्यसेनानी' म्हटले. त्याचे नेतृत्व रजेवर असलेले पाकिस्तानी लष्कराचे जवान करीत होते. त्यांचा हेतू स्पष्ट होता. काश्मीरवर ताबा मिळवून तो पाकिस्तानात विलीन करायचा तोपर्यंत काश्मीरने कोणत्या देशात विलीन व्हायचे याचा निर्णय घेतलेला नव्हता. इतर जवळपास सर्वच संस्थानांनी भारत किंवा पाकिस्तान यांपैकी एका देशाची निवड केली होती. जम्मू-काश्मीरने मात्र अजून निर्णय घेतला नव्हता.[४]

१२ ऑगस्ट १९४७ रोजी जम्मू-काश्मीरचे महाराजा हरिसिंह यांनी भारत आणि पाकिस्तानसोबत 'Stand still Agreement' म्हणजे 'जैसे थे' करार केला होता. याचा अर्थ असा होतो की, जम्मू-काश्मीर कुठल्याही देशात विलीन न होता स्वतंत्र राहील. हा करार होऊनही पाकिस्तानने तो पाळला नाही आणि जम्मू काश्मीरवर हल्ला चढविला.[५] पाकिस्तानातल्या आदिवासी टोळ्या काश्मीरचा एक एक भाग ताब्यात घेत होत्या. २४ ऑक्टोबर १९४७ पर्यंत त्या श्रीनगरपर्यंत येऊन ठेवल्या. त्यांनी श्रीनगरजवळ असलेल्या माहुरा जलविद्युत प्रकल्पाचा ताबा घेतला आणि तो बंद केला. संपूर्ण श्रीनगर अंधारात बुडाले, पुढच्या दोन दिवसांत श्रीनगर ताब्यात घेऊन श्रीनगरमधील मशिदीत ईद साजरी करू, अशी वल्गना त्यांनी केली व टोळी सैन्य श्रीनगरच्या सीमेवर पोहोचले.

**विलीनीकरणाबाबत करार :**

एव्हाना दिल्लीत या सर्व घडामोडींमुळे खलबते सुरू झाली. २५ ऑक्टोबर रोजी संरक्षण मंत्रालयाची बैठक बोलाविण्यात आली. लॉर्ड माऊंटबॅटन या बैठकीचे नियंत्रण करीत होते. त्या बैठकीतून असे ठरले की, गृहसचिव व्ही. पी. मेनन यांनी

श्रीनगरला जावे आणि तिथली माहिती भारत सरकारला द्यावी. त्यातूनच गृहसचिव व्ही. पी. मेनन यांनी श्रीनगरचा दौरा केला. काश्मीरची परिस्थिती किती चिंताजनक आहे हे त्यांच्या लक्षात आहे. माहुरा जलविद्युत प्रकल्प आक्रमणकारी टोळयांच्या हातात पडला होता. अशा परिस्थितीत काश्मीरला वाचविण्यासाठी महाराज हरिसिंह यांच्याकडे आता केवळ एकच पर्याय होता आणि तो म्हणजे भारताकडून मदत मागायची. भारतीय लष्करच आता काश्मीरला पाकिस्तानच्या घशात जाण्यापासून रोखू शकत होते. गृहसचिव व्ही. पी. मेनन परत जम्मूला गेले. त्यांनी तिथे महाराज हरिसिंहांना भारत सरकारने घेतलेल्या निर्णयाची माहिती दिली.[६] महाराजा हरिसिंह यांनापण टोळयांपासून संरक्षण होण्यासाठी भारत सरकारची मदत घ्यावीच लागली असती. त्यातून २६ ऑक्टोबर १९४७ रोजी महाराज हरिसिंहांनी विलीनीकरणाच्या कागदपत्रांवर स्वाक्षरी केली.

**करारावर स्वाक्षरी करण्यास महाराजा हरिसिंहानी उशीर का केला ? :**

गृहसचिव व्ही. पी. मेनन याबाबत सांगतात की, काश्मीरची परिस्थिती गुंतागुंतीची असल्यामुळे करारावर स्वाक्षरी करायला महाराजा हरिसिंह यांना वेळ लागला. काश्मीर राज्य चार प्रदेशांमध्ये विभागले गेले होते. उत्तरेकडचा गिलगीट, दक्षिणेकडचा जम्मू, पश्चिमेकडे लडाख आणि मध्यभागी होते काश्मीर खोरे. जम्मू हिंदूबहुल भाग होता तर लडाखमध्ये बौद्ध लोकसंख्या जास्त होती. मात्र गिलगीट आणि काश्मीर खोऱ्यात मुस्लिम मोठ्या प्रमाणावर होते. त्यामुळे हे राज्य मुस्लिमबहुल म्हणून ओळखले जाई. मात्र राजा हिंदू असल्यामुळे संस्थानात सर्व वरिष्ठ पदांवर हिंदू व्यक्ती होत्या. त्यामुळे मुस्लिमांच्या मनात दुरावण्याची भीती होती.[७] या दुरावलेल्या मुस्लिमांची महत्त्वकांक्षा आणि त्यांचा आवाज बुलंद करण्याचा प्रयत्न शेख अब्दुल्ला यांनी त्यांच्या ऑल जम्मू अँड काश्मीर मुस्लिम कॉन्फरन्स या पक्षाच्या माध्यमातून केला होता. पुढे हा पक्ष धर्मनिरपेक्ष वाटावा म्हणून पक्षातून मुस्लिम नाव वगळून त्याचे 'नॅशनल कॉन्फरन्स' असे नाव केले होते. याच शेख अब्दुल्लांनी महाराजाहरिसिंह विरोधात अनेक आंदोलने केली होती. १९४६ मध्ये त्यांनी 'काश्मीर छोडो चळवळ' उभारली होती. शेख अब्दुल्ला तिथे लोकप्रिय होते.[८]

**भारतीय सैन्याची मदत :**

महाराज हरिसिंहाच्या मदतीच्या पत्राची दखल घेऊन भारत सरकारने गृहसचिव व्ही. पी. मेनन यांना आपला दूत म्हणून महाराजा हरिसिंहांकडे पाठविला होता. तेव्हा विलीनीकरणाच्या करारावर महाराज हरिसिंहांनी स्वाक्षरी केली. त्यानंतर भारतीय सैन्याने काश्मीरमध्ये आपले सैन्य उतरविले. श्रीनगरमध्ये भारतीय सैन्य पोहोचले. त्याचे नेतृत्व ले. कर्नल रणजित राय, एल. पी. सेन, मेजर सोमनाथ शर्मा, ब्रिगेडियर सेन इत्यादी करीत होते. भारतीय सैन्यांनी पराक्रम करीत पाकिस्तानी टोळ्यांना हुसकावून लावले.[९] पाकिस्तानी टोळ्यांनी जिंकलेला भाग ताब्यात घेण्यास सुरूवात केली.

**संयुक्त राष्ट्र सभेत काश्मीरचा प्रश्न :**

या सर्व काश्मीरच्या परिस्थितीत भारत सरकारने काश्मीरचा प्रश्न संयुक्त राष्ट्र सभेत उठविला. सुरक्षा समितीसमोर भारताचे प्रतिनिधी गोपाल स्वामी अय्यंगार यांनी बाजू मांडली. युनोने जैसे थे परिस्थितीची घोषणा केली व एका निरीक्षक आयोगाची निर्मिती केली.[१०]

**काश्मीरची आजची परिस्थिती :**

संयुक्त राष्ट्र सभेत हा प्रश्न गेल्यानंतर 'जैसे थे' परिस्थिती काश्मीर प्रदेशात लागू झाली. काश्मीर समस्येचा विचार करताना आपण तटस्थ दृष्टीने विचार केला पाहिजे. काश्मीरमध्ये बहुसंख्य मुस्लिम आहेत. बहावलपूर, कलात, खैरपूर याप्रमाणे काश्मीरही पाकिस्तानात सामील होणे गृहीत होते परंतु शेख अब्दुल्ला पाकिस्तानात जायला तयार नव्हते. परंतु काश्मिरी जनतेने तिसरा मार्ग स्वीकारला आणि पुढे जैसे थे करार मान्य करावा लागला. म्हणजे ब्रिटिश सरकार असताना जे व्यापार, दळणवळणविषयक करार होते ते तसेच पुढे चालू होते.

भारतीय संसदेने काश्मीरसाठी विशेष कलम ३७० व ३५A बनविले. त्यातून काश्मीरमध्ये विधानसभा स्थापन होऊन निवडणुका झाल्या. पुढे १९९० च्या काळात काश्मीरमध्ये फुटीरतावादी चळवळ सुरू होऊन आतंकवाद मोठ्या प्रमाणात वाढला. तेथील काश्मिरी पंडितांना काश्मीर सोडून भारतात इतर ठिकाणी यावे लागले.[११]

ऑगस्ट २०१९ मध्ये भारत सरकारने कलम ३७० मध्ये बदल घडवून आणला. जम्मू-काश्मीरचे विभाजन करून जम्मू व काश्मीर आणि लडाख असे दोन केंद्रशासित प्रदेश तयार केले. कलम ३७० बदलानंतर काश्मीरमधील परिस्थितीत आमूलाग्र बदल होऊ लागला आहे.

कलम ३७० रद्द केल्यानंतर पाकिस्तानने जम्मू-काश्मीरसंदर्भात नव्याने काही निर्णय घेतलेले आहेत तेही महत्त्वाचे आहेत. भारताच्या विरोधात भारताबरोबरचे अनेक व्यवहार बंद केले आहेत. उदा : टपालसेवा २७ ऑगस्ट २०१९ पासून स्वीकारलेली नाही व तेथूनही टपाल पाठविलेले नाहीत. यामध्ये आंतरराष्ट्रीय निकषाचे उल्लंघन पाकिस्तानने केलेले आहे, असे भारताचे म्हणणे आहे. पाकिस्तानच्या या निर्णयाने दोन्ही देशांचे संबंध आणखीन बिघडलेले पाहायला मिळतात.

**संदर्भ :**


(१) पांडेय अशोक कुमार, काश्मीरनामा इतिहास आणि वर्तमान, अनु. भोंजाळ चंद्रकांत, मधुश्री पब्लिकेशन, मुंबई, २०२२, पृ. २७५.

(२) जगमोहन, काश्मीर धुमसते बर्फ, अनु. जोगळेकर सुधीर, मोरया प्रकाशन, डोंबिवली, २०१९.

(३) शेवडे सच्चिदानंद, काश्मीरनामा, नवचैतन्य प्रकाशन, मुंबई, २०१२, पृ. ७४.

(४) पांडेय अशोक कुमार, काश्मीर आणि काश्मिरी पंडित, अनु. भोंजाळ चंद्रकांत, मधुश्री पब्लिकेशन, मुंबई, पृ. २२.

(५) Menon V.P., The Story of Integration of the Indian States, Orient Longman, 1956, p. 22.

(६) Cottrell Jill, Kashmir : the Vanishing Autonomy, Cambridge University Press, 2013, p. 13.

(७) रॉय अरूंधती, आझादी, अनु. अक्कानवरू प्रवीण, मेहता पब्लिशिंग हाऊस, २०२२, पृ. ८०.

(८) पोतनीस सुनीत, बखर संस्थानाची, राजहंस प्रकाशन, पुणे, २०१७, पृ. ००

(९) उपरोक्त, पांडेय अशोक कुमार, काश्मीरनामा इतिहास आणि वर्तमान, पृ. १६७.

(१०) गोयल बिंदू, कलम ३७० नेमके काय आहे आणि काश्मीरचे महत्त्व काय आहे? दी न्यूयॉर्क टाइम्स, ५ ऑगस्ट २०१९.

(११) डोईफोडे सुधाकर, सुरनर जयप्रकाश, हिंदुस्थानातील संस्थानांचे विलीनीकरण कसे झाले? संगत प्रकाशन, नांदेड, २०१४, पृ. १६१.


❍❍❍

५

# आर्थिक राष्ट्रवादातून भारतीय राष्ट्रवादाची जडणघडण

**डॉ. गिरीधर नागोराव सोमवंशी**
श्री छत्रपती शिवाजी कॉलेज, उमरगा

आधुनिक जगाला भांडवलशाहीने आणि औद्योगिक विकासाने दिलेली देणगी म्हणजे राष्ट्रवाद आहे. राष्ट्रवाद हा दृश्य स्वरूपात नसून तो काल्पनिक आहे. सामुदायिक भावना आहे. सर्वप्रथम ती यूरोपमध्ये उदयास आली. नंतरच्या काळामध्ये इतर खंडांमध्ये तिचा फैलाव झाला. राष्ट्रवाद सामूहिक एकत्वाची कल्पना असून ती एका व्यवस्थेच्या संक्रमणावर उदयास आली. राष्ट्रवाद ही एक सुप्त शक्ती आहे आणि ती भावनिक असल्याने ती विवेकाधिष्ठित असत नाही. ती समंजस असत नाही, विवेकापेक्षा भावना प्रबळ ठरते. आपल्या लोकांशी भावनिक नातेही या शक्तीच्या मुळाशी असते.[१] भारतीय राष्ट्रवाद हा ब्रिटिश राजवटीची उपज आहे. भारतात प्राचीन काळापासून एक संदिग्ध स्वरूपाची सांस्कृतिक एकतेची जाणीव होती खरी पण राष्ट्र म्हणून भारताची जडणघडण झाली ती ब्रिटिशांच्या आगमना-नंतरच भारतीय राष्ट्रवादाच्या उभारणीमध्ये आर्थिक राष्ट्रवादात महत्त्वाचा धागा राहिला आहे. भारतीय राष्ट्रवादाचा पायाभरणी करण्याचे कार्य आर्थिक राष्ट्रवादाने केले आणि आर्थिक राष्ट्रवादातूनच सामूहिक हितसंबंधी राष्ट्रवादाचा व ब्रिटिश-विरोधी (द्वेषमूलक) राष्ट्रवादाचा उदय झाला.

ब्रिटिश राजवट भारतात वर वसाहतीवादी हेतूने राज्य करीत होती. त्यामुळे तेथील जनतेचे कल्याण करण्याचा उद्देश नव्हता. त्याच्यामुळे ब्रिटिशांची धोरणे ही ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीचा नफा, ब्रिटनमधील उद्योगांची वाढ, जनतेची प्रगती व सुबत्ता या उद्दिष्टांना अनुसरून ठरत होती. त्याचा विपरीत परिणाम भारतीय अर्थव्यवस्थेवर होत होता. भारतीय अर्थव्यवस्थेमधील स्वयंपूर्णता नष्ट झाली. त्याची पारंपारिक अर्थरचना विस्कटून ती ब्रिटिश अर्थव्यवस्थेची गुलाम बनली. ब्रिटिश मालाची जंगी बाजारपेठ व ब्रिटिश उद्योगासाठी कच्चा मालाचा स्त्रोत असे स्वरूप भारताला प्राप्त झाले. भारतात तत्कालीन उदयास येणाऱ्या उच्चशिक्षित अभिजन

वर्गाला ब्रिटिशांचे धोरणे व त्यामधून होणारी भारतीयांची प्रचंड लूट त्यांच्या लक्षात आली. त्यांनी ब्रिटिश वसाहतवादी धोरणाविरूद्ध आवाज उठविण्यास सुरूवात केली. मासिके, वृत्तपत्रे यांतून भारताच्या शोषणाची हकीकत पुढे आणली, भारतीय जनतेमध्ये वसाहतवादी धोरणाविरूद्ध जनजागृती केली. त्यातून भारतातील सर्वच जाति-धर्माचे लोक आर्थिक हितसंबंधातून एकत्र आले. ब्रिटिश वसाहतवादाविरूद्ध लढा उभारला. त्यातूनच आर्थिक राष्ट्रवाद आकाराला आला. आर्थिक राष्ट्रवादाची मांडणी सुरूवातीस रामकृष्ण विश्वनाथ, भास्कर पांडुरंग तडखकर, दादाभाई नवरोजी, रमेशचंद्र दत्त, रजनी पाम दत्त, न्यायमूर्ती एम. जी. रानडे, गोपाळ कृष्ण गोखले इत्यादी बुद्धिजिवींनी केली.

**आर्थिक राष्ट्रवादाची मांडणी :**

ब्रिटिशांचे वसाहतिक शोषण व त्याची दुष्परिणाम याबद्दलचे लेखन सर्वप्रथम रामकृष्ण विश्वनाथांच्या इ. स. १८५१ मध्ये प्रसारित झालेल्या 'हिंदुस्तान की प्राचीन व सांप्रती स्थिती व पुढे याचा काय परिणाम होणार' यामध्ये आलेली आहे. परंतु त्याची व्यवस्थित मांडणी रजनी पाम दत्त यांच्या 'इंडिया टुडे' या पुस्तकामध्ये मिळते. दत्त यांनी वसाहतवादी शोषणाच्या प्रामुख्याने तीन अवस्था सांगितल्या आहेत. व्यापारवादी वसाहतवाद (इ. स. १७५७-१८१३), मुक्त व्यापारातून वसाहतिक शोषण (इ. स. १८१३-१८५८) आणि भांडवल गुंतवणुकीचा वसाहतवाद (इ. स. १८५८ नंतरचा काळ)[२] रमेशचंद्र दत्त यांनी आपल्या 'इकॉनॉमिक हिस्टरी ऑफ इंडिया' या पुस्तकाच्या पहिल्या भागात भारतीय दारिद्र्याची तीन कारणे सांगितलेली आहेत - १) ब्रिटिश सरकारने उद्योगधंदे व शेती यांना उत्तेजन न देता त्याची गळचेपी केली. २) अयोग्य करनिर्धारण तत्त्वाचा पाठपुरावा केला. ३) ईस्ट इंडिया कंपनीच्या काळापासून ब्रिटिश सरकारने मायदेशात भारतातून बेसुमार पैसा नेला. (होम चार्जेस)[३] भारताच्या आर्थिक शोषणास रेल्वेही कारणीभूत असून 'रेल्वे ही ब्रिटिश व्यापाऱ्यांना दिलेली सबसिडी आहे', असे मत रमेशचंद्र दत्त यांनी मांडले.

दादाभाई नवरोजी यांनी ब्रिटिश साम्राज्यवादाचे खरे स्वरूप जगासमोर उघड केले आणि भारतीय आर्थिक राष्ट्रवादाचा पाया रचला. कार्ल मार्क्सने भांडवल-शाहीची मीमांसा किंवा पृथक्करण केले आणि तिच्या रचनेतच तिच्या विनाशाची बीजे कसे आहेत ते शोधून काढले. त्याचप्रमाणे या भांडवलशाहीतून निर्माण

होणारी आर्थिक साम्राज्यशाही किती भयानक आहे व तिच्या रक्तशोषणातच तिच्या विनाशाची बीजे कशी आहेत हे दादाभाईंनी जगापुढे मांडले.[४] दादाभाई नवरोजी यांनी आपल्या 'Povertly Un British Rule in India' या ग्रंथात त्यांनी ब्रिटिशांच्या आर्थिक शोषणाची सविस्तर मांडणी करून भारताच्या दारिद्र्यास ब्रिटिश राजवट कशी जबाबदार आहे ते विशद केले. या पुस्तकात त्यांनी आर्थिक निस्सारणाचा (Diain Theory) सिद्धांत मांडला.

ब्रिटिश साम्राज्यवादाने भारताचे आर्थिक शोषण दोन प्रकारे केले. एक राजकीय आणि दुसरे व्यापारी किंवा औद्योगिक होय. भारताच्या राजकीय, आर्थिक शोषणात प्रमुख खर्च हा होम चार्जेसचा (Home Charges) होता. पूर्वी ईस्ट इंडिया कंपनीच्या युद्ध मोहिमा व येथील उठावांना मोडून काढण्यासाठी झालेला खर्च यामुळे ब्रिटिशांचे भारतावरील कर्ज अगोदरच वाढले होते. इ. स. १८५८ नंतरचा भारताचा कारभार ईस्ट इंडिया कंपनीकडून ब्रिटिश पार्लमेंटच्या नियंत्रणाखाली आला. यासाठी स्वतंत्र कौन्सिल करण्यात आले. सेक्रेटरी ऑफ स्टेटची नेमणूक करण्यात आली. त्यास जबाबदार व्हाईसरॉय ठेवण्यात आले. त्यामुळे आता पूर्वीच्या कंपनीच्या भागधारकाच्या नफ्याची जागा आता भारत सचिवाच्या व इंडिया ऑफिसच्या खर्चाने घेतली. इंडिया ऑफिसच्या इंग्लंडमधील अधिकाऱ्यांच्या व भारतातील अधिकाऱ्यांचा पगार व पेन्शन हे भारतीय तिजोरीतून द्यावा लागत असे. इंग्लंडमध्ये घेतलेल्या सैनिकी साहित्य, भंडार, सैनिकी प्रशिक्षणाचा खर्च भारतात व भारताबाहेर होणारी सैन्य अभियानवरील खर्च हा भारतीय तिजोरीतूनच द्यावा लागत असे. त्याचबरोबर रेल्वे मार्गासाठी गुंतवलेले व्याजसुद्धा द्यावे लागत असे. या पगागाची, खर्चाची, व्याजाची रक्कम ही पौंडमध्ये द्यावी लागत असल्यामुळे भारताच्या एकूण उत्पन्नाचा अर्धा हिस्सा हा होम चार्जेसच्या नावाखाली ब्रिटनला जात होता. हा सर्व खर्च पौंडमध्ये द्यावा लागत असल्यामुळे पौंड स्टुगलिंगमुळे भारताच्या तिजोरीवर अधिकच भार पडत होता. अशा प्रकारे भारतीयांचे राजकीय स्वरूपातून आर्थिक शोषण होत होते.

दुसऱ्या प्रकाराचे आर्थिक शोषण व्यापारी किंवा औद्योगिक स्वरूपाचे होते. भारतात ब्रिटिशांचा होणारा व्यापार हा सुरूवातीपासूनच आयातीपेक्षा निर्यातही जास्त होती परंतु जो भारतीय निर्यातीतून मिळणारा नफा आपणास न मिळता तो ब्रिटिशांना मिळत होता. म्हणजेच भारताची निर्यात वाढविणे हे भारतीयांच्या आर्थिक

शोषणाची कळ होती. भारतातील निर्यात वस्तू जेव्हा जहाजावर टाकली जाई तेव्हा त्या वस्तूची सूची केली जाई. त्यावर भारतीय किंमत नोंदविली जायची. ती रूपयांमध्ये असायची. ब्रिटनच्या बाजारात हाच माल पौंडमध्ये विकायचा. मिळणारा नफा ब्रिटिशांनाच मिळत असे. त्यासच दादाभाईंनी भारतीयांचे व्यापारातील आर्थिक निःसारण म्हटले आहे. व्यापारावर मिळालेला नफा पुन्हा भांडवलरूपाने भारतात येतो आणि भारतीय लोकांची अधिक लूट करून अनेक पटींनी परत ब्रिटनला जातो हे आर्थिक निसर्गाचे चक्र एकसारखे सुरू असते. त्यासाठी दादाभाईंनी इ. स. १८५७ ते १८७१ पर्यंतच्या कालावधीचा लुटीचा तपशील मांडला व त्याची दाहकता पुढील विधानात सांगतात "जो द्रव्यापहार या दशकाच्या प्रारंभी दर साल तीस लक्ष पौंड होता तो आज दर साल तीन कोटी पौंड झाला आहे. महम्मद गझनीने १८ स्वाऱ्या करून अठरा वेळा हिंदुस्थान लुटला, असे इतिहासतज्ज्ञ म्हणतात पण त्याने या सर्व स्वाऱ्यांत लुटून नेलेली एकूण संपत्ती ही तुम्ही इंग्रज एका वर्षातून लुटून नेता तितकी होऊ शकली नाही. शिवाय त्याने हिंदुस्थानाची जखम केली ती निदान अठराव्या घावानंतरही बंद झाली पण तुम्ही जे घाव घालता व त्यामुळे जो रक्तपात होत आहे त्यांना अन्तच नाही. ज्याप्रमाणे ऋतुपरंपरा नियमितपणे चालू असते त्याचप्रमाणे आम्ही जगलो किंवा मेलो तरी आम्ही निपजलेल्या धनापैकी तीन कोटी पौंडचे धन दरसाल देशातून बाहेर धाडलेच पाहिजे."[५]

आर्थिक शोषणासोबत ब्रिटिशांनी भारतीयांचे नैतिक शोषणही केले आहे. नैतिक शोषण दोन मार्गांनी झाले आहे. पहिला मार्ग म्हणजे भारतातील प्रशासकीय सेवेतील वरिष्ठ पदावर ब्रिटिश अधिकाऱ्यांची नेमणूक केली जाते. त्यांना भरपूर वेतन व सुविधा दिल्या जातात. भारतीय लोकांची नेमणूक दुय्यम दर्जाच्या पदावर केली जाते. दुसरी नैतिक लूट म्हणजे भारतातील प्रशासकीय सेवेतील वरिष्ठ पदावर नेमणूक केलेल्या ब्रिटिश अधिकाऱ्यांना प्रशासकीय अनुभव मिळाल्यानंतर त्यांची बदली इंग्लंडमध्ये केली जाते म्हणजे भारतीय तिजोरीतून खर्च केलेल्या पैशातून अनुभव द्यायचा व त्या अनुभवाचा फायदा इंग्लंडमध्ये करून घ्यायचा. ब्रिटिशांच्या या धोरणाची जाणीव व्हावी म्हणून १८९४ साली दादाभाईंनी ब्रिटिश पार्लमेंटमध्ये केलेल्या भाषणात पुढील विधान केले- "सनदी सेवेवर खर्च केल्या जाणाऱ्या पैशाचा भारतीयांना कवडीचादेखील लाभ होत नाही. हिंदुस्थानात अनुभवी अधिकारी

नेमतात. अनुभव प्राप्त केल्यानंतर त्यांची रवानगी इंग्लंडला केली जाते."[६] अशा प्रकारे ब्रिटिशांनी भारतीयांचे आर्थिक आणि नैतिक शोषण कसे केले याची मांडणी आर्थिक राष्ट्रवादाद्वारे दादाभाई नवरोजींनी केली.

दादाभाई नवरोजी यांच्यानंतर रजनी पाम दत्त यांच्या 'इंडिया टुडे' आणि एम. जी. रानडे यांचा 'Essays on Indian Economics' या ग्रंथांनीही आर्थिक राष्ट्रवादाच्या विकासास हातभार लागला.[७] रानडे वसाहतवादाचे दुष्परिणाम सांगताना लिहितात... "हिंदुस्थान देशावर ब्रिटिश लोकांचे केवळ राजकीय प्रभुत्व नसून औद्योगिक प्रभुत्व स्थापन झाले आहे आणि हे एकदम डोळ्यांत न भरणारे औद्योगिक प्रभुत्व परिणामाच्या दृष्टीने देशाला फारच अधिक हानिकारक असते. त्याच्या योगाने राष्ट्रीय जीवनाच्या सर्व शक्तीच नष्ट होतात आणि तो देश विकलांग होतो."[८] रानडे यांचे शिष्य गोपाळकृष्ण गोखले यांनाही आर्थिक प्रश्नाची चांगलीच जाण होती. त्यांनीही भारतीय आर्थिक समस्यांचे निराकरण करण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या मते "भारतीय शेतकरी दोन्ही बाजूंनी नागवला जात आहे, एका बाजूने सावकार शेतकऱ्याचे शोषण करतो तर दुसऱ्या बाजूला सरकार कराचा बोजा वाढवित शेतकऱ्यांच्या शोषणाला हातभार लावते."[९] गोखले यांनी १९०२ च्या केंद्रीय कायदे मंडळातील मांडलेल्या शिलकी अंदाजपत्रकावर ताशेरे ओढून सरकारला उपयुक्त सूचना सांगितल्या होत्या.

जहालवादी बिपिनचंद्र पाल, लाला लजपतराय आणि लोकमान्य टिळक या नेत्यांनीही परकीय मालावर बहिष्कार आणि स्वदेशी या तत्त्वाच्या आधारे लोकांना आर्थिक प्रश्नावर जनआंदोलनात उतरविण्याचा प्रयत्न केला.[१०] ब्रिटिशांच्या आर्थिक शोषणास प्रतिकार करण्यासाठी स्वदेशी व बहिष्कार या दोन शस्त्रांचा वापर करून राष्ट्रीय चळवळीला बळकटी दिली. स्थानिक भाषेतील वृत्तपत्रांतून सरकारच्या धोरणांवर सडकून टीका केली. महात्मा गांधी यांनीही आपल्या सर्वसमावेशक राष्ट्रवादामध्ये आर्थिक राष्ट्रवादाला विशेष स्थान दिले होते. गांधीजींचा विश्वास नुसता स्वदेशीवरच नव्हता तर त्यांच्या मते "स्वयंपूर्णता आणि स्वावलंबन हेच आपल्याला स्वातंत्र्य मिळवून देणार आहेत यावर होता."[११] त्याकरिताच त्यांनी खादीची आणि चरख्याचे अर्थकारण मानले. श्रमदान, स्वावलंबन, शेतीचा विकास, चरखा आणि खादी यामुळे राष्ट्रीय चळवळीची नाळ ही सामान्य माणसासोबत जोडली गेली. त्यामुळे भारतीय

राष्ट्रवाद सर्वसमावेशक व व्यापक बनत गेल्याचे आपल्याला दिसून येते. स्वतंत्र भारतामध्ये नेहरूंनी आधुनिकता, औद्योगीकरण, विकास आणि नियोजन या आर्थिक बाबींवर अतिरिक्त भर दिलेला दिसून येतो. अशा प्रकारे आर्थिक राष्ट्रवादातूनच भारतीय राष्ट्रावादाची जडणघडण झाली.

**निष्कर्ष :**

(१) आर्थिक राष्ट्रवादातूनच भारतीय राष्ट्रवादाची पायाभरणी झाली.

(२) भारतीय आर्थिक राष्ट्रवादाची मांडणी रामकृष्ण विश्वनाथ, रमेशचंद्र दत्त, दादाभाई नवरोजी, एम. जी. रानडे, रजनी पाम दत्त, गोपाळ कृष्ण गोखले आदी बुद्धिजिवी नेत्यांनी केली.

(३) आर्थिक राष्ट्रवादाच्या मांडणीतून भारतीय स्वातंत्र्यलढ्याला एक वैचारिक अस्त्र मिळाले.

(४) भारतीय राष्ट्रवादाच्या विकासामध्ये आर्थिक राष्ट्रवाद हा महत्त्वाचा धागा राहिला आहे.

(५) आर्थिक राष्ट्रवादातूनच भारताचा सामूहिक हितसंबंधी राष्ट्रवाद व ब्रिटिश विरोधी द्वेषमूलक राष्ट्रवाद उभा राहिला.

**संदर्भ :**


(१) देशमुख सुधाकर, राष्ट्र आणि राष्ट्रवादी संकल्पना आणि विकास, पद्‌मगंधा प्रकाशन, एरंडवन, पुणे, २००९, पृ. १३५.

(२) सरकार सुमित, आधुनिक भारत, राजकमल प्रकाशन, नई दिल्ली, १९९३, पृ. ४१-४२.

(३) https://mr.vikaspedia.in/education/

(४) जावडेकर शं. द., आधुनिक भारत, सुलभ राष्ट्रीय ग्रंथमाला, टिळक रोड, पुणे, १९५३, पृ.११६.

(५) उपरोक्त, पृ. १२१.

(६) पाटील महेंद्र, भारतीय राजकीय विचारवंत, विद्या बुक्स पब्लिशर्स औरंगपुरा, औरंगाबाद, २०१९, पृ. १२१.

(७) खराडे डी. पी. (संपा.), भारतीय राष्ट्रवादाचा उदय, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, दूर शिक्षण केंद्र, पृ. ९.

(८) उपरोक्त, जावडेकर शं. द., आधुनिक भारत, पृ. १३४.

(९) उपरोक्त, पाटील महेंद्र, भारतीय राजकीय विचारवंत, पृ. १२७.

(१०) उपरोक्त, देशमुख सुधाकर, राष्ट्र आणि राष्ट्रवादी संकल्पना आणि विकास, पृ. २९४.

(११) उपरोक्त, पृ. २९५.


❍❍❍

६

# निजाम राज्यातील शिवलिंग देशमुख व रामराव ऊर्फ जंगबहाद्दुरचा लढा

**डॉ. एम. डी. दामाजीवाले**

स्वामी विवेकानंद महाविद्यालय, शिरूर ताजबंद, जि. लातूर

मोगल बादशहा औरंगजेबाच्या मृत्यूनंतर निर्माण झालेल्या अंतर्गत कलहाचा फायदा घेऊन दक्षिण भारतात हैद्राबाद या ठिकाणी मीर कमरूद्दीन ऊर्फ निजाम-उल-मुलकने स्वतंत्र राज्य निर्माण केले. हेच राज्य पुढे निजाम राज्य म्हणून ओळखले जाते. या राज्याच्या स्थापनेपासूनच सरकारच्या दडपशाही, अन्याय, अत्याचारी धोरणांमुळे जनतेत असंतोष होता. निजामाची राजसत्ता ही सरंजामशाही स्वरूपाची होती. लोककल्याण हे या संस्थेचे उद्दिष्ट नव्हते. सत्ताकांक्षा या राजसत्तेचा पाया होता. सामान्य जनतेला कसलेच स्वातंत्र्य नव्हते. निजामाच्या प्रतिगामी राजवटीत अडकलेल्या सामान्य जनतेला प्रगतीपासून दूर राहावे लागले. निजामी राजवटीत सामाजिक, धार्मिक, आर्थिक विषमता होती. राजकीय जीवनात इस्लाम धर्मीयांना प्राधान्य होते. निजामाचे धार्मिक धोरण हिंदूंना मारक तर इस्लामांना तारक होते. निजामाच्या अन्यायी, अत्याचारी आणि भ्रष्ट राजवटीविरूद्ध निजामाच्या राज्यातील जनतेने अनेक वेळा लहान-मोठे उठाव केले. याला आजच्या मराठवाड्यातील लातूर जिल्ह्यातील उदगीर परिसर (पूर्वी बीदर, उस्मानाबाद जिल्हा) अपवाद नव्हता. उठाव करणारे हे सामान्य लोक, बंजारी, हटकर, भिल्ल, देशमुख, देशपांडे व समाजातील उपेक्षित वर्गातील होते. त्यांच्या उठावात संघटन नव्हते. त्यात त्यांना यश मिळेल तेवढी ताकद नव्हती पण अन्याय, अत्याचाराचा प्रतिकार करण्याचे तेजस्वी स्फुल्लिंग मात्र निश्चित होते. त्यांनी ठेवलेला प्रतिकाराचा वारसा पुढील पिढ्यांना प्रेरणादायी ठरला व त्यातूनच १७ सप्टेंबर १९४८ रोजी निजामाची जुलमी राजवट नष्ट झाली. प्रस्तुत शोधनिबंधात निजामाविरूद्ध उदगीर परिसरातील शिवलिंग देशमुख

व रामराव ऊर्फ जंगबहाद्दुर यांनी निजामाची भ्रष्ट, जुलमी राजवट नष्ट करण्याचा प्रयत्न केला याचा अभ्यास केला आहे.

हैद्राबाद राज्यात खऱ्या अर्थाने इ. स. १९३० पासून राजकीय व सामाजिक प्रबोधन सुरू झाले. असे असले तरी निजाम राजवटीच्या स्थापनेपासून राजकीय सत्ता संघर्षामुळे व इस्लाम धर्माच्या वाढत्या हस्तक्षेपामुळे जनतेत असंतोष होता. त्यात भर पडली ती निजामाने इंग्रजांशी १२ ऑक्टोबर १८०० मध्ये तैनाती फौज पद्धतीचा तह केल्यामुळे.[१] त्यामुळे निजाम इंग्रजाच्या अंकित झाला. त्याचे राज्य हे नेहमीसाठी संरक्षित बनले. त्यामुळे निजामाने हुकूमशाही, दडपशाही धोरणाचा अवलंब केला. प्रारंभीपासूनच जनतेला निजामाच्या धोरणाला बळी पडावे लागले. १८१३ मध्ये इंग्रजांनी निजामाच्या काही फलटणी तयार केल्या. यांनाच "हैद्राबाद कॉन्टिजेन्ट" असे नाव देण्यात आले. यात सैन्यभरती करणे, प्रशिक्षण देणे या केंद्रावर रेसिडेंटचे नियंत्रण असे.[२] या सैन्याचे केंद्र सिकंदराबादजवळ बोलाराम येथे ठेवण्यात आले. मराठवाड्यातील "हैद्राबाद कॉन्टिजेन्ट" च्या सैनिकी तुकड्या जालना, औरंगाबाद, अंबाजोगाई (मोमिनाबाद) व हिंगोली येथे तैनात करण्यात आल्या. त्यामुळे निजामाविरूद्ध झालेल्या सर्व बंडाला किंवा लढे मोडून काढण्याचे काम या सैन्याद्वारे निजामाला शक्य झाले. राज्याची व प्रजेची दुःखे दूर करून प्रगती करणे आवश्यक होते पण याकडे दुर्लक्ष केले. उलट निजामाला इंग्रजाचे संरक्षण मिळाल्याने लोककल्याणाकडे त्याने दुर्लक्ष केले. निजामाच्या अन्याय, अत्याचाराला विरोध केला की निजामाच्या नावाने इंग्रज विरोध दडपून टाकत असत. इंग्रजांनी निजामाविरूद्धची बंडे मोडून काढली नसती तर निजामाचे राज्य १५० वर्षांपूर्वीच रसातळाला गेले असते.[३]

**उस्मानाबाद (लातूर) जिल्ह्यातील उठाव :**

निजाम व इंग्रजी राज्यकर्त्यांच्या धोरणामुळे मराठवाड्यातील जनतेत प्रचंड असंतोष धुमसत होता. बीड जिल्ह्यातील धर्माजी प्रतापराव गर्जे, नांदेड जिल्ह्यातील हटकर बंधूंनी जशा प्रकारे सरकारविरूद्ध उठाव केले तसेच उस्मानाबाद (लातूर) जिल्ह्यातील उदगीरच्या परिसरातील शिवलिंग देशमुख आणि रामराव ऊर्फ

जंगबहाद्दुर यांनी सरकारविरूद्ध बंड आणले. इ. स. १८१९-१९२० मध्ये शिवलिंग देशमुखांनी सरकारविरूद्ध उठाव केला तर इ. स. १८५९ मध्ये रामराव ऊर्फ जंगबहाद्दुरचे सरकारविरूद्धचे कट-कारस्थान महत्त्वाचे मानले जाते.

**शिवलिंग देशमुखांचे बंड (१८२०) :**

इ. स. १८०३ मध्ये निजाम अली मृत्यू पावला. त्यानंतर हैद्राबादचा शासक तिसरा निजाम म्हणून निजाम अलीचा मुलगा वारसा हक्कप्रमाणे सत्तेवर आला. तो व्यसनी व निर्बुद्ध होता. त्याने राज्याच्या कारभाराकडे पित्याप्रमाणेच दुर्लक्ष केले.[४] एवढेच नव्हे तर निजामाने इंग्रजांशी केलेल्या तैनाजी फौजेच्या तहामुळे इंग्रजाचे निजामाच्या प्रशासनावर वर्चस्व वाढत गेले. इ. स. १८०४ मध्ये निजामाचा दिवाण अरिस्मोजाह मरण पावला. त्याच्या जागी मीर आलमची नियुक्ती झाली. तो इंग्रजाशी एकनिष्ठ होता. निजामाला इंग्रजांचा वाढता हस्तक्षेप आवडत नसे पण दिवाण इंग्रज-धार्जिणे असल्याने त्याने शासनाची सूत्रे आपल्याकडे ठेवण्यासाठी धडपड चालविली. त्याच्या मृत्यूनंतर पेशकार म्हणून काम पाहणारा राजा चंदुलालच्या हाती सत्ता गेली. त्याने आपल्या मनाप्रमाणे दिवाणीचे अधिकार वापरून भ्रष्टाचारी राजवट निर्माण केली. या संदर्भात सर जॉन के यांनी तत्कालीन प्रशासनाचे स्वरूप विशद केले आहे. “सर्व प्रशासन सडलेले असून त्यात असंख्य दोष होते. भ्रष्टाचाराशिवाय कशाचीही भरभराट होत नव्हती. शासन केवळ नावाचे उरलेले आहे.”[५] प्रशासनाची सर्व सूत्रे चंदुलालद्वारा ब्रिटिशांच्या हाती गेली होती. राजा चंदुलाल इंग्रजधार्जिणा असल्याने प्रशासन ब्रिटिशांच्या मर्जीप्रमाणे चालत असे. इ. स. १८०८ ते १८४३ या काळात हैद्राबादचा दिवाण चंदुलालने इंग्रजांच्या प्रत्येक मागणीला होकार दिला. रेसिडेंटच्या आश्रयाने झालेल्या पामर कंपनीचे बस्तान बसले. चंदुलालने या कंपनीकडून अनेक वेळा कर्ज काढून निजामांच्या अडचणी भागविल्या. दिवसेंदिवस कर्ज वाढत गेले. मराठवाड्यातील आर्थिक परिस्थिती गंभीर बनत गेली. सर्वत्र अस्थिरता व अशांतता निर्माण झाली. सरकारी धोरणाविरूद्ध उदगीर येथे शिवलिंग देशमुख यांनी सरकारविरूद्ध बंड पुकारले. शिवलिंग देशमुखांचे बंड मोडून काढण्यासाठी १७० घोडेस्वारांची एक तुकडी उदगीर येथे पाठवून उदगीरचा ताबा घेऊन परिस्थितीवर नियंत्रण प्रस्थापित करण्याचे आदेश दिले.[६]

शिवलिंग देशमुखांनी निजाम सरकारविरूद्ध बंड करून उदगीरचा किल्ला व आजूबाजूच्या प्रदेशावर आपला प्रभाव निर्माण केला. हे बंड मोडून काढण्यासाठी ले जॉन सदरलँड उदगीरला आला. त्याने समझोता घडवून आणण्याचा प्रयत्न केला. एक पत्र पाठवून शिवलिंग देशमुखाला आपल्या तळावर येण्याची विनंती केली पण देशमुख यांनी ती फेटाळून लावली. त्यामुळे ले जॉन सदरलँड याने २४ डिसेंबर रोजी आपल्या लष्करासह सुल्लाळी गावाकडे आपला मोर्चा वळविला. त्या वेळी त्यास किल्ल्यावरील देशमुखांच्या पहिल्या फळीच्या सैनिकाकडून प्रतिकार झाल्याने त्यास पुढे जाता आले नाही. त्याने परत देशमुखांना निरोप पाठविला. ही तुकडी त्याला त्याच्या गुन्ह्याची शिक्षा देण्यासाठी आलेली नसून स्थानिक सरकारी अधिकारी जो तालुकादार, त्याची त्या पदावर त्यांनी पुन्हा स्थापना करावी व त्यांच्या सैन्याने शस्त्रे खाली ठेवावेत हे सांगण्यासाठी आली आहे. २४ डिसेंबर रोजी सुल्लाळी गावाजवळील घळीत उतरून देशमुखांच्या टेहळणी पथकावर सदरलँडने हल्ला केला. प्रतिकार करू पाहणाऱ्या देशमुखांच्या सैन्यास धुळीस मिळविले. तेव्हा त्याच्या मदतीला सैन्याची दुसरी तुकडी आल्यामुळे सदरलँड याने माघार घेऊन देशमुखांच्या सैन्यावर पाठीमागून हल्ला केला. तेव्हा एकच गोधळ निर्माण झाला. किल्ल्याचा द्वारपाल यांनी किल्ल्याचे दरवाजे बंद केले. ले जॉन सदरलँडच्या घोडेस्वारांनी तटबंदीखाली जमा होऊन पिस्तुलाने बुरूजावरील अनेक सैन्य मारले गेले. माचीवरून गोळीबार करणाऱ्या सैनिकांच्या गोळया आम्ही बुरूजाच्या तळाशी असल्याने आम्हाला न लागता आमच्या डोक्यावरून जात असे.[७] असे ले जॉन सदरलँडने लिहून ठेवले आहे. या चकमकीत बरेच लोक मारले गेले. काही जखमी झाले, काही दरीमध्ये पळून गेले तर काहींनी जवळच्या घरांत आश्रय घेतला. या दंग्यात शिवलिंग देशमुखांचा एक पुढारी मालजी कोल्का (मालोजी कोलते) हा वीर योद्धा मारला गेला. अंधाराचा फायदा घेऊन ले जॉन सदरलँडपुढे आपला निभाव लागत नाही हे ओळखून शिवलिंग देशमुखांनी गोजेगाव येथील मेघश्याम या दरोडेखोरांच्या गढीत आश्रय घेतला. ही गढी उंच मजबूत व तटबंदीयुक्त होती. गढीत मेघश्याम राहात होता. ले जॉन सदरलँडजवळ भक्कम सैन्य व दारूगोळा नसल्याने त्याने गोजेगावच्या गढीवर हल्ला केला नाही.

पण आजूबाजूच्या प्रदेशावर २४ ते ३१ डिसेंबर या कालावधीत सुल्लाळी, हातनूर, गोजेगाव आणि बतीनगाव या गढ्या घेऊन या प्रदेशावर ताबा मिळविला. अशा रीतीने ले जॉन सदरलँडने शिवलिंग देशमुखांचे बंड मोडून काढले.[८]

ले जॉन सदरलँडने उदगीरच्या शिवलिंग देशमुखने केलेली बंडाळी योग्य रीतीने मोडून काढल्यामुळे ब्रिटिश रेसिडेन्सीने पत्र पाठवून अभिनंदन केले व निजामी राज्यात धोका करू पाहणाऱ्या बंडखोरांना नष्ट करण्याची त्याला मोकळीक दिली.

**रामराव ऊर्फ जंगबहाद्दुरचे कारस्थान (१८५९) :**

शिवलिंग देशमुखांचा बंडाचा बीमोड केला असला तरी सरकारने राज्यात फारशा सुधारणा केल्या नाहीत. संपूर्ण देशात ब्रिटिशांच्याविरूद्ध असंतोष निर्माण झाला होता. याला हैद्राबाद राज्य हे अपवाद नव्हते. ब्रिटिशविरोधी १८५७ साली उठाव झाला. या उठावाचे पडसाद हैद्राबाद राज्यात उमटले. ब्रिटिशांच्या व निजामांच्या राजवटीविरूद्ध रामराव ऊर्फ जंगबहाद्दुर या व्यक्तीने आपण सातारचा राजा आहोत असे भासवून उस्मानाबाद, बीदर जिल्ह्यांत ब्रिटिशांविरूद्ध हिंदू, मुसलमान, अरब आणि पठाणांचे संघटन करून उठाव करण्याचा प्रयत्न केला पण त्याला यात यश आले नाही. याबाबत 'हैद्राबाद अफेअर्स' या पुस्तकातील बंड प्रकरण पान क्रमांक २३३ वर तत्कालीन वर्तमानपत्रात खालील मजकूर सापडतो. 'इंग्लिशमण' ३ मे १८५९ हैद्राबादहून खालील बातमी आहे. "स्वतःला सातारचा राजा म्हणविणाऱ्या इसमास कॅप्टन मेर यांनी पकडले आहे."[९] यावरून बीदर जिल्ह्यात व लातूरच्या परिसरात रामराव ऊर्फ जंगबहाद्दुरने सातारचे राज्य ब्रिटिशांकडून परत घेण्याकरिता कट रचला होता हे स्पष्ट दिसून येते. १८६७ मध्ये रामराव ऊर्फ जंगबहाद्दुर या व्यक्तीस जिल्हा बीदर मुक्कामी पकडण्यात आले. त्याचे साथीदार व त्यांच्यावर फौजदारी खटला दाखल करण्यात आला. या खटल्याचा निकाल लवकर लावून आरोपीला शिक्षा देण्याची मागणी रेसिडेंटने केली. रामराव ऊर्फ जंगबहाद्दुर मूळचा सातारचा होता. छत्रपतींच्या सांगण्यावरून ब्रिटिश व निजाम सत्तेविरूद्ध लोकांना चिथावणी देऊन सैन्य उभा करीत होता. लातूरचा नेकराम टेलर, बाजीराव पाटील,

औश्याचा पाटील हे त्याला सहकार्य करीत होते. त्याने उठाव केल्याचे संदर्भ उपलब्ध असून त्यात अनेक लोकांच्या सहभागाच्या नोंदी आहेत. निलंगा तालुक्यातील विठोजी यांनी केलेल्या चळवळीची ब्रिटिशांना नोंद घ्यावी लागली. इंग्रजांनी विठोजी खंडोजीला पकडून औरंगाबाद येथील क्रांती चौकात तोफेच्या तोंडी दिले तर ७२ सैनिकांचे नेतृत्व करणारे फिदा अली यांचे कोर्ट मार्शल झाले.[१०]

रामराव ऊर्फ जंगबहाद्दुरवर सरकारच्या विरोधात युद्ध करण्याच्या हेतूने फौजफाट्याची तयारी करणे हा आरोप होता. त्याने बीदर जिल्हा फिरून फौज जमा करण्याकरिता लोकांना ठिकठिकाणी छत्रपतींचा शिक्का असलेले कौलनामे देऊन आपल्या नोकरीत घेतले. मौजे अष्टे तालुका राजुरा (आष्टा, ता. अहमदपूर) येथील गढी ताब्यात घेऊन बांधायला घेतला, असा आरोप रामरावांवर ठेवण्यात आला. या खटल्यात अनेक साक्षीदारांच्या जबानी घेण्यात आल्या. भीमराव यशवंत नाईकवाडी, जहागीर अली, वीरभद्रप्पा, बाळकृष्ण, विठोबा गोविंदराव कुलकर्णी यांच्या जबान्या घेतल्या.[११] अहमदपूर, उदगीर, चाकूर या परिसरात गोसावी वेशात फिरून फौज गोळा करण्याची खटपट चालविली होती असे दिसते. रामराव ऊर्फ जंगबहाद्दुर निजाम व ब्रिटिश सरकारच्या विरोधात मराठवाड्यातील उस्मानाबाद (लातूर) जिल्ह्यात फौजा संघटित करून गुलामगिरीच्या शृंखला तोडण्याचा प्रयत्न केला.

इ. स. १८५८ पासून ते १८६७ पर्यंत बीदर व उस्मानाबाद या भागात अन्यायी व अत्याचारी सरकारविरूद्ध उठाव केला. या उठावात या भागातील शेकडो लोकांना सहभागी करून घेतले. शेवटी हा उठाव अपयशी ठरला. या उठावात सहभागी झालेल्या लोकांवर खटले भरून त्यांना शिक्षा देण्यात आल्या. त्यात या उठावाचा प्रमुख रामराव ऊर्फ जंगबहाद्दुर, भीमराव, बाळकृष्ण व विठोबा यांना आजन्म कारावासाची आणि काळ्या पाण्याची शिक्षा देण्यात येते, असे जाहीर केले. वीरभद्रला सोडून दिले तर बाळकृष्ण आणि विठोबा यांना दोन आणि २२ हजार रूपयांच्या चिठ्ठ्या हजर केल्यास व इतर बंडखोरांचा पत्ता लावून दिल्यास बंधमुक्त करण्याचे आश्वासन दिले.[१२]

**सारांश :**

प्रस्तुत शोधनिबंधातून निजामकालीन आजच्या लातूर जिल्ह्यातील (पूर्वीचा बीदर व उस्मानाबाद जिल्हा) परिस्थितीतून सरकारविरूद्ध झालेल्या उठावाचा आढावा घेतला आहे. निजाम राजवटीत प्रारंभापासूच राजकीय, सामाजिक व धार्मिक धोरणातील विसंगत नीतीमुळे असंतोष होता. याविरूद्ध स्थानिक जनतेने वेळोवेळी उठाव केले होते. तैनाती फौज पद्धतीमुळे निजामाबरोबरच इंग्रज सरकारचा हस्तक्षेप वाढत गेला. वेळोवेळी निजाम सरकारविरूद्ध स्थानिक जनतेने उठाव केले की, निजामाने इंग्रजाच्या तैनाती फौजेच्या मदतीने बंडाळ्या मोडून काढल्या. अशी स्थिती १८०० ते १९०० या कालखंडात होती. निजाम व इंग्रजाविरोधी झालेले हे प्रारंभिक उठावातून भविष्यातील हैद्राबाद मुक्तिलढ्याची पार्श्वभूमी तयार होत गेली. या बंडाळ्या किंवा उठावांतून प्रेरणा घेऊन हैद्राबाद मुक्तिलढ्यातील नेत्यांनी प्रखर लढा दिला. त्यातून १७ सप्टेंबर १९४८ रोजी हैद्राबाद स्वतंत्र झाला व स्वतंत्र भारतात विलीन झाला.

**संदर्भ :**


(१) भालेराव अनंत, हैद्राबादचा स्वातंत्र्यसंग्राम आणि मराठवाडा, मौज प्रकाशन,मुंबई,२००१, पृ. ६.

(२) देशमुख लक्ष्मीकांत व धारूरकर वि. ल., मुक्तिसंग्राम, म.सा.प.,औरंगाबाद, १९९८, पृ. २८.

(३) सेतु माधवराव पगडी, हैद्राबाद स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास, म.सा.प.,हैद्राबाद, १९५६, पृ. ४.

(४) सरदेसाई गो. स., ब्रिटिश रियासत, खंड-२, मुंबई, १९९३, पृ. २४१.

(५) पाठक अरूणचंद (संपा.), महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर लातूर जिल्हा, भाग-१, दर्शनिका विभाग, मुंबई, २००८, पृ. ११८.

(६) उपरोक्त, पृ. ११२-११३.

(७) सेतु माधवराव पगडी (संपा.), दी फ्रीडम स्ट्रगल इन हैद्राबाद, भाग-३ (१८५५-१९२०), हैद्राबाद स्टेट कमिटी, १९५७, पृ. १०८-१०९.

(८) उपरोक्त, पृ. २१.

(९) सेतू माधवराव पगडी, १८५७ चे आणखीन काही पैलूं, पार्श्व पब्लि., कोल्हापूर,२०२२,पृ.१४४.

(१०) उपरोक्त, पाठक अरूणचंद (संपा.), पृ. १२०.

(११) उपरोक्त, सेतू माधवराव पगडी, १८५७ चे आणखीन काही पैलूं, पृ. १४४.

(१२) उपरोक्त, पृ. १४५.


ooo



**UGC Care Listed Journal : ISSN : 0976 - 5425**

७

# संशोधन आणि अन्वयार्थ : सहसंबंध

**डॉ. ओमशिवा लिगाडे**
शिवजागृती वरिष्ठ महाविद्यालय, नळेगाव, जि. लातूर

संशोधनाचा उगम हा जिज्ञासेतून होत असतो. त्याचबरोबर त्याची निकडसुद्धा महत्त्वाची असते. म्हणूनच गरज ही शोधाची जननी आहे, असे म्हटले जाते. संशोधन ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. संशोधन हे एम.फिल., पीएच.डी. पदवीसाठी असू शकते किंवा एखादी सामाजिक शास्त्रीय समस्या सोडविण्यासाठी असू शकते. संशोधन कोणत्याही प्रकारचे असो. संशोधनाच्या प्रक्रियेमध्ये संशोधनाचा विषय निश्चित केल्यानंतर त्याची ध्येये, उद्दिष्टे ठरविली जातात. गृहीतके निश्चित केली जातात. त्या विषयाबाबतचा पूर्वसूरींनी घेतलेला आढावा घेणे आवश्यक आहे. संशोधन पद्धती निश्चित करून संशोधन विषयाशी संबंधित साधने म्हणजेच संशोधन विषयाशी संबंधित माहिती जमविणे (Data Collection) आवश्यक आहे. जमविलेल्या माहितीचे पृथक्करण करून त्या माहितीचा अन्वयार्थ लावणे हा संशोधनातील अत्यंत महत्त्वाचा टप्पा असतो. उपलब्ध माहिती व साधने याच्या आधारे संशोधक अन्वयार्थ काढत असतो. हा अन्वयार्थच संशोधनाला दिशा देण्याचे काम करतो.

**अन्वयार्थ म्हणजे काय ? :**

कोणत्याही समस्येचे अथवा संशोधन विषयाचे संशोधन करीत असताना संकलित केलेल्या माहितीचा अन्वयार्थ लावणे हे अत्यंत महत्त्वाचे असते. अन्वयार्थालाच इंटरप्रिटेशन किंवा डेटा अनालिसिस असेही म्हणतात. मध्य काळात एखादी घटना अशीच का घडली? नेमकी कशी घडली? यापेक्षा वेगळे घडू शकले असते का? यापेक्षा वेगळे घडू शकले नसते का? अशा प्रश्नांची उत्तरे दैव, नशीब, भाग्य, देवेच्छा, ईश्वर इच्छा अशा शब्दांमध्ये दिली जात असत. मात्र आता आधुनिक काळामध्ये

त्याचा वेगळ्या पातळीवर विचार करून त्यातून अन्वयार्थ काढण्यात येऊ लागला. अन्वयार्थ लावणे म्हणजे गतकालीन घटनांचे स्पष्टीकरण करणे, कार्यकारणभाव सांगणे, त्या घटनांमधून ध्वनीत होणारा अर्थ समजून घेणे व त्यातून काही सर्वमान्य बुद्धिगम्य तर्काला पटतील असे विचार मांडणे होय.[१] घटना अचानक अवतीर्ण होत नाही. त्याच्या पाठीमागे निश्चित कारणमीमांसा असते. थोडक्यात अन्वयार्थ म्हणजे माहितीचे अर्थनिर्वाचन होय.

**संशोधनात अन्वयार्थाचे महत्त्व :**

विविध स्त्रोतांद्वारे संशोधन विषयाशी संबंधित माहिती प्राप्त केल्यानंतर त्या माहितीची चिकित्सा करण्यात येते. आलेख, कोष्टके, वर्णन इत्यादी माध्यमातून माहितीचे वर्गीकरण किंवा मांडणी करावी लागते. म्हणजे हा टप्पा विश्लेषणाचा असतो. या विश्लेषणातूनच घटका-घटकांतील संबंध लक्षात येतात व सामान्यीकरणाची प्रक्रिया आरंभ होते. अनेक समान घटनांमध्ये एखादे समान सूत्र लक्षात येते आणि त्यातून सामान्यीकरणाद्वारे निष्कर्ष पुढे येतो. एखादे सूत्र, नियम, तत्त्व शोधले जाते. माहितीचा अन्वयार्थ लावण्याचा संशोधनातील हा अत्यंत महत्त्वाचा टप्पा होय. येथे संशोधकाच्या तार्किकतेची कसोटी लागत असते. म्हणजे संशोधकाला येथे घटनांना अर्थ देण्याचे काम करावे लागते.[२] या टप्प्यावर संशोधक अत्यंत सजग असणे आवश्यक आहे. कारण अन्वयार्थ हा संशोधनपर लेखनाचा मूळ आधार असतो.

संशोधनपर लेखनामध्ये आपल्या विधानाला पुष्टी देण्यासाठी अथवा आपल्या मताला अधिकृतता आणण्यासाठी अवतरणे दिली जातात. लेखनामधील आपले निष्कर्ष एखाद्या वेळेस वादग्रस्त असू शकतात. तेव्हा ते चिकित्सक वाचकांसमोर मांडताना काळजी घेणे जरूरी आहे. इतरांच्या विचारांना छेद देताना स्वतःच्या मतांमध्ये सत्यांश जास्त कसा भरलेला आहे, ही बुद्धीची कसरत करताना अवतरणाचा आश्रय घ्यावा लागतो. संशोधनपर लेखनामध्ये अवतरणे अपरिहार्य आहेत. तरीही त्याचा वापर करताना संशोधकांनी तारतम्य बाळगणे आवश्यक आहे. प्रसिद्ध संशोधक डॉ. स. ग. मालशे म्हणतात... अवतरणासाठी प्रबंध नसून प्रबंधासाठी अवतरणे असतात. याचे भान संशोधकाला असले पाहिजे. अवतरणाची

दाटीवाटी करून विद्वत्तेचे प्रदर्शन करण्यासाठी प्रबंधाचा प्रपंच नसतो तसेच इतरांच्या मताची नुसती जंत्री लावणे म्हणजे प्रबंध नव्हे.[३] घटनांचे नुसते वर्णन म्हणजे संशोधन नव्हे. घटनेचे पूर्ण आकलन होण्यासाठी त्या घटनेचे इतरही धागेदोरे धुंडाळावे लागतात. घटनेचा क्रम ध्यानात घ्यावा लागतो. घटनेचे स्पष्टीकरण म्हणजे अन्वयार्थ उलगडून पाहावा लागतो.[४] म्हणजेच घटनेतील अंतिम सत्याचा शोध अन्वयार्थ देत असतो. अन्वयार्थाचे सामान्यीकरण शक्य नसते. घटनेचा अर्थ आपण ज्या चष्म्यातून पाहू तसा लागत असतो. अशा परिस्थितीत वस्तुनिष्ठ संशोधक घटनेचा सांगोपांग विचार करून अत्यंत तटस्थपणे घटनेचा नेमका अर्थ लावण्याचा प्रयत्न करेल व तो अन्वयार्थ कदाचित व्यापक असल्याने सत्याच्या अधिक जवळ जाणारा असेल. अन्वयार्थ हे संशोधकाचे घटनेबाबतचे विश्लेषण असते, संशोधकाची ती कल्पना असते. हे विश्लेषण संशोधकपरत्वे वेगळे असू शकते. अन्वयार्थातील विश्लेषणाचा संशोधनाच्या निष्कर्षावर परिणाम होत असतो.

अवतरणे एक दशांशपेक्षा जास्त असू नयेत.[५] जेथे गरज आहे तेथेच अवतरणांचा अवलंब करावा. रूढ मताहून वेगळा विचार अथवा वादग्रस्त मुद्दा मांडावयाचा असल्यास अवतरणांचा वापर करावा. लांबलचक अवतरणे देऊ नयेत तसेच अवतरणामागून अवतरणेही देऊ नयेत. इत्यादी पथ्ये अवतरणाच्या बाबतीत संशोधकांनी पाळली पाहिजेत. संशोधनपर लेखनामध्ये स्वतःचे मत सर्वात जास्त महत्त्वाचे तर असतेच परंतु आपल्या मताच्या अनुरोधाने त्या क्षेत्रातील संबंधित विद्वानांची मते दिली गेली तर संशोधनाचा दर्जा सुधारण्यास मदत होते. संशोधकांनी एकत्र केलेल्या माहितीची सत्यता पडताळण्यासाठी अंतर्गत व बहिर्गत चिकित्सा करताना घटनेला अर्थ द्यावा लागतो. यातूनच प्रभावित माहिती हाताशी येते. त्याचा पुढे निष्कर्षासाठी उपयोग होतो. अन्वयार्थ हा संशोधनाचा गाभा असतो. म्हणून अन्वयार्थ लावताना व तो शब्दबद्ध करताना बौद्धिकशक्ती, आकलनशक्ती, कला गुण, कल्पनाशक्ती तसेच भाषेची समर्पक जाण असणे गरजेचे आहे.[६] म्हणूनच प्रा. एडवर्ड कार म्हणतात... घटिते (घटना) स्वतः बोलत नाहीत, इतिहासकार त्यांना बोलते करतो. हे विधान अन्वयार्थासाठी अत्यंत समर्पक वाटते.

संशोधनपर लेखनामध्ये अन्वयार्थ म्हणजेच संशोधकाचे स्वतःचे विश्लेषण महत्त्वाचे असते. संशोधकांच्या समोर जी माहिती आहे त्यावर विचार करून संशोधक आपले मत मांडत असतो. ते विचार एखाद्या वेळेस वेगवेगळे पण असू शकतात. तेथे संशोधकाच्या बुद्धीची कसोटी व प्रगल्भबद्धता महत्त्वाची असते. अन्वयार्थाद्वारा संशोधन विषयाचे गर्भसत्य साधार उलगडून दाखविणे आवश्यक असते. संदर्भ उद्‌धृत करण्याच्या नादात शोधकार्य करणारा संकलक नसून संशोधक आहे याचा विसर पडता कामा नये.[७] पांडित्य प्रदर्शन करण्याऐवजी अगदी सोप्या आणि स्पष्ट भाषेत अन्वयार्थाद्वारा संशोधनाचे स्फटिकत्व प्रकट झाले पाहिजे. त्यातून संशोधकाची सूक्ष्म, विश्लेषक व चिकित्सक विमर्श करणारी बुद्धी वाचकांच्या लक्षात आली पाहिजे.

**अन्वयार्थ लावताना घ्यावयाची काळजी :**

घटितांची अन्वयार्थाद्वारा मांडणी करीत असताना संशोधकाने खालील बाबी लक्षात ठेवणे आवश्यक आहेत.[८]

१) महत्त्वाचे सर्व घटिते समाविष्ट व्हावीत.

२) कालविपर्यास होणार नाही याची खबरदारी घ्यावी.

३) घटितांच्या मांडणीत सुसूत्रता असावी. एका विधानातून दुसरे विधान सहजपणे निघावे.

४) अनावश्यक तपशील टाळावा.

५) घटितांना मनाला येईल तसे वाकवू नये. संशोधकाचा अन्वयार्थ काढण्याबाबतचा चष्मा वस्तुनिष्ठ असावा.

६) घटिताशी संबंधित भाषा व लिपी याची जाणीव संशोधकाला असणे आवश्यक आहे अन्यथा इतर तज्ज्ञांची मदत घ्यावी.

वरील बाबी लक्षात ठेवून संशोधकांनी संशोधनकार्य केले तर, संशोधन-कार्याच्या निश्चित निष्कर्षापर्यंत पोहोचविण्याचा मार्ग मोकळा होतो.

**निष्कर्ष :**

१) अन्वयार्थ हा संशोधनाचा गाभा असतो. अन्वयार्थाशिवाय संशोधन होऊच शकत नाही.

२) अन्वयार्थ हे संशोधकाचे घटनेबाबतचे स्वतःचे विश्लेषण असते.

३) घटना बोलत नसते तर संशोधक अन्वयार्थाद्वारे घटनांना बोलते करीत असतो.

४) घटनेचा अर्थ आपण ज्या चष्म्यातून पाहू तसा लागत असतो.

५) भाषा व लिपीचा अर्थ कळल्याशिवाय घटनेचा अन्वयार्थ लावता येत नाही.

६) अन्वयार्थ लावताना व तो शब्दबद्ध करताना संशोधकाच्या बौद्धिकशक्ती, आकलनशक्ती, कलागुण, कल्पनाशक्ती यांची कसोटी लागत असते.

७) घटनेतील अंतिम सत्याचा शोध अन्वयार्थ देत असतो.

८) अन्वयार्थाचा परिणाम संशोधनाच्या निष्कर्षावर होत असतो. अन्वयार्थ जर चुकीचा निघाला तर संशोधनाचा निष्कर्षपण चुकतो.

**संदर्भ :**


१) देव प्रभाकर, इतिहास एक शास्त्र, कल्पना प्रकाशन, नांदेड, २००२, पृ. १६७.

२) बरकले रामदास व इतर, ऐतिहासिक संशोधन पद्धती, पुष्प दुसरे, कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक, २००५, पृ. ३७.

३) उपरोक्त, पृ. ३५.

४) उपरोक्त, देव प्रभाकर, पृ. १६५.

५) कपले आर. डी., स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांचे भाई किशनराव देशमुख महाविद्यालय, चाकूर, जि. लातूर येथे शॉर्ट टर्म कोर्स ऑन रीसर्च मेथोडोलॉजीमध्ये रीसर्च स्कीम या विषयावर व्याख्यान, दि. १० ते १६ ऑक्टोबर २०१४.

६) कोठेकर शांता, इतिहास तंत्र आणि तत्त्वज्ञान, साईनाथ प्रकाशन, नागपूर, २०११, पृ. १०४.

७) उपरोक्त, पृ. १०५.

८) वर्तक चंद्रकांत, संशोधनातील लेखनशैली, पुष्प तेरावे, कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक, २००५, पृ. १६-१७.

८

# वि. दा. सावरकरांच्या सैनिकीकरण सिद्धांताची वर्तमान उपयुक्तता

**डॉ. विजय पांडुरंगराव कुलकर्णी**
वै. धुंडा महाराज देगलूरकर महाविद्यालय, देगलूर, जि. नांदेड

मानवी उत्क्रांतीचा इतिहास लाखो वर्षांचा आहे. अश्मयुगात टोळ्या टोळ्याने राहणाऱ्या मानवी समूहाचे ज्या वेळी राज्यामध्ये रूपांतर झाले त्या वेळी राज्याच्या संरक्षणाची गरज भासू लागली. यातून राज्याचा प्रमुख तो राजा व राज्य रक्षणासाठी त्याने कार्यान्वित केलेली यंत्रणा म्हणजे सैन्यव्यवस्था असे स्वरूप विकसित होत गेले. कालौघात राज्याच्या सीमा ठरविल्या गेल्या व 'आणखीन अधिक हवे' या मानवी प्रवृत्तीतून आपल्या राज्याच्या सीमा ओलांडून दुसऱ्याचा भूप्रदेश बळकावणाऱ्या साम्राज्यवादी व्यवस्थेचा उगम झाला. या साम्राज्यवादी व्यवस्थेने दोन महायुद्धे अनुभवली व आज जग तिसऱ्या महायुद्धाच्या उंबरठ्यावर उभे आहे. अशा परिस्थितीत आपल्या राष्ट्राची संरक्षणसिद्धता हा घटक अत्यंत महत्त्वपूर्ण ठरतो. इ. स. पूर्व ४ थ्या शतकात कौटिल्याने आपल्या 'अर्थशास्त्र' या ग्रंथात राज्याच्या स्थैर्यासाठी प्रतिपादन केलेल्या उपाययोजना आजही तितक्याच महत्वपूर्ण ठरतात. तद्वतच स्वातंत्र्यलढ्यात सशस्त्र क्रांतिकारितेचा आवर्जून पुरस्कार करणाऱ्या वि. दा. सावरकर यांच्या सैनिकीकरण सिद्धांताचीही उपयुक्तता आज तितकीच महत्त्वाची आहे. याच गृहीतकावर आधारित या संशोधन विषयाची मांडणी असून राष्ट्राला सामर्थ्यशाली बनविण्यासाठीच्या वि. दा. सावरकरांच्या तत्त्वातील व्यापकता समजून घेणे हे या शोधनिबंधाचे उद्दिष्ट आहे. विविध संदर्भग्रंथ, नियतकालिके, वृत्तपत्रीय लेख इत्यादी साधनांच्या आधारे या शोधनिबंधाची विश्लेषणात्मक मांडणी केली आहे.

**विषय प्रतिपादन :**

ब्रिटिश साम्राज्यशाहीच्या विरोधात सशस्त्र क्रांतीचा पुरस्कार केल्याने वि. दा. सावरकरांना १९११ ते १९२१ या काळात अंदमान, १९२१ ते १९२३ या काळात अलिपूर, मुंबई, रत्नागिरी, येरवडा तर १९२४ ते १९३७ या काळात रत्नागिरी येथे स्थानबद्धतेत ठेवण्यात आले होते. स्थानबद्धतेच्या काळात त्यांनी अस्पृश्यता-निर्मूलनाचे व्यापक उपक्रम राबविले. १९३७ मध्ये त्यांची सुटका झाल्यानंतर त्यांनी सैनिकीकरण सिद्धांताचा प्रचार चालविला होता. या काळात यूरोपमध्ये द्वितीय महायुद्धाचे ढग जमा झाले होते. प्रत्यक्ष द्वितीय महायुद्धाचा भडका उडाल्यानंतर तत्कालीन व्हाईसरॉय लॉर्ड लिनलिथगो यांनी भारतीय पुढाऱ्यांशी विचारविनिमय न करताच (परवानगी न घेताच) भारत युद्धात ब्रिटिशांच्या बाजूने सहभागी होत असल्याची घोषणा केली व प्रत्यक्ष भारतीय सैनिकांच्या अनेक तुकड्या ईजिप्त, एडन, सिंगापूर या युद्धभूमीवर पाठविल्या. ब्रिटिशांच्या या धोरणाला विरोध म्हणून काँग्रेसने प्रांतीय मंत्रिमंडळाचे १९३९ मध्ये राजीनामे दिले. (इ. स. १९३५ च्या कायद्यानुसार मद्रास, मुंबई, मध्य प्रदेश, ओरिसा, आसाम, सरहद्द प्रांत इ. ठिकाणी काँग्रेसची मंत्रिमंडळे स्थापन झाली होती.) काँग्रेसने या पद्धतीने ब्रिटिशांशी असहकार पुकारला होता पण याउलट वि. दा. सावरकरांनी याच अडचणीचे संधीत रूपांतर करण्याच्या भूमिकेतून "भारतीय तरूणांनी सैन्यात शिरून सैनिकी शिक्षण घेऊन त्याच बंदुका १८५७ प्रमाणेच ब्रिटिशांवर रोखाव्यात,"[१] असे सूत्र प्रतिपादन केले. हे सूत्र म्हणजे सावरकरांच्या ब्रिटिश विरोधीच्या सशस्त्र क्रांतीच्या तत्त्वज्ञानाचेच एक रूप होते. तरूणांनी भूदल, वायुदलात प्रवेश करून शस्त्रास्त्रांची ओळख व रणभूमीवरील डावपेच शिकून घ्यावेत आणि त्याचा देशाच्या स्वातंत्र्यासाठी उपयोग करावा, असे सावरकरांचे मत होते. भारतीय सैन्यामध्ये असलेली ब्रिटिश निष्ठा उखडून राष्ट्रनिष्ठा निर्माण करणे व स्वातंत्र्यापर्यंत वाटचाल करणे, असा सैनिकी-करणाचा प्रवास सावरकरांना अपेक्षित होता. "ब्रिटिश सैन्यातील शस्त्रधारी सैनिक हे जरी परकीय सरकारचे पगारी नोकर आहेत असे वाटत असले तरी योग्य वेळ येताच तेच सैनिक कणखर देशभक्त ठरल्याशिवाय राहणार नाहीत,"[२] असा सावरकरांचा

ठाम विश्वास होता. जे ब्रिटिश सरकार एखादी पिस्तूल बाळगल्यानंतर तरूणांना तुरूंगात टाकत होते तेच सरकार स्वतः होऊन तुमच्या हाती बंदुका, तोफा देत आहे, याच सुवर्णसंधीचा लाभ घेऊन तरूणांनी सैनिकी शिक्षण घ्यावे तद्वतच हजारो तरूणांनी तोफा, बंदुका, विमाने, जहाजबांधणी, दारूगोळा इत्यादीच्या कारखान्यात शिरून तंत्रज्ञ म्हणूनही शिक्षण घेतले पाहिजे व योग्य वेळ येताच क्रांती करावी, अशी सावरकरांची विचारधारा होती.

द्वितीय महायुद्धाला सुरूवात झाल्यानंतर महायुद्धाबाबत हिंदू महासभेच्या भूमिकेविषयी सभेत करण्यात आलेल्या प्रस्तावात "ब्रिटिशांनी सैनिकी शिक्षणसंस्था स्थापन करून हिंदू तरूणांना युद्धकेलेचे सर्व प्रकारचे शिक्षण द्यावे, संरक्षणाच्या सर्व शाखांत हिंदू तरूणांना प्रवेश द्यावा,"[३] अशा मागण्या सावरकरांनी केलेल्या होत्या. अर्थात द्वितीय महायुद्ध काळात ज्या वेळी नेताजी सुभाषचंद्र बोस, रासबिहारी बोस, ब्रिटिशविरोधी लढ्याची सूत्रे विदेशातून हाताळत होती, त्याच वेळी हिंदुस्थानात सावरकर "ब्रिटिशांच्या सैन्यभरतीचा लाभ घेऊन नौदल, भूदल, वायुदलात प्रवेश करून रणभूमीवरील डावपेच, शस्त्रास्त्रांची ओळख करून घेण्याची तरूणांना आयती संधी आहे,"[४] असा उघड-उघड प्रचार करीत होते. या पद्धतीने हिंदू महासभेच्या वतीने सैनिकीकरणाचा धोशा उडवून देऊन सहस्त्रावधी देशभक्त तरूणांनी ब्रिटिश सैन्यात भरती करविली. द्वितीय महायुद्ध काळात सुभाषबाबूंनी १९४० मध्ये मुंबईत सावरकरांची भेट घेतली त्या वेळीही सावरकरांनी "सैन्य हे महत्त्वाचे सामर्थ्य केंद्र असून त्याच्या साहाय्याने इंग्रजांची अडवणूक करण्याचा सुभाषबाबूंना सल्ला दिला होता."[५] पहिल्या महायुद्धाच्या वेळीही हिंदू क्रांतिकारकांनी असाच प्रयत्न केल्याची आठवणही सावरकरांनी सुभाषबाबूंना या प्रसंगी करून दिली होती.

सावरकरांच्या सैनिकीकरणाच्या प्रचाराची प्रत्यक्ष पूर्तताही दिसून येत होती. द्वितीय महायुद्ध काळात प्रत्यक्ष ब्रिटिश सैन्यातील जवळपास ४५००० हिंदू सैनिक ब्रिटिश पक्ष सोडून सुभाषबाबूंच्या पक्षाला येऊन मिळाले होते. हिंदू सैनिकांच्या या प्रतिसादाबाबत जपानी लेखक जे. जी. ओहसावा यांनी आपल्या 'टू ग्रेट इंडियन्स इन जपान' या ग्रंथात लिहिले की, "सावरकरांचे 'तरूणांनो सैन्यात भरती व्हा' हे

धोरण प्रत्यक्षात अशा अनुकूल प्रतिसादात आकाराला येत होते."[६] एवढेच नाही तर स्वतः सुभाषबाबूंनी सावरकरांच्या सैनिकीकरण मोहिमेचा आझाद हिंद सेनेला झालेला लाभ सांगताना २२ जून १९४४ रोजी सिंगापूर नभोवाणीवरून प्रतिपादन केले की, "काँग्रेसमधील बहुतेक अदूरदर्शी नेते ब्रिटिश हिंदू सैन्यास भाडोत्री म्हणून हिणवीत असताना वीर सावरकरांचा तरूणांना, सैन्यात शिरा हा संदेश मोलाचा आहे. या तरूणांतूनच आझाद हिंद सेनेला प्रशिक्षित सैनिकांचा पुरवठा होत आहे."[७]

या पद्धतीने सावरकरांचे द्वितीय महायुद्ध काळातही सशस्त्र क्रांतीच्या मार्गाचेच अप्रकट (पडद्यामागील) कार्य सुरूच होते. सावरकरांच्या सैनिकीकरण सिद्धांताचा एवढा व्यापक प्रभाव सैन्यावर पडलेला होता की, "हिंदू सेना ही ब्रिटिशांशी एकनिष्ठ राहिली नसून हिंदुस्थान ताब्यात ठेवण्यास ब्रिटन असमर्थ ठरत आहे व अशा परिस्थितीत भारताला स्वातंत्र्य देणे भाग पडत आहे,"[८] अशी जाहीर कबुली ब्रिटनचे पतंप्रधान ॲटलीने हिंदुस्थानच्या स्वराज्याचा ठराव मांडताना दिलेली होती. अर्थात साम्राज्यवाद हा अन्यायमूलक आहे किंवा अहिंसेचे तत्त्व आम्हाला पटल्यामुळे आमचे हृदयपरिवर्तन होऊन आम्ही हिंदुस्थानला स्वातंत्र्य देत आहोत, असे ॲटली किंवा कोणताही ब्रिटिश सदस्य म्हणाला नव्हता. याचा अर्थच असा होतो की, स्वातंत्र्यलढ्याच्या विविधांगी साधनांमध्ये सैन्यबळाचा व शस्त्रबळाचा अधिक वाटा होता. अर्थात सैन्यात भरती होणे ही सैनिकीकरणाची एक बाजू होती तर देशाला शस्त्रबळातही सामर्थ्यशाली बनविणे ही सैनिकीकरणाची दुसरी बाजू होती. कारण "संरक्षक सैन्य हा शब्दप्रयोग सावरकरांना मान्य नव्हता, सैन्य आक्रमक असेल तरच ते राष्ट्राचे संरक्षण करू शकेल, त्यामुळे ज्या वेळी युद्धाची अपरिहार्यता जाणवू लागते त्या वेळी सैन्याने केवळ संरक्षकाच्याच भूमिकेत न राहता शत्रूवर आक्रमण करण्याची नीती अमलात आणावी व त्यासाठी देश सदोदित शस्त्रसज्ज असला पाहिजे,"[९] असे सावरकरांचे युद्धशास्त्र होते.

सावरकरांचे सैनिकीकरण हे केवळ भारताच्या स्वातंत्र्यप्राप्तीसाठीच नव्हते तर स्वातंत्र्योत्तर काळात देशरक्षणार्थही या तत्त्वाची आवश्यकता त्यांनी प्रतिपादन केली होती. "ब्रिटिश राज्य उलथवून टाकण्यासाठी ज्या सशस्त्रतेचा अंगीकार केला

त्या सशस्त्र संस्थांची स्वतंत्र भारतात स्वकियांविरूद्ध आवश्यकता नाही, कारण ती बाह्य शत्रूपेक्षा स्वराज्यास अधिक प्राणघातक ठरतील,"[१०] असे मत सावरकरांनी १९५२ मध्ये अभिनव भारतच्या सांगता समारोह प्रसंगी प्रतिपादन केले होते. अर्थात परकियांविरूद्ध लढताना तलवार व स्वातंत्र्योत्तर काळात स्वकीय राजवटीत मात्र कायद्यानुसार विकासाकडे वाटचाल, असे सावरकरांचे व्यापक वैचारिक अधिष्ठान होते. या वैचारिक अधिष्ठानाला अनुसरूनच बाह्य शक्तीपासून देशरक्षणासाठी प्रबळ शस्त्रसामर्थ्याची आवश्यकता त्यांनी प्रतिपादन केली होती. स्वातंत्र्योत्तर स्वकीय सरकारला "देशाच्या सीमा निश्चित करण्याची सावरकरांची आग्रही सूचना होती तसेच चीन भारतावर आक्रमणाच्या तयारीत असून चीनचे भारतावर आक्रमण होईल, असा १९५४ मध्येच इशारा देणारे सावरकर हे एकमेव पुढारी होते."[११] परंतु सावरकरांच्या या सूचना हिंदी-चिनी भाई-भाई च्या घोषणेत विरून गेल्या व याच चीनने २० ऑक्टोबर १९६२ रोजी भारतावर आक्रमण करून भारताच्या पाठीत खंजीर खुपसला. नेहरू सरकारने सैन्यशक्तीकडे केलेल्या अक्षम्य दुर्लक्षामुळेच चीनचे विषारी संकट उभे राहिले. या संदर्भात 'दैनिक सकाळ'चे संपादक श्रीराम पवार म्हणतात की, "भारत व चीन यांच्यातील सीमारेषा निश्चित करण्यात सीमांविषयीचे निरनिराळे आकलन हा मोठाच अडथळा होता. हा आकलनातील फरक १९६२ च्या युद्धापर्यंत जाईल, असे तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू व संरक्षणमंत्री कृष्ण मेनन यांना अजीबात वाटले नव्हते."[१२]

वर्तमान काळातही जागतिक परिस्थिती वेगाने बदलत आहे. जागतिक राजकारणात दीर्घ काळ एकाधिकारशाही प्रस्थापित केलेल्या अमेरिकेला चीन, उत्तर कोरियासारख्या राष्ट्रांनी प्रबळ शस्त्रसामर्थ्याच्या बळावर शह देण्याचा प्रयत्न चालविला आहे. "विशेषतः २००८-२००९ पासून अमेरिकेतील अंतर्गत कारणांमुळे जागतिक राजकारणाचे एक ध्रुवीय पर्व संपुष्टात येऊन बहुध्रुवीय व्यवस्थेची प्रक्रिया अधिक वेगवान होण्याची व जगातील महत्त्वाच्या भू सामरिक प्रदेशातून अमेरिकेची मोठ्या प्रमाणात किंवा अंशतः पीछेहाट होण्याची दाट शक्यता आहे."[१३] कारण याच रशिया-युक्रेन युद्धासंदर्भात अमेरिकेच्या पुढाकाराने युनोच्या सभेत रशियाविरोधी

मांडलेल्या ठरावातील मतदान प्रक्रियेत "पाच (०५) देशांनी ठरावाविरूद्ध मतदान केले. ३५ देश तटस्थ राहिले. बारा (१२) देश मतदान प्रक्रियेत सहभागी झाले नाहीत. विविध देशांची ही भूमिका म्हणजे अमेरिकेच्या नेतृत्वाखालील नाटोच्या दबावाला बळी न पडण्याची व रशियाशी संबंध सुरळीत ठेवण्याची आहे"[१४] हे स्पष्ट होते. यासारख्या महत्त्वपूर्ण जागतिक स्थित्यंतरावरून आम्ही बोध घेणे आवश्यक आहे. बाह्य कोणत्याही राष्ट्राशी संबंध ठेवताना ते संतुलित तर असणे गरजेचे आहेच पण राष्ट्ररक्षणार्थ लष्करीदृष्ट्या अत्यंत प्रबळ असणे तितकेच आवश्यक आहे. वर्तमानातील रशिया-युक्रेन युद्धातूनसुद्धा सावरकरांच्या सैनिकीकरण सिद्धांताची अनंत उपयुक्तता लक्षात येते. अद्ययावत लष्करी तंत्रज्ञानाने राष्ट्राला सदोदित सुसज्ज ठेवले पाहिजे. तथाकथित शांततेचा टेंभा मिरविण्याऐवजी, "सावरकरांना अभिप्रेत असलेल्या रणगाडे, पाणबुड्या, विमाने, तोफा, अणुबॉम्ब या पंचशिलावर परराष्ट्र धोरण कार्यान्वित केले तरच भारत संरक्षणसिद्ध होऊन त्याची बड्या राष्ट्राच्या यादीत गणना होईल."[१५] एकंदरीत वि. दा. सावरकरांच्या सैनिकीकरण सिद्धांताची वर्तमान उपयुक्तता या विषयावर संशोधनात्मक अध्ययन करताना पुढील निष्कर्ष हाती येतात-

**निष्कर्ष :**

१) सावरकरांच्या सैनिकीकरण सिद्धांताचे दोन पैलू दिसून येतात. एक म्हणजे ब्रिटिश राजवटीत ब्रिटिश सैन्यात प्रवेश करून सर्वतोपरी सैनिकी प्रशिक्षण घेणे व वेळ येताच ब्रिटिशविरोधात उठाव करणे आणि दुसरे म्हणजे स्वातंत्र्योत्तर काळात देशरक्षणासाठी देशाला प्रबळ शस्त्रसज्ज बनविणे.

२) सावरकरांच्या सैनिकीकरण मोहिमेचा विदेशातून ब्रिटिशविरोधी सशस्त्र क्रांतीचे नियोजन करणाऱ्या सुभाषबाबूंना प्रत्यक्ष फायदा झालेला होता.

३) स्वातंत्र्योत्तर काळात स्वकियांविरूद्ध सशस्त्र साधनांचा त्याग व कायद्यानुसार विकास हा सावरकरांचा विचार लोकशाहीवरील प्रखर निष्ठा दर्शवितो.

४) जागतिक राजकारणाचा लंबक आज एक ध्रुवीय व्यवस्थेकडून बहुध्रुवीय व्यवस्थेकडे स्थलांतरित होत आहे.

५)	कवी, साहित्यिक, क्रांतिकारक, समाजसुधारक, इतिहासकार इत्यादींबरोबरच सावरकरांना एक सामरिक तज्ज्ञ हे विशेषणही पूर्णतः लागू होते.

थोडक्यात स्वातंत्र्यलढ्यात स्वातंत्र्यप्राप्ती व स्वातंत्र्योत्तर काळात स्वातंत्र्यरक्षण या उदात्त ध्येयाभोवती सावरकरांचा सैनिकीकरणाचा सिद्धांत केंद्रित झालेला दिसून येतो. सावरकरांच्याच शब्दांत सांगावयाचे झाल्यास "शस्त्रबळावाचून असुरक्षित संपन्न हीच लुटारू पण सशस्त्र परराष्ट्रीय दरोडेखोरांना एक प्रलोभन व आमंत्रणच ठरेल. अर्थात सुबत्तेसाठी व शांततेच्या रक्षणासाठी समर्थ सैनिकी शक्ती सिद्ध असणे आवश्यक आहे तरच स्वातंत्र्यरक्षण शक्य होईल"[१६] हे सावरकरांचे तत्त्व कालातीत आहे हे सूज्ञांस सांगण्याची आवश्यकता नाही.

**संदर्भ :**


१)	मंगळवेढेकर राजा, स्वतंत्र झाला माझा भारत, अनिरूद्ध प्रकाशन, पुणे, १९७२, पृ. १०५.

२)	धर्माधिकारी अविनाश (संपा.), चाणक्य मंडल, चाणक्य मंडल परिवार,पुणे,जुलै-२०१८, (ब्रिगेडियर हेमंत महाजन यांच्या 'स्वातंत्र्यवीर सावरकर आणि राष्ट्रीय सुरक्षा' या लेखातून) पृ. ११.

३)	सावरकर वि. दा., ऐतिहासिक निवेदने जनआवृत्ती, रिया पब्लि., कोल्हापूर,२०१२, पृ.२७-२८.

४)	देशपांडे सुधाकर, महाराष्ट्राचे शिल्पकार स्वातंत्र्यवीर सावरकर, म. रा. सा. आणि सं. मंडळ, मुंबई, २००३, पृ. ६७.

५)	दाते शं. रा. (संपा.), भारतीय स्वतंत्र्ययुद्धाचे रणझुंजार, काळ प्रकाशन, पुणे, १९८५, पृ. १९४.

६)	उपरोक्त, देशपांडे सुधाकर, पृ. ६८.

७)	भट रा. स., चलो दिल्ली, वोरा प्रकाशन, मुंबई, १९६९, पृ. १०५-१०६.

८)	अंदुरकर व्यं. गो., क्रांतीच्या यज्ञकुंडात, सरस ग्रंथमाला, सोलापूर, १९६८, पृ. २१.

९)	उपरोक्त, धर्माधिकारी अविनाश (संपा.), पृ. १२.

१०)	मोरे शेषेराव, सावरकरांचा बुद्धिवाद आणि हिंदुत्ववाद, राजहंस प्रकाश, पुणे, २००३, पृ.९८.

११)	उपरोक्त, धर्माधिकारी अविनाश (संपा.), पृ. ११-१२.

१२)	पवार श्रीराम, युद्धासाठीची शिकवणी, दै. सकाळ, सप्तरंग पुरवणी, दि.२७-११-२०२२, पृ. ०१.

१३)	पवार प्रज्ञा, भोसले नारायण, परिवर्तनाचा वाटसरू (पाक्षिक), नर्मदा प्रकाशन ऑफसेट, पुणे, दि. १६ ते ३१ मार्च २०२२, (परिमल माया सुधाकर या लेखकाच्या 'भारतासमोरील वाढती आव्हाने' या लेखातून), पृ. १२.

१४)	उपरोक्त.

१५)	उपरोक्त, धर्माधिकारी अविनाश (संपा.), पृ. १२.

१६)	उपरोक्त.

(१)

# हैद्राबाद मुक्तिसंग्रामातील स्वतंत्रता सेनानी : पं. श्रीनिवासराव कुमठेकर

**श्री. संदीप भरतराव कुमठेकर**
महाराष्ट्र अध्यापक महाविद्यालय, निलंगा, जि. लातूर

ब्रिटिश सत्तेविरोधात भारतीय स्वातंत्र्य चळवळ सुरू असतानाच भारतातील विविध संस्थानांमध्येही स्थानिक संस्थानांच्या विरोधात स्वातंत्र्य चळवळ उभी राहिली. त्यांपैकीच एक संस्थान म्हणजे हैद्राबाद संस्थान होय. या संस्थानात मराठी, तेलुगू आणि कानडी असा त्रैभाषिक प्रदेश समाविष्ट होता. सध्याच्या महाराष्ट्रातील मराठवाडा विभाग हा तत्कालीन हैद्राबाद संस्थानाचाच भाग होता. या प्रदेशातील जनतेने संस्थानिकाच्या विरोधात जुलमी राजसत्तेच्या जोखडातून मुक्त होण्यासाठी चळवळ उभारली. या चळवळीलाच हैद्राबाद मुक्तिसंग्राम या नावानेही ओळखले जाते. यामध्ये आर्य समाज, महाराष्ट्र परिषद, हैद्राबाद स्टेट काँग्रेस अशा विविध स्तरांवरून निजाम सत्तेला विरोध करून स्वातंत्र्याची मागणी मोठ्या प्रमाणात झाली. त्यामुळे या स्वतंत्र्य संग्रामाला विविध कंगोरे आहेत. आर्य समाजाने या प्रदेशात मोठ्या प्रमाणात जनजागृती घडवून आणली. परिणामी या प्रदेशात एक सशक्त लढा निजाम सत्तेच्या विरोधात उभारला. सध्याच्या लातूर जिल्ह्यातील निलंगा परिसरात शेषराव वाघमारे यांच्या नेतृत्वात आर्य समाजाने मोठ्या प्रमाणात जनजागृती घडवून आणली. त्यामुळे या परिसरातील अनेक तरूण या मुक्तिलढ्यात सहभागी झाले. त्यांपैकीच एक पं. श्रीनिवासराव कुमठेकर होत.

**पं. श्रीनिवासराव कुमठेकर यांचा जीवन परिचय :**

पं. श्रीनिवासराव व्यंकटराव कुमठेकर यांचा जन्म मु. पो. अंबुलगा (बु.), ता. निलंगा, जि. लातूर (पूर्वीचा जिल्हा उस्मानाबाद (धाराशिव) आणि त्याच्याही पूर्वीचा जिल्हा बीदर हा होता) वै. पं. श्रीनिवासराव व्यंकटराव कुमठेकर यांचा जन्म

दि. ११ डिसेंबर १९१६ मध्ये अंबुलगा (बु.) या गावी झाला. त्यांच्या आईचे नाव वै. लक्ष्मीबाई व्यंकटराव कुमठेकर होते तर वडिलांचे नाव वै. व्यंकटराव रामराव कुमठेकर होते.

भारतीय स्वातंत्र्य संग्राम, हैद्राबाद मुक्तिसंग्राम, आर्य समाजाचा सत्याग्रह व सामाजिक कार्यात त्यांनी वयाच्या १७ व्या वर्षापासूनच आपला सक्रिय सहभाग नोंदवला. पं. श्रीनिवासराव व्यंकटराव कुमठेकर यांचा अनेक प्रसिद्ध दिग्गज नेत्यांशीसुद्धा त्यांचे चांगले संबंध, संपर्क होता. त्यात नेताजी सुभाषचंद्र बोस, सरदार वल्लभभाई पटेल, स्वामी रामानंद तीर्थ, लालबहाद्दुर शास्त्री, महात्मा गांधी, जवाहरलाल नेहरू हे होत. पं. श्रीनिवासराव व्यंकटराव कुमठेकर यांना 'पंडितजी' ही उपाधी मिळाली होती.

पं. श्रीनिवासराव व्यंकटराव कुमठेकर व त्यांच्या पत्नी सुशीलाबाई श्रीनिवासराव कुमठेकर या दोघांच्या हाताने खूप अन्नदान, विद्यादान व समाजातील लोकांची अनेक प्रकारची खूप मदत त्यांनी केली होती. त्यांच्या शेतात खूप आंब्यांची झाडे होती, आंब्यांची आमराई होती. ते दोघे गावात दवंडी देऊन गावातील सर्व लोकांना आंबे वाटत असत. अन्नदान तर दररोज व्हायचे. गावात त्यांना 'पंडितजी' या नावानेच संबोधले जायचे. देशकार्यासाठी, सामाजिक कार्यासाठी पं. श्रीनिवासराव व्यंकटराव कुमठेकर यांनी आपल्या ३५० एकर शेत जमिनीपैकी आपली स्वतःची ३०० एकर शेतजमीन ही देशकार्यासाठी, सामाजिक कार्यासाठी वेळ, काळ, प्रसंगावधान पाहून अर्पण करीत गेले, दान करीत गेले.

त्यांच्या पत्नी वै. सुशीलाबाई श्रीनिवासराव कुमठेकर यांचा मृत्यू दि.१९-०२-२०१३ रोजी झाला. पं. श्रीनिवासराव व्यंकटराव कुमठेकर यांना पाच मुले व दोन मुली आहेत. (अनुक्रमे) १) कलावतीबाई २) वै. प्रताप श्रीनिवासराव कुमठेकर (पत्नी : वै. लक्ष्मीबाई कोकिलाबाई) ३) वै. सुरेश श्रीनिवासराव कुमठेकर (पत्नी : लतिकाबाई) ४) श्री. सुभाष श्रीनिवासराव कुमठेकर (पत्नी : सौ. शकुंतलाबाई) ५) श्री. शरद श्रीनिवासराव कुमठेकर (पत्नी : सौ. मीनाबाई) ६) सरलाबाई ७) श्री. भरत श्रीनिवासराव कुमठेकर (पत्नी : सौ. मंगलबाई)

**हैद्राबाद मुक्तिसंग्राम / मराठवाडा मुक्तिसंग्राम :**

निजामशाहीच्या व रझाकाराच्या राजवटीतून मुक्त होण्यासाठी उभ्या राहिलेल्या हैद्राबाद / मराठवाडा मुक्तिसंग्राम लढ्यात अनेकांनी हौतात्म्य पत्करले. या लढ्यात निलंगा तालुक्याचे मोठे योगदान राहिले. हैद्राबाद संस्थान निजामाच्या व रझाकाराच्या जुलमी राजवटीतून मुक्त करण्यासाठी स्टेट कॉंग्रेस आणि आर्य समाजाने सशस्त्र लढा दिला. या स्वातंत्र्य संग्रामात पं. श्रीनिवासराव व्यंकटराव कुमठेकर अंबुलगा (बु.), मोहनराव पाटील (हाडोळी) यांच्या नेतृत्वाखाली हा मोठा सशस्त्र उठाव झाला. त्या काळी निलंगा व औराद शहाजानीच्या बाजारपेठा रझाकारांनी जाळून खाक केल्या होत्या, अनेकांच्या घरांची राखरांगोळी केली होती.[१]

बोटकूळ गावातील हिंदूंची संपूर्ण घरे रझाकारांनी जाळली होती. जमिनीची वाताहत केली होती. बोटकूळ गावातील ही घटना पं. श्रीनिवासराव व्यंकटराव कुमठेकर यांना कळाल्यानंतर त्यांनी आपल्या सहकाऱ्यांसमवेत बोटकूळच्या अनेक हिंदूंना आपल्या परीने जितकी होईल तितकी मदत करण्याचा, त्यांना आधार देण्याचा प्रयत्न केला. संपूर्ण तालुकाभर पसरलेल्या या जुलमी राजवटीच्या विरोधात अंबुलगा (बु.) चे पं. श्रीनिवासराव व्यंकटराव कुमठेकर, निलंग्याचे बळिराम पाटील, तमन्ना आर्य, पुंडलिक आर्य आदी शेकडो सत्याग्रहींना अटक व शिक्षा देऊन जेलमध्ये बंदिस्त करण्यात आले. शेषेरावजी वाघमारे, गोविंदराव नाईक, व त्यांच्या अनेक सहकाऱ्यांसह त्यांनी सशस्त्र लढा देऊन १६ गावे निजाम व रझाकाराच्या राजवटीतून मुक्त केली. अंबुलगा (बु.) चे पं. श्रीनिवासराव व्यंकटराव कुमठेकर, निलंग्याचे शेषेरावजी वाघमारे, औराद (शहाजानी) चे पं. वीरभद्रजी आर्य आणि हाडोळीचे मोहनराव पाटील या चौघांनी तर निजाम-रझाकारांच्या नाकीनऊ आणून सोडले होते. त्यांना सळो की पळो करून सोडले होते.[२]

**अंबुलगा (बु.) गावातील एक छोटीशी घडलेली घटना :**

अंबुलगा (बु.) या गावातील मुसलमान देशमुख, एक मोठा जमीनदार खूप जुलमी होता. त्यांच्या वाड्यात विशाल परिसरात आड (विहीर) होता, तेथून नागरिक पिण्याचे पाणी नेत असत. एके दिवशी हिंदूची सुंदर तरूणी पाणी नेत असता मुसलमान देशमुखाच्या मुलांनी तिचा हात वाईट हेतूने धरला. ती वीरांगना त्याला

झिडकारून बाहेर पळाली व स्वगृही आश्रयास गेली. मुसलमान देशमुखाच्या मुलाने झिडकारल्याने राग अनावर होऊन त्या महिलेस नग्न करून तिची गावातून धिंड काढली. ही घटना आर्य सेनानी पं. श्रीनिवासराव व्यंकटराव कुमठेकर यांना सहन झाली नाही. पं. श्रीनिवासराव व्यंकटराव कुमठेकर, शेषेरावजी वाघमारे, गोविंदराव नाईक व काही सहकारी मित्रमंडळी यांनी मुसलमान, देशमुखाच्या वाड्यावर जाऊन त्याला घराबाहेर काढून त्यांची गावातून धिंड काढली. पं. श्रीनिवासराव व्यंकटराव कुमठेकर यांच्या अनेक धाडसाच्या घटनांची इतिहासात नोंद आहे.[३]

अंबुलगा (बु.) येथील सत्यनारायण तेली यास नियामतखाँ पठाण याने विनाकारण तलवारीचे वार करून जखमी केले. निलंग्याच्या रूग्णालयात घेऊन जात असता सत्यनारायण वाटेतच मरण पावला. नरसिंग विठोबा कलाल यास अंबुलगा (बु.) येथील पिंजारी जातीच्या रझाकाराने चाकूने भोसकून ठार केले. निजामी पोलिसांनी कोणाचीही दखल घेतली नाही. उलट गावातील प्रतिष्ठित लोक पं. श्रीनिवासराव व्यंकटराव कुमठेकर, बाबासाहेब वकील, नागोरावजी पटवारी, माधवरावजी पटवारी, अमृताप्पा मिरगाळे, गंगाधर धनगर, नामदेव मिस्त्री आणि चंद्रनाथ कलाल यांना राजद्रोही (तयफोजी आमन) म्हणून वॉरंटही काढले होते.[४]

**अनेक ठिकाणी सक्त कारावायाच्या शिक्षा भोगाव्या लागल्या :**

पं. श्रीनिवासराव व्यंकटराव कुमठेकर यांनी केलेल्या अनेक प्रकारच्या सक्रिय सशस्त्र कारवायांमुळे त्यांना अनेक कारावासाच्या शिक्षा भोगाव्या लागल्या. त्यात निलंगा येथील जेलमध्ये काही वर्षे, गुलबर्गा येथील जेलमध्ये काही वर्षे, बीदर येथील जेलमध्ये काही वर्षे, चंचलगुडा जेलमध्ये काही वर्षे, हैद्राबाद जेलमध्ये काही वर्षे सक्त कारावासाची शिक्षा त्यांना भोगावी लागली होती.

पं. श्रीनिवासराव व्यंकटराव कुमठेकर यांचे परममित्र व सहकारी मित्रमंडळी शेषेरावजी वाघमारे, वीरभद्रजी आर्य, मोहनराव पाटील, गोविंदराव नाईक, माधवराव नाईक, लक्ष्मणराव आर्य मास्तर (हणमंतवाडी), चंद्रशेखरदादा बाजपाई, भाई श्यामलालजी, भाई बन्सीलालजी, पं. नरेंद्रजी, सरदार वल्लभभाई पटेल, स्वामी रामानंद तीर्थ इत्यादी होत.[५]

सरदार वल्लभभाई पटेल यांनी निजाम रझाकारांना शरण येण्याची व माघार घेण्याची सूचना करूनही ते माघार घेत नव्हते. शेवटी सरदार वल्लभभाई पटेल व स्वामी रामानंद तीर्थ यांच्या नेतृत्वाखाली निजाम रझाकारांच्या विरूद्ध सरकारी सशस्त्र पोलिस कारवाई ॲक्शन करण्याचा निर्णय घेतला. या सरकारी पोलिस कारवाईच्या ॲक्शनमध्ये पं. श्रीनिवासराव व्यंकटराव कुमठेकर यांनीही सक्रिय सहभाग घेतला. त्यांनीही या पोलिस कारवाईमध्ये महत्त्वाची कामगिरी बजावली. या मोठ्या सशस्त्र पोलिस कारवाईमुळे निजाम रझाकार शेवटी शरण आले आणि दि. १७ सप्टेंबर १९४८ रोजी हैद्राबाद संस्थान उर्वरित भारतामध्ये विलीन झाले.

**आर्य समाजाचे सत्याग्रह (इ. स. १९३७-३९) :**

भारतीय स्वातंत्र्य संग्रामात, हैद्राबाद मुक्तिसंग्रामात, आर्य समाजाच्या सत्याग्रहात, अनेक सामाजिक कार्यांत आर्य समाजाचे मोठे मोलाचे योगदान राहिलेले आहे. त्यांनी या सर्व सशस्त्र लढाईत हिरीरीने सक्रिय सहभाग नोंदविलेला आहे.[६] याच आर्य समाजाच्या सत्याग्रहाच्या चळवळीत क्रांतिकारी आर्य सेनानी पं. श्रीनिवासराव व्यंकटराव कुमठेकर यांनीसुद्धा आपला मोठा मोलाचा सक्रिय सहभाग नोंदविला. त्यांच्या या आर्य समाजाच्या सत्याग्रहाच्या चळवळीत सक्रिय सहभागामुळे, त्यांच्या सक्रिय कार्यामुळे त्यांना एक वर्षाची सक्त कारावासाची शिक्षा ठोठावण्यात आली आणि ती भोगावी लागली.[७]

**काही सामाजिक सुधारणा कार्य :**

पं. श्रीनिवासराव व्यंकटराव कुमठेकर यांना 'पंडितजी' ही उपाधी मिळाली होती आणि त्यांना गावातसुद्धा सर्व जण 'पंडितजी' या नावानेच संबोधले जायचे.

**अंबुलगा (बु.) गावात आर्य समाज मंदिराची स्थापना :**

अंबुलगा (बु.) गावातील आर्य समाज मंदिर स्थापनेचे मूळ मुख्य संस्थापक अध्यक्ष पं. श्रीनिवासराव व्यंकटराव कुमठेकर हे होते. अंबुलगा (बु.) गावात आपल्या स्वतःच्या पैशाने जागा विकत घेऊन तेथे आर्य समाज मंदिराची स्थापना केली व आजही तेथे आर्य समाज मंदिर अस्तित्वात आहे. या आर्य समाज मंदिरात दररोजची

एक दिनचर्या असायची. या आर्य समाज मंदिरात एक मोठी घंटा असायची. ती घंटा बरोबर वेळेला वाजविली जायची. गावातील लोक, तरूण-तरूणी, मुलं-मुली ती वाजविलेली घंटा ऐकून तेथे जमा व्हायचे. तेथे सर्वांना काठ्या फिरविणे, तलवारबाजी, गदा फिरविणे, मलखांब चढणे, मांड्याला पीळ देऊन खाली उतरणे, बैठका काढणे, जोर काढणे, सूर्यनमस्काराचे व्यायाम, विविध योगासने अशा अनेक प्रकारच्या कसरती, व्यायाम त्यांच्याकडून दररोज करवून घ्यायचे.

सणासुदीच्या विशिष्ट दिवशी, राष्ट्रीय दिनाच्या दिवशी, काही प्रसंगानुसार या आर्य समाज मंदिरात आठवड्याची शिबिरें ठेवली जायची. या शिबिरामध्ये देशभक्तिपर, धार्मिक-आध्यात्मिक प्रवचने-भाषणे देण्यासाठी दररोज अनेक नवनवीन दिग्गज मान्यवरांना, ज्येष्ठ क्रांतिकारी स्वातंत्र्यसैनिकांना, धार्मिक-आध्यात्मिक पंडितजींना आमंत्रित केले जायचे आणि या सर्वांची राहण्याची, चहा-पाण्याची, फराळाची, जेवणाची, व्यवस्थासुध्दा ते स्वतः आपल्या स्वखर्चाने करीत असत.

स्वतः पं. श्रीनिवासराव व्यंकटराव कुमठेकरजीसुध्दा देशभक्तिपर भाषणे करायचे. लोकांमध्ये देशभक्तीची भावना निर्माण करायचे, जनजागृती करायचे, दरवर्षी आर्य समाज मंदिरतर्फे आर्य समाज मंदिरातून मोठे जुलूस, मोठी मिरवणूक गावातून काढली जात असे. गावात देशभक्तिपर घोषणा देत-देत गावातील मुख्य-मुख्य ठिकाणी आपल्या कलाकौशल्याचे, दिलेल्या प्रशिक्षणाचे प्रदर्शन करीत असत आणि शेवटी अर्य समाज मंदिरात वन्दे मातरम् या राष्ट्रीय गीताने याची सांगता होत असे. इ. स. १९३७ ते १९३९ या दरम्यान होणाऱ्या आर्य समाजाच्या सत्याग्रह चळवळीमध्येसुद्धा पं. श्रीनिवासराव व्यंकटराव कुमठेकर यांनी सक्रिय सहभाग घेतला होता. त्याच्यामुळे त्यांना काही वर्षांची सक्त कारावासाची शिक्षा भोगावी लागली होती.

**अंबुलगा (बु.) गावात शिक्षणाची सोय :**

अंबुलगा (बु.) गावात इयत्ता दहावीपर्यंतच्या शिक्षणाची सोय पं. श्रीनिवासराव व्यंकटराव कुमठेकर यांनी करून दिली. गावात अगोदर इयत्ता चौथीपर्यंतच शाळा होती. गावातील सर्व मुला-मुलींसाठी शिक्षणाची सोय गावातच करून दिली. सर्वांना

शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. बोर्ड परीक्षेचे परीक्षा केंद्रसुद्धा गावातच ठेवले. सुरूवातीच्या काळात काही काळ पं. श्रीनिवासराव व्यंकटराव कुमठेकर यांनीसुद्धा शिक्षक म्हणून शिकविण्याचे काम केले होते.

**गावातील लोकांना अन्नदान, विद्यादान व इतर मदतकार्य :**

गावात पं. श्रीनिवासराव व्यंकटराव कुमठेकर व त्यांच्या पत्नी सुशीलाबाई श्रीनिवासराव कुमठेकर या दोघा पति-पत्नीच्या हातून भरपूर अन्नदान, विद्यादान, गोर-गरीब गरजूंना पैशाची मदत, कपडालत्ता आणि काही अतिगरजूंना तर भूदान म्हणून शेतजमीनसुद्धा करून खाण्यासाठी दिली होती. ती आजही पं. श्रीनिवासराव व्यंकटराव कुमठेकर यांच्याच नावे आहे. त्यांना दान दिलेली शेतजमीन तेव्हाची. त्या काळी अशिक्षित मुलं-मुली, स्त्री-पुरूष होते. त्यांना साक्षर बनविण्याचे महत्त्वाचे कार्य या दोघांनी केलेले आहे. मुलींना, स्त्रियांना सुशिक्षित करण्यात, त्यांच्यात जाणीव-जागृती निर्माण करण्यात तसेच दानधर्म करण्यातही पत्नी सुशीलाबाई श्रीनिवासराव कुमठेकर यासुद्धा आपल्या पतीप्रमाणे खांद्याला खांदा लावून कार्य करीत असत. सुशीलाबाई श्रीनिवासराव कुमठेकर या पण खूप साहसी व धाडसी प्रवृत्तीच्या होत्या. त्यांनीही अनेक प्रकारची सामाजिक कार्ये केलेली आहेत. सुशीलाबाई श्रीनिवासराव कुमठेकर यांचे सख्खे भाऊ पण स्वातंत्र्यसैनिक होते. नानासाहेब आबासाहेब देशपांडे, सरवडी, ता. निलंगा होय. सुशीलाबाई श्रीनिवासराव कुमठेकर यांचे माहेर सरवडी, ता. निलंगा हे होते.

**अंबुलगा (बु.) गावातील श्री मारूती मंदिरचे शेत इनाम :**

अंबुलगा (बु.) गावातील श्री मारूती मंदिराची शेतजमीन एका मुस्लिम व्यक्तीच्या ताब्यात होती. पं. श्रीनिवासराव व्यंकटराव कुमठेकर यांनी जिल्ह्याच्या ठिकाणी जाऊन पेशा करून नंतर तहसीलमध्ये जाऊन शेत सर्व्हे नंबर आणून ते शेत इनाम म्हणून श्री मारूती मंदिर देवस्थानच्या सर्व प्रकारच्या व्यवस्थापनासाठी एक समिती नेमून दिली. समितीतील अध्यक्ष व सर्व सदस्यांना या मंदिरला इनाम म्हणून दिलेल्या शेतामधून जे काही उत्पन्न निघेल ते उत्पन्न या मंदिराच्या विकासासाठी, व्यवस्थेसाठी, कार्यक्रमासाठी खर्च करावे, असे सर्वांना सांगितले. अशा प्रकारे एका

मुस्लिम व्यक्तीच्या ताब्यातील शेतजमीन सोडवून श्री मारूती मंदिर देवस्थानसाठी इनाम म्हणून घोषित केले. या सर्व प्रकारच्या सरकारी कामासाठी लागणारा जो काही खर्च आहे तो खर्च स्वतः पं. श्रीनिवासराव कुमठेकर हे आपल्या स्वखर्चाने करीत असत.

**अंबुलगा (बु.) गावचे पहिले सरपंच होण्याचा मान :**

अंबुलगा (बु.) या गावचे पहिले सरपंच होण्याचा मान-सन्मान पं. श्रीनिवासराव व्यंकटराव कुमठेकर यांना मिळाला. गावातील सर्व जनतेच्या सर्वसंमतीने एकमताने १५ वर्षे बिनविरोध निवडून येणारे ते एकमेव सरपंच होते. त्यांनी गावात अनेक प्रकारच्या सुधारणा केल्या. गावात पिण्याच्या पाण्याची सोय करून दिली. गावात सरकारी व खासगी वाहने येण्यासाठी गावातून एक मैल ॲप्रोच रोड तयार करून तो निलंगा-उदगीर या दुहेरी दोन विरूद्ध दिशेला जाणाऱ्या रस्त्याला जोडून घेतला गेला आणि निलंगा आगार व उदगीर आगार या दोन्ही आगारांतील प्रत्येक एसटी बसगाडी ही अंबुलगा (बु.) गावातून ही गेलीच पाहिजे, असे दोन्ही आगारांत सांगितले गेले. अशा प्रकारे गावात एसटी बसची आणि रस्त्याची सोय करून दिली. गावात आठवडी भाजीपाल्याचा व जनावरांचा बाजार भरण्याचा व त्यासाठी लागणाऱ्या जागेचीही सोय करून दिली. त्याचा फायदा गावातील तसेच आसपासच्या खेड्यांना, वाड्यांनाही लाभ होत असे.

**गावातील सर्व नागरिकांतर्फे पति-पत्नीचा जाहीर सत्कार व मिरवणूक :**

दोघांच्या या निःस्वार्थी भावनेने केलेल्या गावातील सामाजिक कार्यासाठी, सामाजिक सुधारणेसाठी गावातील सर्व जनतेतर्फे पं. श्रीनिवासराव व्यंकटराव कुमठेकर व त्यांच्या पत्नी सुशीलाबाई श्रीनिवासराव कुमठेकर या दोघांची बैलगाडीत बसवून व त्यांच्या गळ्यात फुलांचा हार घालून, गुलाल उधळत आनंदाने, उत्साहाने त्या दोघांचा जय जयकार करीत होते. त्या दोघांनी गावभर साखर वाटली आणि ती बैलगाडी बैलांनी नाही तर अक्षरशः माणसांनी ओढली होती. सर्व वातावरण अगदी आनंदाने, उत्साहाने प्रफुल्लित झाले होते. अशा प्रकारे गावातील सर्व जनतेतर्फे त्या दोघांची मोठी भव्य मिरवणूक काढण्यात आली व त्या दोघांचा यथोचित आदर-सत्कारही करण्यात आला.

**केंद्र सरकार व महाराष्ट्र राज्य सरकारतर्फे अनेक पुरस्कारांनी सन्मानित :**

क्रांतिकारी स्वतंत्रता सेनानी पं. श्रीनिवासराव कुमठेकर यांना त्यांनी केलेल्या भारतीय स्वातंत्र्यसंग्राम, हैद्राबाद मुक्तिसंग्राम, आर्य समाजाचे सत्यग्रह, सामाजिक कार्य या सर्वांत केलेल्या विशेष मौलिक कार्याबद्दल अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले होते. त्यापैकी दोन पुरस्कार खालीलप्रमाणे...

**भारत-केंद्र शासनातर्फे :** या अशा देशभक्त, देशप्रेमी, धाडसी, साहसी, धैर्यशील अशा क्रांतिकारी स्वतंत्रता सेनानी पं. श्रीनिवासराव व्यंकटराव कुमठेकर यांना त्यांच्या अशा प्रकारच्या विशेष क्रांतिकारी सशस्त्र सक्रिय कार्यामुळे त्यांना भारत केंद्र सरकारतर्फे **दिल्लीत पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी** यांच्या हस्ते "ताम्रपत्र" देऊन त्यांचा आदरपूर्वक सत्कार करण्यात आला.[८] तसेच

**महाराष्ट्र राज्य शासनातर्फे :** क्रांतिकारी स्वतंत्रता सेनानी पं. श्रीनिवासराव कुमठेकर यांना अशा प्रकारच्या विशेष क्रांतिकारी सशस्त्र सक्रिय कार्यामुळे त्यांना महाराष्ट्र राज्य सरकारतर्फे **मुंबईत मुख्यमंत्री वसंतराव नाईक** यांच्या हस्ते "सन्मानपत्र" देऊन त्यांचा आदरपूर्वक सत्कार करण्यात आला.[९]

**क्रांतिकारी स्वातंत्र्यसैनिक पं. श्रीनिवासराव व्यंकटराव कुमठेकर यांचा मृत्यू :**

या महान निःस्वार्थी देशप्रेमी क्रांतिकारी स्वातंत्र्य सेनानी पं. श्रीनिवासराव व्यंकटराव कुमठेकर यांचा मृत्यू अंबाजोगाईच्या एका मोठ्या रूग्णालयात उपचार घेत असताना दि. ३० जुलै १९८३ रोजी झाला. डॉक्टरांनी सांगितले होते की, त्यांनी जास्त प्रमाणात कारावास भोगल्यामुळे त्यांच्या शत्रूचा अति मार खाल्ल्यामुळे त्यांच्या अंगातील ज्या काही शिरा आहेत त्या जास्त प्रमाणात दबल्या कारणाने आणि त्यांच्या शरीराची मार खाऊन झीज झाल्यामुळे व त्याच्यातच त्यांना अर्धांगवायू (लकवा) ही झालेला होता. त्याच्यामुळे त्यांना त्यांची प्रकृती साथ देत नव्हती. वरचेवर त्यांची प्रकृती ढासळत होती. या अशा सर्वच कारणांमुळे त्यांना त्यांचा देह सोडून जावे लागले. शेवटी त्यांचा मृत्यू वयाच्या ६७ व्या वर्षी झाला.




हैद्राबाद मुक्तिसंग्रामातील क्रांतिकारी स्वतंत्रता सेनानी : पं. श्रीनिवासराव व्यंकटराव कुमठेकर




मुख्यमंत्री श्री. वसंतराव नाईक यांच्या हस्ते 'सन्मानपत्र' प्रदान (महाराष्ट्र राज्य सरकार,मुंबई)



पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांच्या हस्ते 'ताम्रपत्र' प्रदान (भारत केंद्र सरकार, दिल्ली)



निलंगा हुतात्मा स्मारकावरील नावांची यादी[१०]

## संदर्भ :


(१) दै. सकाळ वर्तमानपत्र, औरंगाबाद, दि. १७ सप्टेंबर २०१२, पृ. ५.

(२) दै. सकाळ वर्तमानपत्र, औरंगाबाद, टू डे लातूर, दि. १७ सप्टेंबर २०१६ पुरवणी, पृ. ४.

(३) दै. गणाधीश गर्जना वर्तमानपत्र, लातूर, दि. १७ सप्टेंबर २०१२, पृ. ३.

(४) पोतदार वसंत, हैद्राबाद स्वातंत्र्यसंग्राम, विद्याभारती प्रकाशन, लातूर, २०१७, पृ. १८०.

(५) गर्जे चंद्रकांत, वीर सेनानी आर्य नेता श्री शेषेराव वाघमारे, आर्य समाज स्मृती रौप्य महोत्सव समिती, २००९, पृ. २३६.

(६) लोखंडे चंद्रशेखर, मराठवाड्याचा मुक्तिलढा आणि हैद्राबाद संस्थान, विद्याभारती प्रकाशन, लातूर, २०१७, पृ. २९७.

(७) कुंटे भ. ग., स्वातंत्र्य सैनिक चरित्रकोश, महाराष्ट्र राज्य (मराठवाडा विभाग) दार्शनिक विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, २०११, पृ. ५०.

(८) भारत केंद्र सरकारतर्फे दिल्ली प्रधानमंत्री श्रीमती इंदिरा गांधी यांच्या हस्ते 'ताम्रपत्र', दि. १५ ऑगस्ट १९७२.

(९) महाराष्ट्र राज्य सरकारतर्फे मुंबईत मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या हस्ते "सन्मानपत्र".

(१०) निलंगा, जि. लातूर येथील हुतात्मा स्मारकावरील नावांची यादी.


❍❍❍

१०

# जातीविरोधी चळवळीतील वैचारिक क्रांतिशलाका - गेल ऑम्वेट

**श्रीमती मधुरा वामनराव जगताप**
संशोधक विद्यार्थी
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

प्रसिद्ध भारतीय-अमेरिकन समाजशास्त्रज्ञ, आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या संशोधिका आणि दलित शोषितांच्या प्रेरणास्थान, महात्मा फुले यांच्या सत्यशोधक चळवळ, ब्राह्मणेतर चळवळ, सांस्कृतिक संघर्षावरील चळवळी यांचा अभ्यास करून क्रांतिपर्व साकार केला. ऑम्वेट यांनी आपल्या कामातून जात आणि वर्ग यांतील गुंतागुंतीच्या नात्याची उकल करण्याचा प्रयत्न केला. विशेषतः वसाहतकालीन धोरणांतून जात कशी पुनरूत्पादित होत होती यावर त्यांनी प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला. यापुढे अशा म्हणाल्या की, वसाहतिक शिक्षणाने आणि त्यांच्या धोरणांनी ब्राह्मण उच्चभ्रूंना वसाहतिक नोकरशाहीमध्ये उदयास येणाऱ्या प्रभावी कामांमध्ये प्रवेश करण्यासाठी मदत केली होती. तथापि ब्राह्मणेतर किंवा अस्पृश्यांना अशा प्रकारचे स्थानांतर अनुभवता आले नाही आणि ते सर्वाधिक प्रमाणात परिघावरच राहिले. त्यामुळे जात ही केवळ उतरंडीची व्यवस्था नव्हती तर ती एक राजकीय प्रक्रिया होती आणि ती तत्कालीन वर्गव्यवस्थेला छेद देत होती.

या संदर्भात त्या महात्मा फुले यांच्या चळवळीचे आकलन 'सांस्कृतिक बंड' म्हणून करतात. ज्यामध्ये या वसाहतकालीन जात-वर्गीय व्यवस्थेला धक्के देण्याची क्षमता होती, असे मत गेल यांनी मांडले. आंबेडकरांच्या काळाचे व्यावहारिक संदर्भ आणि त्यांचे राजकीय डावपेच याविषयी अत्यंत महत्त्वाचे विश्लेषण अलीकडील काळात क्रिस्तोफ जेफरलॉट यांनी मांडले आहेत.[१]

**जातीविषयक संशोधन :**

शास्त्रीयदृष्ट्या विचार केल्यास ऑम्वेट यांनी ऐतिहासिक अभ्यासपद्धती वापरून जातीचा अभ्यास केला होता. भारतातील आधुनिक इतिहासकारांनीदेखील जातीचा अभ्यास करताना पौर्वात्त्यवादी दृष्टिकोन स्वीकारल्याचे दिसते. ज्यामध्ये जातीचे भौतिकवादी आकलन पुढे येऊ शकले नाही! परंतु ऑम्वेट यांनी स्वीकारलेल्या ऐतिहासिक पद्धतीमुळे त्यांना जातीचे वर्ग आणि लिंगभाव सहजपणे पाहता आले. यातूनच जात व वर्ग यांचे गुंतागुंतीचे नाते विशद करणारा जातीविषयीचा भौतिकवादी दृष्टिकोन त्या विकसित करू शकल्या.

जातीविरोधी लिखाण करताना असे नमूद करतात की, आंबेडकरांच्या छोट्या चकमकीतून शांतपणे केलेल्या युक्तिवादांनी जवळपास एकट्याने जाती आणि अस्पृश्यतेचा प्रश्न लोकांच्या डोळ्यांसमोर धगधगता ठेवला.[२]

ऑम्वेट यांनी १९८३ मध्ये भारतीय नागरिकत्व स्वीकारले. त्यांनी भारतातील अनेक चळवळींच्या बौद्धिक मार्गदर्शक म्हणून आपले योगदान दिले आहे. विशेषतः पश्चिम महाराष्ट्रातील परित्यक्त्या स्त्रियांच्या चळवळींच्या त्या प्रमुख होत्या. श्रमिक मुक्ति दलाच्या चळवळींत सहभाग घेऊन शोषित समाजाला न्याय मिळवून दिला. महत्त्वपूर्ण अशी सामाजिक आणि राजकीय स्थित्यंतरे घडवून आणण्यासाठी अशा चळवळी किती मोलाचे काम करू शकतात याचे महत्त्व त्या जाणत होत्या. सततचा अभ्यास, चिंतन, संशोधन यांतून त्यांनी आधुनिक चळवळींना सैद्धांतीक रूप दिले. त्यांनी वंचित-बहुजनांच्या न्याय्य हक्कांसाठी सक्रिय योगदान दिले. जात, धर्म, वर्ग, लिंगभाव, पितृसत्ताक पद्धती, जमीन इत्यादींचा शोषणाशी जवळचा संबंध आहे.

**जातीविषयक लिखाणाचे वैशिष्ट्य :**

दलित कोण आहेत? ते आहेत जे अनुसूचित जाती व जनजातीचे लोक नवबौद्ध, कामगार लोक, भूमिहीन, निर्धन शेतकरी, स्त्रीवर्ग आणि ते सर्व ज्यांचे राजकीय, आर्थिक आणि धर्माच्या नावावर शोषण करण्यात आले.[३] अशी व्याख्या त्यांनी दलित वर्गाची केलेली दिसून येते.

भारतातील दलित-बहुजन आणि कनिष्ठ जातींतील स्त्रियांना पितृसत्ताक विचारांकडून होणारे अत्याचार सहन करावे लागत असून हिंसा, शोषण व लैंगिकता यांचा आंतरसंबंध त्या स्त्रियांच्या अत्याचारामागे आहे, असे स्त्रियांच्या अस्तित्वाबद्दल गेल यांनी आपले परखड मत मांडले आहे. जातीअन्त स्त्रियांवरील अन्याय इत्यादी व्यवस्थेचा अभ्यास करून या सर्व शोषितांना न्याय मिळवून देण्यासाठी ऑम्वेट यांनी पुढाकार घेतला.

स्त्री-पुरूष विषमता, जातिभेद इत्यादी सामाजिक विषमता दूर व्हाव्यात, यासाठी त्यांनी सत्यशोधक विचारांतून प्रथम स्वतः अभ्यास केला आणि नंतरच आपले विचार समाजापुढे मांडले. म्हणजेच महात्मा फुले यांची समाजहितासाठीची क्रांतिकारकता किती महत्त्वाची होती ते त्यांनी आपल्या अभ्यासातून व्यक्त केले आहे. त्याचबरोबर गेल यांनी मार्क्सवाद, बुद्धाचे तत्त्वज्ञान, संतसाहित्य इत्यादींची मांडणी करून आजच्या घडीला गौतम बुद्ध, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले यांचे विचार संपविण्याचे षड्यंत्र सुरू असून तसे करणे थांबले पाहिजे आणि अभ्यासपूर्ण संशोधनातून नवीन विचारांची मांडणी झाली पाहिजे, असे मत त्यांनी व्यक्त केले आहे. ग्रामीण भागात जाती विशेषतः दलित अस्पृश्यता विभेदीकरण आणि व्यवसायातील प्रवेश याविरूद्ध बलुतेदारी पद्धती सक्रिय होती.[४] याबाबत अधिक विवेचन करताना ऑम्वेट अस्पृश्यता निर्देशांक त्यात सर्व्हेक्षित गावातील मंदिरे, विहिरी, हॉटेलमधील वर्जित प्रवेशसंख्याचा अभ्यास दर्शवितात.

**गेल ऑम्वेट यांचे संक्षिप्त कार्य :**

१९७० च्या दशकात महाराष्ट्रातील साम्यवादी चळवळीची प्रमुख शाखा असलेल्या 'लाल निशाण' या पक्षाशी त्यांचा सर्वप्रथम संबंध आला. अमेरिकेसारख्या संपन्न देशातून भारतासारख्या 'तिसऱ्या' जगातील देशात येऊन येथील जातींचा अभ्यास करताना दलित, शोषित, महिला, श्रमिक यांपैकीच एक होऊन त्यांच्या चळवळींना आयुष्यभर वाहून घेणे ही काही सोपी गोष्ट नाही. ज्येष्ठ समाजशास्त्रज्ञ आणि सामाजिक कार्यकर्त्या डॉ. गेल ऑम्वेट यांनी हा आदर्शवाद तर प्रत्यक्षात आणलाच परंतु त्याचबरोबर या चळवळींना सैद्धांतिक अधिष्ठान दिले.

महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याचे संशोधन करतानाच त्यांनी शूद्रातिशूद्रांच्या प्रश्नांची अभ्यासपूर्ण मांडणी केली. दलित, आदिवासी, शेतकरी, महिला यांच्यात फिरत, त्यांची भाषा आत्मसात करीत, त्यांच्याशी संवाद साधत तीन दशकांहून अधिक काळ केलेल्या कार्यामुळे त्या या सर्वांचा आवाज बनल्या.

महात्मा फुले यांच्या सत्यशोधक समाजावर त्यांनी संशोधन केले. बुद्ध, फुले, डॉ. आंबेडकर, कार्ल मार्क्स यांचे विचार आणि स्त्रीमुक्तिवाद यांचे सक्रिय पाईक होऊन दलित चळवळीत सक्रिय सहभाग नोंदविला. अभ्यासपूर्ण वक्तृत्व आणि चळवळींसाठी सतत फिरण्याची तयारी यांद्वारे त्यांनी महाराष्ट्राच्या नव्हे तर देशाच्या सामाजिक जीवनात चैतन्य आणले. विद्यापीठीय अध्यापन, संशोधन आणि तळागळातील समाजकार्य यांचा मिलाफ त्यांनी घडविला होता. 'श्रमिक मुक्ति दला'च्या माध्यमातून धोरणात्मक कार्याची दिशा त्यांनी दिली.

ऑम्वेट या भारतीय म्हणून येथील लोकांशी विशेषतः महाराष्ट्रातील लोकांशी, त्यांच्या प्रश्नांशी, समस्यांशी एकरूप राहून व त्यांच्या समस्यांना आपल्या मानून जीवन जगल्या. त्या इंग्रजीसह हिंदी व मराठी या भाषाही अस्खलित बोलत. थोडक्यात, गेल यांच्या लिखाणाने व कार्याने जात, वंचितता, पर्यावरण, लिंगभाव आणि कृषि राजकारण यांच्या सहसंबंधांची उकल केली व त्यांना सार्वजनिक चर्चेत आणले.

**संदर्भ :**


(१) गेल ऑम्वेट, बेगमपुराच्या शोधात जातीविरोधी विचारवंतांची सामाजिक दृष्टी, मधुश्री प्रकाशन, पुणे, २०२२, पृ. २८२.

(२) गेल ऑम्वेट, आंबेडकर प्रबुद्ध भारताच्या दिशेने, मधुश्री प्रकाशन, पुणे, २०२१, पृ. ९८.

(३) गेल ऑम्वेट, दलित दृष्टी, वाणी प्रकाशन, दिल्ली, २०११, पृ. ७६.

(४) गेल ऑम्वेट, दलित और प्रजातांत्रिक क्रांति, सेज प्रकाशन, दिल्ली, २००९, पृ. ३२५.


❍❍❍

(११)

# गव्हर्नर जनरल लॉर्ड विल्यम बेंटिकचे कार्य

**डॉ. सचिन उत्तमराव हंचाटे**
मास्टर दीनानाथ मंगेशकर महाविद्यालय, औराद शहाजानी, जि. लातूर

मध्ययुगीन कालखंडात जलवाहतुकीच्या मार्गाचा शोध लागल्यामुळे पाश्चात्त्य राष्ट्रांनी पूर्वेकडील आशियन देशांशी व्यापाराच्या हेतूने आपला मोर्चा वळविला. भारतातील राजकीय परिस्थिती व आर्थिक संपन्नता पाहून यूरोपातील पोर्तुगीज, डच, ब्रिटिश आणि फ्रेंच या व्यापाऱ्यांनी भारतात व्यापारासाठी पाऊले टाकावयास सुरूवात केली. यूरोपीय व्यापाऱ्यांनी व्यापारासोबतच राजकीय सत्ता स्थापन करण्याकडे आपले लक्ष केंद्रित केले. यामध्ये ब्रिटिश हे सर्वाधिक यशस्वी ठरले. ब्रिटिशांनीदेखील प्रारंभीच्या काळात व्यापाराच्या उद्देशानेच भारतात पाऊल ठेवले होते परंतु तत्कालीन भारतीय राजकीय परिस्थिती अनुकूल असल्याने व्यापारासोबतच हळूहळू त्यांनी साम्राज्य विस्ताराच्या दिशेने वाटचाल सुरू केली. ब्रिटिशांचा इ. स. १७५७ मधील प्लासी आणि इ. स. १७६४ मधील बक्सार या दोन्ही युद्धांतील विजयांमुळे व्यापारी वर्चस्वासोबतच भारतात राजकीय सत्ता स्थापन करण्याचा आत्मविश्वास बळावला. ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीच्या विविध गव्हर्नर जनरलनी व्यापारासोबतच भारतात राजकीयदृष्ट्या साम्राज्य विस्ताराचे धोरण हाती घेतले. यासाठी प्रत्येकाने आपापल्या काळात अनेकानेक मार्गही अवलंबिले. ज्यामध्ये कायमधारा पद्धती, तैनाती फौज, खालसा धोरण इत्यादींसोबतच सती प्रथा बंदी कायदा, शिक्षणविषयक कार्य, रेल्वेसारख्या दळणवळणाच्या सोयी, स्थानिक स्वशासन संस्थांची निर्मिती करून विधायक कार्याचा परिचयही भारतीय जनतेस करून दिला.

ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीच्या कार्यपद्धतीचा दूरगामी परिणाम भारतावर दिसून येतो. ब्रिटिश लेखक एन. सी. हिल्ल हा आपल्या १७५६-५७ सालचा 'बंगाल' या ग्रंथाच्या प्रस्तावनेत लिहितो की, "या देशातील व्यापार व उद्योगधंदे हे बहुतेक पूर्णांशाने हिंदू लोकांच्याच हाती असल्याने व्यापाराकरिता येऊन वसाहत करून

राहिलेल्या यूरोपीयन व्यापाऱ्याशी साहजिकच त्यांचा निकटचा संबंध आला आणि म्हणून या भौतिक हितसंबंधाच्या आधारावर हिंदू व यूरोपीय व्यापाऱ्यांची एक प्रकारची गुप्त गट्टी या वेळी बनली होती."[१] बंगालचा सुभेदार मुर्शीदकुलीखानाचा ब्रिटिशांना त्रास होऊ लागल्याने त्यांनी मुर्शीदकुलीखानाची तक्रार मोगल बादशहा फर्रूखसियरकडे केली. ब्रिटिश शिष्टमंडळात जॉन सर्मन, कोजी सर हौद यांच्या सोबतच हॅमिल्टन नावाचा वैद्यही होता. मोगल बादशहा फर्रूखसियरने हॅमिल्टन-कडूनच मूळव्याधीवर उपचार करून घेतले होते. वैद्य हॅमिल्टनने बादशहास बरे केले पण त्याने स्वतःसाठी बादशहाकडून काहीच न मागता आपल्या साम्राज्यासाठी बंगालच्या सुभेदाराविरूद्ध कंपनीने ज्या काही तक्रारी केल्या आहेत त्या बादशहाने कबूल कराव्यात असे मागितले. या फर्मानाचे परिणाम काय होतील याची कल्पना बादशहास नव्हती. त्याने कंपनीच्या मागण्या मान्य करून तीस व्यापाराची सनद करून दिली.[२] बादशहाचा वैयक्तिक आजार बरा झाला परंतु त्यांच्या फर्मानाने राज्य मात्र कायमचे आजारी बनले.

**गव्हर्नर जनरल लॉर्ड विल्यम बेंटिक (इ. स. १८२८ ते इ. स. १८३५) :**

गव्हर्नर जनरल लॉर्ड ॲम्हर्स्टचा उत्तराधिकारी म्हणून लॉर्ड विल्यम बेंटिकची निवड करण्यात आली. फेब्रुवारी १८२८ च्या अखेरीस गव्हर्नर जनरल लॉर्ड ॲम्हर्स्टने आपल्या पदाचा राजीनामा दिला. गव्हर्नर जनरल पदाची सूत्रे मार्च १८२८ मध्ये लॉर्ड विल्यम बेंटिकद्वारा घेईपर्यंत डबल्यु. बी. बेली या अधिकाऱ्याकडे गर्व्हनर जनरल पदाचा पदभार सोपविण्यात आला होता. उदारमतवादी आणि मानवतावादी गव्हर्नर जनरल म्हणून लॉर्ड विल्यम बेंटिककडे पाहिले जाते. त्याच्या काळापासून भारताच्या इतिहासात नव्या युगास प्रारंभ झाला. भारताच्या तत्कालीन परिस्थितीनेही बेंटिकला त्याच्या धोरणांसाठी साथ दिली. सामाजिक स्वातंत्र्याचा पुरस्कर्ता असल्यामुळे भारतीय सामाजजीवनात त्याने पाश्चात्त्य देशातील स्वातंत्र्याच्या कल्पना मूर्त स्वरूपात आणण्याचा प्रयत्न केला. त्याचा काळ भारतासाठी विशेषतः सामाजिक क्षेत्रात 'प्रगतीचा काळ' म्हणून ओळखला जातो. सोबतच भारतात सुधारणा आखताना आपल्या सत्तेचा विस्तार करावयाचा आहे ही बाबदेखील त्याने कधीच कानाडोळा केली नाही. फरक इतकाच होता की, युद्ध न करता संधी मिळेल तेव्हा

शांततेच्या मार्गाने अनेक संस्थाने साम्राज्याला जोडली. उदा. इ. स. १८३४ मध्ये कुर्ग, इ. स. १८३४ मध्ये जैता इत्यादी. मुंबई प्रांताचा गव्हर्नर एलफिन्स्टन इ. स. १८२९ मध्ये म्हणतो, "येथील लोकांची आपण इतकी सुधारणा करावी की परकी सरकार येथे राहण्याची आवश्यकताच राहू नये. अशा मरणाची आपण अपेक्षा करावी. याला अर्थात बराच वेळ लागेल. हिंदुस्थान आपल्याला सोडून जावेच लागेल. रानटी देशाशी झगडा होण्यापेक्षा सुसंस्कृत देशापासून विभक्त होणे केव्हाही चांगले. तसे केले नाही तर आपला व्यापार तर बुडेलच पण ज्या संस्था आपण उभ्या केल्या त्याही बुडतील."[३] तात्पर्य, भारत देश आपणास एक न एक दिवस सोडून जावे लागणार आहे याची जाणीव ब्रिटिश राज्यकर्त्यांना अठराव्या शतकाच्या आरंभीच झाली होती.

लॉर्ड विल्यम बेंटिकने गव्हर्नर जनरल म्हणून पदभार हाती घेतला तेव्हा कंपनीच्या उत्पन्न व खर्चाचा ताळमेळ नव्हता. यासाठी 'उत्पन्नात वाढ आणि खर्चात कपात' हे आपले ध्येय असल्याचे त्याने जाहीर केले. मुलकी व लष्करी शासन-व्यवस्थेतील खर्च कमी करण्यासाठी चौकशी समिती नेमून अनावश्यक खर्च कमी करण्यावर भर दिला. अफूच्या व्यापारातील दलालांवर नियंत्रण मिळवून सरकारी उत्पन्नवाढीवर भर दिला. लष्करी व दिवाणी नोकरांची संख्या व पगार या दोन्ही बाबींत कपात केली. ज्या शेतजमिनींवर अद्याप साराआकारणी झाली नव्हती त्यांचा सर्व्हे करून त्यांना सारा लागू केला. परिणामी सरकारी उत्पन्नात वाढ झाली. ब्रिटिश अधिकारी व कर्मचाऱ्यांवरील वाढता खर्च कमी करण्याच्या उद्देशाने भारतीयांना अल्प पगारात सरकारी नोकरीत घेण्यास सुरूवात झाली. न्यायदानात जलदता यावी, होणाऱ्या वेळेचा अपव्यय टाळावा म्हणून अपील आणि मंडळ न्यायालये बंद करून बंगाल प्रेसिडेन्सीचे वीस भागांत विभाजन करून प्रत्येकावर कमिश्नर (आयुक्त) नेमले. मुलकी न्यायाधीशांकडेच फौजदारी न्याय विभाग सोपविला. त्या वेळी भारतात न्यायालयाचे कामकाज फारशी भाषेतून चालत असे, ती प्रथा बंद करून त्याने देशी भाषा वापरण्याचा कायदा केला. यामुळे सर्वसामान्य भारतीयांची मोठी सोय झाली.

गव्हर्नर जनरल लॉर्ड विल्यम बेंटिकच्या काळात लॉर्ड मेकॉले याची गव्हर्नर जनरल मंडळात विधीमंत्री म्हणून नियुक्ती झाली. इंग्रजी भाषेतून भारतीयांना पाश्चात्त्य ज्ञान-विज्ञान मिळावे, शाळा व महाविद्यालये उघडावीत यासाठी सरकारने आर्थिक प्रोत्साहन देऊन मदत करावी म्हणून तो प्रयत्नशील होता. भारतात इंग्रजी भाषेतून शिक्षणाची सुरूवात करण्याचे काम लॉर्ड मेकॉले याने केले. मार्च १८३५ मध्ये ठराव पास करून भारतात इंग्रजी शिक्षणाची सुरूवात केली.

लॉर्ड मेकॉलेने अपनी माँ को दिनांक २२ अक्तूबर १८३६ के पत्र में लिखा था, 'हमारी शिक्षा योजना पर अमल किया जाए जो बंगाल में ३० वर्ष में एक भी मूर्ति-पूजक नहीं रहेगा।'[४]

गव्हर्नर जनरल लॉर्ड विल्यम बेंटिकने कलकत्त्यात मेडिकल कॉलेज सुरू केले. भारतात इंग्रजी भाषेच्या माध्यमातून पाश्चात्त्य विज्ञान व साहित्याचा प्रचार-प्रसार केला. लॉर्ड विल्यम बेंटिकनंतरचा भारताचा गव्हर्नर जनरल सर चार्ल्स मेटकाफ म्हणतो, "ज्ञानाच्या प्रसारामुळे परिणामी आमच्या हिंदी राज्याचा अन्त होईल असे म्हणणे असेल तर त्यावर माझे असे उत्तर आहे की, परिणाम काही झाला तरी ज्ञानाचे फायदे त्यांना उपभोगू देणे हे आमचे कर्तव्य आहे. हिंदी लोकांना अज्ञानात ठेवल्यानेच तो देश आमच्या साम्राज्यात राहू शकत असेल तर आमचे प्रभुत्व हा या देशाला शापच ठरेल व त्याचा अन्त होणेच अवश्य होईल. ज्ञानाच्या प्रसारामुळे आमच्या साम्राज्याची बळकटी अधिकच वाढेल या दृष्टीने मी त्याचा विचार करतो. त्यामुळे राज्यकर्ते व प्रजाजन यांच्यात सहानुभूती निर्माण होऊन परस्परांत ऐक्य नांदू लागेल आणि आज जे त्यांच्यात अंतर आहे ते हळूहळू कमी होऊन परिणामी पार नाहीसे होईल."[५] भारतीयांच्या धार्मिक क्षेत्रात ढवळाढवळ करण्याची लॉर्ड विल्यम बेंटिकची इच्छा नव्हती. लॉर्ड विल्यम बेंटिक पूर्वकाळात अनेक स्त्रिया सती गेल्याची उदाहरणे आढळतात. इ. स. १८१५ साली एका बंगाल प्रांतात ३७८ संख्या सतींची

होती, ती इ. स. १८१८ साली ८३९ झाली.[६] या आकडेवारीवरून असे लक्षात येते की, मृत पतीच्या चितेवर जिवंत स्त्रीला जाळण्याची अमानवीय सती प्रथा समाजमान्य होती. या कुप्रथेच्या निर्मूलनासाठी पदभार घेताच लॉर्ड विल्यम बेंटिकने डिसेंबर १८२९ मध्ये सती प्रथा बंदी कायदा करून ही अमानवीय प्रथा बंद केली व भारतीय स्त्री वर्गास मोठा दिलासा दिला. या क्रांतिकारी निर्णयाने लॉर्ड विल्यम बेंटिकची कारकीर्द ब्रिटिशकालीन भारताच्या इतिहासात अविस्मरणीय ठरली. या कायद्याने धर्माच्या नावाखाली भरडल्या जाणाऱ्या भारतीय स्त्रीला धार्मिक अंधश्रद्धेतून मुक्ती मिळाली. सती प्रथा बंदीचे स्वागत आणि समर्थन भारतामध्ये सर्वप्रथम बंगालमधून आद्य समाजसुधारक राजा राममोहन रॉय यांनी केले तसेच ओरिसातील आदिवासी समाजातील नरबळीची प्रथा, खान्देश - वऱ्हाड येथील स्त्रियांचा व्यापार अशा अनेक सामाजिक समस्यांविरोधात गव्हर्नर जनरल लॉर्ड विल्यम बेंटिकने कडक पावले उचलली.

गव्हर्नर जनरल लॉर्ड विल्यम बेंटिकची कारकीर्द शांततेची होती. त्याच्या काळात मोठी युद्धे जरी झाली नसली तरी त्याने आपल्या साम्राज्य विस्तारासाठी अराजकतेच्या नावाखाली देशी संस्थाने बडतर्फ केली. म्हैसूरचा राजा कृष्णराज वाडियार उधळपट्टी करणारा होता. परिणामी म्हैसूर राज्यातील जनतेत असंतोष निर्माण झाला होता. गव्हर्नर जनरल लॉर्ड विल्यम बेंटिकने राजा कृष्णराज वाडियार यास पदावरून पदच्युत करून त्याच्या जागी ब्रिटिश कमिशनरची नेमणूक केली. पुढे इ. स. १८८१ मध्ये व्हाईसराय लॉर्ड रिपनच्या काळात कृष्णराज वाडियारच्या वंशजांना म्हैसूर संस्थान परत देण्यात आले. इ. स. १८२० पासून कुर्ग येथे चिक्कराय राज्य करीत होता. तो अत्यंत अन्यायी व दुष्ट होता. त्याच्या वागण्याने सर्व प्रजा असंतुष्ट व त्रस्त होती. गव्हर्नर जनरल लॉर्ड विल्यम बेंटिकने त्याची समजूत काढण्याचा बराचसा प्रयत्न केला परंतु निरर्थक ठरला. शेवटी इ. स. १८३४ मध्ये

कुर्ग संस्थान खालसा केले. आसाममध्ये मणिपूरला लागूनच कछार नावाचे एक लहानसे राज्य होते. येथील राजा गोविंदचंद्र इ. स. १८३० मध्ये मृत्यू पावला. तो निपुत्रिक असल्याने त्याचे राज्य खालसा करून कंपनीच्या साम्राज्याला जोडले. पंजाबचा राजा रणजितसिंह अत्यंत पराक्रमी व स्वाभिमानी होता. त्याच्यापासून आपल्या सत्तेला धोका आहे ही बाब गव्हर्नर जनरल लॉर्ड विल्यम बेंटिक चांगल्या पद्धतीने ओळखून होता. म्हणून त्याने रणजितसिंहाशी मैत्री प्रस्थापित करण्यासाठी लेफ्टनंट रॉबर्ट बर्न यास नजराणे देऊन लाहोरला पाठविले. एवढ्यावरच संतुष्ट न होता तो रणजितसिंह यांना भेटावयास गेला. उभयतांनी परस्परांचे स्वागत करून एकमेकांना मदत करण्याचे मान्य करून मैत्री धोरण अवलंबिले. शिवाय राजा रणजितसिंहाने आपल्या राज्यात कंपनीला व्यापाराची परवानगी दिली.

इ. स. १८३३ च्या चार्टर ॲक्टअन्वये ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीला भारतात व्यापारासाठी येथून पुढे २० वर्षांसाठी नवीन सनद देण्यात आली. आग्रा येथे नवीन प्रांत निर्माण करून त्यास वायव्य प्रांत असे नाव देण्यात आले. कंपनीच्या प्रशासनासाठी आवश्यक ते सर्व कायदे करण्याचा अधिकार या कायद्याने गव्हर्नर जनरलला मिळाला तसेच मुंबई व मद्रास येथील प्रांतीय गव्हर्नरांना असलेला कायदे करण्याचा अधिकार काढून घेण्यात आला. आतापर्यंत गव्हर्नर जनरलला केवळ बंगालचा गव्हर्नर जनरल असे संबोधले जात परंतु या कायद्यामुळे आता भारताचा गव्हर्नर जनरल म्हणून त्यास मान्यता देण्यात आली. ब्रिटिश सत्तेच्या भारतातील विस्तारीकरणात गव्हर्नर जनरल लॉर्ड विल्यम बेंटिकच्या काळातील चार्टर ॲक्ट हे अत्यंत महत्त्वपूर्ण पाऊल आहे.

**निष्कर्ष :**

(१) गव्हर्नर जनरल लॉर्ड विल्यम बेंटिकच्या सती प्रथा बंदी कायद्यामुळे भारतीय स्त्रियांच्या सामाजिक परिस्थितीत सुधारणा झाली.

(२) गव्हर्नर जनरल लॉर्ड विल्यम बेंटिकच्या शैक्षणिक कार्यामुळे भारतीय शिक्षणव्यवस्थेत इंग्रजी भाषेतून शिक्षणास सुरूवात झाली.

(३) इ. स. १८३३ च्या चार्टर ॲक्टने गव्हर्नर जनरल अधिकार संपन्न झाला.

(४) साम्राज्यविस्तार व आर्थिक धोरणातून इंग्लंडच्या तिजोरीत मोठ्या प्रमाणात आर्थिक भर पडली.

(५) स्वातंत्र्योत्तर भारताच्या शासनव्यवस्थेवर ब्रिटिश राजवटीचा प्रभाव आहे.

गव्हर्नर जनरल लॉर्ड विल्यम बेंटिकच्या काळात युद्धांऐवजी शांतता व सुधारणांचे प्रमाण अधिक पाहायला मिळते. भारतीय समाजजीवनातील अनेक पारंपारिक चालीरीतींवर कायद्याने प्रहार करून शैक्षणिक व वैज्ञानिक दृष्टिकोनास सुरूवात केली. इंग्लंडच्या तिजोरीत वाढ आणि भारतावरील ब्रिटिश सत्ता आणखी भक्कम करण्यासाठी प्रयत्नदेखील केले. पुढे इ. स. १८५७ मध्ये गव्हर्नर जनरल लॉर्ड कॅनिंगच्या काळात ब्रिटिश सत्तेविरूद्ध उठाव करण्यात आला परंतु त्यात भारतीयांना यश आले नाही परंतु उठावानंतर मात्र भारताच्या राजकीय, शैक्षणिक व सामाजिक परिस्थितीत मोठा बदल झाल्याचे दिसून येते.

**संदर्भ :**

(१) जावडेकर शं. द., आधुनिक भारत, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, २००९, पृ. ९.

(२) सरदेसाई गो. स., हिंदुस्थानचा अर्वाचीन इतिहास मुसलमानी रियासत भाग दुसरा, महादेव आणि कंपनी, पुणे, १९२८, पृ. ३९५.

(३) तळवलकर गोविंद, सत्तांतर : १९४७, खंड-०१, मौज प्रकाशन गृह, मुंबई, १९८३, पृ. १८.

(४) नाथ धर्मेन्द्र, १८५७ का मुक्तिसंग्राम भ्रम, भ्रान्तियॉ और सत्य, राधा पब्लिकेशन्स्, नई दिल्ली, २०११, पृ. १५.

(५) उपरोक्त, जावडेकर शं. द., पृ. ३६.

(६) गर्गे स. मा. (संपा.), ब्रिटिश रियासत, खंड-०२, ईस्ट इंडिया कंपनी (उत्तरार्ध), (इ. स. १८५८ पर्यंत), पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, २०१२, पृ. २७१.

❍❍❍

(१२)

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरपूर्व अस्पृश्य चळवळीतील शिलेदार

**श्रीमती मायादेवी साहेबराव खळगे**
संशोधक विद्यार्थी
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

पिढ्यानु पिढ्या ब्राह्मणांच्या सर्वतोपरी गुलामगिरीत राहणाऱ्या शूद्र-अतिशूद्रांमध्ये ब्रिटिशांनी आरंभिलेल्या शिक्षणव्यवस्थेमुळे चैतन्य निर्माण झाले होते. आपल्या गुलामगिरीच्या कारणाचा शोध ते घेऊ लागले. शूद्र समजल्या गेलेल्या समाजाच्या चळवळीचा प्रारंभ जसा हा काळ होता त्याप्रमाणेच या काळातही अस्पृश्यावरील अन्यायाला वाचा फोडण्यासाठी व त्यांची उन्नती व्हावी यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरपूर्व अनेक अस्पृश्य नेते निर्माण झाले होते. ज्यांच्या जीवनकार्याची सामान्य लोकांना अद्यापही ओळख झालेली नाही. यासाठी आंबेडकरपूर्व अस्पृश्यांच्या चळवळीमधील गोपाळबाबा वलंगकर, शिवराम जानबा कांबळे आणि किसन फागुजी बनसोडे यांच्या जीवनकार्याविषयीची थोडक्यात माहिती सदरील लेखामध्ये दिलेली आहे.

**गोपाळबाबा वलंगकर :**

अस्पृश्यांच्या चळवळीमध्ये ज्यांचे प्रथम नाव घेतले जाते ते म्हणजे गोपाळबाबा वलंगकर होय. गोपाळबाबा हे महार जातीत जन्मलेले रावदूल या गावचे रहिवासी होते. रावदूल हे छोटेसे गाव रायगड जिल्ह्यातील महाडच्या जवळ होते. योग्य वय झाल्यावर ते ब्रिटिशांच्या फलटणीत सामील झाले. त्यांनी रामानंद पंथाची स्वीकृती केली होती. त्यांचा हिंदू धर्मग्रंथाचा दांडगा अभ्यास होता. स्पृश्य-अस्पृश्यतेमुळे अस्पृश्यांच्या होत असलेल्या विटंबनेच्या कार्यकारणभावाचा शोध घेण्याचा त्यांनी प्रयत्न केला. "गोपाळबाबांची फलटण पुणे व मुंबईला येत असे तेव्हा ते महात्मा जोतिराव फुले व त्यांचे कार्येकर्ते यांच्याशी ते जातिभेद पुराणे व चळवळीच्या संदर्भात

चर्चा करीत असत."[१] अस्पृश्यांवर ज्यांनी अस्पृश्यतेचा कलंक लावला ते आर्य व इतर सर्व अनार्य असे ते म्हणत असत. आर्य-अनार्य हाच विचार या अगोदर जोतिरावांनी मांडला होता. आर्य लोकांनी परधर्मी व परदेशी लोकांना अस्पृश्य का मानले नाही याचे कारण पुरातनकाळी सवर्ण हे अस्पृश्यांचे हाडवैरी असावेत, असा त्यांचा निष्कर्ष होता.

गोपाळबाबा इ. स. १८८६ साली हवालदार या पदावरून निवृत्त झाले. नंतर ते दापोलीला राहावयास गेले. येथूनच त्यांनी आपली चळवळ चालविली होती. त्यांनी एक संस्था अस्पृश्यांच्या उद्धारासाठी स्थापन केली होती. याबद्दल रावसाहेब कसबे यांचे विधान लक्षात घेता येईल. "गोपाळबुवा सैन्यातून निवृत्त झाले नि त्यांनी 'अनार्य दोष परिहार मंडळी' या नावाची संस्था स्थापन केली."[२] अस्पृश्यांनी स्थापन केलेली ही पहिलीच संस्था होय. "सत्यशोधक समाजाचे अध्वर्यू जोतिबा फुले यांचे खरे साथीदार व उत्साही शिष्यांपैकी बरेचसे जण या संस्थेच्या चालकांपैकी होते. एकाच्या नावाचा उल्लेख केल्याशिवाय माझ्याने राहवत नाही. ते गृहस्थ म्हणजे (कै.) गोपाळबुवा वलंगकर हे होत. त्यांनी आपल्या लेखनाद्वारे जी जागृती केली ती अनुपम आहे. ज्यांना ती पाहावयाची असेल त्यांनी दीनबंधूच्या जुन्या फाईली वाचून पाहाव्यात म्हणजे कळेल."[३]

गोपाळबाबा हे वर्तमानपत्रांतून आपले विचारही लेखांच्याद्वारे व्यक्त करीत असत. गोपाळबाबा वलंगकर हे "सुधारक' व 'दीनबंधू' या वर्तमानपत्रांतून ते अस्पृश्यांच्या मानवी हक्कांबद्दल लेखही प्रसिद्ध करीत असत."[४] जातिभेद आणि अस्पृश्यता हे काल्पनिक राक्षस आर्य म्हणविणाऱ्या हिंदूनी निर्माण केलेले आहेत. यात ईश्वराचा काहीही संबंध नाही. अस्पृश्यांची दुर्दशा व्यक्त करण्यासाठी त्यांनी 'विटाळविध्वंसन' ही पुस्तिका १८८८ रोजी लिहिली. ही पुस्तिका नंतरच्या काळात विस्मृतीत गेली होती. ही पुस्तिका पुन्हा एकदा प्रकाशित केली गेली. ज्यामध्ये प्रस्तावना 'रोझलिंड ओ हॅनलल' यांनी लिहिली आहे. त्यामध्ये ते म्हणतात की, "महात्मा जोतिराव फुले व तत्कालीन सत्यशोधक समाज यांजविषयक संशोधन सामुग्रीचा शोध घेताना पुणे येथील विश्रामबाग वाड्यातील शासकीय ग्रंथालयात मला हे पुस्तक आढळले."[५] या शोधामुळेच गोपाळबाबांचे पुस्तक रूपातील विचार

आज आपणांस माहीत होतात. साधारणतः गोपाळबाबांनी 'विटाळविध्वंसन' या छोटेखानी पुस्तिकेत "हिंदूधर्म' सिंधूचे मंथन करून एकूण सव्वीस प्रश्न सर्व पवित्र असणाऱ्या हिंदूना विचारले आहेत आणि त्यांचा निवाडा करून छायास्पर्शाविषयी महार कोणत्या दोषास पात्र आहेत हे सिद्ध करण्याचे आव्हान दिले आहे.'[६] असे सर्वांना एका अस्पृशांकडून आव्हान देणे ही आधुनिक भारतीय इतिहासातील प्रथमच घटना होय. आपल्या लेखनपत्राचा विचार शंकराचार्य व राष्ट्रीय सभेने करावा, असेही त्यांनी म्हटले होते. शेवटी त्यांनी सवर्ण लोकांनाही त्यामध्ये इशारा दिला होता. ते म्हणतात की, "न्याय मिळाला नाही तर सर्व कोकणस्थ महार हा प्रांत सोडू." विनंती पत्राच्या सर्वात शेवटी त्यांनी जोतिराव फुले यांचा प्रिय शब्द 'सत्यमेव जयते' हा लिहिला होता. खैरमोडे लिहितात की, "अस्पृश्यांच्या चळवळीचे आद्यजनक गोपाळबुवा वलंगकर हे १९०० साली रावदुलला वारले."[७] गोपाळबाबा यांचे कार्य आंबेडकरपूर्व अस्पृश्यांच्या चळवळीमध्ये अत्यंत महत्त्वाचे होते.

**शिवराम जानबा कांबळे :**

अस्पृश्योद्धाराचे दुसरे कार्यकर्ते ते म्हणजे शिवराम जानबा कांबळे होत. कांबळे हे आंबेडकरपूर्व काळातील पहिले अस्पृश्य पत्रकार, प्रकाशक, मुद्रक व संपादक होते. कांबळे यांनी सन १९०४ मध्ये "श्री शंकर प्रसादिकीय सोमवंशी हितचिंतक मित्र समाज" नावाची संस्था स्थापन केली तसेच वाचनालयही सुरू केले होते. शिवराम जानबा कांबळे यांनी सासवड येथे ५१ गावांतील महार लोकांची १९०३ साली सभा घेतली होती. या सभेमध्ये महारांना शिक्षण व नोकऱ्या मिळाव्यात म्हणून त्यांनी सरकारदरबारी अर्ज दाखल केले.

शिवराम जानबा कांबळे यांनी इ. स. १९०८ ते १९१० या कालखंडात 'सोमवंशीय मित्र' नावाचे मासिक सुरू केले होते. या मासिकाबद्दल चां. भ. खैरमोडे म्हणतात की, "कांबळे यांनी दि. ०१ जुलै १९०८ ला 'सोमवंशीय मित्र' या नावाचे मासिक सुरू केले. त्याची वार्षिक वर्गणी ८ आणे होती. या मासिकातून त्यांनी अस्पृश्य वर्गाच्या शैक्षणिक, धार्मिक, सामाजिक व आर्थिक प्रगतीसाठी अनेक लेख लिहिले व त्यांनी समाजसुधारणेसाठी चालविलेल्या चळवळीचे वृत्तान्त या मासिकाद्वारे प्रसिद्ध केले."[८] कांबळे यांनी स्वतःच्या मासिकाबरोबरच इतर वर्तमानपत्रातदेखील

त्यांनी लेखन केल्याचे आढळते. याबद्दल डॉ. पानतावणे म्हणतात की, "तत्कालीन ज्ञानप्रकाश, डेक्कन हेरॉल्ड, दीनबंधू, टाइम्स ऑफ इंडिया, दलितबंधू इत्यादी पत्रांत त्यांनी लेखन केले. स्वतःच्या 'सोमवंशीय मित्र' मध्ये तर सातत्याने लिहिले."[९] अशा प्रकारे त्यांनी अनेक वर्तमानपत्रांतून आपल्या लेखणीच्या आधारावर अस्पृश्यांचा उद्धार व त्यांच्यात जागृती करण्याचा प्रयत्न केला.

जुन्या रूढी व परंपरा यांना कांबळे यांनी कडाडून विरोध केला. अस्पृश्य समाजात देवी-देवतांना मुले व मुली सोडण्याची जी कुप्रथा होती त्याविरोधात त्यांनी जोरदार चळवळ उभी केली. या चळवळीबद्दल खैरमोडे यांचे विधान महत्त्वाचे ठरते. ते म्हणतात, "मुरळ्या व जोगत्या म्हणून देवींना मुली सोडणे व त्या उपवर झाल्यानंतर त्यांच्या देहविक्रयावर त्या मुलींच्या नातलगांनी जगणे, ही रूढी अत्यंत अमानुष, तिरस्करणीय व समाजहितबाधक आहे, अशी त्यांनी चळवळ केली."[१०] तेव्हा काही जोगत्या व मुरळ्या आपला पेशा सोडून लग्न करून सांसारिक जीवन कंठण्यास तयार झाल्या. सामाजिक सुधारणेत महार व अस्पृश्य यांची मनोभूमिका आणखीनही तयार झालेली नाही हे ओळखून शिवराम जानबा कांबळे व त्यांचे सहकारी यांनी परिषद भरविली होती. ही परिषद म्हणजे भारत देशातील अस्पृश्य लोकांतील प्रथम परिषद होय. याबद्दल धनंजय कीर लिहितात की, "अस्पृश्य समाजातील शिवराम जानबा कांबळे हे महाराष्ट्रातील अस्पृश्य समाजात जागृतीचे कार्य करीत होते. 'सोमवंशीय मित्र' या नावाचे एक मासिक ते पुण्याहून प्रसिद्ध करीत असत. भारतातील पहिली अस्पृश्यांची परिषद बोलविण्याचा मान या कर्तृत्ववान नेत्याचा आहे."[११]

शिवराम जानबा कांबळे यांनी अखिल भारतीय परिषदेतही भाग घेतला होता. ही परिषद १९२० साली नागपूर या ठिकाणी भरली होती. विशेष म्हणजे या परिषदेत कांबळे यांनी आपले विचारही व्यक्त केले होते. याबद्दल पानतावणे म्हणतात की, "१९२० च्या नागपूर येथील अखिल भारतीय बहिष्कृत वर्ग परिषदेत त्यांनी भाषणही केले होते. तेव्हा अस्पृश्य वर्गात शिक्षणप्रसार, त्यांना स्वत्वाची जाणीव करून देणे, अन्याय-जुलुमाविरूद्ध लढा पुकारण्यासाठी प्रवृत्त करणे, जुन्या चालीरीतींचा त्याग करणे इत्यादी बाबतींत शिवराम जानबांनी जिवापाड

परिश्रम केले."[१२] अशा प्रकारे शिवराम जानबा कांबळे हे एक द्रष्टे, परखड विचार मांडणारे व समाज सुधारणा व्हावी या दृष्टीने लढा देणारे, अस्पृश्यांचे नेतृत्व करणारे नेते होते.

**किसन फागूजी बनसोडे :**

गोपाळबाबा वलंगकर व शिवराम जानबा कांबळे यांच्यानंतर किसन फागूजी बनसोडे हे एक महत्त्वाचे अस्पृश्य नेते होते. किसन फागूजी बनसोडे यांची सामाजिक जागृती व वृत्तपत्रीय क्षेत्रातील कामगिरी महत्त्वाची आहे. बनसोडे यांचा जन्म १८ फेब्रुवारी १८७९ रोजी नागपूर जिल्ह्यातील मोहपा या गावी झाला.

अस्पृश्य समाजात जागृती व्हावी या दृष्टीने किसन फागूजी बनसोडे यांनी एक संस्था स्थापन केली होती, तिचे नाव 'सन्मार्गबोधक निराश्रित समाज' होते. ही संस्था १९०३ साली स्थापन करण्यात आली होती. "हीनदीन अशा अस्पृश्य समाजाला त्यांच्या स्थितीची जाणीव करून द्यावी, त्यांच्या विद्येचा प्रसार करावा, त्यांची आर्थिक, औद्योगिक व नैतिक उन्नती व्हावी म्हणून किसन फागूंनी १९०३ साली 'सन्मार्गबोधक निराश्रित समाज' नावाची संस्था स्थापन केली."[१३] आपले तमाम विचार अस्पृश्यांपर्यंत पोहोचावेत म्हणून वृत्तपत्र व वृत्तपत्रांतील लेखन या प्रभावी माध्यमांचा वापर त्यांनी केला होता. त्यासाठी त्यांनी छापखाना उभारला होता. ज्ञानप्रकाश, सुबोधपत्रिका, देशसेवक, मुंबई वैभव, केसरी, काळ या विविध वर्तमानपत्रांतून त्यांनी आपले विचार मांडले होते. एवढेच नव्हे तर बनसोडे यांनी स्वतःची काही पत्रे सुरू केली होती. याबद्दल पानतावणे लिहितात की, "निराश्रित हिंद नागरिक' (१९१०), 'विटाळ विध्वंस' (१९१३), आणि 'मंजूरपत्रिका' (१९१८) ही पत्रे स्वतःच सुरू करून दलित पत्रकारितेच्या क्षेत्रात भरीव असे त्यांनी कार्य केले."[१४] किसन फागूजी बनसोडे यांनी सामाजिक, आर्थिक, धार्मिक, सांस्कृतिक लेख यांतून मूलभूत प्रश्नांना हात घातला होता. त्यासाठी धर्म, धर्मग्रंथ, चालीरीती, रूढी-परंपरा, अन्याय यामागील उद्दिष्टे व त्याचे समाजव्यापी होणारे परिणाम यांची संक्षेपाने मीमांसा करते. धर्माच्या नावाखाली होणाऱ्या अन्याय-अत्याचाराची विसंवादी चर्चा करते. हे सर्व लेखन सामाजिक सुधारणा व मानवी प्रतिष्ठा याची मूल्यभावना जपणारे आहे. त्यामुळे त्यास अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त होते.

**निष्कर्ष :**

(१) अस्पृश्यांवर ज्यांनी अस्पृश्यतेचा कलंक लावला ते आर्य व इतर सर्व अनार्य अशी मांडणी गोपाळबाबा यांनी केली होती.

(२) आर्य लोकांनी इतर धर्मीय व बाह्यदेशी लोकांना अस्पृश्य का मानले नाही? कारण पुरातन काळी अस्पृश्यजनांचे ते हाडवैरी असावेत, असा निष्कर्ष गोपाळबाबा काढतात.

(३) एका अस्पृश्य व्यक्तीने अस्पृश्यांवरील अन्याय-अत्याचारास वाचा फोडण्यासाठी स्थापन केलेली अनार्य दोष परिहार मंडळी ही प्रथमच संस्था होती.

(४) मुरळ्या व जोगत्या म्हणून देवीला मुली सोडणे आणि तिच्यावर तिच्या नातलगांनी उदरनिर्वाह करणाऱ्या कुप्रथेचा कडाडून विरोध शिवराम जानबा कांबळे यांनी केला होता. त्याची फलश्रुती म्हणून काही मुरळ्या आणि जोगत्या यांनी त्यांचा पेशा सोडून संसारिक जीवनात आल्या होत्या.

(५) डॉ. बाबासाहेब आंबेडकरपूर्व किसन फागुजी बनसोडे यांनी निराश्रित हिंद नागरिक, विटाळ विध्वंस आणि मजूरपत्रिका ही पत्रे सुरू करून अस्पृश्यांवर होत असलेल्या अन्यायास वाचा फोडली होती.

**संदर्भ :**


(१) खैरमोडे चां. भ., डॉ. भीमराव रामजी आंबेडकर चरित्र, खंड पहिला, सुगावा प्रकाशन, पुणे, २०१३, पृ. २०४.

(२) कसबे रावसाहेब, आंबेडकर आणि मार्क्स, सुगावा प्रकाशन, पुणे, २००६, पृ. ९६.

(३) उपरोक्त, खैरमोडे चां. भ., २०१३, पृ. २०६.

(४) उपरोक्त, पृ. २०५.

(५) वलंगकर गोपाळबाबा, विटाळ विध्वंसन, सुगावा प्रकाशन, पुणे, २००७, पृ. १.

(६) उपरोक्त, पृ. ६.

(७) उपरोक्त, खैरमोडे चां. भ., २०१३, पृ. २०५.

(८) उपरोक्त, पृ. २०७.

(९) पानतावणे गंगाधर, पत्रकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सुगत प्रकाशन,नागपूर,२०१५, पृ. ३७.

(१०) उपरोक्त, खैरमोडे चां. भ., २०१३, पृ. २०७.

(११) कीर धनंजय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, २००६, पृ. २८.

(१२) उपरोक्त, पानतावणे गंगाधर, २०१५, पृ. ३६.

(१३) पानतावणे गंगाधर, पत्रकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर, प्रतिमा प्रकाशन, पुणे, १९९६, पृ. ४७.

(१४) उपरोक्त, पानतावणे गंगाधर, २०१५, पृ. ४७.


❍❍❍

गोषवारा

१

# मानव व पृथ्वी यांच्या सहसंबंधाचा पर्यावरणीय इतिहास

**श्री. आनंद मारोतीराव पौळकर**
श्री अनंतपाळ नूतन विद्यालय, शिरूर अनंतपाळ, जि. लातूर

आजच्या आधुनिक मानवाची उत्पत्ती ही एकपेशीय सजीवापासून हजारो वर्षांपूर्वी झालेली आहे. मानव व पर्यावरण यांच्यासह अस्तित्वातूनच आजचा आधुनिक मानव पृथ्वीवरील आपले अस्तित्व टिकवून आहे. मानव व पर्यावरण या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. जगात ज्या प्राचीन संस्कृती उदयास आल्या त्यात भारतातील सिंधू संस्कृतीचा उदय (हडप्पा) सिंधू नदीच्या काठी झाला. नाईल संस्कृतीचा उदय ईजिप्त, तैग्रिस व युफ्रेटिस नदीकाठी मेसोपोटेमिया संस्कृती, होयांग नदीच्या काठी चिनी संस्कृतीचा उदय झाला.

मानवाच्या उत्क्रांतीपासून पर्यावरण व मानव यांच्या सहसंबंधातूनच शेतीचा विकास झाला. मनुष्य हा शेती करण्यासाठी समूहाने राहू लागला. त्यातूनच मानवाच्या विविध संस्कृतींचा उदय झाला. पर्यावरणाशिवाय मानवाच्या विकासाचा विचारही आपण करू शकत नाही. अश्मयुगापासून आजच्या आधुनिक काळातील विज्ञान-तंत्रज्ञानाच्या युगातील मानवाचा विकास पर्यावरणातूनच झाला आहे. पर्यावरणाच्या बदलास अनुसरून मानवाने आपल्या व्यवसायाच्या माध्यमातून जीवनात सकारात्मक बदल घडवून आणले. पर्यावरणाशिवाय मानवाच्या अस्तित्वाची आपण कल्पनादेखील करू शकत नाही.

पृथ्वीवरील जमीन, हवा, पाणी या जीवावरणाच्या माध्यमातूनच सजीव सृष्टी उदयास आली व तिचे अस्तित्व आजपर्यंत टिकून आहे. निसर्ग, मानव त्याभोवतालचा सर्व परिसर ही अद्वितीय सांगड आहे. ही सांगड एकमेकांपासून कधीच वेगळी करता येणार नाही.

जगभरातील प्राचीन संस्कृतीमध्ये मानवाच्या इतिहासाचा पर्यावरणाच्या दृष्टिकोनातून विकास कसा होत गेला यांचा एक आढावा या लेखाच्या माध्यमातून आपण घेणार आहोत. मानवाच्या प्राचीन, मध्ययुगीन, आधुनिक काळापर्यंतच्या विकासात पर्यावरणाचा सिंहाचा वाटा आहे. मानवाने आपल्या बुद्धीच्या जोरावर इतर प्राण्यांच्या तुलनेत प्रगती करून पृथ्वीवर आपले अधिराज्य निर्माण केले आहे. प्राचीन काळातील शेतीचा शोध, चाकाचा शोध, अग्नीच्या शोधातून मानवाच्या विकासास सुरूवात झाली.

❍❍❍

## २

# रेशमी रूमाल आंदोलन : एक परिचय

**श्रीमती हाजेरा बानो अजहर आफाख**
नॅशनल उर्दू माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, बीड

रेशमी रूमाल आंदोलनने भारतीय स्वतंत्रता आंदोलनमें महत्त्वपूर्ण भुमिका निभाई हैं। जिसके अंतर्गत ब्रिटिश साम्राज्यवाद के विरूद्ध संघर्ष और स्वाधीनता के उज्ज्वल अध्याय प्रकाशमें आते हैं। रेशमी रूमाल आंदोलन को तहरीक-ए-शेख-उल-हिंद भी कहा गया हैं। हजरत मौलाना महेमूद हसन जिन्हें शेख-उल-हिंद की उपाधी दी गई थी, देश और राष्ट्र की सेवा में शेख-उल-हिंद और उनके सहकारियों ने जो महान संघर्ष किया है वह भारत कि स्वतंत्रता के आंदोलन का स्वर्णिम अध्याय हैं। परंतु, दुर्भाग्य से रेशमी रूमाल आंदोलन को इतिहास में लगातार उपेक्षित किया गया हैं। हजरत मौलाना शेख-उल-हिंद महेमूद हसन कौन थे और रेशमी रूमाल आंदोलन क्या था, यह हमारी और आनेवाली पीढियों को पता ही नही होगा। इसे देखते हुए हमारी आज की और भावी पीढियों को अपने बुजुर्गो की उपलब्धियों से अवगत कराने की आवश्यकता अनुभूत हुई।

१८५७ के स्वतंत्रता आंदोलन की असफलता के पश्चात मुसलमानो के पुनर्जागरण के लिए १८६६ में देवबंद में एक मदरसा (स्कूल) की स्थापना हुई। जिसका नाम दारूलउलूम देवबंद रखा गया। इस मदरसे के पहले विद्यार्थी मौलाना महेमूद हसन थे। दारूलउलूम देवबंद के संस्थापक मौलाना मुहम्मद कासीम नानोतवी के ज्ञान और विचारों के न्यासी मौलाना महेमूद हसन सिद्ध हुए। देश और राष्ट्र की स्वतंत्रता के लिए मौलाना महेमूद हसन की तडपने देश को दारूलउलूम देवबंद के

रूप में एक उद्देशपूर्ण आंदोलन दिया। परिणामी १८६६ में शुरू किए गए छोटे से मदरसे का रूपांतर बडे दारूलउलूम (युनिवर्सिटी) में हो गया। जहाँ शिक्षा के साथ-साथ स्वतंत्रता के संघर्ष का पाठ पढाकर देश के लिए मर मिटने की मानसिकता तयार की जाने लगी। हजरत मौलाना महेमूद हसन भी इसी दारूलउलूम से प्रशिक्षित थे, जिससे उनके दिल में भी देशभक्ती की भावना घर कर गई थी।

१८५७ की स्वाधीनता की लढाई की विफलता के बाद, देवबंद के उलेमाओं ने १८६६ में देश में विद्वानों को तयार करने के लिए दारूलउलूम देवबंद की स्थापना की, जो अंग्रेजोद्वारा फैलाए गए बौद्धिक धर्मत्याग का बचाव कर सके। जिसके लिए मौलाना कासीम ननोतवी के मार्गदर्शन में समरत-उल-तरबीयत नामी एक औपचारिक संघटन का गठन किया गया। मौलाना महेमूद हसन, मौलाना अहेमद हुसैन अमरोही, मौलाना फखर-उल-हसन गंगोही, मौलाना अब्दुल हक खाजवी, मौलवी मुहम्मद फाजेल साहब फुलती इत्यादी इस संघटन के सदस्य थे।

(१) भारत की स्वतंत्रता की लढाई में मुसलमानो और उनके धर्मगुरू (उलेमा) के प्रयत्नोंको भुलाया नही जा सकता।

(२) उलेमाओं का काम मस्जिद, मदरसा और धार्मिक क्षेत्र में होता है, परंतु देश की स्वतंत्रता लढाई के लिए कई आंदोलन किए और मदरसे से देश भक्ती और देश के लिए जान देने की मुसलमानों में मानसिकता बनाई।

(३) उलेमाओं ने हिंदू-मुस्लिम एकता का पुरस्कार किया।

(४) उलेमाओं के संघटन जमीयत-उलेमा-ए-हिंद ने देश की स्वतंत्रता के लिए अखेर तक प्रयास किया।

भारत की स्वतंत्रता की लढाई में बहुत सारे आंदोलन किए गए, इन्ही में से एक रेशमी रूमाल आंदोलन, इस आंदोलन के योगदान को भुलाया नही जा सकता।

❍❍❍

३

# हैद्राबाद राज्याची भौगोलिक रचना (सन १७४७-१९४८)

**डॉ. शामसुंदर दिनकर रत्नपारखी**
बीड

मध्ययुगीन कालखंडात निजाम-उल-मुलुकने मोघल साम्राज्याचा दक्षिणेतील सुभेदार असताना जे स्वतंत्र राज्य स्थापन केले व पुढे ते हैद्राबादचे संस्थान म्हणून ओळखले गेले. त्याची भौगोलिक रचना व प्रशासकीय रचना कशी होती याचा अभ्यास करताना या संस्थानाच्या भौगोलिक रचनेची माहिती मिळाली. सन १७४७ ला निजामी राज्य आपल्या सुरूवातीचा टप्पा ओलांडून संघर्षाच्या मध्यावर येऊन अस्तित्व टिकविण्याचा प्रयत्न करीत होते. कारण दक्षिणेत मराठ्यांचे राज्य विस्तारत होते तर म्हैसूरचे राज्यही आपला विस्तार करीत होते. याच कालखंडात प्रथम फ्रेंच व नंतर इंग्रजाशी मैत्री करून निजामाने आपल्या शत्रूंपासून राज्याचा बचाव केला.

**निजामी राज्याची स्थिती :**

निजामी राज्य स्थिरस्थावर १८१८ नंतर झाले आणि खऱ्या अर्थाने निजामी राज्याची रचना करण्यात आली. त्यानंतर १९०५ पर्यंत यात बदल होत गेले व १९०५ ते १९४७ हा प्रदीर्घ काळ हा बदल कायम राहिला. निजामी राज्यातील प्रादेशिक रचना व कार्यपद्धतीमध्ये आमूलाग्र बदल हा सर पहिला सालार जंग यांच्या काळात झालेला दिसून आला. त्यांनीच निजामी राज्याची पुनर्रचना व कार्यपद्धतीमध्ये बदल केला.

निजामी राज्य हे त्रिभाषिक राज्य म्हणून ओळखले जात होते. यात तेलंगना भागात तेलुगू भाषा, कर्नाटकातील भागात कानडी भाषा व मराठवाड्यातील भागात मराठी भाषा बोलली जात असे. निजामी राज्यानेही आपल्या जुन्या मोघल राज्य पद्धतीचा स्वीकार केला होता. त्यामुळे राजाशी व प्रशासनाशी संबंधित शब्दांमध्ये बदल झालेला दिसून येत नाही. सुभा, महल, सरकार, तालुका, तहसील हे शब्द फारशी व उर्दू भाषेतील आहेत. ते वापरात आणले गेल्याचे दिसून येते.

साधारणपणे १७४७ पासून याची रचना आपल्याला दिसून येते. या कालखंडात पुढीलप्रमाणे हैद्राबाद राज्याची भौगोलिक व प्रशासकीय रचना होती. निजामी राज्यात पाच

सुभे होते, ते पुढीलप्रमाणे...

**(१)** **हैद्राबादचा सुभा :** महबूबलगी, भोंगीर, नालगोंडा, देवरकोंडा, कोईलकोंडा, कोवळे, मंगलूर, वारंगल, एल्गंड, खम्ममेट, अमिगीर, कन्हाई-इलमास.

**(२)** **औरंगाबाद सुभा :** दौलताबाद, जालनापूर (जालना), भिर (बीड), हवेली पैठण, धारूर, परंडा आणि अहमदनगर.

**(३)** **बीदर सुभा :** बीदर, कल्याणी, अक्कलकोट, मुझफ्फरनगर, नांदेड व रायगड.

**(४)** **विजापूर सुभा :** विजापूर, इम्तियाजगड, पुर्गाल, हसनाबाद ऊर्फ गुलबर्गा, फिरोजनगर ऊर्फ रायचूर, नुसरताबाद, नळदुर्ग.

